# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ६३

## सभावृत्तांत

दिनांक - २०.०९.२०१६ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर-२०१६ ची मासिक मा. महापालिका सभा मंगळवार दि.२०.०९.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.पात्रे राम संभाजी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.आर.एस.कुमार

३०. मा.जावेद रमजान शेख

३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३४. मा.राजू मिसाळ

३५. मा.नंदा विकास ताकवणे

३६. मा.नेटके सुमन राजेंद्र

३७. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३८. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३९. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४०. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

४१. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४२. मा.लोंढे गणेश नारायण

४३. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४४. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४५. मा.अपर्णा निलेश डोके

४६. मा.अनंत सुभाष को-हाळे

४७. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४८. मा.जयश्री वसंत गावडे

४९. मा.पवार मनीषा काळूराम

५०. मा.प्रसाद शेट्टी

५१. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

५२. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५६. मा.वाबळे संजय मल्हारराव

५७. मा.मडिगेरी वर्षा विलास

५८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

६०. मा.सुपे आशा रविंद्र

६१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

६२. मा.मोहिनीताई विलास लांडे

६३. मा.अजित दामोदर गव्हाणे

६४. मा.गोफणे अनुराधा देविदास

६५. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६६. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६७. मा.लोंढे शुभांगी संतोष

६८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७९. मा.टाक अरुण मदन

८०. मा.आसवाणी सविता धनराज

८१. मा.वाघेरे सुनिता राजेश

८२. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६. मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०. मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२. मा.बारणे निलेश हिरामण

९३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९४. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९५. मा.बारणे माया संतोष

९६. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९९. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१००. मा.चौंधे आरती सुरेश

१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०४. मा.जवळकर वैशाली राहुल

१०५. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०७. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११०. मा.जम सोनाली पोपट

१११. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११३. मा.गायकवाड संध्या सुरदास

११४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११५. मा.शेंडगे आशा सुखदेव

११६. मा.मोटे किरण बाळासाहेब

११७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११८. मा.संजय केशवराव काटे

११९. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२१. मा.पाटील सुजित वसंत

१२२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे- अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.गावडे-सह आयुक्त, मा.दुधेकर, मा.पठाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कांबळे-प्र. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.निकम, मा.सवणे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे मा.कांबळे, मा.शेख - कार्यकारी अभियंता, मा.बुरसे-मुख्य अभियंता पीएमपीएमएल, मा.लावंड- कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) घंटागाडी ठेकेदार श्री. लोखंडे यांचे कुंटूंबियांना सध्या मिळणाऱ्या मासिक वेतन व त्यांचा शील्लक सेवेचा विचार करुन भविष्यात मिळणा-या वेतनाइतकी रक्कम ठेकेदारांच्या कुंटूंबियास एकरक्कमी आर्थीक मदत देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९३ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

२) मा.भारत निवडणूक आयोगातर्फे मतदार नोंदणी अभियान कार्यक्रम दिनांक- १५ सप्टेंबर २०१६ ते दिनांक-१४ ऑक्टोबर २०१६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक-१८/९/२०१६ (रविवार) व दिनांक-९/१०/२०१६ (रविवार) या दोन्ही दिवशी विशेष मोहिमेचे आयोजन करणेत आलेले आहे. त्या अनुषंगाने सदरच्या विषयाचे अवलोकन करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९३ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, काश्मीरमधील उरी येथील लष्करी तळावर दहशतवादी हल्ल्यात हुतात्मा झालेले जवान तसेच विलास शिंदे- कर्तव्य बजावताना हल्ल्यात हुतात्मा झालेले पोलिस कॉन्स्टेबल, वि.ग.कानिटकर - ज्येष्ठ साहित्यिक, शरद राव - ज्येष्ठ कामगार नेते, राजश्री आंदेकर - पुणे महानगरपालिकेतील विद्यमान नगरसदस्या, लिलाताई परुळेकर - दै.सकाळच्या संचालक, सकाळ साप्ताहिकच्या प्रकाशक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, नंदू होनप - ज्येष्ठ संगीतकार, शंकर हुसेन लोखंडे - महापालिकेतील घंटागाडी ठेकेदार, श्री.चपटे - पोलिस फौजदार, बारकु नथु पवार - विद्यमान नगरसेवक मा.संपत पवार यांचे चुलते, विमल गणेश ओव्हाळ - विद्यमान नगरसेविका विमल जगताप यांच्या नणंद, विष्णू पवार - लांडेवाडी भोसरीतील नागरीक, संजय ज्ञानेश्वर निकाळजे - वाल्हेकरवाडी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

**मा.अरुण बो-हाडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.अरुण बो-हाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. नुकत्याच दोन दिवसापुर्वी भारतीय सिमेवरती काश्मिर याठिकाणी कर्तव्य बजावत असताना पाकिस्तानी सैन्यानी केलेल्या भ्याड हाल्ल्यामध्ये २१ भारतीय जवान शहीद झाले. खरंतर भारताला स्वातंत्र मिळाल्यापासून अनेकवेळा पाकिस्तान एका बाजून हाल्ले करत आहे. दुस-या बाजूने भारत सरकारने कधीतरी त्यठिकाणी प्रतिउत्तर दिलेली आहेत. पण अनेकदा भारताने सांमजस्याची भूमिका घेतली एका बाजुला शांततेची भुमिका आणि शांततेच्या चर्चा चालू असताना मग कारगील असेल, सियाचीन असेल किंवा वारंवार होणारे काश्मिर हाल्ले असतील भारतीय जवान हा कर्तव्य बजावताना त्यांच्यावरती शहीद होण्याची वेळ येते. पाकिस्तानने तर संपुर्ण जगामध्ये लज्जास्पद असे वर्तन करत एका बाजूला सहकार्याची भूमिका भारताकडून मागत आहेत भारतानेही वेळोवेळी ती देऊ देखील केली आहे. त्याचवेळेला कोणताही मुलाहीजा न ठेवता पाकिस्तानचे सैन्य ऐनवेळेला कुठतरी येऊन घातपाती कृत्य करतयं आणि भारतीय जवानाना कंठस्थान देण्याची लज्जास्पद कामगीरी पाकिस्तान कडून केली जाते. अतीशय निषेधार्ह, काश्मिरचा करावा तेवढा धिक्कार हा कमी आहे. या सभागृहाच्या वतीने भारत सरकारला मी एकच विनंती यानिमीत्ताने करु इच्छितो की आता हे सामंजस्य आणि शांतता या गोष्टी बाजूला ठेवुन पाकिस्तानला रोखठोक गोळीला गोळीने उत्तर देण्याची वेळ आलेली आहे. भारतसरकारने याचा विचार करुन पाकिस्तानला त्वरीत तीतक्याच ताकदीचे प्रतीउत्तर देवून भारतीय सैन्याचे मनोधैर्य वाढविण्याच्या दृष्टिने पाऊल उचलावीत. तरी मी पाकिस्तानचा तीव्र शब्दात धिक्कार करतो आणि या शहीदाला श्रध्दांजली अर्पण करुन याठिकाणी थांबतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दोन दिवसापुर्वी जम्मू-काश्मिर येथील उरी याठिकाणी पाकिस्तानी सैनिकांनी जो आपल्या भारतीय सैनिकांवर हाल्ला केला त्याच्यामध्ये आपले २१ जवान शहीद झाले. त्याच्यामध्ये आपल्या महाराष्ट्राचे चार जवान होते ते शहीद झालेले आहेत. खरंतर पाकिस्तानच्या जम्मू-काश्मिरच्या माध्यमातून अनेकवेळा हाल्ले होत चाललेले आहेत. सरकारच्या माध्यमातून कालही आपण सर्वानी मिडीयाला पाहीलेले असेल. जवान आणि त्यांची यंत्रणा सरकारला बोलते की आम्हांला थोडस मोकळ सोडा आम्ही पाकिस्तानचा नामोनिशाण केल्याशिवाय राहणार नाहीत. असे आपले जवान म्हणतात पण सरकारची तशी भूमिका दिसत नाही. या निमीत्तान मी मोदी सरकारला सांगू इच्छितो की आता आपल्याला लढण्याची वेळ आलेली आहे. प्रत्येकवेळा आपले जवान शहीद होत असेल आणि आपल्या सैनिकांचे जर प्रत्येकवेळा मनोधैर्य कमी करण्याचे काम होत असेलतर नक्कीच ही निंदनीय बाब आहे. काश्मिर सारख्या ठिकाणी जर आपले जवान प्रत्येकवेळेस शहीद होत असतीलतर याचा मी जाहीरपणे निषेध करतो आणि या सरकारला सांगू इच्छितो की आता आपण बाहेर फिरण्यापेक्षा या देशामध्ये लक्ष देवून या देशाच्या नागरीकांचे संरक्षण करण्याची गरज आलेली आहे आणि हे आपण कराव. बाहेर जे काही रोज

दौरे चाललेले आहेत त्यापेक्षा आपण देश वाचविण्याचे काम या सरकारने करावे असे सांगतो आणि पाकिस्तानचा तीव्र शब्दात जाहीर निषेध करतो, धन्यवाद.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कालची घटना ही नक्कीच निंदनीय आहे. १५ ऑगष्ट १९४७ ला हा भारत देश स्वातंत्र झाला. १९४८ ला पार्टेशन झाले ज्यांना पाकिस्तानात जायचे होते ते सन्मानाने पाकिस्तानात गेले त्यांना प्रॉपर्टीच्या रक्कमाही देण्यात आल्या, भरपाई देण्यात आली, करोडो रुपये त्यावेळेला देण्यात आले. पण ज्यावेळेला सिंध भागामध्ये किंवा पाकिस्ताना मध्ये हिंदू राहत होते. रेल्वेमध्ये जीवंत माणस आले नाहीत तर रेल्वेमध्ये जीवंत माणसाची हात्त्या करुन प्रेत आणण्यात आली आणि रक्तांने वाहीलेले पाट पाकिस्तानातून भारतात आले. १५० वर्षे इंग्रजान या भारतावर राज्य केले. जाताना त्यांनी हिंदु-मुस्लिम लढण्याची ठिणगी लावुन गेले. माणसा माणसामध्ये व्देश ठेवुन गेले. आज पुर्ण जग दहशतवादाने पेटून उठलेल आहे पोखरलेल आहे. एकिकडे एक्केविसाव्या शतकाच्या उंबरठयावर असताना आपण चंद्रावर घर बांधले आहेत, चंद्रावर जाण्याची भाषा बोलतो आहोत त्याच बरोबर दुसरी एक किड या जगाला लागलेली आहे ती म्हणजे अंतर्गत दहशतवादाची. हा दहशतवाद निपटून काढून टाकण्यासाठी सर्व राजकीय पक्षानी आपले मतभेद विसरुन या स्वतंत्र भारताच्या नव्या मुक्तिचा लढा पुकारण्याची गरज आहे. ही वेळ आता टिकाटिप्पणीची नक्कीच नाही. आज २१ जवान हुतात्मे झाले त्यापैकी चार जवान महाराष्ट्र राज्यातील आहेत. कुणाच लग्न ठरलेलं होत, कुणी दिवाळीला येतो म्हणून फोन केलेला होता, कुणाची आई वाट पाहत होती, कुणाच नुकतच लग्न झालेलं होतं. आमच्या आया-भगीनीच्या कपाळावरील कुंकू पुसले गेलं तो आक्रोश त्या याचना हे भयावह चित्र या जवानाच्या कुटूंबामध्ये आपल्याला पहायला मिळतं. सगळयात मोठ बजेट हे आर्मीचं आहे, आर्मी त्यावर खर्च करते आणि नाहक रात्रीचा भ्याड हाल्ला पाकिस्तानने केला झोपेत सैनिक होते अशा घुसखोरीच्या माध्यमातून पाकिस्तान वेळोवेळी कुरघोडया करतयं त्यांना चोख उत्तर देण्याची आज गरज आलेली आहे, भारतीय ऐक्याची यात वेळ आलेली आहे. आपण शांतता पत्कारलेला देश आहोत. संविधानाने धार्मीक धर्मनिरपेक्ष आपल्याला दिलेलं आहे. बंधु बांधवाची शिकवण, या भारतीय राजकारण आणि समाजकारणामध्ये संताच्या भूमिमध्ये मिळालेली आहे. तरीही आपली सहनशिलता आता कुठतरी संपत आलेली आहे आणि म्हणून पुन्हा एकदा पाकिस्तानने केलेल्या या भ्याड कृत्याचा निषेध करुन थांबतो, जयहिन्द, जय महाराष्ट्र!

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या भारताच एक नंदनवन म्हणून ओळखल्या जाणा-या जम्मू-काश्मिर याठिकाणी उरी येथे मागील दोन दिवसापुर्वी जे दहशतवादया मार्फत आणि त्या पाठीमागे असलेल्या पाकिस्तान सरकारचा निश्चितच जेवढा निषेध करेल तेवढा कमी आहे. रात्रीच्या वेळी सिमेचे संरक्षण करत असताना अपल्या या जवानाच्या कॅम्पावर या दहशतवादयानी हाल्ला केला आणि २१ जवान शहीद

झालेले आहेत. महाराष्ट्र राज्याचे चार सुपूत्र त्यामध्ये होते. अतीशय दु:खद अशी बाब आहे. काल दुरदर्शनवर त्यांचा अंत्यविधी पाहत असताना अगदी मन भरुन आलं. आशा या पाकिस्तानला धडा शिकविणे ही खरच काळाची गरज आहे. मला याबाबत अफजल खान-शिवाजी महाराज यांची भेट आठवते. शिवाजी महाराजा सारखी भूमिका आपल्या मा.पंतप्रधानाने घेतली पाहीजे अशी अपेक्षा करतो. प्रेमाने भूरपूर काही करण्याचा प्रयत्न आपल्या सरकारने केलेला आहे. असं असताना सुध्दा त्याठिकाणी गद्दारी करुन पाकिस्तानने आपल्या भारतामध्ये अस्थिरता माजविण्याचा प्रयत्न काश्मिर खो-यातून करते. या भारताच्या जनतेस भयभीत करण्याचा प्रयत्न करते याचा निश्चित सरकारने आता कुठतरी रोखठोक असे उत्तर दिले पाहीजे एवढीच अपेक्षा करतो आणि सर्व शहीद जवानाना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.शमिम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दहशतवादी पाकिस्तानने काल उरी या सैनिकी ठाण्यावर भ्याड असा हाल्ला केलेला आहे. आपले जवान शहीद झालेले आहेत. महाराष्ट्राचे चार सुपूत्र त्यामध्ये शहीद झाले. टिव्हीवर बघताना बातमी सुध्दा बघवत नव्हती. रात्र कशी पुढे सरकत होती तेही कळत नव्हतं आणि तो दु:खद प्रसंग आपण सर्वजण पाहत होतो. आपल्या सर्वानाच खुप दु:ख झालेले आहे. पण दु:ख करुन आपण थांबऊ नये. आकाराने लहान असलेला हा पाकिस्तान सतत आपल्या खंडप्राय अशा भारत देशावर सतत हाल्ले करतंय आणि आपण त्यांचा निषेध करुन फक्त गप्प बसतो. आज गरज आहे सर्व जात, धर्म, पंथ सर्व काही विसरुन आपण आपल्या सरकारच्या मागे ठामपणे उभे राहीले पाहीजे आणि पाकिस्तानचे जे नापाक ईराधे आहेत, त्यांची ही जी दहशतवादी वृत्ती आहे त्यांना आपण सडेतोड उत्तर दिले पाहीजे. एवढच मला याठिकाणी म्हणायच आहे आपल्या सर्व शहीद सैनिकांना मी याठिकाणी मानवंदना देते श्रध्दांजली अर्पण करते.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. काल दुरदर्शनवरुन ज्या पध्दतीने संपुर्ण देशामध्ये वातावरण होतं आपल्या लष्करी तळावरती झालेला हाल्ला आतापर्यंत झालेला सगळयात मोठा हाल्ला आणि हे सर्व पाहत असताना अनेकवेळच्या घटना माणस संघटीत होतात, निदर्शने करतात, पाकिस्तान विषयी अक्रोष व्यक्त करतात. खरेतर असे शहीद सैनिक हे रिअल हिरो आहेत. देशाची सुरक्षा करणारे आमचे सैनिक आपल्या जीवाची परवा न करता देशाचे रक्षण त्याठिकाणी करत असतात त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आज कुठल्याही वातावरणाची परवा न करता त्याठिकाणी देशाचे रक्षण करणे, सिमेवर अवघड आहे, याची कल्पना केलीतरी आपल्या अंगावरती शहारे येतात अशा सैनिकांचे मनोधैर्य वाढविणे हे आपले काम आहे. जे शहीद झालेले आहेत, सरकारच्या पुढे आज फार मोठा पेच आहे. प्रत्येक भारतीय नागरीकांचे एकच म्हणणे आहे की पाकिस्तानला आपण धडा शिकविला पाहीजे. सर्वसामान्य माणूस हातामध्ये हात्यारे घेवून सिमेवर जाऊन लढू शकत नाही. परंतु एक नागरीक म्हणून, एक देशभक्त म्हणून आपली जबाबदारी काय हे प्रत्येक

नागरीकांने आपआपल्या भागामध्ये सांगीतले गेले पाहीजे. चौकाचौकामध्ये आपण सरकारला जाणीव करुन दिली पाहीजे. आपण परखड धोरण घेतलं पाहीजे. ज्यावेळेस संपुर्ण देशामधून, प्रत्येक शहरामधुन, अशा पध्दतीचे जुलूस, मोर्चे निघतील, सरकारला मागणी केली जाईल, की आता तुम्ही काहीतरी ठोस पाऊल उचलावीत. शासनावरती आपण दबाव आणण्याचे काम करु शकतो. आज तो निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. आज शहीद झालेल्यांच्या कुटूंबीयांची परिस्थिती पाहीलीतर खरच आपण जे आज करतो या कामासाठी ख-या अर्थाने आपण आज सगळया शक्तीनिशी समाजाने सरकारच्या पाठिमागे उभे राहीले पाहीजे आणि सरकारला जाणीव करुन दिली पाहीजे की आता आपल्याला पाऊल उचलली पाहीजेत. म्हणून सर्व सामान्य माणुस म्हणून आपले कर्तव्य काय आहे, कार्यकर्ता म्हणून आपले कर्तव्य काय आहे, लोकप्रतिनीधी म्हणून आपल कर्तव्य काय आहे हे आपण चोखपणे बजावले पाहीजे. खरंतर हाळहाळ भरपूर आहे पण ती हाळहाळ रस्त्यावर जाऊन आपला अक्रोश व्यक्त करुन सरकारला जाणीव व्यक्त करुन, सरकारच्या पाठीमागे ठामपणे उभे राहू न, सरकारला कारवाई करण्यासाठी भाग पाडण्याचं वातावरण निर्माण केले पाहीजे ही आपली देशभक्ताची भूमिका आहे. खरंतर अशाप्रसंगी सर्व जात-पात-धर्म विसरुन देशाचे नागरीक म्हणून उभे राहीले पाहीजे. हे मनोधैर्य आपल्या सैनिकांना आहे. त्यांना हा देश एकवटून संपुर्ण ताकदीनिशी उभा रहावा असे आपल्या सैनिकाना आणि त्याठिकाणी प्रत्येकाना वाटते. म्हणून मला सर्वांना सांगायचे आहे की आज, उदया अशा पध्दतीने राजकीय पक्ष असेल, संघटना असेल व्यक्तीगत स्वरुपाचे असेल अशा पध्दतीने रस्त्यावर उतरुन आपण सरकारला मागणी केली पाहीजे. या भ्याड पाकिस्तानला धडा शिकविल्या शिवाय स्वस्त बसायचे नाही अशी मागणी अक्रोशपणे चौकाचौकातून जाऊन, टीव्हीवर धडकली पाहीजे. आपल्या शहरातून, आपल्याच भागातून आशाप्रकारच देशभक्तीमय वातावरण सगळ जात, धर्म पंत विसरुन सर्वांनी एकत्र येणे हे आपले कर्तव्य आहे. नागरीक म्हणून एवढच आज याठिकाणी आपण करु शकतो. शहीदाना सलाम करु यात. खरोखरच असे भाग्य आमच्याही नशीबात यावे. या देशासाठी लढण्याच भाग्य आम्हांलाही यावं. आज एक नागरीक म्हणून आपल्याला जे करायचं ते आपण अतीशय विचारपुर्वक सर्वानीच अंतर्मुख होऊन कराव एवढच सांगतो आणि सर्व शहीद जवानांना पुन्हा एकदा मी सलाम करतो आणि याठिकाणी थांबतो.

**सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी जम्मू-काश्मिर येथील उरी याठिकाणी जो दहशतवादी हाल्ला झाला, खरेतर आपले भारतीय जवान झोपेमध्ये असताना या पाकडयानी भ्याड हाल्ला केलेला आहे. कारण झोपेत असताना हाल्ला करणारा तो पाकिस्तानच असु शकतो दुसरा कुठलाही देश असे कृत्य करणार नाही. याच्या प्रतिक्रीया संपुर्ण देशामध्ये उमटलेल्या आहेत. प्रत्येक नागरीकाला त्याच दु:ख झालं, वाईट वाटलेल आहे. सर्वजणच या जवानाच्या कुटूंबामध्ये, दु:खामध्ये सामील झालेले आहेत. आपणही

महानगरपालिकेची एक जबाबदारी म्हणून, सर्व लोकप्रतिनिधीची जबाबदारी म्हणून आपण याठिकाणी श्रध्दांजली अर्पण केली. खरंतर बलुचिस्तानच्या विषयी मा.पंतप्रधन यांनी जी भुमिका घेतली आहे, देशामध्ये जो अन्याय होतो त्याला वाच्छता फोडण्यासाठी त्यांनी स्वत:ची बाजू सांगीतली त्यानंतरच सर्व देशामध्ये खळबळ उडालेली आहे. पंतप्रधान कुठे जातात, कुठ दौरे करतात म्हणजे श्रध्दांजलीमध्ये अशाप्रकारच वकृत्व करणं, राजकारण आणण अत्यंत चुकीचे आहे. मराठी म्हणं आहे, "घार फिरते आकाशी, तीच लक्ष पिल्लापाशी" त्या पध्दतीन मा.पंतप्रधान संपुर्ण जगामध्ये फिरत असताना सुध्दा भारत देश म्हणून ते सगळीकडे आहेत, संपुर्ण भारतावर त्यांचे लक्ष आहे आणि निश्चितपणे जनतेच्या अपेक्षा एवढया उंचावलेल्या आहेत की त्यांचे म्हणणे आहे की पाकिस्तान बरोबर युध्द कोण करेल कोण प्रतिउत्तर देईल तर फक्त हे सरकारच देऊ शकतं. जेव्हा आपल्या अपेक्षा उंचावतात त्यावेळेस नागरीकामधुन ही अशी मागणी व्हावी लागते, ज्यावेळेस आपला सरकारवर विश्वास असतो त्यावेळेस अशाप्रकारच्या मागण्या हया नागरीकांपासून होतात आणि आम्हांला खात्री आहे आपण येथे नागरीक म्हणून बोलतो, त्याठिकाणी सरकार म्हणून बोलत असताना मा.पर्रिकर साहेब संरक्षण मंत्री आहेत त्यांना मोदीजीने दिल्लीमध्ये थांबून ठेवलेले आहे. त्यांच काय चालल हे आपल्याला येथे बसून माहिती नाही. परंतु आपण एवढ शोधू शकतो जसं आता सगळयांनी सांगीतल की एक देश म्हणून आपण सर्व त्यांच्या दु:खात सहभागी आहोत. देश म्हणून आपण येणा-या पुढच्या सगळया परिस्थितीमध्ये आपण ज्या काही गोष्टी आहेत जसं भारत आणि पाकिस्तान मॅच चालू असताना आपण कुठल्या पक्षाचे आहोत, आपण कुठल्या जातीचे आहोत म्हणून आपण नाहीतर आपण भारतीय आहोत आणि पाकिस्तानला हारवायची आपली जी भुमिका असते ती भुमिका सगळयांची आपली असली पाहीजे. राजकारण म्हणून किंवा या वातावरणाचा फायदा घेऊन कोणी या गोष्टीकडे बघु नये, तर आपण फक्त मनोभावे श्रध्दांजली अर्पण करावी, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह ज्यावेळेला अशी घटना घडते, निश्चितपणे त्याचे विपरीत परिणाम संपुर्ण देशावर होत असतात. भारत स्वातंञ्यानंतर  आणि विशेषत: पाकिस्तानने अणुबॉब तयार केल्यानंतर त्यांच्या कारवाईमध्ये फार मोठया विवीध अतिरेक्यांच्या संघटना उपलब्ध करुन सातत्याने भारतावरती हाल्ले करतात. पंधरा-वीस वर्षाच्या कालखंडापुर्वी कोणताही हाल्ला झाला की त्याच राजकीय भांडवल होत असे. या सभागृहात गेली वीस ते बावीस वर्षे बसत असताना अशाही काही घटना घडलेल्या की जो हाल्ला आहे तो देशावरचा हाल्ला हा सर्व नागरीकांवरचा हाल्ला आहे अस समजून भावना व्यक्त करण्याकरिता त्याचं राजकीय देखील चर्चा, राजकारणाचा देखील भास देण्यात आला. मागे अशी घटना घडलेली असताना ज्यावेळेस युपीएचे सरकार होते त्यावेळेला संसदेवर हाल्ला झाला, आक्षरधामवरदेखील हाल्ला झाला, कारगीलवर सुध्दा हाल्ला झाला

आणि आपल्याच भुमित आपण युध्द जिंकलेलो आहेत. नंतरच्या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये सरकार बदललं त्यावेळेसही खुप हाल्ले झाले. आता एक निर्णयाप्रत आपण आलेलो आहोत की जे दहशतवादी असतात त्यांना जात, धर्म नसतो किंवा कोणत सरकार आहे हे बघुन ते हाल्ले करत नसतात तर त्यांची ती एक प्रवृत्ती आहे. अमेरीका सारख्या जगतदेशात त्याठिकाणी सुध्दा हाल्ला करण्याची ताकद त्यांनी निर्माण केलेली आहे. असे काही देश आहेत की ते निश्चितपणे त्यांना पाठींबा देत असतात. म्हणून या घटना ज्यावेळेस घडत असतात त्यावेळेला एक देशातील नागरीक म्हणून आपण सर्वानी त्या भावनेतून त्या भावना व्यक्त करणं त्याला कोणतेही राजकीय किंवा किमान ते सिध्द झाल असल्या कारणानं एक विशिष्ठ कालखंड गेल्यानंतर चांगल्या वाईट गोष्टी आपल्यासमोर निश्चितपणे आल्या असल्या कारणान या अशा घटना घडतात त्यावेळेस राजकारण करता कामा नये. याठिकाणी मी वैयक्तिक काश्मिर याठिकाणी केवळ पर्यटन म्हणून नाहीतर त्याठिकाणी मित्र परिवार असल्या कारणाने फिरण्याची संधी मिळाली कशा पध्दतीने सैनिक राहतात हे डोळयानी पाहीलेलं आहे. याठिकाणी राज्यसरकार विशिष्ठ रक्कम घोषीत करते त्यांच्या त्या कर्तव्याचा तो भाग असतो. मी तर असे म्हणेल की जे काही सैनिक आहेत, केवळ ते सैनिक आणि त्यांच्या संपुर्ण कुटूंबाची झालेली अवहेलना आयुष्यभर त्यांच वैदयकीय असेल, शिक्षणाचा त्यांचा खर्च उचलावा. महानगरपालिकेनी एक नवीन पायंडा पाडावा की महापौर या नात्यांन त्यांच्या कुटूंबीयाला जाऊन भेटावं आणि आपल्या शहराच्या वतीने कायमस्वरुपी एक निधी तयार करावा. त्या निधीतून अशा काही घटना घडत असतीलतर किमान आर्थीकदृष्टया नव्हेतर एक मानसीकदृष्टया असेल किंवा वैदयकीय दृष्टया असेल किंवा आपल्या शहरामध्ये त्यांच्या कुटूंबातील कोणी जरी आलंतरी त्यांना कोणत्याही गोष्टीची गरज भासलीतर आपली महापालिका कटिबध्द राहील. केवळ भाषण करुन अशा महानगरपालिका महाराष्ट्रा मध्ये विवीधप्रकारच्या आहेत. आपण काही काही ठिकाणी कशाही पध्दतीने खर्च करतो. मा.महापौर साहेब, त्या कुटूंबामध्ये जाऊन आपल्या कालखंडामध्ये या महानगरपालिकेचा एक असा काही निधी तयार करावा की त्याठिकाणी आपण महाराष्ट्रात राज्यात कुठेही मदत करु शकतो, निधी तयार करु शकतो. या शहरामध्ये त्यांना शिक्षण घ्यायच असेलतर संपुर्ण कुटूंबाची जबाबदारी असेल त्यांना वैदयकीय काही अडचण आलीतर या शहराच्या वतीने त्यांना संपुर्ण काही खर्च करता येईल केवळ शहीद झालेलेतर आहेच, असे माजी सैनिक आहेत की त्यांनी आयुष्यभर देशाचे रक्षण केलेले आहे. माझे मित्र परिवार आहेत मला माहिती आहे त्यांच्या काय वेदना आहेत. सरकारन काय कराव, आपण भावना व्यक्त करु शकतोत पण संधी देण्याची आपली ही परिस्थिती नाही. कुठल्याही संघटना असतात ब्युरो असेल, गुप्तहेर संघटना असेल ते त्यांच्या पध्दतीने ते काम करतीलच. परंतु ख-या अर्थाने श्रध्दांजली जर वाहीची असेलतर आपण काहीतरी एका निर्णयाप्रत येऊन अशी भूमिका की जी आयुष्यभर लक्षात राहील अशा वाईट

घटनेतून चांगल्या घटना घडण्याची एक वेळ येते ती वेळ केवळ भाषण करुन निभावणार नाहीतर आपल्याला काय करता येईल या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने या दृष्टिकोनातून आपण विचार करावा. सर्व पक्षीय नगरसेवकांना बोलावून त्यांचा सगळा विचार घ्यावा. एक वातावरण निर्माण करण्याचा हा विषय नाही. ख-या अर्थाने श्रध्दांजली अर्पण करायची असेलतर कृतीने करा अशी मी विनंती करतो.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भारतीय सैनिकांवर ज्या पध्दतीने क्रूर हाल्ले करुन मारल गेलं ही अतीशय निंदनीय अशी घटना आहे. या भ्याड हाल्ल्याचा आम्ही सर्व पुन्हा एकदा निषेध करतो. गेल्या अनेक वर्षापासून जसं स्वातंञ्य मिळाले स्वातंञ्याचा आनंद घेत असताना पाकिस्तानचा दहशतवाद जो सुरु झाला आणि मागच्या साठ वर्षापासून हा दहशतवाद आपल्यावर कायम असल्याचे आपण बघत आहोत. या हाल्ल्यामागे ज्या शक्ती आहेत, ज्या काही त्यांच्या योजना आहेत त्या अत्यंत चुकीच्या आहेत त्यामुळे आपण याठिकाणी भारतीय म्हणून या गोष्टीचा गांभीर्याने विचार करत असताना खरंतर ज्या घरातील मुल ही शहीद झालेली आहेत, जे जवान शहीद झालेले आहेत त्यांचा अक्रोश आपण पाहीला परंतु त्यांच अभिनंदनही केलं पाहीजे यासाठी की त्या घरातील ज्या महीला आहेत. मग त्या शहीदाची पत्नी असेल त्या शहीदाची आई असेल, खरच त्या महीलांच काळीज किती मोठ असेल की ज्या बाईला माहिती आहे की माझा पती सीमेवर असणार आहे, माझा पती तिथं कधीही मरु शकतो तो लढाईमध्ये आहे आणि असं असून देखील ती त्यांच्या संसारामध्ये जाते आणि त्याचा संसार करते. तीचे खुप मोठे धाडस म्हणावे लागते. त्या आईच सुध्दा खुप मोठ काळीज म्हणाव लागेल की जीने आपल्या मुलांला देशाच्या संरक्षणासाठी सिमेवर पाठविते अशी आई सुध्दा महान आहे. त्यामुळे खरच या महीलांचा आपण सत्कार केला पाहीजे, गुणगौरव केला पाहीजे. याठिकाणी सुलभाताईने सांगीतल्याप्रमाणे की मा.पंतप्रधान मोदी हे इतर देशामध्ये दौरे करतात हे जरी बरोबर असलंतरी देखील पहीला आपला जा विषय आहे आपल्या देशातला कोणीही पंतप्रधान झाल्यानंतर कोणाचीही सत्ता आल्यानंतर दहशतवादी हाल्ले होत असताना जो कोणी आपला शत्रु आहे त्याला एकटे कसे पाडता येईल आणि एकटे पडल्यानंतर हाल्ला झालातर तो संपुष्टात येईल. पाकिस्तानच्या पाठीशी असणारे जे जगातले इतर देश आहेत या देशाचा पाठींबा पाकिस्तानकडून त्यांनी काढून घेतला पाहीजे ही भूमिका पंतप्रधानांची आहे. एक मुत्सद्दी राजकारणी म्हणून त्यांच्याकडे पाहीले पाहीजे. खरचं या सरकारकडून अपेक्षा आहे पाकिस्तानला नक्की धडा शिकवावा नव्हेतर तो शिकवलाच पाहीजे. पण हे करत असताना आपण जरी १०० करोड पेक्षा मोठा जरी आपला देश असलातरी आणि पाकिस्तान लहान जरी असलातरी अणुबॉंब जिथे कुठे पडेल तेथे लाखो लोक मरतच असतात त्यामुळे आपण हाल्ला करावा हे शंभर टक्के जरी खरं असलतरी हे करण्यासाठी जी परिस्थिती निर्माण करावी लागते, जे वातावरण निर्माण कराव लागतं ते

वातावरण निर्माण करण्याची परिस्थिती आता तयार होत आहे आणि या भूमिकेच आता आपण सर्वानी कौतूक केलं पाहीजे आणि आभार व्यक्त केलं पाहीजे. फक्त भारतावरच दहशतवादी हाल्ले होत नाही मग फ्रान्स असेल, पॅरीस असेल, अमेरीका असेल इतर देशामध्ये सुध्दा हाल्ले होतात त्यामुळे ही ताकद आहे एक दहशतवादी हाल्ले करणारी ही एक विचारधारा आहे या विचारधारेला संपवण गरजेच आहे. आपण पाकिस्तान कडे बघताना एकच शत्रू आहे काही वेळेला चीन कडन सुध्दा वाकडया दृष्टीने चीन आपल्याकडे बघत असतो. या शक्ती कोणत्या आहेत हे सुध्दा आपण ओळखल पाहीजे आणि त्या पध्दतीने कारवाया केल्या पाहीजेत. आज दाऊद सारखा एवढा मोठा गुंड पाकिस्तानमध्ये लपवून बसलेला आहे तो आपण मिळऊ शकत नाहीत ही सुध्दा आपली फार मोठी शोकांतीका आहे. सरकार कोणाचही येऊ परंतु या ज्या ताकदी आहेत या ताकदी आणि हया शक्ती आपल्याला त्रासदायक कशा ठरलेल्या आहेत. त्यामुळे आजच्या या प्रसंगी आपण सर्वांनी या देशाच्या, या सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे. जो काही निर्णय होईल, जो काही संदेश आपल्यापर्यंत येईल त्यासाठी आपण तत्पर असावं. भारतीय सैनिकांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते, धन्यवाद.

**मा.विनोद नढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जम्मू-काश्मिर मध्ये उरी याठिकाणी परवा २१ जवान हुतात्मा झाले. हे जवान सव्वासे कोटी जनतेचे ते रक्षण करतात आणि त्यांच्यावर अशाप्रकारे पाकिस्तान भ्याड हाल्ला करतं हे निश्चितपणे निंदनीय आहे. आज परिस्थिती पाहीलीतर पाकिस्तानचे संरक्षण मंत्री चॅनेलला उघडपणे सांगतात की आम्ही भारतावर अणूबॉंब हाल्ला करु. असं असताना आपण किती दिवस गप्प बसायचं. आता पाकिस्तानला ज्या भाषेत समजेल त्या भाषेत त्यांना त्याठिकाणी उत्तर निश्चितपणे भारत सरकारने दिलं पाहीजे. आज संपुर्ण जम्मू-काश्मिर पाहीलतर अशांत आहे त्याठिकाणी रोज नागरीकांवर हाल्ले होतात, पोलीसांवर हाल्ले होतात. दहशतवादयाला भारताच्या सैनिकानी ठार केलं त्याला पाकिस्तानमध्ये अमर म्हणून घोषीत करतात हे निश्चितपणे निंदनीय आहे. माझी सरकारला विनंती आहे की आता आपण चर्चा बंद करा आणि त्यांना त्यांच्या भाषेत उत्तर दया. २१ जवान शहीद झालेले आहे त्यांना मी सभागृहाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. परवा उरीमध्ये जी घटना घडली त्याचा मी निषेध करतो. हे रोज घडत आहे. कधी जम्मु काश्मिरच्या बॉर्डरमध्ये तर कधी राजस्थानच्या बॉर्डरमध्ये तर कधी गुजरातच्या बॉर्डरमध्ये. हे आपल्याला पेपरमध्ये आलं म्हणून माहीती पडलं. अशी घटना नेहमी घडते. ज्या दहशतवादयानी हाल्ला केला ते पाकिस्तानचे आहेत हे सिध्द झालेले आहे त्यांनी रायफल, पिस्तुल वापरले आहेत त्याच्यामध्ये पाकिस्तानचा डेटा आहे. पाकिस्तानला धडा शिकवा, आपण काय धडा शिकवणार. आपल्या सरकारने आपल्या आर्मी, नेव्ही, ईएरफोर्सने पाकिस्तानवर मात करायला पाहीजे. आपल्या

आर्मी, नेव्ही, ईएरफोर्स भक्कम आहेत तीन चार दिवसात पाकिस्तान भूईसपाट करायला पाहीजे. ६० वर्षापासून चर्चा चालू आहे. ६० वर्षापासून येथे येतात चर्चा करतात, बाहेरच्या देशात चर्चा करतात काही परिणाम झालेला नाही आणि २६/११ ची मुंबईची घटना आणि ही घटना कन्टिन्यू चालत आलेली आहे. अनेकांनी जे मृत्यू झालेले आहेत त्यांना श्रध्दांजली वाहीलेली आहे मी सुध्दा श्रध्दांजली वाहतो आणि कोटी कोटी या शिपायाना प्रणाम करतो. २१ जवानांचा मृत्यू झाला ते २० ते २५ वर्षाचे होते. एका तरी त्यांच्यातील व्यक्तीला महापालिकेमध्ये नौकरी दयायला पाहीजे. हे एक उदाहरण दिलंतर याप्रमाणे इतर सर्व कॉर्पोरेशन करणार. आपल्याकडे अध्यापक कर्मचारी काम करतात. त्यांच जसं शिक्षण आहे तसं त्यांना त्या त्या पदावर घेतलतर आयुष्यभर त्यांना उत्पन्न मिळेल, पैसे देऊन उपयोग नाही. म्हणून माझी विनंती आहे की आपण महाराष्ट्र सरकारकडून परवानगी घ्यावी शासन परवानगी देईल. या २१ जवानांचा मृत्यू झालेले आहेत त्यांच्या कुटूंबातील एका व्यक्तीला तरी नौकरीला घ्यावे.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. "सारे जहाँ से अच्छा हिंदुस्ता हमारा हम बुलबुलें हैं उसकी वो गुलसिताँ हमारा, ना हिंदु ना मुस्लिम ना शिख ईसाई हाम हैं सारे भाई भाई" आपण नेहमीच हा नारा देत असतो आणि देशाच्या हितासाठी काम आणि कार्य करत असतो कुठला पक्ष सत्तेवर आहे कुठला नाही हा भाग आपण सोडलातर ख-या अर्थाने आपल्या लाडक्या पंतप्रधान इंदिरा गांधी, लाडके पंतप्रधान लालबहादुर शास्त्री आपल्याला आठवत असतील अशा ज्यावेळेला घटना घडतात त्यावेळेला त्यांची भाषण त्यांनी दिलेले पाकिस्तानला उत्तर आपल्याला आठवत असेल. ज्यावेळेला असं घडत होतं त्यावेळेला शिवसेना प्रमुखाने एक मुलाखत दिलेली होती त्यावेळेला म्हणले होते एवढसा पाकिस्तान इतर देशातील सगळे गुंड जमा करुन अतिरेक करत असेलतर आपल्याला सुध्दा तसेच अतिरीकी निर्माण करुन आपल्याला तसच चोख उत्तर दिलं पाहीजे. ज्यावेळेला मी माझ्या मुलाची लग्नपत्रिका घेवुन शिवसेनाप्रमुखाकडे निमंत्रण दयायला गेलो होतो तो दिवस मला आठवतो, माझी मिसेस बरोबर होती मी म्हणालो साहेब, तुम्ही असं असं बोललात. त्याला उत्तर असं आल की साहेब म्हणाले बाबा, असं नाहीए. असं करायच असेलतर आपले जे सैनिक आहेत त्या सैनिकाला वेळेवर ऑर्डर मिळत नाही. चीनच्यावेळेला असंच घडल समोर चायनाचे लोक आपल्यालवर वार करतात त्यावेळेला आदेश नसल्यामुळे आपले लाखो सैनिक मेले गेले आणि म्हणून कधीतरी या देशाचे संरक्षण करण्यासाठी स्वत: आपण आत्मपरिक्षण करुन त्याठिकाणी आपले सैनिक उभे करायला पाहीजे. साहेबाना मी म्हणालो असे असेलतर आमचे दोघांचे नाव पहीले घ्या आम्ही त्या पाकिस्तानला जायला तयार आहोत. आम्हांला फक्त सुचना दया, आदेश दया. त्यावेळेस साहेब हासले आणि साहेब म्हणाले ज्यावेळेला वेळ येईल त्यावेळेला तुला ऑर्डर देऊ. हे अंतकरणात, रक्तात भिडल पाहीजे. ज्यावेळेला लढाई होते

त्यावेळेला सैनिक आपल्या रेल्वेमधुन प्रवास करत असतात त्यावेळेला आपण त्यांना भेट देतो. मी सुध्दा जम्मू मध्ये गेलो होतो त्यावेळेला ते दृष्य पाहीलतर ईतक वाईट वाटल अंतकरणातून की त्यावेळेला ते सैनिक उभे रहायचे एकांमेकाला पाठ करुन, त्यांच तोंड रस्त्याकडे न येता तोंड डोंगराकडे असायचे. त्यां सैनिकाच्या हातात स्टेनगन असायची, त्यांना विचारल तुम्ही चार चार तास डयुटया करतात, तुम्ही चार चार तास काय घेता. त्यावेळेस त्यांनी सांगीतल चार तासानंतर एक गाडी येते आम्हांला चार-चार बॉईल आणि दोन पॅक रम दिली जाते. आपण सकाळी नाष्टा, दुपारी जेवण, संध्याकाळी जेवण काय काय खातो त्या सैनिकाना फक्त चार अंडी दिली जातात व दोन पॅक रमचे चार तासानंतर घेतात त्या बर्फामध्ये मायनस टेम्परेचर. देशामध्ये आपण एवढे पांढरपेशी लोक राहतो. असं घडायला लागल की आपण मोर्चे काढतो, आंदोलन करतो ख-या अर्थाने रक्तात असाव लागतं. ज्यावेळेस देश स्वातंञ्य करायचा होता त्यावेळेला काय घडलं. तीन चाफेकर बंधु फुटले आणि ज्यावेळेला रँडला मारल त्यावेळेला काय घडलं. त्यांना कोणी शिकवल होतं का, नाही. असं कुठेतरी न्याय हाक्कान शिकल पाहीजे. केवळ भाषण करुन काही होणार नाही. शासन कुठलही असु दयात. ते सैनिक नदीच्या पाञातुन आले, नदीच्या पाञाला आपले संरक्षण का नव्हते. एका रिटायर्ड मेजरनी सांगीतल की त्याठिकाणी त्या सैनिकानी गव्हर्मेंटला विचारल होतं ते नदीच्या पाञातून येऊ शकतात त्याठिकाणी काहीतरी संरक्षण करायला पाहीजे. ते पाच ते सहा कि.मी. चे अंतर आहे त्याठिणी काही केलं नव्हतं. तिथं फक्त त्यांची छावणी होती. पण नदीपाञात बंदोबस्त करायला पाहीजे होता तो गव्हर्मेंटने केलेला नव्हता. तेथील परिस्थिती आपल्याला काही माहिती नसते. आपण ज्यावेळेस पेपरला ऐकतो, टिव्हीवर बघतो त्यावेळेला आपल्याला देशप्रेम जाणवते. मी मा.महापौरांना एवढच सांगेल आताच भाऊसाहेब भोईर यांनी सांगीतलेल आहे. त्याठिकाणी त्यांना भेटल पाहीजे, ते केवळ प्रेमापोटी, त्यांच्या कुटूंबियाचे सांत्वन करण्यासाठी जाणार. मी तर असं म्हणतो आपला एक महीन्याचा सर्व नगरसेवकांचा पगार, ऍडमिनीस्ट्रेशन ऑफिसरचा एक महीन्याचा पगार घेवून त्यांना दयावा, मा.महापौरांनी मोकळया हाताने सांत्वन करायला जाऊ नये. दोन-दोन लाख चार कुटूंबाना दिलेतर त्यांना सहकार्य केल्यासारख होईल. तरी मा.महापौरांना मी विनंती करतो आपण असं कराव. जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.आनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. उरी याठिकाणी दहशतवादी हाल्ला झाला. हा दहशतवादी हाल्ला नाहीतर पाकिस्तानने केलेला हाल्ला आहे. पाकिस्तान असे अघोषीत युध्द कायमच करतय. गेल्या वीस वर्षापासून मग तो ताज मधील हाल्ला असेल, आपल्या काही जवानाचे शीर पण मागे त्यांनी छाटले होते असे बरेच हाल्ले पाकिस्ताननी दरवेळेस केलेले आहेत आणि हे दहशतवादी हाल्ले नाहीतर पाकिस्तानने केलेले हाल्ले आहेत. मागे आपल्या दिवंगत पंतप्रधान इंदीरा गांधी यांनी वेळोवेळी चांगले निर्णय घेवून पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून दिलेली आहे आणि निश्चितपणे आताचे पंतप्रधान हे देखील

मी अपेक्षा करतो की पाकिस्तानला त्यांची जागा दाखवतील. पक्ष कुठलाही असो पंतप्रधान हे देशाचे आहेत. सर्वांना त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. काश्मीर हा नेहमीच वादाचा मुद्दा झालेला आहे आणि काश्मीर हे भारताचे असूनदेखील वेळोवेळी पाकिस्तानने त्याची मागणी केलेली आहे. त्यावर ब-याच चर्चा झालेल्या आहेत. परंतु चर्चेतून काहीही निष्पन्न होत नाही. पाकिस्तान आपली कटकारस्थान कायम करतच चाललेले आहे. आता ती वेळ आलेली आहे निश्चितपणे मोदी सरकार त्यावर चांगला निर्णय घेतील अशी अपेक्षा वाटते. परंतु एक नागरीक आणि नगरसेवक या नात्याने असे वाटते की आपली पण काहीतरी जबाबदारी आहे. भाऊसाहेब यांनी, आर.एस.कुमार साहेब यांनी, बाबासाहेब धुमाळ यांनी सांगीतले. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की याच्यावर आपण विचार करावा, श्रध्दांजली आपण वाहीलेली आहे. पाकिस्तानचा निषेध केलेला आहे. या दु:खद घटने विषयी सर्वांच्याच मनामध्ये कळकळ निर्माण झालेली आहे. परंतु ती शाब्दीक नसावी तरी या शहीदांच्या कुटूंबीयाना आपल्या महापालिकेतर्फे काही मदत उभी करु शकतो का, मग ती नौकरीच्या संदर्भातील असेल, आर्थिक संदर्भातील असेल याचा विचार झाला पाहीजे आणि ती मदत मिळाली पाहीजे अशी अपेक्षा याठिकाणी मी व्यक्त करतो. पुन्हा एकदा जे शहीद झालेले आहेत त्यांना मी श्रध्दांजली वाहतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**मा.अमिना पानसरे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. काश्मीर येथे २१ जवान शहीद झालेले आहेत. त्यांना मी माझ्या कुटूंबीयाच्या वतीने श्रध्दांजली वाहते. पाकिस्तान एवढा लहान देश असून आपल्यावर हाल्ला करते. त्यांची संख्या कमी आहे आपली संख्या जास्त आहे. सरकारने ठोस निर्णय घेवून पाकिस्तानला खतम करावे एवढी विनंती करते आणि थांबते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जम्मू-काश्मीर मधील उरी येथे जी घटना झालेली ती खुपच निंदनीय आहे आपण प्रत्येकवेळा जेव्हा भारत-पाकिस्तान मॅच असते त्यावेळेला सर्वजण जागरुक असतो. ही जी प्रत्येक व्यक्तीला आतून ऊर्मी येते त्याच्यामध्ये कोणीही जात, धर्म, राजकीय पक्ष कोणीही असो या सर्वांची एकच भावना असते माझा भारत देश हा जिंकला पाहीजे. तशी जी स्फूर्ती तेंव्हा असते तसे आता सगळे राजकीय पक्ष एकत्र येऊन सर्व जात, धर्म हे सगळ विसरुन माणूसकी या नात्याने प्रत्येक व्यक्तीने पुढे आले पाहीजे आणि त्यांचा निषेध नोंदवला पाहीजे. त्याचप्रमाणे भाऊसाहेब भोईर, आर.एस.कुमार, चंद्रकांता सोनकांबळे, सुलभा ऊबाळे यांनी विषय मांडले आहेत त्यांना काय मदत करता येईल. त्यांना कुठे जॉब देता येईल का यादृष्टिने आपण मदत केली पाहीजे. आपण फक्त म्हणतो “ऐ मेरे वतन के लोगों ज़रा आँख में भर लो पानी जो शहीद हुए हैं उनकी ज़रा याद करो कुरबानी”. कुरबानी करायची पण हे कृतीतून दाखवून दिले पाहीजे जेव्हा आपण सगळे राजकीय पक्ष एकत्र येऊ, सगळया जात, धर्माची लोक एकत्र येऊ तेव्हा, हे

शहीद झालेले आहेत पण त्यांची आई-वडील, मुलं, त्यांची पत्नी यांना असे वाटले की भारतातील प्रत्येक नागरीक हा माझ्या माग आहे, माझ्या बरोबरीस आहे आणि जेंव्हा संकट येते त्यावेळेला सगळेजण सगळ विसरुन माणूसकी या नात्याने ते पुढे येतात आणा आम्हांला मदत करतात त्यामुळे त्यांच पण मनोधैर्य, मनोबदल हे खूप वाढेल आणि हे जे कृत्य केलेले आहे ते खुपच निषेधार्थ आहे त्याचा मी निषेध व्यक्त करते आणि येथे थांबते, जयहिन्द, जय महाराष्ट्र!

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कश्मीर मधील उरी याठिकाणी झालेल्या दहशतवादी भ्याड हाल्ल्याचा मी निषेध करते. पाकिस्तानी प्रवृत्तीचा मी निषेध करते. भ्याड हाल्ल्यामध्ये २१ जवान शहीद झाले त्यांना माझ्या सर्व कुटूंबीया तर्फे, संततुकारामनगर आणि संपुर्ण सभागृहातर्फे मी त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहते. बातमी ऐकली आणि खरोखर त्या बातमीने मन हिराऊन गेलं आणि खरोखर झोप उडाली त्यावेळी एकच गोष्ट लक्षात आली की “फिर उड़ गयी नींद ये सोच कर,. सरहद पर बहा वो खून मेरी नींद के लिए था.” आणि त्यावेळेला लक्षात आल की सर्वसामान्य नागरीकांच्यासाठी आमच्या सुरक्षततेसाठी हे जवान शुन्य डिग्री पासून त्याठिकाणी खडा पहारा करत असतात त्या सर्व जवानाना मी मानाचा मुजरा करते आणि त्यांना एकच सांगु इच्छिते की तुम्ही आहात म्हणून संपुर्ण भारतीय सर्वसामान्य जनता ही सुरक्षीत आहे. आज २१ जवान गेले त्याच्यामध्ये कोण कोणाचा मुलगा होता, कोणी कोणाचा भाऊ होता, कोणी कोणाचे वडील होते, कोणाचा पती होता आणि या सर्व शहीद झालेले परिवार जे आहेत त्यांना सहानुभूतीची तर गरज नाही पण ईश्वरचरणी प्रार्थना मात्र करते. ही भारताची १२५ कोटी जनता त्यांच्या मागे उभी आहे. पण ज्यावेळेला हे भ्याड कृत्य पाकिस्तानने केलेले हाल्ला कळला त्यावेळेला जवानाच्या एका मुलांने जी स्वत:ची एक शोकांतीका मांडली त्यावेळेला खरोखर मन हिराऊन गेल होतं. तो म्हणाला “ओढ़ के तिरंगा क्यों पापा आये है? माँ मेरा मन बात ये समझ ना पाये है, ओढ़ के तिरंगे को क्यूँ पापा आये है। पहले पापा मुन्ना मुन्ना कहते आते थे, टॉफियाँ खिलोने साथ में भी लाते थे। गोदी में उठा के खूब खिलखिलाते थे, हाथ फेर सर पे प्यार भी जताते थे। पर ना जाने आज क्यूँ वो चुप हो गए, लगता है की खूब गहरी नींद सो गए। नींद से पापा उठो मुन्ना बुलाये है, ओढ़ के तिरंगे को क्यूँ पापा आये है। फौजी अंकलों की भीड़ घर क्यूँ आई है, पापा का सामान साथ में क्यूँ लाई है। साथ में क्यूँ लाई है वो मेडलों के हार, आंख में आंसू क्यूँ सबके आते बार बार। चाचा मामा दादा दादी चीखते है क्यूँ, माँ मेरी बता वो सर को पीटते है क्यूँ। गाँव क्यूँ शहीद पापा को बताये है, ओढ़ के तिरंगे को क्यूँ पापा आये है। माँ तू क्यों है इतना रोती ये बता मुझे, होश क्यूँ हर पल है खोती ये बता मुझे। माथे का सिन्दूर क्यूँ है दादी पोछती, लाल चूड़ी हाथ में क्यूँ बुआ तोडती। काले मोतियों की माला क्यूँ उतारी है, क्या तुझे माँ हो गया समझना भारी है। माँ तेरा ये रूप मुझे ना सुहाये है ओढ़

के तिरंगे को क्यूँ पापा आये है। पापा कहाँ है जा रहे अब ये बताओ माँ, चुपचाप से आंसू बहा के यूँ सताओ ना। क्यूँ उनको सब उठा रहे हाथो को बांधकर, जय हिन्द बोलते है क्यूँ कन्धों पे लादकर। दादी खड़ी है क्यूँ भला आँचल को भींचकर, आंसू क्यूँ बहे जा रहे है आँख मींचकर। पापा की राह में क्यूँ फूल ये सजाये है, ओढ़ के तिरंगे को क्यूँ पापा आये है। क्यूँ लकड़ियों के बीच में पापा लिटाये है, सब कह रहे है लेने उनको राम आये है। पापा ये दादा कह रहे तुमको जलाऊँ मैं, बोलो भला इस आग को कैसे लगाऊं मैं। इस आग में समा के साथ छोड़ जाओगे, आँखों में आंसू होंगे बहुत याद आओगे। अब आया समझ माँ ने क्यूँ आँसू बहाये थे, ओढ़ के तिरंगा पापा घर क्यूँ आये थे । सरकारने आता जागे व्हायला पाहीजे. सर्व पक्षीयाने एकत्रीत येऊन या प्रश्नावर काय तोडगा काढला पाहीजे हे मात्र त्यांनी आता खरोखर पाहीलच पाहीजे. पुन्हा एकदा मी या अतिरेकी भ्याड हाल्ल्याचा निषेध करते आणि आपल्या सगळया शहीदाना कोटी कोटी प्रणाम करते.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. परवा जम्मू-काश्मीरमध्ये उरी याठिकाणी झालेला दहशतवादी हाल्ला, त्या हाल्ल्यात २१ जवान शहीद झाले आहेत. या सगळयाच जवानांना मी आदरांजली वाहते. खरतर हा भेकड पाकिस्तान ज्याच उगमस्थान म्हणजे हा दहशतवाद. हा दहशतवाद फक्त भारतालाच लागला अशातला विषय नाहीतर दहशतवादी हाल्ले हे संपुर्ण जगावरती होतात आणि याच उगमस्थान म्हणजे हा देश म्हणून न घेण्याच्या लायकीचा असणारा पाकिस्तान, या पाकिस्तानचा याठिकाणी आपल्या सभागृहाच्या वतीने असं न म्हणता संपुर्ण भारताच्या वतीने या पाकिस्तानचा मनापासून निषेध आपल्या सभागृहाच्या माध्यमातून करते. खरंतर एखादा जवान ज्यावेळेला शहीद होतो, त्यावेळेला आपण सर्वानी टिव्ही वर पाहीलं दुर्दैवाने या गोष्टी आमच्या कासारवाडीने अनुभवली आहे आणि त्याच बरोबर माझ्या घरातील माझ्याच कुटूंबातील एक व्यक्ती, एक जवान माझा बंधु आशा हाल्ल्यामध्ये गेलेला होता. त्यामुळे कुटूंबीयावर होणारी जी वेदना आहे ती शब्दात सगळेजण व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात परंतु या पाकिस्तानला जे दहशतवादाच उगमस्थान आहे त्याला सध्यातरी गप्प करनं ही आपल्या सगळयांची गरज आणि निश्चितपणे ती गरज आपले सन्मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनाही कळते आणि फक्त “ईंट का जवाब पत्थर से” असे न म्हणता त्याला वेगवेगळया युक्त्या कराव्या लागतील. याची पुर्ण कल्पना त्यांना आहे आणि त्याच पध्दतीने सन्मा.पंतप्रधान निश्चितपणे काम करतात याची सगळया भारतीयांना खात्री आहे आणि म्हणून आज सुध्दा आमचा सहनशिल भारत देश आजही सहन करण्याच्या भुमीकेमध्ये आहे. खरंतर हे सैन्य हे जवान आपल्या सिमेवरती लढतात म्हणून कुठेतरी आपला जीवनक्रम, आपण आनंदाने दिवस घालवतो, बीनाभीतीचा घालवतो. परंतु या सिमेवरील जवानाना आज सगळेजण आपआपल्या पध्दतीने बोलतात राजकीय भांडवल करतात, पण राजकीय भांडवल न करता मोदी सरकार हे मोदीच होते, की जे पहील्यांदा

मायनस डिग्री काय असतं, शुन्य डिग्री काय असतं  हे बघण्यासाठी ते त्याठिकाणी गेलेले होते आपल्या सैन्याची अवस्था काय असते हे त्यांनी पाहीलेले आहे आणि म्हणूनच ज्या भागामध्ये आपले हे भारतीय लोक आहेत ज्यांच्या घरातील, कुटूंबातील व्यक्ती, जवान म्हणून आपल्या सैन्यामध्ये भरती होत अशा सगळया भारतीय कुटूंबीयाच मनापासून कौतूक. त्यांना माहिती असते की कधीतरी माझ्या देशावरती अडचण आलीतर माझा मुलगा, माझा पती देशाच्या संरक्षणासाठी लढणार आहे तो त्याठिकाणी शहीद होऊ शकतो याची पुर्ण कल्पना असताना सुध्दा माझ्या इथल्या आया-बहीणी असतील, त्यांचे वडील असतील, त्यांचे बंधु असतील, सर्व कुटूंबीय असतील हे त्याला भरती करण्याच मनाधैर्य, त्यांच्यातली ती एक उर्जा म्हणावी लागेल की त्या उर्जेमुळे त्यांची ते भरती करतात आणि म्हणून आपण सगळेजण याठिकाणी निश्चिंतपणे असतो अशा सगळयाच जवानानां मनापासून आमच्या सगळया भारतीयांच्या वतीने सांगु इच्छिते की आम्ही सगळेच तुमच्या बरोबर आहोत आणि असा एखादा दुर्दैवी हाल्ला झाला त्यात शहीद होण्याची वेळ आली तर निश्चितपणे घाबरु नका आम्ही सगळे तुमच्या बरोबर आहोत आणि निश्चितपणे आपला देश त्या सगळया बरोबर असेल अशी खात्री आपल्या सगळयाच्या वतीने त्यांना देते. पुन्हा एकदा या दहशतवादी हाल्ल्यात जे शहीद जवान झाले त्यांना मनापासून पुन्हा एकदा आदरांजली अर्पण करते आणि दहशतवादी पाकिस्तानचा निषेध करते आणि थांबते.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जम्मू-काश्मीर मध्ये झालेल्या या भ्याड हाल्ल्याचा मी निषेध करतो. साता-या सारख्या जिल्हयामध्ये जेव्हा एखादया महीलेचा एखादया बहीणीचा पती देशाचे संरक्षण करताना शहीद झालेला असतो तरी त्या मातेची जीगर किती मोठी असते हे बघा. त्यानंतरही आपला मुलगा त्या सरहद्दीवर ती पाठवते, कुठलाही विचार न करता हा मोठेपणा ख-या अर्थाने येथे येतो. आपण अनेक वेगवेगळया जिल्हयामध्ये पाहीले असेल, प्रत्येकाच्या टि.व्ही.वर आपण इन्टरिव्ह पाहतो त्या माता-भगिनी त्यावेळेस बोलतात खरंतर अंगावर शहारे येतात. एवढे होत असताना निश्चितपणे कालचा झालेला भ्याड हाल्ला त्याच्या प्रतिक्रीया किती विचीत्र असतात. ख-या अर्थाने हा देश म्हणजे आपल एक कुटूंब आहे. आणि या आपल्या कुटूंबातील प्रत्येक सदस्य तिथ तडफडून उठतो आणि विरोध करायचा प्रयत्न करतो. परंतु जेव्हा हा हाल्ला झाला तेव्हा पासून वेगवेगळया टि.व्ही.वर वेगवेगळया पक्षाचे लोक अनेक मोठमोठे नेते मंडळी स्टेटमेंट देत होते. ते देताना विचीत्र आणि निषेधार्ह असे म्हणलेतरी वावग ठरणार नाही. प्रत्येकजण एकमेकांवर कुठतरी बोट दाखवणार. कुठतरी सरकारवर टिका करणार. हेच केल पाहीजे, तेच केल पाहीजे. आज मी पाहीलतर माझ्या मते प्रत्येक सरकारच्या काळात देशाच्या सरहद्दीवर अनेक आपले जवान शहीद झालेले आहेत आणि ते कुठतरी सिरीएस घेतले पाहीजे. या जवानाचे मनोबल वाढले पाहीजे अशा पध्दतीने ख-या अर्थाने प्रतिक्रीया आली पाहीजे. त्यांच्या कुटूंबाच कुठेतरी

मनोधैर्य राखल पाहीजे. आज ख-या अर्थाने आपला देश अनेक जाती-पतीमध्ये विखुरला गेलेला आहे. अनेक जातीपातीमध्ये आपण एकमेकांच्या समोरासमोर उभे राहु आणि अशा माध्यमातून या देशाची विक्रूता वाढत चाललेली आहे. आज ख-या अर्थान जबाबदारी असेलतर या राजकारण्यांची आहे प्रत्येक राजकारणी जर एकमेकांवर बोट दाखवत बसलातर त्या सैन्यांचे मनोधैर्य काय वाढणार आहे. मी विनंती करतो की या सभागृहामध्ये अनेक पक्षाचे लोक आहेत मी सर्वाना विनंती करतो ख-या अर्थाने या ठिकाणी एकत्रीतपणे श्रध्दांजली वाहीली गेली पाहीजे. ज्यावेळेला अशी देशावर वेळ येते त्यावेळेला एकजुटीने सर्वानी उभे राहीले पाहीजे अशा पध्दतीने ज्यावेळेस सर्व देश उभा राहतो त्यावेळेस कुणाचाही निभाव लागणार नाही. अर्थाने एकमेकांकडे दोष न देता ख-या अर्थाने एकत्र यावे म्हणजे ही ताकद एकजुटीची दाखविता येईल, निश्चितपणे आपल्या सैनिकाला मनोबल मिळेल आज जे काही शहीद झाले त्या जवानाना चांगल्याप्रकारे पाठबळ पाहीजे, एकजुटीने पाठबळ पाहीजे. आपला आख्ख देश आपल्या पाठिशी आहे असं त्यांच मनोबल वाढवल पाहीजे. या शहीदाना मी भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो. सर्वजण एकजुट झालेतर त्यांना चांगले उत्तर देउ एवढेच याठिकाणी बोलतो आणि थांबतो.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. देशाचे संरक्षण करत असताना बारमुल्ला उरी याठिकाणी रात्रीचा भ्याड हाल्ला झाला. त्यामध्ये शहीद झालेले २१ जवानांना मी भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो. श्रध्दांजली वाहत असताना आताच फरांदे ताई यांनी लता मंगेशकर यांचे गाणे ऐकवले. ते गाणे ऐकत असताना अंगावर शहारे येतात की देशासाठी आपले जवान त्याठिकाणी आहोरात्र लढतात. आपण चीनच्या बॉर्डवर गेललो होतो. बॉर्डवर गेलो असताना आपण पाहील चीनमध्ये बॉर्डरवरती जे सैनीक आहेत त्यांना सर्व सुविधा आहेत त्यांना त्याठिकाणी लाईटची सुध्दा सोय आहे. त्याठिकाणी बॉर्डरवरती बर्फात राहणारे आपल्या सैनिकांना जनरेटर आणि पऱ्याचे शेडमध्ये रहावे लागते. आपण तेथे गेलो असताना फार त्रास झाला तरी सुध्दा आपण विचार केला की आपण याठिकाणी आलोत ते दहा ते पंधरा मिनीटासाठी परंतु आहोरात्र आपले सैनिक त्याठिकाणी लढतात आशा सैनिकांना पाठबळ दिले पाहीजे. सुरवातीस आपल सरकार कुबडया घेऊन सरकार होतं परंतु आता मा.नरेंद्र मोदीचं सरकार एकहाती सरकार आहे त्यामुळे ते निर्णय घेऊ शकतात. तुम्ही आम्ही त्यांना सांगायची आवश्यकता नाही. मोदी सरकारला फक्त एकच विनंती आहे की मोदीची बस हुई आब मन की बात या पाकिस्तान्याला नेस्तानाभूत करुन टाका. दया आदेश, हवाई दलाचे व सर्व प्रमुख लोक विचारतात. फक्त मा. पंतप्रधानांनी आम्हाला आदेश दिला की फक्त तीन तासात आम्ही पाकिस्तानला भुईसपाट करुन टाकू एवढच याठिकाणी सांगतो. आज त्या कुटूंबावर खुप दुःख कोसळलेलं आहे. त्या दु:खामध्ये आपण सर्व सामील होऊ यात. त्यांच्या आत्म्याशी शांती लाभो. त्यांच्या कुटूंबीयावर जे दु:ख कोसळलेल आहे ते सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती

देओ. आताच आर.एस.कुमार यांनी सूचना मांडली नुसते पैसे देऊन चालणार नाहीतर पिंपरी चिंचवड महापालिका याठिकाणी हजारो लोक काम करतात. आज आपल्या महाराष्ट्रातील चार शिपाई बलीदान झालेले आहेत, शहीद झालेले आहेत त्यांच्या कटूंबातील एका व्यक्तीला आपल्या महापालिकेमध्ये सामावुन घेतलेतर ते बरे होईल. आर.एस.कुमार यांनी सूचना मांडली त्याला अनुमोदन देतो. पाकिस्तानचा मी निषेध करतो आणि जे शिपाई विरगती पडले आहेत त्यांना मी भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो, जयहिन्द!

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शहीद झालेले सर्व जवानांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण केली. "बेताब हमारे दिलमें एक मस्ती सी छाई हैं.. ऐ देश अलविदा कुछ कहो, कहनेकी घडी आई हैं. महेक गई तेरी फिजा में हाम बनके हवा का झोका किस्मतवालों को मिलता ऐसा मरने का मौका..त्रिवार सलाम मा. महापौर साहेब, ज्यांनी देशासाठी याठिकाणी बलीदान दिलं. खरंतर संपुर्ण देश एका दु:खाच्या घटनेतून जात असताना राजकारण करायच नाही, केल नाही पाहीजे या मताचे आपण सर्वजण असताना सुध्दा राहून राहून काही लोकांना वाटत की मोदी म्हणजे जादुची छडी, त्यांनी ती छडी फिरवावी आणि पाकिस्तानला जगाच्या नकाशावरुन गायब करावं. चला तुम्ही ते तरी मान्य करता की निदान मोदी मध्ये ती ताकद आहे, ती क्षमता आहे पंतप्रधानामध्ये की ती त्यांना गायब करु शकतात. या देशामध्ये सर्वात मोठा टेरेरीस्ट अटॅक हा मुंबईचा बॉमब्लास्ट होता. एकूण जे काही सोळा-सतरा टेरेरीस्ट अटॅक झाले त्यामध्ये जवळपास १९५० लोक मृत्यूमुखी पडले हजारो लोक त्याठिकाणी घायाळ झालेले आहेत. मुंबईवरती ज्यावेळेस हाल्ला झाला मग तो २६/११ चा दहशतवादी हाल्ला असेल मला वाटत त्यावेळेला मी असेल, सुलभाताई असतील आम्ही त्यावेळेला कुठलही राजकारण न आणता मुख्यमंत्र्यांना दोष न देता राज्याना, देशाना कुठल्याही सरकारला दोष न देता आम्ही श्रध्दांजली वाहीली आणि किमान आम्ही तेवढे त्यावेळेस सामंजस्य होतो. आम्ही पण एखादया व्यक्तीला दोष न देता त्याठिकाणी जे लोक दहशतवाद पसरवतात त्यांच्या प्रवृत्तीला आम्ही दोष देतो मगाशी भाऊसाहेब म्हणाले की काही लोकांनी वेगवेगळे टर्न दिले. गेल्या दहा वर्षात आम्ही सभागृहात आहोत मला तर काही आठवत नाही की असा दहशतवादी हाल्ला झाला आणि वेगळा टर्न दिला. विरोधी पक्ष म्हणून निश्चितपणे आम्ही येथे आहोत, आम्ही प्रत्येकवेळेला निषेध केला असेल. परंतु असा व्यक्तीगत निषेध एखादया सरकारचा करावा, पाकिस्तानने येऊन हाल्ला करावा हे कुठल्याही देशाचा कुठल्या पक्षाचा कोणीही पंतप्रधान असलेतरी त्यांना ते वाटणार नाही. आपण वयाने मोठे आहोत, बुध्दी सुध्दा प्रग्लभ आहे. तरी सुध्दा आपण दोष देतो आणि दिला पाहीजे. लोकशाहीमध्ये काहीही होऊ शकतं. मी आशाताईला आता म्हणल की अशा विषयाला, एखादया गोष्टीला टर्न दयायच म्हणलतर काय होऊ शकतं. समजा भारत आणि पाकिस्तानच युध्द झालं मोदी सक्षम पंतप्रधान आहेत त्यांनी कळवलं की पाकिस्तानला गायब करायच. संपुर्ण

महाराष्ट्रामध्ये आपण बघतो आम्हांला त्यामध्ये पडायचच नाही आणि म्हणून शांततेच्या मार्गाने शंभर टक्के “जैसे को तैसा जवाब” देणारच आज संबंध देशभरामध्ये, आपल्या ताकदीला हजारो लोक, लाखो लोक सलाम करतात. इतर देशाचे पंतप्रधान आपल्या पंतप्रधानाला न्यायला विमानतळावर येतात यातच आपल्या देशाची ताकद समावलेली आहे. आणि म्हणून शेजारच्या देशाच्या राज्यकर्त्याना वाटत असेल यांच्यावर हाल्ले केले यांचे सैनिक मारले तर ते आपल्याला कुठेतरी कमकुवत करु शकतात परंतु त्यांनाही माहिती आहे की जास्तच जर आपण फडफड केलीतर आपले पंख कापायला जास्त दिवस लागणार नाहीत किंवा जास्त वेळ लागणार नाही. याची शाश्वती मलाही आहे, तुम्हांलाही आहे या देशात राहणा-या प्रत्येक नागरीकाला आहे. मा.महापौर साहेब, याठिकाणी या सर्व शहीदाना खरंतर आर.एस.कुमार साहेबांनी सांगीतल की यांना जे महाराष्ट्रात आहेत त्यांना आपली महानगरपालिका काय मदत करु शकते, त्यांना आपण नौकरी देऊ शकतो का, त्यांच्या कुटूंबियाला काही हातभार लाऊ शकतो का. मगाशी आमच्या आशाताई एकदम भाऊक झाल्या होत्या. कारगील युध्दामध्ये जेव्हा भोसले वारले तेंव्हा त्यांनी त्यांच्या पत्नीला निरोप दिला होता की येत्या आठ ते पंधरा दिवसात मी भेटायला येतो. बायकोनी हातावर मेंदी काढलेली, घरामध्ये नटलेली की नवरा येणार आहे आज येतो, उदया येतो माहीती नाही आणि तीला फोन आला की तुझा नवरा शहीद झाला आहे. परंपरेन बांधलेलो आहोत, सांस्कृतीन जखडलेलो आहोत आणि अशा सौभाग्यवतीला सांगायला जायच तुझा नवरा या देशासाठी बलीदान गेलाय आणि एखादी सौभाग्यवती त्याठिकाणी रडत असताना त्याच्या मृत्यूच जर भांडवल आपण करत असुतर आपल्या सारखे दुर्दैवी आपणच आहोत मा.महापौर साहेब, मी सर्व शहीदाना याठिकाणी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते आणि एक छोटीशी कविता सांगते. “जिस देश में मेरे तिरंगे को छुकर हवा चली गई, जिस देश में मेरे तिरंगे को छुकर हवा चली गई, समझो ऊस देश की सारी बला चली गई, समझो ऊस देश की सारी बला चली गई, चुटकी मे सिमट कर रह जाऐगा ओ देश, चुटकी मे सिमट कर रह जाऐगा ओ देश, जिस में मेरी भारत माँ की बददुआँ चली गई”. जयहिन्द जय भारत, शहीद जवानानां त्रिवार सलाम! भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते आणि थांबते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने आपला जो देश आहे हा अहिंसेच्या मार्गाने, महात्मा गांधीजीने दिलेल्या मंत्राच्या अनुषंगाने, आपण गुण्यागोविंदाने या देशात राहत असून पाकिस्तान हा आपला भाऊबंधच आहे अशाप्रकारच्या भावना घेवून आपण आजपर्यंत भाईचा-याच्या मार्गाने, माणूसकीच्या मार्गाने आपण आजपर्यंत चालत आलेला आहोत परंतु आपल्या या आखंडतेला बाधा घालण्याचे पाकिस्तानचे मनसुबे आहेत ते या देशाच्या अखंडतेला तडा देण्याच्या बाबत त्यांचा जो विचार आहे तो आपला देश कदापि हे होऊ देणार नाही. वास्तविक पाहता पाकिस्तानच्या या भ्याड हाल्ल्याचा

आपण निषेध करतच आहोत परंतु हा देश एकसंघ राखण्यासाठी हे शुरवीर जवान रक्षण करत आहेत त्यांना कोटी कोटी सलाम! काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे “काश्मीर हमारा है और काश्मीर हमारा ही रहेगां” आणि यासाठी आपल्या सिमेचे रक्षण करणारे सर्व जवान आणि आताच सांगीतल्याप्रमाणे परवा जो हा भ्याड हाल्ला झाला आणि या भ्याड हाल्ल्यामध्ये २१ जवान शहीद झालेले आहेत. वास्तविक पाहता जर पाकिस्तानला हाल्ला करायचा असेलतर, युध्द करायचे असेलतर त्यांनी ओपन युध्द कधीही पुकारावे त्यासाठी आपला देश सज्ज आहे. परंतु एका बाजुला भाईचाऱ्यांनी असं सांगायच आणि दुसऱ्या बाजुला अशाप्रकारचे घातपाती हाल्ले करायचे याबद्दल मी त्यांचा जाहीर निषेध करतो. या सूचना काही मान्यवरांनी दिलेल्या आहेत त्यास अनुमोदन देतो. त्या संकल्पनेच्या अनुषंगाने आपण जर काही चांगली व्यवस्था त्यांच्या कुटूंबीयासाठी करु शकलो तर ते एका दृष्टीने आपण चांगल पाऊल उचललं असं म्हणता येईल. मी पुन्हा या भ्याड हाल्ल्याचा जाहीर निषेध करतो आणि या शहीदांना भावपुर्ण आदरांजली अर्पण करतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. काश्मीर येथे उरी येथे झालेल्या, पाकिस्तानने केलेल्या भ्याड हाल्ल्यामध्ये आपले २१ जवान अमर झाले या सर्व जवानांना माझ्या वतीने, सभागृहाच्या वतीने, पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने मी भावपुर्ण श्रध्दांजली वाहते. ज्यावेळेला आपण येथे सुरक्षीत असतो त्यावेळेला देशासाठी जे आपले जवान आपल्या सर्वांचे रक्षण करत असतात. तुम्ही आम्ही सर्वजण कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यठिकाणी आपण गेलेलो आहोत ज्यावेळेला ते प्रत्यक्षात दृष्य बघतो त्यावेळेला खरंच अंगावर शहारे येणारे ते दृष्य असतं आणि हे दृष्य बघीतल्यानंतर आपल्याला प्रत्येकाला असे वाटते की आपण आपल्या देशामध्ये कोणत्या गोष्टीमुळे सुरक्षीत आहोत तर या भारतीय जवानामुळे आज आपण सुरक्षीत आहोत. या पाकिस्तानामध्ये ज्यावेळेला पाकिस्तानी पंतप्रधानाना हे माहित नाही की ते म्हणतात आज तुम्ही आम्हांला सबळ पुरावे दया. आज इतके सबळ पुरावे असताना सुध्दा पाकिस्तानच्या पंतप्रधानाना हे लक्षात येत नाही की आपल्याकडुन हा भ्याड हाल्ला झाला. परंतु सर्व देशानी आणि सर्व देशातील नागरीकांना म्हणजे फक्त आपणच नाही, भारतच नाहीतर सर्व देशातल्या नागरिकांना आणि त्यांच्या त्यांच्या पंतप्रधानाना सुध्दा हे कळले आहे की हा जो भ्याड हाल्ला आहे तो पाकिस्ताननेच केलेला आहे आणि दरवेळेला ते भ्याड हाल्ले करतात आणि पळपुटया सारखे आम्ही त्यातले नाहीत असे सांगण्याचा केवीलवाणा प्रयत्न कायमचा ते करतात आणि म्हणूनच या सगळया देशानी एकत्र येऊन पाकिस्तान आणि पाकिस्तानातल्या या सगळया अतिरेकी कारवायावर आपण एक चांगल्या पध्दतीचा निर्णय घेवुन देशानी त्यांच्यावर एक वचक बसविला पाहीजे. चांगल्या पध्दतीची त्यांच्यावर योग्य पध्दतीने रणनीती आखून हे केले पाहीजे. येथे कोणत्याही पक्षाचा नेत्यांचा प्रश्न येत नाही कारण शेवटी देश हा आपला आहे. आपण नेहमी म्हणत असतो भारत माझा

देश आहे त्याप्रमाणे देश आपला आहे आणि या देशासाठी तुम्ही-आम्ही सर्वजण कटिबध्द आहोत. हे जवान आपल्यासाठी काम करत असतात व भ्याड हाल्ल्यामध्ये आपले जवान शहीद होतात त्यावेळेला प्रत्येक घरामध्ये, कुटूंबामध्ये आज ते आपल्यातीलच आहे असे मनापासून वाटतं, एखादी घटना आपल्याला समजल्यानंतर आपल्याला असं वाटत की हा आपला माणूस आहे. कुठल्याही व्यक्तीला असं वाटत नाही की हा आमचा माणूस नाही. म्हणून या भ्याड हाल्ल्याचा निषेध करुन आजची ही सभा दि. २८/९/२०१६ रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करावी अशी मी सूचना मांडते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.महापौर-** आताच सन्मा.सदस्यांच्या मागणीनुसार शहीद झालेल्या जवानांना सभागृहाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. मान्यवरांनी शहीदांच्या विषयी चांगल्या सुचना मांडलेल्या आहेत. सर्व पक्ष एकत्र येऊन नक्कीच त्याच्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न करता येईल. आपल्या महापालिकेतून काय देता येईल त्यासाठी सुध्दा प्रयत्न करता येईल. जो भ्याड हाल्ला झालेला आहे त्याचा निषेध करून आजची सभा बुधवार दि.२८/९/२०१६ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ६३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.२०/०९/२०१६ ची तहकूब सभा )</u>**

दिनांक - २८.०९.२०१६ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/०९/२०१६ ची (माहे-सप्टेंबर २०१६) तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२८.०९.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.पात्रे राम संभाजी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश

१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.पवार मनीषा काळूराम

४७. मा.प्रसाद शेट्टी

४८. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५३. मा.वाबळे संजय मल्हारराव

५४. मा.मडिगेरी वर्षा विलास

५५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५७. मा.सुपे आशा रविंद्र

५८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५९. मा.मोहिनीताई विलास लांडे

६०. मा.गोफणे अनुराधा देविदास

६१. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६३. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६४. मा.सावळे सिमा रविंद्र

६५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६६. मा.पालांडे सुजाता सुनिल

६७. मा.बहल योगेश मंगलसेन

६८. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.छाया जगन्नाथ साबळे

७१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७२. मा.टाक अरुण मदन

७३. मा.आसवाणी सविता धनराज

७४. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७६. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७७. मा.पाडाळे निता विलास

७८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८०. मा.विमलताई सुरेश जगताप

८१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८२. मा.बारणे निलेश हिरामण

८३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८४. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८५. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८६. मा.कलाटे स्वाती मयुर

८७. मा.चौंधे आरती सुरेश

८८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९०. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९१. मा.जवळकर वैशाली राहु ल

९२. मा.जगताप राजेंद्र गणपत

९३. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९४. मा.जगताप नवनाथ दत्तु

९५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९७. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

९८. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

९९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१००. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०१. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०३. मा.संजय केशवराव काटे

१०४. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०५. मा.पाटील सुजित वसंत

१०६. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१०७. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.तानाजी शिंदे- अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कांबळे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गड्डूवार, मा,पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे -कार्यकारी अभियंता, मा.लहारे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.बुरसे-मुख्य अभियंता, पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. देशात, वास्तविक पाहता महाराष्ट्रामध्ये हा लढा चालू आहे. मराठा संघाने ही मागणी केलेली आहे त्याच्या अनुषंगाने जे मोठमोठे मोर्चे निघतात त्याची नोंद भारतामध्ये नव्हेतर जगामध्ये घेतली जाईल अशाप्रकारचे विक्रमी मोर्चे आहेत आणि शिस्तबध्द पध्दतीने काढले जातात. त्यांच्या मागण्याकड सगळयांच लक्ष आहे. सरकारने देखील त्याची दखल घेतलेली आहे. असं असताना सामना पेपरमध्ये जे व्यंगचित्र छापून या समाजाचा अवमान करण्याचा प्रयत्न केलेले आहे त्या कृत्याचा मी राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने, सभागृहाच्या वतीने याठिकाणी जाहीर निषेध करतो, त्यांना पाठिंबा देत असताना याचा निषेध करुन आपण ही सभा तहकूब करावी अशी मी सूचना करतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, सुचनेस मी अनुमोदन देतो आणि पंधरा मिनीटासाठी ही सभा तहकूब करावी अशी मी विनंती करतो.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब या विषयावर आम्हांला बोलू दयावे या विषयावर आम्हांला आमचे मत मांडायचे आहे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब्र, या विषयावर बोलू दयावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सर्वानी खाली बसून घ्यावे, बाकी कोणी बोलणार नाही फक्त एक जणच बोलेल.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आज संपुर्ण जगभरामध्ये या मराठा क्रांती मोर्चाची चर्चा सुरु आहे. एवढेच नव्हेतर प्रत्येक मराठा या मोर्चामध्ये सहभागी झालेला आहे आणि जो कुठल्या कारणान्वये या मोर्च्यामध्ये सहभागी होऊ नाही शकला त्यांच सुध्दा मन त्या मोर्चामध्ये सहभागी झालेलं होत. या सगळया गोष्टी होत असताना संपुर्ण जिल्हयातून हे वातावरण ढवळून निघाल असताना अशाप्रकारचे सामना वर्तमानपत्रामध्ये एक कार्टून आलं त्याच्या संदर्भात त्याचा अर्थ, त्याचा विपर्यास झाला. करणारे लोक कोण आहे जे आता निषेध नोंदवतात त्यांच्या सारखीच काही लोक आहेत की या मराठा मोर्चामध्ये शिवसेनेचे सुध्दा पदाधिकारी असतील, कार्यकर्ते असतील, शिवसेनेला मतदान करणारे लोक असतील सर्व पक्ष यामध्ये आहेत आपण कुठल्याही पक्षाच वळण लावता कामा नये अशाप्रकारचे सर्व लोक या मराठा मोर्चामध्ये सहभागी होते. मुस्लमान लोकांनी सुध्दा मराठी मोर्चाला पाणी दिलं त्याठिकाणी समोस्याच वाटप केलं. सर्व जाती-धर्माची जी मित्रमंडळी होती ती सुध्दा या मराठा मोर्च्यामध्ये सहभागी झाली. अत्यंत शिस्तप्रिय, आपण सगळयांनी बघीतलं आहे खरंतर आपल्या सारख्या लोकांची लायकी सुध्दा नाही त्या विषयावर बोलण्याची. पण आपण शिवसेना या पक्षाला डोळयासमोर ठेवून हे जे काही चांगल वातावरण चाललेल आहे जे आपल्याला उदयाच मरण दिसतंय, हे मरण दिसण्यामुळे तुम्ही या पक्षाला टार्गेट करण्यासाठी अशाप्रकारचा निषेध व्यक्त करताय. निश्चितपणे शिवसेनेनी सुध्दा शिवसेनेच्या प्रत्येक नेत्यांनी सुध्दा या गोष्टीचा स्वत: निषेध केलेला आहे. जे प्रभू देसाई आहेत त्यांनी जे व्यंग चित्र काढलेले आहे त्यांचा शिवसेनेशी कुठलाही संबंध नाही, सामना वर्तमानपत्रामध्ये ज्या गोष्टी आल्यात त्याची दिलगीरीही व्यक्त केली गेलेली आहे. समाजाला दुखावण्याची भावना नाही आणि त्याच राजकारण महानगरपालिकेच्या या सभेमध्ये, या सभागृहात व्हाव आणि पिंपरी चिंचवड शहराच सुध्दा जे वातावरण आहे ते खराब करावं, म्हणजे खरंतर भ्रष्टाचाराचे आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेसवरती होत असताना दुसरी कुठतरी दिशाभूल करायची दुसरीकड कुठतरी बोट दाखवायचं आणि स्वत:चे जे लांच्छन आहे ते दुस-यावरती टाकायची अशाप्रकारची ही निषेधाची भावना ही काही चांगली नाही. त्यामुळे सामनामध्ये आलेल्या या कार्टूनच आम्ही कोणीही समर्थन करत नाहीत, एक महिला म्हणून बोलत असताना अत्यंत जबाबदारीने बोलते आहे ही जी झालेली चुक आहे त्यासाठी आमच्या खासदारांनी सुध्दा राजीनामा दिलेले आहेत, मग त्याच भांडवल, दुस-याच्या टाळूवरच लोणी खाण्याचा हा जो प्रकार आहे निषेध करण्याचा तो निंदनीय आहे. त्यांनी केलेल्या निषेधाचा मी याठिकाणी निषेध

करते. शिवसेना ही मराठा या संघटनेच्या पाठिमागे आहे आणि असणार आहे. सामानाने सुध्दा आज दिलगीरी व्यक्त केलेली आहे.

**मा.महापौर -** सन्मा.सदस्यांच्या विनंतीनुसार आज व्यंगचित्र आलेले आहे त्याचा निषेध म्हणून आजची सभा दि.२८/९/२०१६ रोजी दु.२.२५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ६३**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/०९/२०१६ व दि.२८/०९/२०१६ (दु.२.००) ची तहकूब सभा )**

दिनांक - २८.०९.२०१६ वेळ - दुपारी २.२५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२८/०९/२०१६ दुपारी २.०० ची (माहे-सप्टेंबर २०१६) तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२८.०९.२०१६ रोजी दुपारी २.२५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.पात्रे राम संभाजी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश

१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.पवार मनीषा काळूराम

४७. मा.प्रसाद शेट्टी

४८. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५३. मा.वाबळे संजय मल्हारराव

५४. मा.मडिगेरी वर्षा विलास

५५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५६. मा.सुपे आशा रविंद्र

५७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५८. मा.मोहिनीताई विलास लांडे

५९. मा.अजित दामोदर गव्हाणे

६०. मा.गोफणे अनुराधा देविदास

६१. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६२. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६४. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६५. मा.सावळे सिमा रविंद्र

६६. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६७. मा.पालांडे सुजाता सुनिल

६८. मा.बहल योगेश मंगलसेन

६९. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७०. मा.गिता सुशील मंचरकर

७१. मा.छाया जगन्नाथ साबळे

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.टाक अरुण मदन

७४. मा.आसवाणी सविता धनराज

७५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७६. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७७. मा.पाडाळे निता विलास

७८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८०. मा.विमलताई सुरेश जगताप

८१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८२. मा.बारणे निलेश हिरामण

८३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८४. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८५. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८६. मा.चौंधे आरती सुरेश

८७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८८. मा.बोकड रामदास गेणभाऊ

८९. मा.जवळकर वैशाली राहुल

९०. मा.जगताप राजेंद्र गणपत

९१. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९२. मा.जगताप नवनाथ दत्तु

९३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९५. मा.प्रशांत शितोळे

९६. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

९७. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९८. मा.शेंडगे आशा सुखदेव

९९. मा.मोटे किरण बाळासाहेब

१००. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०१. मा.संजय केशवराव काटे

१०२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१०४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.तानाजी शिंदे- अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कांबळे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गड्डूवार, मा,पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे -कार्यकारी अभियंता, मा.लहारे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.बुरसे-मुख्य अभियंता, पीएमपीएमएल, मा.परदेशी-प्रशासन अधिकारी (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

## <u>नियुक्त्या</u>

**<u>विषय क्रमांक - १</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे खालील ४ (चार) विशेष समित्या
नेमणे : -

(१) विधी समिती -

(टिप - विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(२) महिला व बालकल्याण समिती -

अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

(३) शहर सुधारणा समिती

(टिप - शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(४) क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

(टिप - क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

**<u>मा.नगरसचिव</u>** - विषय क्रमांक १ - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे ४ (चार) विशेष समित्या नेमणे. विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.

(१) विधी समिती - विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.
विधी समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत **<u>राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८४</u>**, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२१, **<u>शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१६</u>**, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने विधी समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत विधी समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.नंदा विकास ताकवणे २) मा.आर.एस.कुमार, ३) मा.आल्हाट मंदा उत्तम, ४) मा.भारती फरांदे, ५) मा.पाडाळे निता विलास, ६) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम, ७) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर, ८) मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ, ९) मा.शारदा प्रकाश बाबर या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

**<u>मा.नगरसचिव</u>** - (२) महिला व बालकल्याण समिती -

(अ)महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

[महिला व बालकल्याण समितीवर २ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत **<u>राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ८४</u>**, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - २१, **<u>शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १६</u>**, महाराष्ट्र नवनिर्माण सेना - ०४, भारतीय जनता पक्ष - ०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ०१, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-०१, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे व २) मा.संगिता शाम पवार या पालिका सदस्यांच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहिर करण्यात आले.)

**<u>मा.नगरसचिव -</u>** (२) (ब) महिला व बाल कल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

[महिला व बालकल्याण समितीवर ७ महिला सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत **<u>राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ८४</u>**, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - २१, **<u>शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १६,</u>** महाराष्ट्र नवनिर्माण सेना - ०४, भारतीय जनता पक्ष - ०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे / गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या महिला सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ०५, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - ०१, शिवसेना व आर.पी.आय.महायुती (आघाडी) - ०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर महिला सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा. गोफणे अनुराधा देविदास २) मा.आशा सुपे, ३) मा.श्रध्दा बाजीराव लांडे, ४) मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश, ५) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर, ६) मा.शकुंतला काशिनाथ बनसोडे, ७) मा.वैशाली राहुल जवळकर या पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहिर करण्यात आले.)

**<u>मा.नगरसचिव -</u>** (३) शहर सुधारणा समिती -

शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

[शहर सुधारणा समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत **<u>राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८४,</u>** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२१, **<u>शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१६</u>**, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने शहर सुधारणा समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/ विरोधी पक्षनेता / पक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या / गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत शहर सुधारणा समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे

मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे, २) मा.जाधव साधना रामदास, ३) मा.पालांडे सुजाता सुनिल, ४) मा.सौ.स्वाती प्रमोद साने, ५) मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर, ६) मा.पाटील सुजित वसंत, ७) मा.सविता धनराज आसवाणी, ८) मा. अरुणा दिलीप भालेकर, ९) मा.बाबासाहेब निवृत्ती धुमाळ या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

**<u>मा.नगरसचिव</u>** - (४) क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती -

क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ०९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

[क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत **<u>राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८४</u>**, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२१, **<u>शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१६,</u>** महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात

आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.जावेद रमजान शेख, २) मा.ओव्हाळ शेखर अशोक, ३) मा.ननवरे जितेंद्र बाबा, ४) मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे, ५) मा.तानाजी विठ्ठल खाडे, ६) मा.बो-हाडे अरुण तुकाराम, ७) मा.विनोद जयवंत नढे, ८) मा. समिर मोरेश्वर मासुळकर, ९) मा.विमलताई सुरेश जगताप या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

ठराव क्रमांक - ९२४ विषय क्रमांक - १

दिनांक - २८/९/२०१६ विभाग - नगरसचिव

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे १) मा.विधी समिती, २) मा.महिला व बालकल्याण समिती, ३) मा.शहर सुधारणा समिती, ४) मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती या ४ (चार) विशेष समित्या नेमण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच

१) **मा.विधी समिती** - मा.विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.नंदा विकास ताकवणे २) मा.आर.एस.कुमार, ३) मा.आल्हाट मंदा उत्तम, ४) मा.भारती फरांदे, ५) मा.पाडाळे निता विलास, ६) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम, ७) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर, ८) मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ, ९) मा.शारदा प्रकाश बाबर या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच -

२) **मा.महिला व बालकल्याण समिती** - अ) मा.महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक

संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे व २) मा.संगिता शाम पवार या पालिका सदस्यांच्या व (ब) महिला व बाल कल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा. गोफणे अनुराधा देविदास २) मा.आशा सुपे, ३) मा.श्रध्दा बाजीराव लांडे, ४) मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश, ५) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर, ६) मा.शकुंतला काशिनाथ बनसोडे, ७) मा.वैशाली राहुल जवळकर या पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच -

**३) <u>मा.शहर सुधारणा समिती</u>** - मा.शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे, २) मा.जाधव साधना रामदास, ३) मा.पालांडे सुजाता सुनिल, ४) मा.सौ.स्वाती प्रमोद साने, ५) मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर, ६) मा.पाटील सुजित वसंत, ७) मा.सविता धनराज आसवाणी, ८) मा. अरुणा दिलीप भालेकर, ९) मा.बाबासाहेब निवृत्ती धुमाळ या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच -

४) **<u>मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>** - मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.जावेद रमजान शेख, २) मा.ओव्हाळ शेखर अशोक, ३) मा.ननवरे जितेंद्र बाबा, ४)

मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे, ५) मा.तानाजी विठ्ठल खाडे, ६) मा.बो-हाडे अरुण तुकाराम, ७) मा.विनोद जयवंत नढे, ८) मा. समिर मोरेश्वर मासुळकर, ९) मा.विमलताई सुरेश जगताप या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माक्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

------

(चार विशेष समित्यांवर नियुक्त्या झालेल्या नवनियुक्त सन्मा.सदस्यांचा मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.पदाधिकारी व मा.गटनेते यांचे हास्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करणेत आला.)

-------

**मा.महापौर-** प्रश्नोत्तरे घेणेत यावे.

**मा.नगरसचिव -** मा.दत्तात्रय साने यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह मी जी.बी.च्या माध्यमातून काही प्रश्नोत्तरे सभागृहामध्ये विचारलेले होते पिंपरी चिंचवड शहरामध्ये आपल्या महापालिकेची सुरक्षा व्यवस्था आहे. या सुरक्षेव्यवस्थेमध्ये अनेक कारनामे सध्या चालू आहेत त्यामध्ये मा.आयुक्त साहेब आपण जरा गांभीर्याने लक्ष दयावं. जर आपल कुंपणच शेत खात असेलतर मला वाटत महानगरपालिकेचा याच्या पेक्षा दुर्भाग्याचा कुठला विषय नसेल. एक निनावी पत्र आपल्याला आलेल होतं आणि काही नगरसेवकांना सुध्दा हे पत्र आलेलं होतं त्या पत्रामध्ये सुरक्षा विभागातील एक त्रयस्थ रखवालदार या नावानं ते पत्र आपल्याला आलं होतं. ते पत्र मी आपल्याला वाचून दाखवितो. "मी आपणास अनुसरुन लिहीतो की, सुरक्षा अधिकारी, मुख्य सुरक्षा अधिकारी, सह सुरक्षा अधिकारी, पर्यवेक्षक व सह पर्यवेक्षक या लोकांकडून आम्हांला मानसीक त्रास होत आहे. त्याचा परिणाम म्हणून आम्हांला आमच्या शारीरीक जीवनावर व कौटूंबिक कुटूंबावर होणारा त्रास खालीलप्रमाणे- हे दोन अधिकारी या लोकांची मते इतर लोकांबद्दल फार वाईट आहेत. मानसीक त्रास दिला जातो उदा. जर एखादा रखवालदारास सुट्टी हवी असेलतर त्याची अडवणूक केली जाते कारण ते सह सुरक्षा अधिका-यांकडे पाठवितात. सह सुरक्षा अधिकारी काही ऐकूण घेण्याच्या मनस्थितीत नसतात. चुटकी वाजवीतच गेट आऊट करतात. सुट्टीसाठी ते आडवतात मग आम्ही एखादया नगरसेवकांकडे गेलो असता आमचे काम तात्पुरत्या स्वरुपात करतात. व नंतर आम्हांला बोलावून घेतात. तुझ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करु का? दंड करु का? यानंतर कारणे दाखवा नोटीस बजावली जाते व ते आम्हांला उत्तर दयायला सांगतात आणि मग इन्चार्ज व सुपरवायझर लोक पार्टीची मागणी करतात. आणि मग आम्हांला तेथे पार्टीसाठी पैसे दयावे लागतात मग ते आमच उत्तर समाधानकारक आहे असं मान्य करतात. असे प्रकार माझ्या बाबतीत दोनदा

होऊन गेले आहेत आणि बाकिच्या सुरक्षारक्षाकांना पण असा त्रास भोगावा लागतो. सुरक्षा पर्यवेक्षक व अधिकारी यांच्यात युनिटी चालते. अशात आमच्या होणा-या वारंवार बदल्या, पैसे दिले की बदली थांबवतात कॉन्ट्रॅक्टर लोक काही बोलत नाहीत त्यांच्याकडून मोठा मलीदा भेटतो. तसेच काही मिळकती मुद्दामहु न कॉन्ट्रॅक्टरला सोडून देतात तसेच महिला सुरक्षारक्षका कडून सुध्दा आम्हांला सुचना आलेली आहे की लोक आमच्याकडे घाणेरडया नजरेनी पाहतात. वारंवार त्यांच्या फोनवर एसएमएस करतात. एक विशेष बाब म्हणजे आताचे नवीन सुरक्षा अधिकारी त्यांना रुजू होऊन दोन ते आडीच वर्षे झाले त्यांना जुन्या लोकांची पण ओळख नाही. कधी कोणत्या पॉईंटला व्हिजीट नसते. साध्या कर्मचा-यांना पण ओळखत नाहीत अशीही अवस्था झाली. तसेच आम्हांला असे आढळून आले आहे की, मिळकतीवरचे रखवालदार तब्बल दोन-दोन, तीन-तीन दशके ठाण मांडून बसलेले आहेत. त्यांच्याकडून यांना दर महीन्याला पार्टीसाठी निमंत्रण असतं. कातर ते मोठे सावकार आहेत. आम्ही सर्व्हे केला असता जवळ जवळ आपल्या घाराजवळच्या मिळकतीवर कॉन्ट्रॅक्टर सिक्यूरीटीचाच माणूस आहे. या एजन्स्या मुळातच यानी पोसल्यात. याबद्दल बोलायचे झालेतर ते खुप त्रासदायक ठरेल. आज ड, अ, क, वायसीएम येथील हे पर्यवेक्षक रखवालदार खुप छळ करतात. उदा. वेळेवर सुट्टया न देणं, डबल शिफ्टमध्ये काम करुन घेणं, वारंवार बदली करणे, खालच्या पातळीवरच बोलणे, डयुटी व्यवस्थिंत न लावणे. त्यांना दारुच्या बाटल्या आणून देणे, त्यांच्यामध्ये राहणे व न राहील्यास त्यांना त्रास करणे. हे लोक आपल्या गणवेषामध्ये कधीच नसतात. पण दुस-या कडूनतर खुप अपेक्षा धरुन असतात, त्यांची वाढलेली दाढी, खादी कपडे, चप्पलमध्ये फिरणे आणि आपल्या प्रभागामध्ये पत्ते पिसणे, पार्टी करणे या गोष्टी आम्हांला खुप त्रासदायक ठरत आहेत. पर्यवेक्षक आपल्या घराजवळचे प्रभाग मागवून घेतात. मग काही दिवस त्यांची सारखी ये-जा सुरु असते आणि आम्हांला कधीही या टोकापासून त्या टोकापर्यंत डयुट्या देत असतात. तसेच हे लोक ऑनडयुटी दारु पिऊन असतात. काही प्रभागाचे इन्चार्ज लोक नामधारी आहेत. कारण ते सुरक्षा पर्यवेक्षकांच्या मर्जीतले आहेत. हे लोकतर खुपच मानहाणी आणि साहेबांना शोभेल असे काम करतात. अर्जीत रजा, मेडीकल रजा, किरकोळ रजा याचे अर्ज यांच्या कडून दयावे लागतात. मग काय दारुच्या खांब्याची मागणी करतात. त्याच्यानंतरच सुट्टया आणि रुजू रिपोर्ट मिळेल नाहीतर हे सुरक्षा पर्यवेक्षकांना सांगतात की आपल्याकडे माणस खुप कमी आहेत यांना सुट्टया नाही देऊ शकत आणि हे पण आपल्या सुरक्षेच्या ड्रेसकोडमध्ये नसतात. कारण हे साहेबांच्या पुढे मागे करतात. अशा गोष्टीना कुठेतरी पायबंद बसला पाहीजे. ज्यावेळेस आयुक्त परदेशी साहेब होते तेंव्हा हा विभाग सुरळीत चालू होता पण आता त्यांच्या बदलीनंतर पुर्वी होता तसाच राहीला आहे. परदेशी साहेबांनी सुरक्षा पर्यवेक्षक व इन्चार्जच्या नेहमी बदल्या केल्या होत्या. आता या गोष्टीना मुहूर्तस्वरुप प्राप्त झालं आता नंतर मा.आयुक्त जाधव साहेब यांनी परिपत्रक काढले होते की त्यांच्या कामाच्या शिस्तीबाबत पण त्यांच्या पर्यवेक्षकाला पण

या लोकांनी केराची टोपली दाखवली आहे. असं हे सुरक्षा विभागामध्ये चालत आहे तरी आम्ही आपणास एक नम्र विनंती करतो की तुम्ही येत्या जनरल बॉडी मिटींगमध्ये हा विषय काढून सार्थकी लावावा यामुळे आमचा १ मे चा कामगारांचा दिन अभिमानाने जाईल." हे १ मे च्या अगोदर ब-याच लोकांना हे निनावी पत्र महापौर साहेब आपल्याकडे पण आलेल आहे. हे पत्र निनावी आहे या पत्रामध्ये कमीत कमी १२ ते १५ लोक सहभागी आहेत आणि हे प्रत्यक्षरीत्या मला भेटलेले आहेत त्यांच्या व्यथा सुध्दा त्यांनी मला सगळया सांगीतलेल्या आहेत. त्यांनी एक मे ला हे पत्र पाठविल आहे. असे प्रकार जर आपल्या येथे घडत असतीलतर मला वाटत नाही चांगल्या दृष्टीने हा विषय असेल. मी असा प्रश्न विचारलेला आहे- सुरक्षा विभागातील ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदारांना ड्रेस कोड आहे का. काही रखवालदार कामावर येताना दारु पिऊन येतात, काही रखवालदार कामावर न येता त्यांची हजेरी लावतात. व त्यांचे बिल व पगार घेतले जाते हि वस्तूस्थिती आहे का. अशा प्रकरणी संबंधितांवर काय कारवाई केली जाते. साहेब, अतीशय सुंदर, सोप उत्तर देणारे हे महाशय. त्यांनी असं उत्तर दिलेल आहे की सुरक्षा विभागासाठी ठेकेदारी पध्दतीने रखवालदार मदतनीस नेमण्याबाबत सन २०१५-१६या आर्थिक वर्षासाठी काढणेत आलेल्या निविदेनुसार मनपा मिळकतीसाठी ५ एजन्सीजला विभागून ४४९ रखवालदार मदतनीस व मनपाचे शाळांसाठी २९४ रखवालदार मदतनीस पुरविणेकामी कार्यारंभ आदेश देणेत आले आहेत. संबंधित एजन्सीजशी झालेल्या करारनाम्यातील अटीनुसार ड्रेसकोड बंधनकारक करणेत आलेले आहेत. ड्रेसकोड हा बंधनकारक आहे. मनपा मिळकती व शाळांच्या सुरक्षेसाठी नियुक्त केलेल्या ठिकाणी तपासणीकामी सुरक्षा विभागामार्फत मनपाचे अस्थापनेचे प्रभाग निहाय १४ सुरक्षा पर्यवेक्षक नेमणेत आले आहेत व त्यांचे दैनंदिन तपासणी अहवाल दुसरे दिवशी सुरक्षा विभागाकडे जमा केला जातो व त्याच बरोबर मनपा शाळेंसाठी मुख्याध्यापकांकडून रखवालदार मदतनीसांचा मासिक हजेरी अहवाल प्राप्त करुन त्यानुसार दंड कपात करुन देयके एजन्सीला अदा केली जातात. करारनाम्यातील अटीनुसार नियुक्त रखवालदाराने गणवेश परिधान न केलेस व तसे तपासणीत आढळलेस प्रतिदिन प्रति व्यक्ती र.रु. ५०/- दंड आकारणे येतो. तपासणी दरम्यान अनुपस्थित कर्मचा-यांवर देखील त्या दिवसाचा पुर्ण पगार कपातीचा दंड आकारण्यात येतो, कामावर झोपलेले आढळल्यास प्रतिदिन प्रतिव्यक्ती र.रु. १००/- प्रति कर्मचारी दंड आकारण्यात येतो व एकूण दंडाचे रकमेवर ५ टक्के दंड कपात केला जातो. त्याच बरोबर प्रति महिना र.रु. २,०००/- अतिरिक्त दंड संबधित एजन्सीसला केला जातो. कर्मचा-यांने कामावर असातना मदयपान अथवा गैरवर्तन केल्यास प्रतिदिन प्रति कर्मचारी र.रु. ५००/- दंड केला जातो. आज अखेर सदर ठेकेदारांचे मासीक बीलातून करारनाम्यातील अटीनुसार माहे जानेवारी १६ ते जुलै १६ अखेरच्या पर्यवेक्षकीय अहवालानुसार र.रु. ४,०१,९२४/- दंडाची रक्कम कपात करणेत आलेली आहे. म्हणजे हे जे आरोप केलेले आहेत ते शंभर टक्के सिध्द आहेत असं मला म्हणाव

लागतंय. जर हे र.रु. ४,०१,९२४/- दंडाची रक्कम कपात केलेली आहे तर मग हे जे आरोप आहेत हे शंभर टक्के सिध्द आहेत. आपल्या शहरामध्ये काही ठिकाणी अतीशय संवेदनशील ठिकाणी सुरक्षारक्षकाची गरज आहे. मी ज्यावेळेस फिरत होतो त्यावेळेस मला काही सुरक्षारक्षक झोपलेले सापडले आहेत. साहेब मी हे फोटो काढलेले आहेत ते बघा. सुरक्षा रक्षक झोपलेला आहे, एका ठिकाणी दारुच्या पार्ट्या चालतात. या पार्ट्यांचे फोटो माझ्याकडे आहेत. आपण याठिकाणी ड्रेसकोड बंधनकारक आहे असं म्हणतात तरी आपला अधिकारी ड्रेसकोडमध्ये नाही. याचे फोटो माझ्याकडे आहेत, पुरावा आहे. हे जे उत्तर दिलेले आहेत ते खोटे उत्तर दिलेले आहेत. जर हे अधिकारी किंवा कर्मचारी झोपलेल्या अवस्थेत तेथे असतीलतर हे काय चालल आहे. कार्यशाळेमध्ये जेवढया चो-या झाल्या आहेत त्याला जबाबदार फक्त सिक्युरीटी आहेत. मिलेजूले काम करतात तिथ आपले सीसीटीव्ही मंजूर झालेले आहेत ते मंजूर झालेले असताना का बसविलेले नाहीत, यांच्या चो-या उघडकीस येतील म्हणून. चो-या करणा-या लोकांचे फोटो माझ्याकडे आहेत. जर महानगरपालिकेची अशी अवस्था असेलतर तर मग काय. नक्की कोणाच्या जीवावर पालिका चाललेली आहे. परवा कुठल्यातरी पेपरने महानगरपालिकेमध्ये स्टिंग ऑपरेशन केलं, स्टिंग ऑपरेशन करताना कुठलातरी चाकू घेवून तो महापालिक्त आला आणि त्याचे फोटो सुध्दा वर्तमानपत्रामध्ये आलेले आहेत. असे असताना सुध्दा सिक्युरीटला काही माहिती मागीतली किंवा उत्तर मागीतलेतर ते सुध्दा देता आलेले नाहीत. मध्यंतरी कोणीतरी बोलल होतं उदया रिव्हॉल्व्हर येतील, बॉम्ब येतील मग आपल्या सिक्युरीटी काय करते. जर हे सगळ असताना याच्यावर गांभीर्याने विचार करणं गरजेच आहे. साहेब, माझा दुसरा प्रश्न असा आहे की- ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदारांची नेमणूकीच्यावेळी चारित्र्य पडताळणी केली जाते का. ठराविक रखवालदारांना सप्ताहिक सुट्टी दिली जात नाही मर्जीतील रखवालदारांना सवलत दिली जाते असा भेदभाव केला जातो का. ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदारांना बायोमेट्रीक (थंब) हजेरी चालू का केली नाही. याच उत्तर असं दिलेलं आहे करारनाम्यातील अटीनुसार ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदार मदतनीसांची एजन्सितर्फे पोलिसांमार्फत चारित्र्य पडताळणी केली जाते. पोलिसाव्दारे पहिले सदर व्यक्तिचे चारित्र्य पडताळणीसंबंधी पावती एजन्सिला दिली जाते व पोलिस चौकशी नंतर संबंधितांस पडताळणी प्रमाणपत्र दिले गेल्यावर एजन्सिमार्फत विभागाकडे जमा करणेत येते. करारनाम्यातील अटीनुसार एजन्सिने रखवालदारांना साप्ताहीक सुट्टी देणे बंधनकारक आहे व पर्याची व्यवस्था करणे ही ज्या त्या संस्थेची जबाबदारी आहे. ठेकेदारामार्फत नियुक्त रखवालदार मदतनीसांना बायोमफट्रीक थंम्ब हजेरी बाबतची अट निविदा/करारनाम्यात नाही. हे हजेरीपट आहे, साप्ताहीक सुट्टी दिली जात नाही. बोगस कामगार त्याठिकाणी असतात. पांडूरंग तेलंग, पाटील आणि गंगाराम मोरे या तीन्ही व्यक्तिंची हजेरी फर्स्ट, सेंकण्ड आणि थर्डला दिलेली आहे आणि यांना सुट्टया देतात म्हणून तुम्ही सांगतात सुट्टया देणं बंधनकारक आहे

असं तुम्ही उत्तर दिलेलं आहे. हा जो तेलंग आहे याला सुट्टी नाही. प्रत्येक महीन्यामध्ये तो तीन तीन शिफ्ट काम करतो. ज्या संस्था आहेत त्यात बोगस कामगार आहेत. चारिञ्य पडताळणीचा विषय आतापर्यंत या एजन्सिमार्फत जे कामगार आहेत त्यांची चारिञ्य पडताळणी केलेली नाही. आमच्या भागातील जेवढे जेवढे ठिकाण आहेत त्याठिकाणी माहिती घेतली, माझ्या कार्यकर्त्यांनी माहितीच्या अधिकारात ही माहिती घेण्यास सुरवात केली त्यानंतर सिक्युरीटी एजन्सीला जाग आली की आपल्याकडून चारिञ्य पडताळणी राहीलेली आहे. माझ्या येथे ढोले या नावाचा व्यक्ति शाळेवर काम करतो तो चार वर्षापासून काम करतो त्याच चारिञ्य पडताळणी झालेली नाही. जर चारिञ्य पडताळणी केलेली असेलतर हा ७० वर्षाचा साडेतीन फुटाचा माणूस हा आपल्या एजन्सीमध्ये काम करतो. त्याला ड्रेसकोड नाही आणि हा काम करतो. हा नक्की कुठला कारभार चालला आहे याच्याकडे बघायला कोणी नाही. माझा सरळसरळ आरोप आहे आपली लोक, एजन्सीची लोक हे सगळे मिलीभगत करुन महानगरपालिका लुटण्याचा कारभार चालू आहे. यांच्या पहील्या चौकशा करुन सस्पेन्ड करा. बोगस कामगारांची सुध्दा तुम्हांला यादी देतो. शाळेवर एलएमसी सिक्युरीटीचे चार लोक आहेत पण त्याठिकाणी दोनच लोक काम करतात शिंदे आणि मोहिते कामावरती नाहीत. म्हेत्रेवाडी शाळा क्रमांक ९२ याठिकाणी आठ लोक काम करतात याठिकाणी नामधारी लोक आहेत ते भोसले, मोरे, राहणे, पाटील आणि वायाळ. चिखली मैला शुध्दीकरण शुभम उदयोग इंगळे, काकडे, वाघेरे, ओतीगे, भीलारे, कांबळे, कदम, जाधव याच्यामध्ये वाघेरे, ओतीगे, जाधव, भिलारे बोगस आहेत. कामच नाही, हे लोक जागेवर नाहीत. शुभम उदयोग, आयटीआय, मोरवाडी देवमाने, वाघमारे, पवार, बनसोडे, सौदांण, वाघेरे आणि नाणेकर आहेत याठिकाणी पवार, बनसोडे, वाघेरे आणि नाणेकर हे बोगस आहेत. सुरक्षा एजन्सी एलएमसी सिक्युरीटी, युनायटेड डेल्टा, नॅशनल, शुभम उदयोग, अशा एजन्सीज आहेत यामध्ये महापालिकेची लुट होती. हे सगळे असताना तो कामगार ड्रेसकोडमध्ये आहे का, शंभर टक्के नाही. तो कामावर येतो का, शंभर टक्के नाही. आपला कोणी तेथे जाऊन चौकशी करतो का, नाही. आपले चौदा पर्यवेक्षक यांच्यावर स्कॉड म्हणून ठेवलेले आहेत. मी माहिती घेतली तर त्यांना २०० रुपये भत्ता फिरण्याचा दिला जातो. जर त्याला भोसरीला जायच असेलतर ५० रुपयाच पेट्रोल, वाकडला जायच असेलतर १०० रुपयाचे पेट्रोल, येथून जर त्याला सगळी कडे फिरायच असेलतर दहा ते पंधरा किलोमीटर प्रत्येक ठिकाणी जाव लागत आणि त्याला तुम्ही २०० रुपये भत्ता देता. म्हणजे या चोरांना पोसण्यापेक्षा यांची जर व्यवस्थित व्यवस्था केलीतर या चो-या-मा-या बंद होतील. या शहरामध्ये यानां दाबायच ते बाकी ठिकाणी जाऊ शकत नाहीत म्हणजे याचा अर्थ त्यांना चो-या करायला रान मोकळ करुन दिलं. हे करायला कारणीभूत सुध्दा सगळी आपलीच लोक आहेत. सुरक्षारक्षकांना १३५००/- किमान वेतन आहे ते आपण देतो पण या कामगाराना फक्त ६०००/- रुपये पगार त्यांच्या हातात जातो मग हे मधले पैसे कुठे जातात.

ठिक आहे त्यांचा पीएफ कट होत असेल, अजून काही कट होत असेल. म्हणजे ७५००/- रुपये जर हे कट करत असतीलतर म्हणजे हे ७५००/- एजन्सीला आणि ६०००/- रुपये कामगाराना हा कुठला न्याय आहे. म्हणजे आपण गोरगरीबाना पगार देतो का एजन्सीला पोसतो हा सुध्दा प्रश्न आपल्या समारे आहे. कुठल्याही कामगाराना पगार वेळेवर नाही. तीन ते चार महीने त्या लोकांना पगार मिळत नाहीत. जो वॉचमेन असतो त्या शाळेमध्ये तो श्रीमंत नसणार. बारा बारा तास, चोवीस चोवीस तास डयुटया करणारे लोक आहेत. ते काही कोणी जहागीरदार नसणार आहेत. अशा लोकांचा जर हे पगार खात असतीलतर यांना आपण पोसण्याची गरज काय. या कोणाच्या एजन्स्या आहेत. यांचे लायसेन्स सुध्दा रेन्यू नाहीत टिएसएआरए हे कुठल लायसेन्स आहे. हे लायसेन्स सुध्दा रेन्यु नाही. त्या दिवशी मी माहितीच्या अधिकारात हे प्रश्नोत्तर विचारली तेव्हा आता यांच व्हेरीफिकेशन चाललं आहे. हे व्हेरीफिकेशन कधी आल, हे सिक्यूरीटीवाले कोण कोण आहेत. या एजन्स्या कोणाच्या आहेत, यांच लायसेन्स रेन्यू आहे का, यांना पगार दिला जातो का, यांना किमान वेतन दिल जातं का. या सगळयांची उत्तर यात दिलेली नाहीत. हे माझे प्रश्न आहेत पण अतीशय भूलभूलैय्या उत्तर दिलं जी उत्तर सभागृहाला गरजेची होती शहराला कळू दया या एजन्स्या कोणाच्याही असू दयात उदया माझी जरी असलीतर सांगणार माझी आहे म्हणून पण ही नाव सुध्दा सिध्द करा. हया कोणाच्या एजन्स्या आहेत, कोण याला पोसतय. जर गोरगरीबांच्या टाळूवरच लोणी खाण्याच काम जर आपली महानगरपालिकेचे अधिकरी करत असतीलतर ते चुकीच आहे. हे सगळयांना माहीती आहे, तो कामगार आठ आठ तास, बारा बारा तास काम करतो त्यांला किती पगार दिला जातो, तो वेळेवर मिळतो का. हे एजन्सीवाले आहेत ते गेटमध्ये सुध्दा त्यांना येऊ देत नाहीत. म्हणजे ज्यांच्या जीवावर सुरक्षा आहे त्यांना अशी वागणूक देत असतीलतर नक्की त्याच्यामध्ये काळबेरं आहे. मी माहीतीच्या अधिकारात माहीती मागीतलेली होती. सुरक्षा विभागातील काम ठेकेदारी पध्दतीने देणे कामी ईच्छूक निवीदाधारकांकडून निवीदा मागविण्यात येत आहे का. याबाबत अटि, शर्ती खालीलप्रमाणे दिलेल्या आहे - सदर कामाकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिका नोंदणी दाखला आवश्यक आहे. हे सगळ तुम्ही दिलेल आहे पण यातील एका सुध्दा कागदाची पुर्तता या लोकांनी केलेली नाही. निवीदा सोबत खालील कागदपत्रे सादर करावीत. पॅनकार्ड, टॅनकार्ड, मागील तीन वर्षाचा आयकर भरल्याचा पुरावा आवश्यक. ऍक्टनुसार पंजीकृत नोंद असलेली रजिष्ट्रर क्रमांक. लेबर कॉन्ट्रॅक्ट ऍक्ट लायसेन्सची नोंदणी प्रमाणपत्र, भविष्य निर्वाह निधी नोंदणी क्रमांक, कामगार नोंदणी क्रमांक व प्रमाणपत्र, व्यावसायचे नोंदणी क्रमांक व पमाणपत्र क्रमांक, बॅंकेचा दाखला पाच कोटी पेक्षा कमी नसावा, सेवाकर, सर्व्हीस टॅक्स प्रमाणपत्र, महाराष्ट्रातील पोलीस प्रमाणपत्र. सुरक्षाव्यवस्थेचे आयएसओ-९००१ व २००८ प्रमाणपत्र. शासकीय, निमशासकीय संस्थेकडे एक वर्षाकरिता केलेल्या कामाचा अनुभव प्रमाणपत्र. या आपण अटि शर्ती केलेल्या आहेत यामध्ये किती लोक पात्र आहेत. याच

सुध्दा मला उत्तर पाहीजे. याच्यामध्ये जर असेलतर त्यांनी सांगाव. माहीतीच्या अधिकारामध्ये काय काय अटि, शर्ती आहेत या तुम्ही दिलेल्या आहेत. याच्यामध्ये एक सुध्दा पात्र नाही. याचा अर्थ शंभर टक्के तुमच्या लोकांची मिलीभगत आहे. ३५ ते ४० नियमावली तुमच्याकडे आहेत. ४० नियम लावलेले आहेत. मुं.प्रा.महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदी बंधनकारक राहतील त्यामुळे उपरोक्त अटिपैकी कोणत्याही अटिशर्तीत कायदयातील तरतूदीचा भंग केल्यास ठेका रद्द केला जाईल ही शेवटची ओळ आहे. किती लोकांना तुम्ही नोटीस दिल्या. जर तो चुकतोय, तो कामावर चुकीचा येतोय. त्याला दंड केला. पाच टक्के केला, दोन टक्के दंड केला शंभर टक्के केलाय, म्हणजे तो चुकलेला आहे तुम्ही मला उत्तर देता. या शेवटच्या उत्तरामध्ये तुम्ही मला म्हणताय की जर या अटि शर्तीचा भंग केलातर आम्ही त्यांची निवीदा रद्द करु शकतो. का नाही निवीदा रद्द केल्या. जे दोन सुरक्षा अधिकारी ठेवलेत वाबळे आणि जरांडे हे आपल्या जवळचे आहेत का. जर या विषयामध्ये तुम्ही हे सगळे केलं असेलतर, नियम आणि अटि दिल्या असतीलतर मग यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे हे तुम्ही सांगताय मग तुम्ही याला ब्लॅकलीस्टला का टाकल नाही त्यांचा ठेका का रद्द केला नाही. म्हणजे हे बोगस कामगार जे १३५०/- रुपये पगार घेतात हे कामावर नाहीत. त्यांच्या नावाचा जो मलीदा मिळतो याच्यामध्ये महानगरपालिकेचे सुरक्षा अधिकारी यांची मिलीभगत आहे आणि हे वाटून खातात असा माझा आरोप आहे. का कारवाई यांच्यावर केलेली नाही, आणि केलेली असेलतर सांगाव की कोणावर कारवाई केलेली आहे. का गोरगरीबांचे पैसे खाता याला कोणीही वाली माणूस नाही. जो कोण सुरक्षा अधिकारी आहे त्यांच्या बरोबर दारुच्या पार्ट्या होतात. बदली तेरा तेरा वर्षे होत नाही. आपले नियम काय आहेत एखादया स्पॉटवर एक अधिकारी तीन वर्षे काम करु शकतो. त्याच्यानंतर त्याची बदली होते असा तुमचाच नियम आहे. तेरा तेरा वर्षे तुमच्या लोकांची बदली होत नाही. तेरा वर्षे बदली न झालेल्या लोकांची नाव मी तुम्हांला देतो. का केल्या नाहीत त्यांच्या बदल्या, ते कोणी आपले पाहूणे आहेत का, कोणी आपल्या जवळचे आहेत. ते जे जवळ ठेवलेले आहेतनां सात ते आठ लोक ते आणि सुरक्षा अधिकारी जरांडे/वाबळे यांची मिलीभगत आहे. त्यांना भेटायच म्हणजे महादेव मंदीरात जायच्या आदि नंदीच्या पाया पडायच. असं असताना रणजीत हिरवे, दराडे, कोकणे, एन्गूरे, एन्गूरेची तेरा वर्षे झाले बदली नाही. मला या सगळयाची उत्तर पाहीजे. हे उत्तर देताना याच्यामध्ये कुठलाही उल्लेख नाही. रेग्युलर बदली केली, आम्ही नियमाने चालतो असं उत्तर दिल आहे. मग एल्गूरे याची बदली का केलेली नाही. कारण एल्गूरे आणि हे आमचे दोन अधिकारी यांची मिलीभगत आहे. यांच्यामुळे बाकीच्या लोकांना नाहक त्रास देण्याच काम हे लोक करतात. या अस्थापनेवरील लोकांचे विषय तुम्ही ऐका. हे लोक तुमच्याकडे सुध्दा यायला तयार आहेत पण हे अधिकारी त्यांना परत काहीतरी त्रास करतील म्हणून ते लोक तुमच्या समोर येत नाहीत. हे सगळे लोक तुमच्यासमोर बोलायला तयार आहेत. त्यांची नाव तुम्ही

आणि मी गुप्त ठेवलेतर हे यायला तयार आहेत. आणि त्यांच्यावर तुम्ही काही कारवाई करणार असालतर ते समोर यायला तयार आहेत. हे लोक तुमच्या हाताखाली काम करतात. तो चुकलातर शंभर टक्के तुम्ही त्यांना सोडू नका मी असं कधी म्हणणार नाही तो चुकलाय आणि त्याला तुम्ही शंभर टक्के माफ करा. पण चुक नसताना, कामावर वेळेवर येत असताना नाहक मला काहीतरी तुमच्याकडून घ्यायच म्हणून तुम्ही त्रास देत असालतर त्याला आम्ही सुध्दा सोडणार नाहीत आणि हीच भुमिका आयुक्त या नात्याने तुमची असावी हे आमच काम नाही तुमच काम आहे. हे आमच्यापर्यंत विषय आले नाही पाहीजे. हे सगळ माहीती असताना जर याच्याकडे तुम्ही कानाडोळा करत असालतर नक्कीच या दोन अधिका-यांना सांभाळायच काम तुम्ही करता असं मी म्हणेल. तोही कामगार आहे, आपणही कामगार आहेत त्यांना पगार मिळतो मलाही पगार मिळतो. तोही कामगार आपलाच आहे तुम्हीही कामगार आपलेच आहेत. मग एकाला एक आणि दुस-याला दुसरा असा दुजाभाव करणे हे आमच्यासारख्यांना सहन होण्यासारखे नाही याचे उत्तर दयावे. दारुपाटर्या कुठ कुठ होतात हे सांगतो. ज्याठिकाणी आपल्या अस्थापनेवरचे काही कामगार आहेत, काही एजन्सी सिक्युरीटी कामगार आहेत त्याठिकाणी सुध्दा या दारु पाटर्या जोरात चालतात. मला बदली, मला वेगळया ठिकाणी, मला शिफ्ट चेंज, मला सुट्टी पाहीजे असते, सुट्टी का मागतो माणुस त्याची काहीतरी अडचण असते म्हणूनच सुट्टी मागतो. तुम्हांला सुट्टी लागलीतर तुम्ही आनंदामध्ये सुट्टी घेणार नाहीत काहीतरी अडचण आसल्याशिवायच सुट्टी घेणारनां. अशा सुट्ट्या घेण्यासाठी सुध्दा वेगळया पध्दतीने हॅरेसमेंट केली जात असेलतर ही निंदनीय बाब आहे. पुराव्यासहीत मी तुम्हांला सांगेल. मी ज्यावेळेस सभागृहात विषय आणतो त्यावेळेस माझ्याकडे अधिकृत पुरावे आहेत या भावनेतूनच तुम्हांला बोलतोय. हे सगळे पुरावे तुम्हांला आता पाहीजे असतीलतर आता देतो नंतर पाहीजे असतीलतर नंतरही देतो. पण त्यांच्यावर कारवाई होणार असेलतर. आपला एखादा अधिकारी चुकलातर त्याला नको ते आपण करतो, इन्क्रिमेंट थांबवतो तसा यांना काय नियम आहे. आपल्याकडे जे दोन सिक्युरीटी आहेत त्यांच्या सिक्युरीटी एजन्सीज इथे आहेत नगरसेवक किंवा अधिकारी, कामगारांना महानगरपालिकेचा कुठलाही ठेका घेता येत नाही असा नियम आहे. मग आपल्या अधिका-यांचे ठेके आहेत. या ज्या पाच एजन्सिज आहेत त्यात तीन एजन्सिज त्यांच्या आहेत. नावासहीत मी सांगेल. मग या एजन्सिज या अधिका-याना पोसण्यासाठी केल्यात का या अधिका-यांनी सगळ गोलमाल करुन हे केलय. महानगरपालिकेमध्ये नगरसेवक, कर्मचारी वर्ग-१ ते वर्ग ४ पर्यंतचा त्याला या महापालिकेमध्ये कुठल्याही अर्थव्यवस्थेमध्ये सहभाग घेता येत नाही. मग अस असेलतर यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार. या विषयावर तुम्ही काय कारवाई करणार आहेत. हे सगळे पुरावे तुम्हाला देवून जर कारवाई झाली नाहीतर उदया या भागामध्ये जेवढया जेवढया सिक्यूरिटीज आहेत त्यांना आणतो आणि यांना सगळयांना बाहेर काढतो. एकाही सिक्युरीटीजला थांबऊ देणार

नाही. ही महानगरपालिका आणि या महानगरपालिकेची वास्तू ही जनतेची आहे आणि यांना फक्त सांभाळण्यासाठी ठेवलेल आहे, जर या प्रॉपर्टीची सुरक्षा आपल्याकडून होत नसेलतर किंवा या सिक्युरीटीकडून होत नसेलतर मग ठेवायचीच गरज नाही नां. आपल्या ज्या कार्यशाळा आपल्याकडे आहेत त्या कार्यशाळेमध्ये आत्तापर्यंतच्या जेवढया चो-या झाल्यात त्याचे एफआयआर कुठ दाखल केलेले आहेत. त्याचा मुद्देमाल आपल्याकडे किती जमा झालेला आहे. हे चो-या करणारे कोण आणि कुठल्या माध्यमातून त्यांनी चो-या केलेल्या आहेत. या मिलीभगतमध्ये चो-या झालेल्या आहेत. महानगरपालिकेच्या कार्यशाळा तीन ते चार ठिकाणी असतात त्या सगळयामध्ये मटेरीएल किती आलं, वापरल किती, तिथ लिहील किती आणि त्याच्यातली चोरी किती झाली. या प्रश्नाचे सुध्दा उत्तर मला अपेक्षीत आहेत. कार्यशाळेमध्ये सगळयात मोठा घोळ चालतो. सगळयात मोठया चो-या झाल्या असतीलतर कार्यशाळेमध्ये झालेल्या आहेत. बघणारे सुध्दा डोळेझोक करुन कार्यशाळेकडे बघीतल जातय. या सगळया विषयाला प्रशासनाचा प्रुखम म्हणून आयुक्त साहेब आपली जबाबदारी आहे जर मला याच उत्तर मिळाल नाहीतर मला वेगळया पध्दतीने सांगाव लागेल की आयुक्त या सगळया भूमिकेला जबाबदार आहेत असं गृहीत धरुन मी चालतो जरी तुमच्या हाताखाली अधिकारी असतील, विभाग असतीलतरी मुख्य जबाबदारी तुमची आहे. हे तुम्हांला सगळ माहीत असताना तुम्ही कानाडोळा करतात. हा जो चाललेला भ्रष्टाचार आहे हा जो चाललेला अंनागोंदी कारभार आहे याला तुम्ही पाठबळ देता. एनएनसीच टेंडर आहे ते झाल कधी. पाच ते सहा लोकांच्या एजन्सिज आहेत त्यांची नाव सांगा, ते ठेकेदार सांगा, ते कामगार दाखवा. त्यांच्या कामावरची हजेरी घ्या. यांचे टेंडर झालेले आहेत त्यांना आजपर्यंत कितीवेळा मुदतवाढ दिलेली आहे. असा विषय असेलतर सगळा अंनागोंधी कारभार आहे. हा सगळा कारभार आपल्या माध्यमातून चालला आहे असा माझा आरोप आहे. हे सगळ आपल्याला माहीत असताना जर तुम्ही ही सगळी शिस्त महानगरपालिकेमध्ये लावायची नसेलतर आता परत मा.श्रीकर परदेशी यांची आठवण येते. सिक्यूरीटी एजन्सीने सुध्दा श्रीकर परदेशींच नाव काढल, जाधव साहेबांच नाव काढल की त्यांनी शिस्त लावली होती. मग तुमच्या काळात ही शिस्त बिघडायला लागली. या प्रश्नाच उत्तर सुध्दा तुम्हांला दयाव लागेल. लोकसत्तामध्ये सुध्दा बातमी हेडींगला आहे “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सुरक्षाव्यवस्था रामभरोसे”. “ठेकेदाराकडून लाखोचा गंडा” हे लोकसत्तामध्ये आलं आहे. हे माझ्या अगोदर तुम्हांला माहीती पाहीजे होतं. “बिनधास्त जा हात्यारे घेऊन” आमच्याकडे अधिकृत लायसेन्स आहेत. आम्हांला जी चौकट दिलेली आहे त्या चौकटीच पालन आम्ही करतो. सुरक्षारक्षक वॉर्डन प्रकरणी पालिका आयुक्तांना नोटीस हे सकाळमध्ये छापलेल आहे. माझ्या प्रश्नोत्तराच्या अगोदर हे सगळ तुम्हांला पत्रकारान छेडल असता, शहरामध्ये बातम्या आल्या असता याच्यावर तुम्ही काय खबरदारी घेतली. हे प्रश्नोत्तर देण्याची आम्हांला वेळ का आली. की माझ्या बांधवाना, माझ्या भगिनीना ज्या सिक्यूरीटीमध्ये

काम करतात, एजन्सिजच्या बाहेर काम करतात त्यांना छळलं जातय, त्यांचा छळ होतोय म्हणून त्यास वाचा फोडण्यासाठी हया प्रश्नोत्तराचा खटाटोप केलेला आहे. भगिनीना सुध्दा त्रास होतो. त्यांनी ते अर्जामध्ये लिहील आहे. माझ्या भगिनीना सुध्दा त्या सिक्यूरीटी एजन्सिमध्ये त्रास होतो. असं आपल्या सिक्यूरीटीकडून आपले जे दोन सिक्यूरीटीचे विभागप्रमुख जे दोघेजण आहेत त्यांच्याकडून जर हे असे होत असेलतर त्यापेक्षा वाईट काही नाही. आयुक्त साहेब तुम्ही या शहरामध्ये आल्यापासून मलातर वाटत नाही की असे विषय गांभीर्याने घेतात का नाही. कुठल्याच विषयामध्ये तुमच गांभीर्य आम्हांला जाणवायला तयार नाही. तुम्ही आल्यापासून एखादया कामामध्ये आम्हांला तुमची चुणूक दिसली नाही. या बिल्डींगमध्ये कोम्बींग ऑपरेशन कोणी केल याची सुध्दा तुम्ही विचारपुस केलेली नाही. महानगरपालिकेमध्ये हात्यार येतात का याबद्दल सुध्दा तुम्ही विचारपुस केली नाही हे सगळ आपल्या थ्रू होतं की काय असही मला म्हणाव लागेल किंवा आपणच आमच्या लोकांना वेठीस धरता की काय असं मला सांगाव लागेल. याच्यावर काय कार्यवाही करणार हे सभागृहाला सांगाव. माझीतर आपल्याला विनंती आहे की हे जर खरं असेलतर जे कोणी यांचे सिक्यूरीटीचे मुख्य अधिकारी आहेत त्यांना सस्पेन्ड, निलंबीत करा, त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.खोसे** **(सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सुरक्षा विभागावर मा.दत्तात्रय साने यांनी प्रश्न विचारलेले आहेत. त्यातला पहिला प्रश्न आहे सुरक्षा विभागातील ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदारांना ड्रेस कोड आहे का. काही रखवालदार कामावर येताना दारु पिऊन येतात, काही रखवालदार कामावर न येता त्यांची हजेरी लावतात. व त्यांचे बिल व पगार घेतले जाते हि वस्तूस्थिती आहे का. अशा प्रकरणी संबंधितांवर काय कारवाई केली जाते. याबाबत मागील वर्षी ज्या निवीदा काढण्यात आल्या होत्या त्यानंतर जे एकुण ४४९ रखवालदार मदतनीस हे मनपा मिळकतीसाठी व मनपाचे शाळेसाठी २९४ रखवालदार मदतनीस पुरविण्याची निवीदा होती. याबाबत पाच एजन्सीला ते काम विभागून देण्यात आलेले आहे. या कामाची मुदत १ जानेवारी १६ ते ३१ डिसेंबर १६ पर्यंत आहे. याबाबतचे जे स्थायी समिती व त्यानंतर जो मनपाने सुरक्षा एजन्सीजशी बरोबर जो करारनामा करण्यात आलेला आहे त्यात ज्या करारनाम्यातील अटी त्यांनी घातल्या होत्या त्यानुसार आपण दंड कपात केला व आतापर्यंत आपण ४,०१,९२४/- इतकी दंडाची रक्कम त्यामध्ये एजन्सीकडून कपात केलेली आहे. यानंतर ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदारांना नियुक्तीच्या वेळी चारित्र्य पडताळणी करण्याबाबत व त्यांना साप्ताहीक सुट्टी न देण्याबाबतचा मा.साने यांचा प्रश्न आहे. तरी याबाबत मनपा शाळेसाठी एकूण चार एजन्सीज आहेत. २९४ पैकी २६२ मदतनीसांचे पुर्वी चारित्र्य प्रमाणपत्र आपल्या सुरक्षा विभागाकडे प्राप्त आहे आणि ३२ लोकांचे चारित्र्य प्रमाणपत्र पडताळणीसाठी पोलीस विभागाकडे दिल्याची पावती

त्यांनी आपल्याकडे सादर केलेली आहे. ३२ जणांचे अजून प्रमाणपत्र आपल्याकडे आलेले नाहीत परंतु त्याची पावती त्यांनी आपल्याकडे सादर केलेली आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर पर्यंतचे दिलेले आहे व २६२ चे आलेले आहेत बाकीच्याचे पत्र दिलेले आहेत सांगतात. याचा पुरावा आहे का तुमच्याकडे. चारिञ्य पडताळणी पत्र आलेले आहे हे दाखविणार का. मी माहितीच्या अधिकारात विचारलेल आहे. दि. २६/२/१६ ला माहिती मागवलेली आहे. २६/२/१६ च्या नंतरची चारिञ्य पडताळणी असेलतर शंभर टक्के या लोकांचे नाव घेतलेले आहे. त्याच्या आदिच असेलतर मला पुरावे पाहीजेत. २६/२/१६ ला मी माहीती अधिकारात मागीतलेल आहे. २६/२/१६ च्या पुर्वी त्यांना ठेके दिले आहेत त्यांची चारिञ्य पडताळणी तुमच्याकडे आहे का.

**मा.खोसे (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पुर्वीची माहिती माझ्याकडे आता नाही. मनपा मिळकतीसाठी आपण पाच एजन्सी नेमलेल्या होत्या. त्यामध्ये एकूण ४४९ रखवालदार मदतनीस मनपा मिळकतीसाठी नेमलेले होते. त्यापैकी ११० जणांचे पोलीस चारिञ्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त आहेत व १३० लोकांचे प्रमाणपत्र मिळणेकामाची पावती त्यांनी आपल्याकड सादर केलेली आहे ते अजून पोलीस विभागाकडून त्यांना मिळालेले नाही. यामध्ये १८ कर्मचारी आपण १/९/१६ ला वाढविलेले आहेत. यानंतर आपल्या निवीदेमध्ये ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-याबाबत बायोमेट्रीक लागू करण्याबाबतचा समावेश नसलेने त्यांची हजेरी आपण बायोमेट्रीक पध्दतीने घेत नाहीत. सुरक्षा विभागात असलेले कायम अस्थापनेवरील कर्मचारी यामध्ये ३२४ रखवालदार आपल्याकडे आहेत व १४ सुरक्षा पर्यवेक्षक आपल्याकडे आहेत. यामध्ये अस्थापनेवर जे रखवालदार आहेत त्यांची आपण प्रभागनिहाय विभागणी केलेली आहे. जुने चार प्रभाग अ,ब,क,ड वायसीएम आणि मेन ऑफिस अशी आपण विभागणी केलेली आहे आणि त्याप्रमाणे आपण रखवालदारांच्या नेमणुका केलेल्या आहेत. ६६ मनपा मिळकतीवरती आपण त्यांची नेमणूक केलेली आहे. सुरक्षेची जबाबदारी कायम असल्यामुळे मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी आपण सुरक्षा पर्यवेक्षक जे १४ नेमलेले आहेत त्यांनाच त्यांच्या रजेचे व पर्यायी व्यवस्था करून देण्याचे त्यांना सांगीतलेले आहे. यानंतर कर्मचा-यांच्या ज्या बदल्या आहेत त्या प्रभागवाईज त्यांच्या बदल्या केल्या जातात आणि प्रभागातून बाहेर इतरत्र बदली करायची असेलतर मा.अतिरीक्त आयुक्तांच्या स्वाक्षरीने त्या बदल्या केल्या जातात. परंतु कर्मचा-यांनी बदल्याबाबत किंवा पॉईंट मिळणेबाबत अशी कुठलीही तक्रार नाही परंतु सुरक्षा विभागाच जे नियंत्रण आहे ते सुरक्षा अधिकारी यांच्या नंतर सहा.आयुक्त, अतिरीक्त आयुक्त यांच्याकडे आहे त्यामुळे त्यांना त्याठिकाणी माझ्याकडे किंवा मा.अतिरीक्त आयुक्त यांच्याकडे पर्सनल अशाबाबतची कुठलीही तक्रार दारुपार्टी किंवा पैसे मागणी अशी केलीतर त्याची निश्चितच दखल घेतली जाईल. यानंतर मा.साने साहेबांनी विचारल त्याप्रमाणे श्रीकृपा सर्व्हिसेसची आपल्याकडे जी नोंद आहे महेश दत्तात्रय खेडकर यांची

आहे. नंतर प्रभाकर अनंत साळूंके यांची आहे. शुभम उदयोग वाघेरे यांची आहे. नॅशनल सिक्यूरीटी सर्व्हिसेस रामचंद्र मापारी यांची आहे. क्रिस्टल सर्व्हिसेस मिलींद जाधव यांची आहे. सैनिक सिक्यूरीटी प्रा.लि. आणि बीव्हीजी इंडीया जी आहे ती उमेश माने यांची आहे. यानंतर कर्मचा-यांच्या किमान वेतन दराबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. एलएमसी मिलींद चौधरी यांची आहे. किमान वेतन या सिक्युरीटी एजन्सीजचे रखवालदार यांना मिळत नसल्याबाबतची तक्रार आहे. पुढच्यावेळेसचा पगार जो आदा केला जातो त्यावेळेसच आपण त्या कर्मचा-यांचे पीएफ नंतर ईएसआय आणि या कर्मचा-यांना बँकेव्दारे पगार केल्याचे स्टेटमेंट हे तीन कागदपत्र असल्याशिवाय आपण पगार अदा करत नाहीत. त्यामुळे ते बँकस्टेटमेंट असल्यानंतर आपण खात्री केल्यानंतरच पगार देतो. त्यानंतर नामधारी रखवालदार लाखो रुपयाची बील काढतात याची चौकशी करावी असे विचारले याबाबत आपण मनपा मिळकतीवर आपल्याकडे जे १४ पर्यवेक्षक आहेत ते प्रभागनिहाय दररोज फिरतात आणि त्यांचा अहवाल हा सुरक्षा विभागाला दिला जातो. तसेच याव्यतिरीक्त शाळा इमारतीसाठी आपण त्या त्या मुख्याध्यापाकाकडे २९४ रखवालदार नियुक्त केले. त्या मुख्याध्यापकांचाही आपण मासीक अहवाल घेतो आणि तो मासीक अहवाल आल्यानंतर आपण त्यांची बील अदा करतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. किमान आणि कमाल वेतन मला सांगा. माझ्याकडे अधिकृत पुरावा आहे तुम्ही देणारा पगार १३५००/- आणि कामगारांना पगार मिळतो ६०००/- ही तफावत का.

**मा.खोसे (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्याकडे जी माहिती आहे ती आमच्याकडे दयावी आम्ही ती तपासून घेऊ. आमच्याकडे जे आहे ते बँकस्टेटमेंटव्दारे आम्ही त्यांना पगार देतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. किमान वेतन काय आणि कमाल वेतन काय हे सांगावे. त्या कामगारांना किती वेतन गेले. आपण चेक कोणाच्या नावावर काढतो. ठेकेदार का कर्मचारी.

**मा.खोसे (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण एजन्सीजला चेक देतो आणि ते नंतर बँकेत त्यांचे खाते असतात त्याच्यावर जमा करतात.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ही एजन्सी तो पगार किमान कमाल दराप्रमाणे देते का. याच्यावर चौकशी करायला कोण आहे. आजपासून मागची माहिती मला दया. या कामगाराला एवढा एवढा पगार मिळालेला आहे आणि एवढा एवढा मिळाला नाही.

**मा.खोसे (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. बँकस्टेटमेंट आपण घेतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या सिक्युरीटी एजन्सीला आपले कुठलेही नियंत्रण नाही. आपली कुठे कमांड नाही. सगळा कारभार चाललेला हा चुकीच्या पध्दतीने चाललेला आहे. ठेकेदाराना पोसण्याचे काम चालू आहे. माझा जो अर्ज दिला त्याच्या पुर्वीची माहीती दया. तुम्ही जी मला नियमावली दिली त्याच पालन करायच हा वीस टक्के प्रयत्न केलेला आहे बाकी सगळे बोगस पत्र जोडलेले आहेत. याच्यामध्ये रजिस्ट्रेशनपण नाही आणि केलेल असेलतर आता २००७ नंतर केल आहे. माझी आपल्याला विनंती आहे हे सगळे प्रश्न विचारलेले आहेत याची शहनिशा करुन या विषयाचा उलगडा किंवा किती दिवसामध्ये मला हे कळेल. हे सगळे दिलेले पेपर याची मला उत्तर पाहीजेत. याची मला शहनिशा करुन येत्या दिवसामध्ये मला मिळावीत अशी अपेक्षा करतो अन्यत: नाही मिळालीतर मी सरळ सांगेल याच्यामध्ये मिलीभगत आहे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. मा.दत्तात्रय साने यांनी सुरक्षा रखवालदार आणि सुरक्षा पर्यवेक्षक यांच्याबाबत जे त्यांनी म्हणण मांडलेल आहे त्याच्यामध्ये जे जे बेसीकली पॉईंटस आहेत ते पुढीलप्रमाणे सांगीतले- सुरक्षारक्षक झोपलेले आढळले, दारुच्या बाटल्यांचे फोटो आहेत, सुरक्षारक्षकांच्या मर्जीनेच महापालिका प्रॉपर्टीची चोरी केली जाते. वर्तमानपत्राव्दारे स्टिंग ऑपरेशन केलेल आहे त्यात सुरक्षा यंत्रणेची कार्यक्षमता ही दिसून आलेली आहे. ७० वर्षाचा ग्रहस्थ हा सुरक्षारक्षक आहे. कामावर नसताना सुध्दा पगार काढला जातो. बोगस व्यक्ती दाखवलेले आहेत, बोगस नावाच्या आधारे बीले काढली जातात. सुरक्षारक्षकाच्या नावे डमी सुरक्षा एजन्सी नेमलेली आहे. या महापालिकेमध्ये जे अधिकारी आहेत त्या अधिका-यांच्याच या एजन्सी आहेत. १३५००/- किमान वेतन या सुरक्षारक्षकाना मिळाल असताना प्रत्यक्षात त्यांना फक्त ६ हजार पगार दिला जातो. अनेक एजन्सीजचे लायसेन्स सुध्दा नाहीत. अनेक सुरक्षारक्षकाना पोलीस व्हेरीफिकेशन शिवाय कामावर दाखल केलेले आहे. अनेक एजन्सीने अटि, शर्तीचा भंग करुन सुध्दा त्यांचा ठेका रद्द केला नाही किंवा त्या एजन्सीजच्या विरुध्द कार्यवाही केलेली नाही. त्या एजन्सीजला ब्लॅकलीस्ट केलेले नाही. विशेष करुन श्री. जरांडे, श्री.वाबळे, श्री.रणजीत हिरवे, श्री.भोसले यांच्यावर कार्यवाही व्हावी आणि काहीना निलंबीत करावे. सुट्टी घेण्यासाठी वेगळया पध्दतीने अधिका-यांकडून सुरक्षारक्षाकांचे हॅरसमेंट केली जाते. कार्यशाळेत झालेल्या चो-यांचा एफआयआर दाखल झालेला नाही. किती साहित्य आलं किती साहित्य इश्यू झाल याची काहीच नोंद नाही. चारिञ्य पडताळणी न करता आदेश दिलेले आहेत, बायोमेट्रीक हजेरी घेतली जात नाही. अशाप्रकारचे अनेक इश्यूज मा.दत्तात्रय साने यांनी मांडलेले आहेत. याच्यावर एक चौकशी समिती नेमून त्याची संपुर्ण चौकशी केली जाईल आणि लवकरात लवकर या चौकशी समितीच्या माध्यमातून काही निष्कर्ष निघालेस त्यानुसार पुढील कायदेशिर कारवाई केली जाईल.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रश्न क्रमांक ५ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील उदयानांची संख्या किती आहे, त्यामध्ये प्राधिकरण आणि एमआयडीसीने विकसीत केलेल्या उदयानांची संख्या किती आहे. महापालिकेच्या ताब्यात असलेल्या आणि नसलेल्या उदयानांची संख्या किती. माध्यमांमधील बातम्यानुसार महापालिका हद्दीत उदयानांची संख्या अनधिकृत बांधकामे असलेली उदयानांची संख्या किती. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्या अधिका-यांचा मी सन्मान करु इच्छितो, त्यांचा सत्कार करु इच्छितो. ज्या अधिका-यांनी मला उत्तर दिलेले आहेत त्यामध्ये आपली आणि अतिरीक्त आयुक्तांची सही आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील उदयानाची संख्या किती आहे त्यांनी उत्तर दिलेल आहे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील उदयानाची संख्या १७८ आहे. सदर उदयानांमध्ये प्राधिकरण आणि एमआयडीसीने विकसित केलेल्या उदयानांची संख्या किती आहे- प्राधिकरणाने विकसित केलेल्या उदयानांची संख्या १ आहे एमआयडीसी-०. महापालिकेच्या ताब्यात असलेली उदयाने किती- तर एकूण १७८ उदयाने आहेत. महापालिकेच्या ताब्यात नसलेल्या उदयानांची संख्या- नगररचना विभागाकडून प्राप्त माहितीनुसार एकूण उदयान आरक्षणे- १०० पैकी मनपाचे ताब्यातील उदयान आरक्षणे- ३२ व मनपाचे ताब्यात नसलेली आरक्षणे- ६८. वरीलप्रमाणे माहिती दिलेली आहे. त्यानंतर मला अतीशय सुंदर विचारपुर्वक उत्तर दिलेल आहे. संदर्भिय पत्रासोबत जोडलेल्या पत्रातील प्रश्न क्र. ५ मधील स्थापत्य विभागा संबंधित माहिती सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. माहिती अशी दिली आहे की माध्यमातील बातम्यांनुसार महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे असलेल्या उदयानांची संख्या अ) कार्यकारी अभियंता (फ) प्रभाग यांनी दिलेली माहिती सोबत जोडण्यात आलेली आहे. आ) पिंपरी चिंचवड क्षेत्रात मनपाच्या ताब्यात असलेल्या अन्य उदयानामध्ये अस्तित्वात असलेल्या विविध प्रकारच्या बांधकामाचे संबंधित विभागामार्फत सर्व्हेक्षण तीन महिन्याच्या कालावधीत करण्यात येवून माहिती देण्यात येईल. साहेब, हे कोण अधिकारी आहेत त्यांना बोलवा. यांचा मला सत्कार करायचा आहे. मलातर वाटत आयुक्त साहेब, तुमचा सत्कार करावा लागेल कारण याला तुमची सही आहे. साहेब, इंग्रज आपल्याकडे अनेक वर्षे राज्य करुन गेले पण त्यांनी शंभर सव्वासे वर्षापुर्वी ज्या प्रॉपटर्या येथे बांधलेल्या आहेत त्या प्रॉपटर्याचा कालावधी, त्या किती टिकणार आहेत, किती चालणार आहेत, त्या किती आपल्या महाराष्ट्रात आहेत याच पत्र प्रत्येक जिल्हाधिका-याना, विभागीय आयुक्तांना त्यांच टाईमींग संपल्यावर म्हणजे ते ९९ वर्षाच आयुष्य असेल, १०० वर्षाच आयुष्य असेल किंवा ८० वर्षाच असेल त्याची कालमर्यादा संपल्यानंतर त्यांच पत्र आपल्याला येतं. महाडला जी पुल दुर्घटना घडली त्या जिल्हाधिका-याना व विभागीय आयुक्तांना पत्र आलेल होतं की हा हा पुल एवढया एवढया कालमर्यादेत टिकणार आहे त्यानंतर तो टिकणार नाही. मग आपले अधिकारी जर असे उत्तर देत असतीलतर त्यांना नक्की काय म्हणावं हा मला प्रश्न पडलेला आहे. तुम्हांला

माहिती आहे आता विधानपरिषदेची आचारसंहिता लागेल त्यानंतर फेब्रूवारीमध्ये महापालिकेच इलेक्शन आहे त्याची आचारसंहिता लागेल. म्हणजे तुम्हांला आपण केलेल्या चो-या हया लपविण्यासाठी आपण केलेले अनधिकृत बांधकाम लपविण्यासाठी तुम्ही हे प्रश्नाच उत्तर दिलं असा माझा आपल्यावर आरोप आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये आज अनेक अनधिकृत बांधकाम चालू आहेत. आम्ही अनेक वर्षे त्यासाठी भांडतोय. शहरामधील अनधिकृत बांधकाम पाडून टाका म्हणून सांगीतले आणि आज आपले अधिकारी मिलीभगत करुन काही ठिकाणी महानगरपालिकेच्या पैशानी अनधिकृत बांधकाम करतात याला जबाबदार कोण. अनधिकृत बांधकामाला ७० ते ८० कोट रुपये ते खर्च करतात. विदाऊट परमीशन अनधिकृत बांधकाम आपण करता. मग चोर तुम्ही का आमचे सर्वसामान्य नागरीक. चुक करता तुम्ही का आमचे सर्वसामान्य नागरीक. आणि तुम्ही काय प्रस्ताव दिला आम्ही ठराव आदिमध्ये करुन देतो. आम्ही ठराव वेगळा करुन देतो. साहेब, हाच न्याय आमच्या गरीब जनतेला दयानां. आज १७८ उदयान आहेत म्हणता सगळया उदयानामध्ये अनधिकृत बांधकाम झालेले आहेत. हे कोणाच्या मदतीने झाले, कोणी त्याला मदत केली. त्याला कोण जबाबदार आहे त्या अधिका-याना सुध्दा कोर्टात खेचा. तुम्हांला २२ तारखेला कोर्टाला अहवाल दयायचा आहे त्यावेळेस हे सांगा. महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामासाठी ७० ते ८० कोट वापरले आहेत. तुम्ही केलेल्या चो-या लपऊ नका. नियम काय आहे. डीसी रुल नुसार १३/३ निवासी झोन म्हणजे एकूण जागेच्या १५ टक्के बांधकाम करण्याची परवानगी देण्याचा अधिकार मा.आयुक्तांना आहे. बिगरनिवासी झोनमध्ये येत नसल्याने मा. आयुक्तांना बांधकाम परवानगी देण्याचा अधिकार नाही पण उदयानाच्या सोईसाठी एखादी छोटी चौकी अथवा तिकीट घर बांधणे योग्य आहे पण सुरक्षेला हानीकारक असेल असे बांधकाम करता येणार नाही. उदयानामध्ये केलेल्या बांधकाम उदयानाचा विकासकार्यात येत नसल्याने तसेच त्यामुळे उदयानाची सुरक्षितता व पर्यावरण कायदयाची हाणी होत नसल्याने असे बांधकाम करण्यास परवानगी देता येणार नाही. पर्यावरणाची कायदयाने पायमल्ली करणारे बांधकाम उदयानात करता येत नाही. तसेच केलेले बांधकाम पाडण्याचा त्वरीत आदेश दिला आहे. असा महत्वपुर्ण निकाल मे.राष्ट्रीय हरित लवाद पुणे यांनी श्री.रविंद्र गोरे पुणे मनपा यांना २०१५ रोजी दिलेला आहे. सदर मे.राष्ट्रीय हरित लवाद पुणे यांना उच्च न्यायालयाचा दर्जा असल्याने संपुर्ण महाराष्ट्र व गुजरात या राज्यानाही हा निकाल लागू पडत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड मनपालाही सदर केसचा आदेश लागू आहे पिंपरी चिंचवड मनपाने सदर निकालाचा आदर न केल्यास राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयाचा अवमान होईल. पिंपरी चिंचवड मनपा विरुध्द हरित लवादामध्ये दाद मागण्यात येईल. साहेब, हा हरित लवादाचा निकाल आहे, हरित लवादाचा निकाल असताना जर आपण उदयानामध्ये असे बांधकाम करतो तर उदयान कशासाठी विकसीत करता. उदयानाचा परपज काय आहे. ज्यावेळेस आमच्या गोरगरीब शेतक-यांकडून जागा ताब्यात घेतल्या त्यामध्ये तुम्ही उदयान

आरक्षणासाठी त्या जागेचा ताबा घेतला किंवा नाही घेतला जर आमच्या लोकांकडून अशा पध्दतीन जागा ताब्यात घेवुन याचा जर गैरवापर करण्याचा आपण प्रयत्न करत असालतर मला वाटत नाही हे चांगल कृत्य आपण करता म्हणून. मी जेव्हा एमआयडीसीला एक पत्र दिलं एमआयडीसीने मला पत्राच उत्तर दिलेल आहे. या बांधकामाला आमच्याकडून कुठलीही परमीशन मागीतली नाही. तुम्ही मला एक उत्तर दिलेल आहे की उपरोक्त विषयानुसार फ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथील मोकळी जागा क्र. १ येथे यापुर्वी मनपा मार्फत सन १९८७ मध्ये एक व्यायामशाळा, ग्रंथालय बांधणेत आलेले आहे. सदर कामाची स.नं. १९९० मध्ये मनपाकडे नोंद आहे. सदर बांधकाम जीर्ण झालेमुळे सदर ठिकाणी नागरिकांच्या मागणीनुसार नविन व्यायामशाळा बांधण्याचे काम सुमारे ७ वर्षापासून चालू आहे. तसेच मोकळी जागा क्र. ३ येथे नागरी सुविधा पुरविणेसाठी नागरी सुविधालय बांधणेत आलेले आहे. सदर दोन्ही बांधकामास म.रा.औ.मं. यांचेकडे परवानगी मागविणेत आलेली होती. तथापि सदर बांधकाम परवानगीची कामे लवकरात लवकर होणे अपेक्षित असून तसा पत्रव्यवहार चालू आहे. साहेब, मी एमआयडीसीचे पत्र दाखवितो. एमआयडीसीला मी अनेक मुद्दे मागविले होते त्यामध्ये त्यांनी पत्र दिलेले आहे की वरील विषयानुसार आपण विचारलेल्या भूखंड क्र ३०५ साई उदयानाबाबतची माहिती मागविलेली आहे ती खालीलप्रमाणे. त्यातील मुद्दा क्रमांक ३ वाचतो- सदरील प्लॉटवरील बांधकामास परवानगी दिलेली नाही. एमआयडीसीने परवानगी दिलेली नाही. आणि आपल उत्तर काय आहे आम्ही परवानगीला पाठवलेलं आहे, आम्ही परवानगी मागीतलेली आहे. हे चुकीच उत्तर दयायच कारण काय. कोणासाठी तुम्ही हे चुकीच उत्तर देता. काय कारण, सरळ सरळ आपण अनधिकृत बांधकाम केलं आहे. खरंतर पत्रकार बांधव हा न्याय मी मागतो आहे. हा काळाबेरा कारभार जनतेसमोर येण्यासाठी प्रश्न मांडलेले आहेत. पत्रकार बांधवानी अनेक दिवस प्रत्येक विषयामध्ये हा विषय समोर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे पण आपल्या प्रशासनाला जाग आलेली नाही. हे अनेक दिवसा पासून बातम्या आहेत. सकाळ असेल किंवा इतर माध्यम असतील. साहेब एक दिवस सुध्दा तुम्हांला असं वाटल नाही, एक दिवस सुध्दा तुम्हांला उत्तर देता आल नाही. माझ्यासारखा एखादा कार्यकर्ता जर कोर्टात गेलातर तुम्हांला अनधिकृत बांधकामाचा नियम पण माहिती आहे. जर नगरसेवकांनी अनधिकृत बांधकाम केलतर तो डिस्क्वॉलीफाय होतो. आतातर तुमच्या कोर्टात आलेल आहे. ज्यांनी त्याला मदत केली तो डिस्क्वॉलीफाय होतो. जो अधिकारी त्याला साथ देईल तो डिस्क्वॉलीफाय होतो तो सस्पेन्ड होतो. याच्यामध्ये स्थापत्याचे अधिकारी, उदयानचे अधिकारी त्यांनी मदत केली, ज्यांनी ज्यांनी मागणी केली त्यांनी मदत केली यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार. ज्यावेळेस पहील अनधिकृत बांधकाम माझ्या येथे पाडल त्यावेळेस आयुक्त श्रीकर परदेशी होते त्यावेळेस वाद झाला होता. आम्ही राजीनामा दिला होता. पहील आम्ही जनतेच्या बाजूने राहणार आहेत. त्यावेळेस मला ढोस दिला होता तुझ नगरसेवक पद

बाद केल जाईल. मी राजीनामा देवून टाकला होता. आज पण कायदयाच्या चौकटीमध्ये बसून त्यांनी हे ७० ते ८० कोट रुपये खर्च केलेले आहेत मग त्यांच्यावर कारवाई करणार का नाहीत याच उत्तर पाहिजे. जर सर्वसामान्य नागरीकांनी जर १० x १० च घर बांधलतर त्याच्यावर फौजदारी गुन्हा, त्याला कोर्टाचे येरझारे, त्याची हॅरीसमेंट, त्याच घर पाडल जातं आणि तुम्ही बागेमध्ये अनधिकृत बांधकाम, पैसे महानगरपालिकेचे हे सगळ करायला कारणीभूत तुम्ही असताना मग दोषी तुम्ही, का ती जनता. मी पत्रकार बांधवाना जाहीर आवाहन करतो जेवढी बांधकाम आहेत ते बीनधास्त तुम्ही बांधा. जेवढी शहरामध्ये अनधिकृत बांधकाम चालली त्याच्यापेक्षा जास्त बांधकाम बांधणार कारण महानगरपालिकेनी अनधिकृत बांधकाम करायला सुरवात केलेली आहे म्हणून माझ्या ग्रामस्थानी बांधकाम करण्यास सुरवात करा पहील हे पाडा आणि मग नंतर आमच्या गोरगरीबांच्या घरावर बुलडोझर चालवा. जर हिम्मत असेलतर करुन दाखवा. गरीबांना एक न्याय, अधिका-यांना एक न्याय, बाकीच्या लोकांना एक न्याय. हे कुठल्या ठिकाणापासून चालल आहे. एमआयडीसीने पत्र दिलेल आहे हे पाडा म्हणून. कोर्टाने तुम्हांला आदेश दिला पाडा. का नाही करत, काय कारण. साहेब, मी तुम्हांला अजून एक ईशारा देतो १२०/ क्रिमिनीयल/कॉन्सटी संगणमत करण्यासंबंधी साहेब मी तुमच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करु शकतो. ह जे जे आहेत त्यांनी हे बांधकाम पाडायचा जर प्रयत्न केला नाही कारण तुम्ही उत्तर देताना अतीशय शुध्द बुध्दीने चांगला विचार करुन अतीशय पध्दतशीर उत्तर दिलेल आहे. तुमच्या चो-या या अख्ख्या शहरापुढे जाणार होत्या म्हणून हे उत्तर दिल आहे. तीन महीन्यात देतो, म्हणजे आपल्याला आता माहिती हा नववा महिना चालू आहे, दहा, आकरा बारा आणि जानेवारीमध्ये हे इलेक्शनला लागतील परत कशाला दत्ता साने येतोय. मी परत येणार आहे काळजी करु नका. सगळयाच काळबेरं बाहेर पडेल. पण मला याच्या अगोदर हे सगळे उत्तर पाहीजेत. जे आरक्षण तुम्ही ताब्यात घेतली किंवा घेतली नाही आपला नियम पण असाच आहे जर १८ ते २० वर्षात आपण ती आरक्षण ताब्यात घेतली नाहीतर त्या शेतक-याला आरक्षण परत दयायची हा कायदा आहे. ही आरक्षण का आपण जवळ ठेवली तुम्हांला विकसीत करता येत नसेलतर देवून टाकाना त्या लोकांना. उदया मी सांगेल माझ्या वॉर्डात आरक्षण आहे दया मला परमीशन. मी तीथ उदयान बांधल, शाळा बांधल, मंडई बांधल माझ आरक्षण आहे. जर हेच वळण तुम्ही लागू केलतर सर्व शहराला लागेल मी उदया प्रस्ताव देतो माझ्या तेथे मला पाहीजे ते दया. महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाला खर्च करायचा हा नियम आहे का. आणि खर्च केला असेलतर का केला. याच मला उत्तर पाहीजे. हे अनधिकृत बांधकाम आहे, महापालिकेचे पैसे खर्च केले आणि जे अधिकारी याच्यामध्ये दोषी आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार याच मला उत्तर पाहीजे. अन्यत: या विषयाच्या पुढे आम्ही जाऊ देणार नाहीत. कारण हा विषय माझा एकटयाचा नाही, २ लाख ८८ हजार लोकांचा विषय आहे. दत्ता साने लोकांसाठी बोलतो, हे जे गोरगरीब लोकांच्या घरावरती बुलडोझर फिरतोना

त्या आमच्या भगिनीनी डागदागीने विकून घर बांधलेली आहेत. आम्ही लोकांमधुन आलेलो आहोत, आम्ही एसीमध्ये बसुन काम करत नाहीत. आम्ही गावामध्ये जाऊन काम करतो. त्यांच्या भावना आम्ही बघीतलेल्या आहेत. ज्याठिकाणी तुम्ही सुविधा देवू शकत नाहीत त्यांची सुध्दा घर तुम्ही पाडली आहेत. तळवडेमध्ये तेथे सुविधा दयायच्या नाहीत का तर रेड झोन आहे मग बांधकाम करायला कोणी परमीशन दिली. जर तुम्ही त्या लोकांना सुविधा देत असालतर तुम्ही बांधकाम पाडानां. त्याना सुविधा दयायच्या नाहीत आणि बांधकाम पाडायला आम्ही मोकळे. हा अन्याय आहे, अस जर करत असाल तुमचे अनधिकृत बांधकामाच अधिकृत बांधकाम तर या लोकांना सुध्दा तोच न्याय दया. बातमी दिलेली आहे तुम्ही- साई उदयानामधील अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याची नोटीस एमआयडीसीने महापालिकेला दिलेली आहे. मात्र महापालिकेचे बांधकाम वाचवणेचे खुले क्षेत्र ओपन स्पेस आणि सुविधा क्षेत्र अमॅनेटीज स्पेस या जागेचा अदलाबदल करण्याचा प्रस्ताव एमआयडीसीकडे पाठविलेला आहे. असे महापालिका आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषेदेत सांगीतल, अशी बातमी आहे. साहेब, हा नियम कुठला आहे. आयुक्त साहेब उदयानातील बांधकाम थांबवा अशी बातमी पेपरला आहे. जर हा नियम एका विषयाला लागत असेलतर साहेब, शहरात जी १७८ उदयान आहेत त्यामध्ये ६८ उदयान तुमच्या ताब्यात आहेत त्या उदयानामध्ये अतिक्रमण आहे. हे एका कोणाला डोळयासमोर ठेवून जर तुम्ही हा विषय घेणार असालतर एकतर अनधिकृत बांधकामाचा निकाल लावायचा, कोर्टात तुम्हांला काय उत्तर दयायचीत ती दया. नाहीतर मी तुमच्या विरूध्द रिट दाखल करीन की असं असं बांधकाम झाल असताना ते महानगरपालिकेनी डोळयासमोर न आणता आमच्या गोरगरीबाच्या घरावरती बुलडोझर चालविण्याच काम महानगरपालिका करत आहे. कोर्टाचा अवमान न करता कोर्टाच्या निदर्शनास आणून देईल. हे सगळ असताना जर तुम्ही असा अदलाबदलीचा ठराव आणला असेलतर मी सभागृहाला प्रश्न विचारतो हा ठराव आणला कधी आणि हा ठराव मंजूर झाला कधी. कारण आम्हांला वाटत नाही आम्ही कुठल्या सभेला अपसेन्ट आहेत म्हणून. म्हणजे हा ठराव आतल्या हाताने दिला का ओपन चर्चा करुन दिला या विषयी सुध्दा शंका माझ्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. म्हणजे या विषयाचा सुध्दा तुम्ही गैरवापर करता हा सुध्दा माझा आरोप आहे. जर हा ठराव आणला असेलतर कधी आणला, कुठल्या तारखेला आणला आणि तो सभागृहात वाचला का वाचला असेलतर तो विषयपत्रीकेवर आला का. तो सभावृत्तांमध्ये आला का हे सुध्दा प्रश्नचिन्ह आहे. आणला असेलतर मी तुमच अभिनंदन करेल. एकतर १७८ उदयान जी तुमच्या ताब्यात आहेत त्यातली आरक्षण, त्यातली अनधिकृत केलेली बांधकाम. हे एकूण उदयान १७८, आरक्षण १०० पैकी आरक्षण ३२. जवळपास ही १७८ उदयान आहेत हे जाहीर करा. मग मलाही वाटेल १२८ लोकांच्यामध्ये प्रत्येकाच्या विभागामध्ये हे आरक्षण आहेत. आणि प्रत्येक विभागामध्ये कुठना कुठतरी काहीतरी झालेल आहे हे मी पण मान्य करेल. पण एवढपण झालेल नाही.

नियम काय सांगतो फक्त वॉचमेन केबीन आणि टॉयलेट बांधकाम करता येते. हे सोडून आपल्याला बांधता येत नाही असा निकाल असताना हे सगळ करायला कोणी भाग पाडल, आपले अधिकारी त्याला बळी गेले का. गेलेतर सगळे हे मिलीभगत झाले का. झाले असेलतर यांच्यावर कारवाई करणार का. अन्यत: मी परत जाहीरपणे सांगतो जर उदयापासून पिंपरी चिंचवड शहरात कुठे अनधिकृत बांधकामावर कारवाई झालीतर हा दत्ता साने जे काय अटॅक करायचाना तो पहीला अधिका-यावर करेल. पहील आपण केलेल पाप धुवायच. अन्यत: आजच मी तुम्हांला सांगतो शहरामधील एकापण अनधिकृत बांधकामावर अजीबात कारवाई करायची नाही. आमच्या शहरामध्ये कुठही एकपण अनधिकृत बांधकाम पाडायच नाही. पाडलतर जो प्रसंग घडेल आज मी नागरीकांना जाहीर आवाहन करतो मी दत्ता साने पहीला येईल तुमचे बांधकाम रोखायला, पहीला मी जाईल नंतर बाकीचे बघेल. पत्रकार बांधवाना माझी विनंती आहे तुम्ही हे छापा. कारण हे नसेलतर महापालिकेच पाप हे पण उघड करा. कायदयाने काय होऊ शकत हे तुम्हांला सबमीट करतो. मी जे बोलतो ते मी करणार. दत्ता साने स्वत:च्या हितासाठी हे करत नाही. शहरामध्ये अनधिकृत बांधकामाची जी टांगती तलवार आहे त्या तलवारीसाठी मी बोलतो. एमआयडीसीने पाडण्यासाठी पत्र दिलेल आहे ते करा. महानगरपालिकेनी पाप केल आहे ते फेडा. जे अधिकारी दोषी आहेत त्यांना सस्पेन्ड करा. २००७ पुर्वी कोण अधिकारी असतील त्यांच्यापासून बघा. अशी माझी तुम्हांला अग्रहाची विनंती राहील अन्यत: या विषयाला एवढ वाईट वळण लागेल की याच्यामध्ये कोण बळीचा बकरा होईल, कोण स्वत:च्या विषयाला खालीवर जाईल, याला हिंसक वळण लागेल, कायदा व सुव्यवस्था बिघडेल हे तुम्हांला मी जाहीर अवाहन करुन सांगतो. याच्यामुळे कायदा व सुव्यवस्था सुध्दा बिघडू शकते कारण हे आम्ही सगळीकड दाखवून देणार पहील महापालिकेनी केलेल पाप धुवा नंतर आम्ही आमच्यासाठी निवारा राहण्यासाठी केलेला आहे आणि तो तुम्ही पाडणार आहेत. हा विषय तुम्ही गांभीर्याने घ्यावा अशी तुम्हांला विनंती आहे. या सगळया विषयाच काय करणार आहेत याचा सुध्दा खुलासा दयावा पाप केल का नाही, पैसे खर्च केले का नाही आणि केले असतीलतर कुठल्या निधीतून केलेत हे सुध्दा सांगाव आमच्या वॉर्डामध्ये आम्ही गेली दहा वर्षे सांगतो रस्ता, ड्रेनेज, गटर, पाणी, उदयान विकसीत करायला दया. त्याठिकाणी पैसे खर्च करायला सगळे हात थरथर करतात. याठिकाणी पैसे आले कुठून. याला बेस काय आहे, कुठल टेंडर. आम्हांला एखाद काम करायला नको तिथ अटापिटा करुन एखाद काम कराव लागतं. मग हे अनधिकृत काम करायला कुठल्या कायदयातून केलं काय त्याला कायदा होता. ७०, ८०, ९० कोट खर्च झाले हे कसे खर्च केले. एखाद स्ट्रक्चर ऑडीट मी लावेल. एखादी याच्यावर समिती नेमा एखादा चांगला ईजिनीअर, आर्किटेक्ट आणा आणि त्या बिल्डींगला किती खर्च झाला तो सांगा. करु दयाना दुधका दुध पाणी का पाणी ठिक आहे ८० लाख नाहीतर १० लाख केला, का केला. चुकीचा केला ना, का केला. कुठल्या कायदयाने केला,

कसा केला. काय नियमावली लावली, काय अटि लावल्या. कोण तो कॉन्ट्रॅक्टर, कोण तो अधिकारी होते. एखाद काम करायला तुम्ही दहा टेबल फाईल फिरवता, सहा-सहा महीने टेंडर पास होत नाही आणि इकडे विदाऊट, काय चाललं आहे. म्हणजे हा पालिकेचा कुठल्या हिशोबाने वापर करुन घेतोय हे सुध्दा बघण्याची आता वेळ आलेली आहे. म्हणून या विषयाच गांभीर्य लक्षात घेवून, कोणाचा दबाव, कोणाचा फोन, कोणाचे प्रेशर हे जाणुन घेणार नाही. याच मला क्लेअर उत्तर आल नाहीतर माझ्याशी गाठ आहे, थांबतो.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाकडून पिं.चिं.महानगरपालिकेकडे किती भूखंड हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत? उत्तर आहे ५३ भूखंड. या सर्व भूखंडाचे ताबे आपण कधी घेतले आहेत? उत्तर आहे सोबत यादी जोडलेली आहे. प्रत्येक प्लॉटचे क्षेत्र किती व कधी ताब्यात देण्यात आले आहेत? उत्तर आहे सोबत यादी जोडलेली आहे. प्रश्न क्रमांक आठवा याच्यातुन तुम्ही वगळलेला आहे. तो प्रश्न असा आहे- महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाने ताब्यात दिलेल्या भूखंडांपैकी कोणत्या भूखंडांमध्ये अनधिकृत काम केलेले आहे? या प्रश्नाच उत्तर तुम्ही दिलेले नाही. जाणुनबुजून हे उत्तर तुम्ही लपवलेल आहे प्रत्येक भूखंडामध्ये अनधिकृत बांधकाम आहेत. या सभागृहाच्या समोर अतिक्रमण झालेल आहे का नाही हे तुम्ही कबुल करत नाहीत आणि त्याच उत्तरही दिलेल नाही. या सर्व प्रश्नाचे उत्तर तुम्ही फिक्स दोन पानी लीस्ट आहे त्यापेक्षा काहीही उत्तर नाही. आमच्याकडून माहिती या प्रशासनाने लपवलेली आहे. शंभर टक्के लपवलेली आहे. एक लीस्ट महापालिकेनी दिलेली आहे व माझ्याकडे तीन लीस्ट आहेत. एक लीस्ट कॉर्पोरेशनने दिलेली आहे, दुसरी लीस्ट एमआयडीसीकडून मी आणलेली आहे. तीसरी लीस्ट अमोल थोरात म्हणून आहेत त्यांना पण कॉर्पोरेशनने दिलेली आहे. एमआयडीसीने दिलेल्या लीस्टमध्ये ४३ प्लॉटला ताबा दिलेला आहे. आता माझ्याकडे लीस्ट दिलेली आहे त्याप्रमाणे ५३ प्लॉट ताब्यात दिलेले आहेत. एमआयडीसीची पुर्वी दिलेली लीस्ट आहे त्यामध्ये ७० प्लॉटचा ताबा घेतलेला आहे. शॉकीन आहे व्हेरी शॉकीन. किती प्लॉट ताब्यात घेतले हे सुध्दा एमआयडीसी एक सांगते, महापालिका एक सांगते. म्हणजे तुम्ही कॉर्पोरेशनचे कुणाकडेही फेरफार करु शकेलेले नाही. तुमच्याकडे ॲडमीनिस्टेशनमध्ये फाईव्ह ॲडमिनीस्ट्रेशन आहे. कमिशनर, अतिरीक्त आयुक्त, सहा.आयुक्त, प्रशासन अधिकारी, नायब तहसिलदार असं असून सुध्दा तुमच्याकडे लीस्ट सुध्दा नाही एक एक प्लॉट किती स्क्वे.फुटाचे आहेत आणि याची लिस्ट सुध्दा नाही. ८३, ८४, ८५ च्या काळात आपल्याकडे अनेक भूखंड एमआयडीसीने ताब्यात दिलेले होते. त्यावेळी रिजनल ऑफीस मुंबई होती. आता रिजनल ऑफीस पुण्यामध्ये आलेलं आहे. तिथ सुध्दा लीस्ट नाही म्हणजे कोणाकडेही नोंद नाही. या अनेक प्लॉटमध्ये अतिक्रमण झालेले आहे हे प्रशासन ॲक्सेप्ट करत नाही. आमचे प्रश्न अधिका-यांनी सिरीएसली घेतलेले नाही. आपल्या प्लॉटमधला एक प्लॉट दुस-या माणसाने घेतला तरी आपण परत परत कोर्टात

जातो. हजारो रुपये खर्च करतो. हा तर दहा लाख स्क्वे.मी.चा हिशोब आहे आणि हे प्रॉपर्ली नेमक आलं नाही. लाखो रुपये आपण ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये खर्च करतो आणि आपण आपली स्वत:ची प्रॉपर्टी सेफ करु शकत नाहीत. या लीस्टमध्ये भूमि आणि जिंदगी, कन्सलटंन्सी नगररचना अनेकवेळा मी सांगीतलेल आहे भुमि जिंदगीकडे तुमच लक्ष नाही. भुमि आणि जिंदगी डिपार्टमेंटमध्ये पैसे मिळत नाही म्हणून कोणी अधिकारी जायला तयार नाहीत. अनेक अधिकारी नगरसेवकांकडे येतात, आम्हांला स्थापत्य दया, ऑक्ट्रॉय दया, हा विभाग दया तो विभाग दया म्हणतात पैसे दयायला तयार असतात पण भुमि आणि जिंदगीमध्ये जायला कोणी तयार नाहीत. भूमि आणि जिंदगीच कधी इन्फ्रास्ट्रक्चरतरी आयुक्त साहेब बघीतलं का. माणस काम करायला नाहीत, जागा नाही, आणि कोणाचाही एक दुस-याशी ताळमेळ नाही. त्याचप्रमाणे आपल्या प्रॉपर्टीमधुन ९ कोटी रुपये येणे आहे ते गेली दहा वर्षे झाले आपण वसुल करत नाहीत असं भुमि आणि जिंदगी डिपार्टमेंटच काम आहे. या लीस्टमध्ये चिंचवड एच-ए आठ हजार स्क्वे.मी. ॲटोक्लस्टर आणि समाविष्ट रिकाम्या जागा, कुठल्या रिकाम्या जागा आहेत काही विषय नाही. आम्ही डिटेल्स मागीतल होत तुम्ही दोन वाक्यात, चार वाक्यात उत्तर दिलेलं आहे. भोसरी जे-१२ नं. १८ हजार स्क्वे.मी. आढळून येत नाही. तसेच भोसरी-एस-५१, १४०० स्क्वे.मी. अतिक्रमण काही कंपनीचे पक्के बांधकाम. दुसरी कंपनी बांधकाम करते. कशाप्रकारे आपण काम करतो. आपल्याच कंपौडमध्ये दुसरा माणुस पक्के बांधकाम करतो तरी आपल्याला माहिती नाही. भोसरी टी-५५, ९४६०० स्क्वे.मी., कार्यशाळा गुलाबपुष्प उदयान व उदयान कार्यालय, वॉचमेन केबीन. कधी ताब्यात आलं माहिती नाही. भोसरी एस-३९, ४०७६ प्लॉट रिकामा, कधी ताब्यात आला माहिती नाही. आकुर्डी जी-१, २५१६८ साई उदयान आता यामध्ये मला फक्त एक प्रश्न विचारायचा आहे. या साई उदयानाच्या बद्दल, ठिक आहे नगरसेवकांनी बांधायला सांगीतलं. आम्हीही ईंजिनीअरला सांगतो पण ईंजिनीअरनी बांधल कसं. मी सुध्दा तांबे साहेबांना सांगीतल हाणुमान मंदीर म्हणुन माझ्या वॉर्डात प्लॉट आहे त्या प्लॉटमध्ये शेड टाकून दया तर पहील हो म्हणाले. नंतर म्हणाले मी बांधु शकत नाही. बांधलतर माझ्यावर कारवाई होईल, अनधिकृत होईल आणि पाहीजेतर दुसर काम करुन घ्या. एक अधिकारी माझ्या सारख्या सिनीअर कार्पोरेटरला अनधिकृत बांधकाम करु शकत नाही म्हणून सांगतो मग दुसरे अधिकारी कसे काम करतात. याची चौकशी करताना तुम्ही काय करणार, ज्यू. ईंजिनीअरवरती कारवाई करणार. आपल्याकडे असं आहे कधीही ज्यू.ईंजिनीअरवरती कारवाई करायची आणि कारवाई केली म्हणून सांगायच. याला कनेक्टीव्हली ज्यु. ईंजिनीअर, डे.ईंजिनीअर, एक्झिक्यूटीव्ह ईंजिनीअर, ॲडीशनल कमिशनर, कमिशनर सर्वजण जबाबदार आहेत. मला सांगीतल शेड बांधु शकत नाही म्हणून एक अधिकारी रिस्पॉन्सीबल नाही तर सर्व अधिकारी रिस्पॉन्सीबल आहेत. यासंदर्भात एक्झिक्युटीव्ह ईंजिनीअरनी एक पत्र पाठवलं आहे. (इंग्रजी पत्राचे वाचन केले). आता हे स्ट्रक्चर डिमॉलीश

करायच्या ऐवजी तुम्ही काय केलं आम्ही एक्सचेंज करु. दिड लाख बांधकाम अनधिकृत म्हणून कोर्टाने डिक्लेअर केलं आणि ते पाडायला सांगीतलं. जे रुल तुम्हांला आहेत ते जनरल नागरीकांनाही पाहीजेत ते तुम्ही करत नाहीत. साई उदयानाला तुम्ही रुल करताना बाकी नागरीकांनाही रेग्युलराईज करा. तुमची चुक लपविण्यासाठी तुम्ही रेग्युलराईज करणार नागरीकांनी केलेली चुक तिथ पण तुम्ही असे करा. आकुर्डी जी ब्लॉक ३-अ,११५६८८ बर्ड व्हॅली, हॉकर्सझोन अधिकृत केले का. मग येथे केलेतर बाकी वॉर्डात का नाही केलं. गेले तीस वर्षे या जनरल बॉडीमध्ये मी ऐकतो हॉकर्स झोन करणार, हॉकर्स झोन करणार. तुम्ही दोन वॉर्डात हॉकर्स झोन केल बाकीच्या वॉर्डात तुम्ही हॉकर्स झोन का केलं नाही. हे हॉकर्स झोन ऑफीशिअल आहे का अनऑफिशीअल आहे हे सांगा. आकुर्डी डी-१, १२ नंबर ९९५४ खडीमशिन, झोपडपट्टी ताबा दिनांक आढळून येत नाही. यानंतर आकुर्डी-जेपी-१३२, ३८५६ स्क्वे.मी. हिंदु कन्स्ट्रक्शन आणि प्रतीभा कन्स्ट्रक्शन हे हिंदु कन्स्ट्रक्शन आणि प्रतीभा कन्स्ट्रक्शन काय आहे. कशाला यांना प्लॉट दिलेले आहेत. भाड घेता का नाही का फुकट कोणीतरी सांगीतल म्हणून दिलं आहे. आम्ही डिटेल मागीतल होत तुम्ही एका वर्डमध्ये उत्तर दिलं. म्हणजे याची नोंदच तुमच्याकडे नाही. मागे आम्ही पेपरमध्ये वाचल की एका उदयानामध्ये फाईव्हस्टार हॉटेल उभा आहे. हे खरं आहे का हे सांगा आणि खरं असेलतर कसंकाय उदयानाच्या रिझर्व्हेशनमध्ये फाईव्ह स्टार हॉटेल आहे. प्लॉट नंबर बीजीपी-११९ डीवाय पाटील उदयान हे दिलं आहे का डीवाय पाटीलला. प्लॉट नं. ५६ १०७ जी आकुर्डी २००० स्क्वे.मी. डीवाय पाटील शाळेचे मैदान. ज्यावेळेला मी कॉर्पोरेशनला विचारल त्यावेळेस ते म्हणाले असा प्लॉट दिलेलाच नाही. मग पेपरमध्ये का येतं. डीवाय पाटीलला दिलेल आहे का नाही हेही सांगा. दिलेल असेलतर कसं दिलेल आहे. यामध्ये कुठेही सिमरॅलीटी नाही. तुम्हांला तीस वर्षात हे सर्व प्लॉट डेव्हलप करता आले नाही का. का नाही तुम्ही डेव्हलप केलं. तुमच्याकडून तीन प्लॉट एमआयडीसीने परत घेतलेले आहेत. एमआयडीसीने महापालिकेशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. एमआयडीसीने महापालिकेला विकासासाठी जे भूखंड दिले होते त्यातील ९० टक्के भूखंडावर विकास केलेला आहे. एमआयडीसीकडून भूखंडाबाबतचा कोणताही पत्रव्यवहार महापालिकेशी झालेला नाही हे तुमचे उत्तर आहे. आता अजीत देशमुख, प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी काय म्हणतात- एमआयडीसीने दिलेली जागा १० टक्के जागा ही शासकीय नियमानुसार वृक्ष लागवडीसाठी ठेवावी लागते त्यापेक्षा जास्त जागा असल्यास ती ताब्यात घेणार आहे. त्या जागेवर एखादा उदयोग उभारता येईल त्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. बुधवारी भोसरी एमआयडीसीतील तीन ओपनस्पेस भूखंड ताब्यात घेण्यात आले आहेत. तुम्ही म्हणतात की त्यांनी प्लॉट कुठलेही ताब्यात घेतलेले नाही आणि अजित देशमुख म्हणतात की ताब्यात घेतलेलं आहे. भोसरी एमआयडीसीमधील एस ब्लॉक मधील ओएच-४३, ओएच-३७, ओएच-२७ असे तीन भूखंड महामंडळाकडून ताब्यात घेण्यात आलेले आहेत आजुबाजूच्या

उदयोगाशी व स्थानिक लोकांशी चर्चा करुन एमआयडीसीच्या अधिका-यांनी हे भूखंड ताब्यात घेतले. हे भूखंड ताब्यात घेण्यासाठी महानगरपालिका अधिका-यांना बोलवण्यात आले होते मात्र त्यापैकी कोणीही हजर राहीलेल नाही. आता खरं काय आहे, कमीशनर लेव्हलचा माणूस आम्हांला स्टेटमेंट देतो. कुठल्याही प्लॉटचा आम्हांला पत्रव्यवहार झालेला नाही, कुठलाही प्लॉट ताबा दिला नाही आणि एमआयडीसीचे चिफ ऑफिसर म्हणतात की आम्ही तीन प्लॉटचा ताबा घेतलेला आहे आणि त्या तीन प्लॉटचे त्यांनी नंबरींग दिलेले आहे. आणि असं म्हणलेल आहे आम्ही ताबा घेताना महापालिकेच्या अधिका-यांना बोलवल होतं ते कोणीही हजर झालेले नाही. या प्रॉपर्टी मध्ये जे अनधिकृत बांधकाम झालेले आहे याच्याबद्दल आता तुम्ही काय करणार तुम्ही हे कस करणार हे सांगाव, कुठला प्लॉट आपल्याकडे आहे कुठला नाही. याचा आपल्याकडे मॅप नाही, यादी नाही, काही नाही आणि या प्लॉटमध्ये अनधिकृत बांधकाम चालले आहे त्याला कोण जबाबदार आहे. तीन चार मोठे प्लॉट एमआयडीसीचे आपल्याला ओपन मिळालेले होते. आता त्याठिकाणी झोपडपट्टी झालेली आहे. कोण जबाबदार आहे. आता त्या झोपडपट्टीला पुनर्वसन करावे लागेल म्हणजे त्या प्लॉटमध्ये आपण झोपडपट्टी होऊ दिली त्यानंतर आता झोपडपट्टीच पुनर्वसन करायच. पुनर्वसन करण्यासाठी एमआयडीसी तयार आहे पण आपण म्हणतो एमआयडीसी तयार नाही. या प्लॉटला सिक्यूरीटी अपॉईंट का केलेली नाही. करोडो रुपयाचे प्लॉट आहेत आणि त्यामध्ये ऍक्शन का घेतले नाही. प्रत्येक प्लॉटचे आम्हांला डिटेल्स पाहीजे. ज्या ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम झालेल आहे त्याठिकाणी अधिका-यांवरती काय कारवाई करणार. कोण रिस्पॉन्सिबल आहे. ऍक्शन काय घेणार याबद्दलही सांगा. यासाठी एक चौकशी समिती नेमा. तुमच्या चौकशी समितीच काहीही होणार नाही मी गेली तीस वर्षात पहील्या वर्षापासून आतापर्यंत बघीतलं आहे. चौकशी समिती नेमणार, चौकशी समितीच्या मेंबरला पैसे दिले की ते लोक पाच पाच वर्षे काहीही रिपोर्ट देणार नाहीत, कुठल्याही चौकशी समितीचा रिपोर्ट आतापर्यंत आलेला नाही आणि चौकशी समितीमध्ये रिझल्ट आला आणि तुम्ही दोषी ठरवलं तरी जनरल बॉडी माफ करणार. अनेक अधिका-याचे करप्शन प्रू झालेल आहे आणि आयुक्त जनरल बॉडीमध्ये हे अधिकारी दोषी ठरले असून सदर अधिका-यांवरती कारवाई करण्यासाठी महानगरपालिका सभेपुढे प्रस्ताव देतात. महानगरपालिकामध्ये जे लोकल लीडरचे काही लीडर त्यास परवानगी देणार नाहीत सुपारी घेवून त्या अधिका-यांना वाचवणार.

**मा.शितल शिंदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मागच्या जीबीमध्ये प्रश्नोत्तर दिले होती ती या जीबीला घेतली त्याचे उत्तर अशाप्रकारे आलेली आहेत की जेणेकरुन अधिका-यांनी त्या प्रश्नाच ऑपरेशन केलं आणि वेगवेगळया कागदावरती वेगवेगळया प्रश्नाच उत्तर दिल आणि वेगवेगळया विभागामार्फत दिलेलं आहे. खरंतर सर्व प्रश्नाच्या उत्तरावरती खाली आयुक्तांच्या सहया हव्या होत्या पण त्या नाहीत आणि जे प्रश्न विचारले

त्यापैकी प्रत्येकाच उत्तर वेगवेगळयाप्रकारे दिशाभूल करणारे आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून जी प्लॉटची यादी दिली गेली आणि एमआयडीसीकडून जी यादी आली त्याचे क्षेत्रामध्ये आणि प्लॉट क्रमांकामध्ये भरपूर तफावत आहे. एखादा सदस्य जेंव्हा प्रश्न विचारतो तो काही स्वहितासाठी विचारत नाही याचा असा अर्थ काढला जातो की यास दिशाभूल करा आणि काही उत्तर करु नका आणि पुढ यांची कामच सोडून दयाव प्रश्न विचारायच आणि उत्तर मागायचं. मला फक्त याच्यातून एकच माहिती दिली गेली की अनधिकृत बांधकाम फक्त प्लॉट नं. २९ मध्ये झालेल आहे. आम्ही प्रश्नामध्ये असं उत्तर विचारलेलच नव्हतं. की २९ नं. प्लॉटमध्ये काही अनधिकृत बांधकाम झालं आहे म्हणून. एमआयडीसीकडून आपल्याला किती प्लॉट हस्तांतरीत झाले आहेत याची माहिती मागवलेली होतीतर त्या विभागाशी संबंधीत नाही म्हणून ई- क्षेत्रीय कार्यालयाच पत्र आहे. ई-क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिका-यांनी जे पत्र दिलेल आहे तरी यांना पुर्ण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहिती दयायचे अधिकार आहेत का. आम्ही प्रश्न पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना व महापौरांना विचारला होता. क्षेत्रामध्ये ७०-७० हजार चौ.मी.ची तफावत आहे. एका मध्ये असं दाखवल जातं की साधारण ३७८ चौ.मी.क्षेत्र आपल्याला १९८४ रोजी मिळालेल आहे आणि एमआयडीसीकडून तेच क्षेत्र दिड लाखाच्या आसपास जातं. त्याचप्रमाणे पुढचा जो आमचा प्रश्न होता महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाकडून ताब्यात घेण्यात आलेल्या भूखंडांमध्ये सद्‌य:स्थितीत कोणत्या प्रकारचा वापर करण्यात येत आहे? याच्यात पण फक्त प्लॉट न. २९ चाच उल्लेख केलेला आहे. बाकीचे प्लॉट आहेत कुठं का दिलेच नाहीत. अशाप्रकारे उत्तर का दिली गेली. म्हणजे अधिका-यांना आम्ही विचारलेले प्रश्न समजत नाहीत का आम्ही जे प्रश्न केलेत ते आम्हांला समजले नाही म्हणून आम्ही काही केलं. अशा प्रकारची उत्तर का दिली गेली याच्या मागचा उद्देश मला सांगावा. आताच दत्तादादा साने यांनी सुरक्षे विषयी मुद्दा मडला होता. माझ्या माहितीनुसार दहा कर्मचा-यांच्या वर जर कर्मचारी असतीलतर तुम्हांला पसारा लायसेन्स आवश्यक असतं आणि आज शहरामध्ये विवीध ज्या सोसायटया आहेत तेथे जरी वॉचमेन, सुरक्षा रक्षक ठेवायचे असतीलतर पहील कोटेशन बघीतल जातं, पसारा लायसेन्स आहे का नाही तेही बघीतल जातं आणि त्यांच्या चारिञ्याचा अहवाल आहे का नाही ते बघीतल जातं. आज एवढी मोठी महापालिका आहे आपण येथील जनतेच्या सुरक्षेची हमी घेतो मग आपले अधिकारी या गोष्टी का बघत नाहीत. याच्या मागे काहीतरी गौडबंगाल आहे हे तर निश्चितच आहे. काही राजकीय पुढा-याचे पण याच्यामध्ये गॉटमेट असेल हे निश्चित आहे. या गोष्टीची तपासणी केली गेली पाहीजे. आयुक्तांनी या प्रश्नाच उत्तर दिल की चौकशी समिती बसवू. चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर कारवाई करु. मीतर म्हणतो की चौकशी समितीचा अहवाल यायच्या आदिच कारवाई सुरु करावी. कारण आताच आमचे आर.एस.कुमार, ज्येष्ठ नेते यांनी सांगीतल की गेली तीस वर्षे हेच करतात. चौकशी समिती होती, निकाल येतो आणि दाबला जातो. २९

नंबरच्या प्लॉट संदर्भात मला माहिती दिली गेली पुर्ण एमआयडीसीकडून आपल्याला जेवढे प्लॉट आलेले आहेत त्याची माहिती विचारलेली होती. आयुक्तांनी त्याच पत्रावर सहया केलेल्या आहेत फक्त प्लॉट नं. २९. मलातर असे वाटते की हा चर्चेचा विषय बनला प्लॉट नं. २९. फक्त एमआयडीसीकडून तेवढाच प्लॉट मिळाला का याची पण माहिती दयावी. बाकीच्या प्लॉटची माहिती दिलेली नाही. रिकामे दहा प्लॉट दाखवलेले आहेत ते रिकामे आहेत का नाहीत हे कोणालाच माहिती नाही. दत्ताकाका सानेनी मगाशी जे सांगीतल प्लॉट नं. २९ वर जे अधिकृत केल जाईल किंवा तिथं जो नियम अवलंबला जाईल प्लॉटची फेरबदल करुन त्याला वाचवल जाईल तसे पिंपरी चिंचवड शहराचे जेवढे पण अनधिकृत बांधकाम आहेत त्यांच्यासाठी पण तोच विचार करावा आणि जोपर्यंत चौकशी समितीचा अहवाल येत नाही आणि कारवाई होत नाही तोपर्यंत अनधिकृत बांधकामावरती हातोडा चालऊ नये ही आम्ही विनंती करतो आणि दत्ता काका साने यांच्या या गोष्टीला आम्ही स्वत: समर्थन करतो की अनधिकृत बांधकामासाठी आम्ही उभे राहू. जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एमआयडीसीने जे प्लॉट आपल्याला दिलेले आहेत त्यासंदर्भात माहिती मागवली ती ब-यापैकी दिलेली आहे. ४० प्लॉट महापालिकेच्या ताब्यात आहेत. त्या ४० प्लॉटमध्ये ब-याच ठिकाणी झाड वगैरे लावलेले आहेत, गार्डन केलेले आहेत व ते वापरण्यात आलेले आहेत. पण काही असे प्लॉट आहेत ते रिकामे प्लॉट आहेत आणि रिकामे प्लॉट एमआयडीसी परत घेत आहे. आपल्याला जे प्लॉट दिलेले आहेत त्या प्लॉट वरती झाड लावायला हवेत या मताशी दुमत नाही. झाड उदयान विभागाने लावलेले आहेत ते मी स्वत: पाहीलेल आहे. काही काही प्लॉट ओपन आहेत त्याठिकाणी पत्ते खेळण्याचे काम चाललेले होते हे पाहीलेल आहे काही काही ठिकाणी खड्डे खोदलेले आहेत त्यात झाड लावलेले आहेत पण ते सुध्दा व्यवस्थित दिसत नाहीत. एमआयडीसीने मोठमोठाले प्लॉट आपल्याला दिलेले आहेत आपण झाड लावली. झाड कुठली लावायची, कुठली नाहीत, अशी झाड लावली पाहीजेत की ते दुर्मीळ झालेले आहेत. त्या झाडाची माहिती कोणाला नाही, विदयार्थ्यांना नाहीत. आज काही अशी झाड आहेत त्या झाडाची नाव सुध्दा माहीत नसतात. गेल्या आठवडयामध्ये तानाजी शिंदे साहेबांच्या कानावर विषय टाकलातर त्यांनी ताबडतोब दुस-या दिवशी मिटींग घेतली मी त्यांचे धन्यवाद मानतो. आयुक्त साहेब, मी विनंती करतो की या शहरामध्ये दुर्मिळ वृक्षाची झाड पाहीजेत. जेणेकरुन बाहेरच्या गावातील मुलं ते बघतील. याठिकाणी चिंच आहे, रक्तचंदन आहे, कापूराची झाड आहेत, उदाची झाड आहेत, रुद्राक्षाची झाड आहेत, रावधुप आहे असे बरेचसे कित्येक झाड आहेत. झाड अशी आहेत की त्या झाडाची नाव सुध्दा आपण ऐकतो. मध्यंतरी मी एका कार्यक्रमाला गेलो होतो राष्ट्रीय सेवासंघाचा कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमामध्ये मला काही जणांनी म्हणाले खाडे साहेब तुम्ही वृक्षप्राधिकरणामध्ये इतकी वर्षे काम करता. तुम्ही शहरामध्ये झाड चांगली लावलेली

आहेत, गार्डन सुध्दा आपली चांगली आहेत. जी झाड लावलेली आहेत त्या झाडांची नाव आज कोणाला सांगता येणार नाहीत. शोकांतीका अशीच आहे मी गेली दोन वर्षे झाली सांगतो की प्रत्येक झाडावरती नेमप्लेट लावावी त्या झाडावरती ते कुठल झाड आहे त्या झाडाच नाव या शहरातल्या नागरीकांना कळाव. काही झाड अशी आहेत की त्याचा औषधासाठी उपयोग केला जातो. आज टेल्को कंपनीच्या बाजूला आपण उदयान विकसीत केलेल आहे त्याठिकाणी आयुर्वेदीक औषध दिली जातात अतीशय चांगल ते गार्डन आहे. असे बरेचसे प्लॉट आपण डेव्हलप करु शकतो. यासंदर्भात ज्यावेळेस चर्चा केली असता शिंदे साहेबांनी ताबडतोब आदेश दिलेले आहेत. आयुक्त साहेब आपण ताबडतोब सुचना दयावी की हे गार्डन विकसीत झाले पाहीजे. ते पण असे की प्रत्येक ठिकाणी दहा दहा, पंधरा पंधरा गार्डनचे बेट तयार झाले पाहीजे जेणेकरुन देशामध्ये असल कुठच नाही. मी सिक्कीमला गेलो त्याठिकाणी सुध्दा असं बघण्याचा प्रयत्न केला. बाहेरच्या राज्यामध्ये, बाहेरच्या देशामध्ये ज्या पध्दतीने आहे तशा पध्दतीने आपले शहर कसे होईल यादृष्टिने आम्ही प्रयत्न करतो. असे बेट लवकरात लवकर तयार झाले पाहीजेत. यासंदर्भात मा.अतिरीक्त आयुक्तांनी विभागाला सुचना दिलेल्या आहेत परंतु बजेटची अडचण असेलतर त्याबाबत आयुक्त साहेब आपण ताबडतोब सुचना दयाव्यात ब-याचशा एमआयडीसीच्या प्लॉटमध्ये झोपडपट्टया झालेल्या आहेत. झोपडपट्टी हा माझ्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. मी झोपडपट्टी समितीमध्ये ज्यावेळेस काम करत होतो त्यावेळेला शहरामधल्या झोपडपट्टयांची संख्या पाहीली. ब-याचशा भागामध्ये केंद्रसरकार पैसे दयायला तयार आहे परंतु आपले काही डिपार्टमेंट आहेत ते त्याच्यावरती लक्ष केंद्रीत करत नाहीत. महापालिकेच्या जागेवरती झोपडपट्टया झालेल्या आहेत त्या झोपडपट्टयांच पुनर्वसन महापालिका करते. एमआयडीसीच्या जागेवर ज्या झोपडपट्टया झालेल्या आहेत त्या झोपडपट्टयांच देखील पुनर्वसन झाल पाहीजे या मतांशी मी आहे. त्यासंदर्भात मी मागे पत्रव्यवहार करायला लावला होता. आज देखील मी एमआयडीसीमध्ये गेलो त्याठिकाणी जे अधिकारी आहेत त्यांच्याशी चर्चा केली. आपल्याकडे एमआयडीसी भागामध्ये काही झोपडपट्टया आहेत त्याच पुनर्वसन करण्यासाठी आपण का प्रयत्न करत नाहीत. आपण एनओसी देत नाहीत आणि आपण म्हणतो की एमआयडीसी पुनर्वसन करेल तर ते म्हणाले असं काही नाही आपली कल्पना होती की आपण पुनर्वसन करायच. महापालिकेनी ते पुनर्वसन करायच घेतलंतर महापालिकेला आम्ही सहकार्य करु परंतु महापालिकेनी तसा प्रस्ताव पाठवावा असं त्यांनी सांगीतल आहे. केंद्रसरकार, राज्यसरकार असेल ते याला मान्यता देतील असा अंदाज आहे परंतु आपण प्रयत्न केले पाहीजेत आणि हे प्रयत्न केले का याची देखील मला माहिती पाहीजे. ज्या ज्या जागेवर झोपडपट्टया झालेल्या आहेत त्या झोपडपट्टयाच पुनर्वसन करण्याच्या हेतूने आपण काही प्रयत्न करतो का याची सुध्दा मला माहिती पाहीजे. काही जागेमध्ये अतिक्रमण झालेल आहे. निश्चितच ते अतिक्रमण काढून त्या जागा आपल्या ताब्यात घ्या, त्याठिकाणी झाड लावा

आणि प्रत्येक झाडाला नाव लावली पाहीजेत हे देखील अतीशय गरजेच आहे. शहरामध्ये जेवढे उदयान असतील त्या उदयानामधील झाडाना नाव लावलीच पाहीजेत अशी सूचना करतो आणि जास्त वेळ न घेता माझे दोन शब्द संपवतो.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. उदयानामधील अनधिकृत बांधकामावरती प्रश्नोत्तर आहेत. मी या विषयी असं बोलू शकतो की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील उदयानाची संख्या १७८ दिलेली आहे. यामध्ये समाविष्ट गावामध्ये जे तळवडे, चिखली, मोशी, च-होली याठिकाणी किती उदयान झालेली आहेत. माझ्या माहीतीप्रमाणे त्याठिकाणी एक छोटस इंदिरा उदयान झालेल आहे. मोशी, च-होलीला उदयान झालेल नाही. त्याठिकाणी उदयान का होत नाहीत, आपला नगररचना विभाग का कार्यरत नाही. तेथील नागरीकांना या सोईसुविधा नको का. का त्याठिकाणचे प्रतिनीधी कमी पडतात का अधिकारी वर्ग कमी पडतो याचा विचार होणे गरजेचे आहे. ज्यांच्याठिकाणी उदयान आहेत ते निश्चित पुढची उडी मारणार. हे काम नागरीकांच्या सोईसुविधाकरीता करण्याचा माणस असेलतर ते निश्चित पुढची उडी मारणार. आपल्याकड बजेट चांगल आहे मग अशा गोष्टी करताना त्या गोष्टी जर नागरीकांच्या फायदयाशी किंवा शहराच्या पर्यटनाच्या दृष्टिने जर योग्य असतीलतर कायदयामध्ये थोडाफार बदल किंवा नियमावलीत बसून आपण ते अधिकृत करणं मलातरी योग्य वाटत. या शहराच्या बाबतीत अनेक सांगता येईल. पर्यटन क्षेत्राचा विकास केलातर लांडेवाडीमध्ये शिवश्रृष्टी आहे ती अधिकृत म्हणायची का अनधिकृत म्हणायची. परंतु शहराच्या सुशोभीकरणामध्ये आज त्याची भर पडलेली आहे. फुटपाथच्या कडेनी ती शिवश्रृष्टी केलेली आहे परंतु रात्रीच्या लाईटीच्यावेळेस किंवा दिवसा पहा अतीशय चांगला स्पॉट दिसतो. शहराच्या श्रृष्टीसौंदर्यामध्ये ही भरीव कामे झालेली आहेत. असच प्रशांत शितोळे यांनी सांगीतल गार्डनमध्ये शिवश्रृष्टी उभारलेली आहे. उदयानामध्ये जी व्यायामशाळा आहे ती जूनी आहे असं पत्र दिलेल आहे ती पाडून नवीन करायची आहे असा एक माणस आहे. साई उदयानामध्ये साई मंदीर आहे मी अनेकवेळा त्याठिकाणी जातो, हजारो नागरीक त्याठिकाणी दर्शनासाठी येतात किंवा एक चांगल्या प्रकारच विरंगूळाच साधन म्हणून त्याठिकाणी वावरतात. त्यावेळेस हे आपल्याकड का नसावं, आपल्या प्रभागामध्ये का नसाव अशी एक मनामध्ये खंत वाटते. चिखली, मोशी, च-होली याठिकाणी कमी कोण पडलं याचा विचार आपण सुध्दा करायला पाहीजे. प्रत्येक प्रभागाला उदयान असाव अशी माझी इच्छा आहे. पुर्वी परदेशी साहेब होते त्यावेळेस संकल्प घेतलेला होता. त्यानंतर जाधव साहेबांनी त्यादृष्टिने पुढे पाऊल उचललीत परंतु या जागा मिळत नाहीत, नगररचना विभाग निश्चित कमी पडत आहे. आरक्षण ताब्यात मिळत नाहीत. आरक्षण ताब्यात घेतल्यास त्याठिकाणी उदयानाला बजेट दिल जाईल. इतर ठिकाणी त्याप्रमाणे कपात केली जाईल. आपल्याकडे दुसर एक उदाहरण दयायच झालतर घरकुल प्रकल्प आहे. आडीच एफएसआय नसतानाही आपण

बांधकाम केल. गोरगरीब त्याठिकाणी रहायला येतात, आलेले आहेत. आपण या शहरवासीयांकरिता तो लाभ दिलेला आहे. त्याठिकाणी उदयान केलतर ते नागरीकांच्या फायदयाचच आहे. आज आमच्या भागामध्ये हजारो नागरीक अनधिकृत काम करतात कोणाच्या मनात आहे त्यांच पाडाव. कायदयात कुठेतरी बसुन आपण शासनाला विनंती केलेली आहे की ही बांधकाम ऑथोराईज करा. पुर्वीच्या सरकारने कुंटे सम्मिती नेमली त्या समितीने अहवाल तयार करुन दिला तो या सरकारकडे आला या सरकारने तो १५ डिसेंबर २०१६ पर्यंतची कामे नियमीत करण्याचा निर्णय घेतला परंतु कोर्टाने अशी अट टाकली की आमच्या परवानगी शिवाय पुढे जायचे नाही. कोर्टात शासन गेलेतर नियमावलीमध्ये काय बदल करणार म्हणून कोर्टाने विचारलं. त्यानुसार शासन नियमावली करुन परत कोर्टात गेलेल आहे त्याचा निर्णय लागेल. तसेच आपल्याकडे हे काम केलेलं आहे ते कसं नियमीत करता येईल हे बघीतलेल आहे. कारण हजारो लाखो नागरीक भविष्यात याचा लाभ घेणार आहेत. अनेक प्लॉटमध्ये झोपडपट्टी आहे. साई उदयानसारखा मोकळा प्लॉट राहीला असतातर तेथे झोपडपट्टी झाली असती. एखादी चांगली कल्पना नगरसेवक किंवा प्रतिनीधी मार्फत येत असेलतर त्याठिकाणी काही गोष्टी होत असतीलतर ते निश्चित नियमीत करण्याच्या दृष्टिने आपण प्रयत्न केला पाहीजे. माझी आपणास विनंती आहे की एमआयडीसीची आणि आपली औदयोगीक मिटींग मागच्या महीन्यामध्ये झालेली होती मी त्या मिटींगला होतो. इंगळे साहेब पण होते त्यावेळेस विषय आला एफ-२ ब्लॉक मधील फायरस्टेशनचा ते म्हणाले आम्हांला काही माहीती नाही. इंगळे साहेब म्हणाले आम्ही तुमच्याकडे प्लॅन सादर केला. इतका निष्काळजीपणा एमआयडीसीच्या लोकांचा आहे. हे आम्हांला आज अनुभवयला मिळाल आहे. त्यांनी अशी उत्तर दिलेली आहेत हे आमच नाही, ते तुमच आहे. एमआयडीसीचा विकास आपल्याला करायचा आहे. पोल्युशनच्या बाबतीत बोललो होतो. एमआयडीसीमध्ये ड्रेनेज सिस्टीम राबविली नाही त्यांनी ती करायला पाहीजे होती. महापालिकेच नाव खराब होतं, त्यांच नाही. याठिकाणी आपण आपल्या नागरीकांच्या सोईच्या दृष्टिन चांगल करत असतो त्याचा आपण निश्चित विचार केला पाहीजे. एमआयडीसीमध्ये अनेक ओपन प्लॉट आहेत. त्याठिकाणी चांगल्याप्रकारे झाडे वगैरे लावलीतर किंवा शहराच्या दृष्टिने याठिकाणी कशी चांगली काम करता येईल याचा विचार केला पाहीजे. याठिकाणी बांधकाम ओपन स्पेस आणि ॲमेनिटीमध्ये बदल करुन करण्याचा प्रयत्न आहे. आपण याबाबत निश्चित ठराव दिला असेल याबाबत मला शंका नाही परंतु हे शहराच्या दृष्टिने चांगल आहे. ज्या ज्या आवश्यक गोष्टी नागरीकांच्या फायदयाच्या आहेत त्या कराव्यात जे काही होत आहे त्या बाबतीत निश्चित आपण विचार करावा अशी मी आपणास विनंती करतो, धन्यवाद.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी सदस्यांनी काही प्रश्न विचारलेले आहेत. त्याचे उत्तर प्रशासनाने सोईस्करपणे टाळलेले आहेत. आज

सगळयांनी सांगीतले पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये अनधिकृत बांधकामाचा प्रश्न हा न्यायालयीन आहे. तो न्यायालयीन प्रश्न असताना अनधिकृत बांधकाम करणे म्हणजे कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होते. नागरीकांनी बांधकाम केली त्यांनी कन्टेम्प्ट केलं. परंतु शासकीय अधिकारी असताना आपण कन्टेम्प्ट करु शकता का याचे उत्तर इंगळे साहेबांनी दयायचे आहे. खरंतर इंगळे साहेब तुम्हाला असं वाटत असेल चाललेला दिवस ढकलतोय, तुम्हांला हार्टचा त्रास आहे आम्हांला माहिती आहे. परंतु तुम्ही जरी रिटायर्ड होऊन गेलात किंवा राजीनामा दिला आणि उदया एखादी चौकशी लागलीतर तुमची सुटका त्याच्यातून नाही. कोणासाठी आणि कशासाठी तुम्ही एवढी रिस्क घेता हे आम्हांला कळत नाही. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, आपण उमेदमान्यतेवरती बांधकामाचा हा विषय करतो. अत्यंत लज्जास्पद ही गोष्ट आहे. प्रमोशन वगैरे उमेदमान्यतेवरती झालं हे समजु शकतो. परंतु उपसूचना दिलेली आपल्यालाही माहीती नाही आपल्यालाही बघाव लागल ही कुठून उपसूचना आली, कधी झाली अशाप्रकारच उत्तर तुम्ही मा.शासनाला देता, एमआयडीसीला देता, पत्रकाराना देता की एक्सचेंज केलय. ३७ चे किती विषय आम्ही आतापर्यंत केलेत, कुठला एवढया तातडीने शासनाकडे विषय गेला आहे का मग या विषयामध्ये आयुक्त साहेब, आपण काळजी घ्यावी. हरित लवादाचा विषय आहे. वर्तमानपत्रामध्ये महापालिकेच्या बातम्या येतात त्या साई उदयान मधील मंगलाताई कदम यांच्या वॉर्डामधील याठिकाणी प्रश्नोत्तर आलेली आहेत. असं असताना तुम्ही पक्षाच्या नेत्या म्हणून तुम्ही वाचविण्याचा काम करता, का नियम तुम्ही स्वत: बदलले हे सांगावे. जागा एक्सचेंज करुन यांच जर अधिकृत होत असेलतर मग अनधिकृत बांधकामामध्ये ज्यांची घरे जातात ज्यांनी ओपनस्पेसमध्ये आता घर बांधली आहेत आणि त्यांची पाडणार आहेत त्यांच्या सुध्दा जागा एक्सचेंज करा. ती का उपसूचना तुम्ही घेतली नाही. स्वत: जेंव्हा पालक या पदावरती आपण असतो, कुठल्याही पक्षाचे असुदेत तेंव्हा आपण सगळयाची जबाबदारी घ्यायची असते का एकटयाची. मा.महापौर साहेब, आपण जेंव्हा टिडीआर लोड करतो, आता तो कोण जैन बालेवाडीमधील त्यांची फाईल टिडीआरसाठी पुणे महानगरपालिकेमध्ये होती. त्यांनी टिडीआर अगोदर लोढ केलेला आहे. फाईल मंजूर झाली नाही म्हणून त्याला अनधिकृत ठरवलं आणि त्यांच्यावर फौजदारी गुन्हा झाला आहे. मग हा नियम तुम्हांला नाही का लागु होणार शासन उमेदमान्यतेवरती बांधकाम करताय, याचा खुलासा आता याठिकाणी करायचा आहे. एमआयडीसीने तुम्हांला कळवले आहे. मा.मंत्री महोदय सुभाषजी देसाई यांच्याकडे पर्सनली जाऊन विचारलेले आहे ते म्हणाले अशी कुठल्याही प्रकारची परवानगी आम्ही दिलेली नाही, देणार नाही. असे कळवलेले असताना तुमचे काय काम चालले ईथ पॉलीशींग करायच. निश्चितपणे तुमचे काही आर्थीक व्यवहार याच्यामध्ये आहेत का, एवढी टिका होत असताना कोणासाठी करता. एवढी अनियमीतता असताना आपण या गोष्टीकडे दुर्लक्ष करता तुम्ही जबाबदार आहात. नगरसेवक कोणी अडकत नाही. किती हाट्ट पुरवायचे, केवढे लाड पुरवायचे,

याला काही परिणाम आहेत का नाही. "हाम तो डुबे सनम, पार्टिकोभी लेके डुबेंगे". ईंगळे साहेब आपण खुलासा करायचा की एमआयडीसीने आपल्याला काय कळवलं आहे. तुम्ही अशाप्रकारची उपसूचना करत असताना त्या उपसूचनेची तुम्ही सांगड कशी घातली. आताच करत असलेल तुमच बांधकाम अधिकृत आहेत का आणि हरीत लवादाच्या नियमाप्रमाणे तुम्ही योग्य आहेत का. दत्तात्रय साने यांनी सांगीतले आहे की उदयाच्या होणा-या सगळया प्रकरणाची जबाबदारी तुमची असेल, मग ती कायदा व सुव्यवस्था असेल किंवा अंदोलन, मार्चे असतील. मा.महापौर साहेब, याचा खुलासा पाहीजे. रोज वर्तमानपत्रामधून जेंव्हा अशाप्रकारच्या बातम्या येतात तेंव्हा जसं आपले म्हेत्रे म्हणाले की माझ्या वॉर्डात का नाही, लोक एकमेकांना प्रश्न विचारतात. मॉडेल वॉर्ड झाला आम्हांला दु:ख नाही. शेजारचा कुठलातरी मॉडेलवॉर्ड होत होता. आमच्याकडे त्या भागातील काही लोकांच्या लेखी तक्रारी येतात, आम्ही सुध्दा लोकांचे प्रतिनीधीत्व करतो. आम्ही सुध्दा काम करतो, लोकं सांगतात आम्हांला नको असलेल्या गोष्टी त्याठिकाणी झालेल्या आहेत. पार्कींगला जागा नाही. रस्त्याने जाताना चेहरा, तोंड रस्त्यात दिसावा अशीजर तुम्ही अपेक्षा करत असालतर ग्रामीण भागातल्या खड्डयांच काय. शहरामध्ये एवढी अनियमीतता चालते का. मुला-मुलींचे पासचे पैसे वर्ग करुन तुम्ही ते बसच जंक्शन बांधता. अशाप्रकारे एवढा अत्याचार, एवढा अन्याय तुम्ही करु नका. आयुक्त साहेब तुम्हांला आम्ही कळकळीची विनंती करतो नियमीत असेलतर शंभर टक्के करा. पण उपसूचना देवून चोरीने धुळफेक करुन अशाप्रकारच कुठलही काम ज्याला शासनाची मान्यता नाही. आयुक्त साहेब तुम्हांला मी आल्या आल्या चार महीन्यापुर्वी एक पत्र दिलेल होतं की एमआयडीसीचे अधिकारी आणि आम्ही नगरसेवक जे या गोष्टीशी संबंधीत आहेत त्यांची एक मिटींग घ्या. परंतु आजपर्यंत तुम्ही ती मिटींग घेतलेली नाही. जेंव्हा आम्ही एमआयडीसीच्या ऑफीसमध्ये जातो तेंव्हा ते अधिकारी आम्हांला सांगतात ते बांधकाम पाडा. तिथले क्षीरसागर कार्यकारी अभियंता आहेत ते सुध्दा दहशतीखाली होते शेवटी शेवटीतर ते रिटायर्ड व्हायच्या आदि महीनाभर रजेवरच गेले. मा.महापौर साहेब, हे चुकीच काम आहे अशाप्रकारे अनधिकृत काम कुठेही होऊ नये. शंभर टक्के परवानगी मिळालीतर तुम्ही काम करा परंतु असं काम तुम्ही करु नका मा.महापौर साहेब, मला एका गोष्टीकडे लक्ष वेधायच आहे की आता याठिकाणी कोरम आहे का. कोरम आहे का ते बघावे आणि मगच मिटींग पुढे घ्यावी. याठिकाणी कोरम नाही, कोरम आहे का त्याचा खुलासा होऊ दया.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, सभागृहात कोरम आहे का त्याचा खुलासा करावा

(सभागृहात गोंधळ)

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, सभागृहात कोरम आहे का त्याचा पहीला खुलासा करावा.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, सभागृहात कोरम आहे का त्याचा खुलासा करावा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** बाकीच्यांनी खाली बसाव. खुलासा दयायला लावते.

(सभागृहात गोंधळ)

**मा.शमिम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा. दत्ता साने यांनी जी अभ्यासपुर्वक प्रश्न दिलेले आहेत. संपुर्ण शहराला गेले अनेक वर्षे भेडसावणारे प्रश्न त्यांनी सभागृहामध्ये मांडला आहे. त्यांच्या त्या अभ्यासू वृत्तीला खरोखरच मी दाद देते आणि त्यांच मनापासून मी अभिनंदन करते. मा.महापौर साहेब, खरं म्हणजे त्यांचा प्रश्न विचारण्याचा, प्रशासनाला धारेवर धरण्याचा उद्देश आपण सर्वांनी लक्षात घ्यायला पाहीजे. त्यांनी त्यांची भुमिका स्पष्ट केलेली आहे. ख-या अर्थाने राष्ट्रवादीचे नगरसेवक गोरगरीबांच्या बाजूने त्यांचा प्रपंच वाचविण्याच्या बाजूने अभ्यास करुन बोलतात व आपली बाजू मांडतात हे त्यांनी याठिकाणी दाखवून दिलेले आहे. खरोखरच दत्तादादा तुमच पुन्हा एकदा अभिनंदन. आपल हे पिंपरी चिंचवड शहर हे अभिमान वाटाव असं प्रगतीकडे वाटचाल करीत आहे मा.महापौर साहेब, या शहराची जागतीक पातळीवर चर्चा चालू आहे आणि मा.महापौर तुमचा खुप मोठा त्यात वाटा आहे. अधिका-यांनी त्यामध्ये योगदान दिलं आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, सभागृहात कोरम नाही हे मी सांगीतलेले आहे.

**मा.महापौर-** नगरसचिव यांनी सभागृहात कोरम आहे का ते बघावे.

**(**मा.नगरसचिव यांनी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या प्रकरण २ नियम १ फ चे वाचन केले)

**मा.महापौर-** सभागृहात कोरम नसल्यामुळे याठिकाणी सर्वांचे आभार मानुन आजची सभा दि.२०/१०/२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ६३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.२०/०९/२०१६ व दि.२८/०९/२०१६ (दु.२.०० व २.२५) ची तहकूब सभा )</u>**

<u>दिनांक - २०.१०.२०१६</u> <u>वेळ - दुपारी १.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२८/०९/२०१६ (दु.२.२५) ची (माहे-सप्टेंबर २०१६) तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.१०.२०१६ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१३. मा.बाबर शारदा प्रकाश
१४. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१५. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१६. मा.उल्हास शेट्टी
१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१८. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

१९. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२०. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२१. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२२. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२३. मा.भारती फरांदे

२४. मा.आर.एस.कुमार

२५. मा.जावेद रमजान शेख

२६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२७. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२८. मा.राजू मिसाळ

२९. मा.नंदा विकास ताकवणे

३०. मा.नेटके सुमन राजेंद्र

३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३३. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३४. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३६. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३७. मा.अनंत सुभाष को-हाळे

३८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

३९. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४०. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४१. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४२. मा.शेख अस्लम शौकत

४३. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४५. मा.सुपे आशा रविंद्र

४६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

४७. मा.गोफणे अनुराधा देविदास

४८. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

४९. मा.सावळे सिमा रविंद्र

५०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

५१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

५२. मा.पालांडे सुजाता सुनिल

५३. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

५४. मा.कदम सदगुरु महादेव

५५. मा.गिता सुशील मंचरकर

५६. मा.कैलास महादेव कदम

५७. मा.छाया जगन्नाथ साबळे

५८. मा.टाक अरुण मदन

५९. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

६०. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६१. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

६२. मा.काळे विमल रमेश

६३. मा.विनोद जयवंत नढे

६४. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

६५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६६. मा.ओव्हाळ शेखर अशोक

६७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

६८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

६९. मा.कलाटे स्वाती मयुर

७०. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७१. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

७२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

७३. मा.जवळकर वैशाली राहुल

७४. मा.जगताप राजेंद्र गणपत

७५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

७६. मा.जगताप नवनाथ दत्तु

७७. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

७८. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

७९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८०. मा.शेंडगे आशा सुखदेव

८१. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

८२. मा.संजय केशवराव काटे

८३. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

८४. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

८५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे- अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.पाटील, मा.पठाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.दंडवते, मा.दुरगुडे, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.कांबळे-प्र. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या जनरल बॉडीमध्ये तरी मुर्तीचा आणि गॅसशवदाहीनीचा दोन्ही रिपोर्ट दया. हे रिपोर्ट तुम्ही सादर करायला पाहीजे. मी हा विषय जनरल बॉडीमध्ये मागच्यावेळेस काढला होता त्यावेळेस मला असा शब्द दिला होता पुढच्या जनरल बॉडीला देणार म्हणून. ही सभा पाहीजेतर चार वाजता घ्या पण रिपोर्टतरी आम्हांला दया.

**मा.महापौर -** रिपोर्ट काय आहे तो सगळा खुलासा करावा. रिपोर्ट दयावा.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमच एवढच म्हणण आहे की रिपोर्ट दया. आता जे मेंबर मागतात त्यांना रिपोर्ट दया आता चर्चा करत नाहीत. दोन्ही रिपोर्ट मुर्तीचा आणि शववाहीनीचा दया. पंधरा दिवसात रिपोर्ट देणार म्हणाले. पहील म्हणाले पाच दिवसात देतो नंतर पंधरा दिवसात नंतर पंधरा दिवस. हे काय चालल आहे, का प्रशासन पण त्याच्यामध्ये इन्व्हॉल्व्ह आहे का. आचारसंहिता विकास कामासाठी आहे, रिपोर्ट दया. रिपोर्ट १५ तारखेला देतो म्हणून कमिट त्यांनी केलं. आता २० तारीख आहे तरी रिपोर्ट दयायला पाहीजे. आचारसंहितेचा आणि त्याचा काय संबंध येत नाही.

**मा.सुषमा तनपुरे -** मा.महापौर साहेब, दि.२३/११/२०१६ दुपारी १.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.अजय सायकर -** मा.महापौर साहेब, सुचनेस मी अन मोदन देतो.

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा बुधवार दि.२३/११/२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ६३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.२०/०९/२०१६ व दि.२८/०९/२०१६ (दु.२.०० व २.२५) व दि.२०/१०/२०१६ ची तहकूब सभा )</u>**

<u>दिनांक - २३.११.२०१६</u> <u>वेळ - दुपारी १.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/१०/२०१६ ची (माहे-सप्टेंबर २०१६) तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि. २३.११.२०१६ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
२. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
३. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
४. मा.थोरात वनिता एकनाथ
५. मा.जाधव साधना रामदास
६. मा.जाधव राहुल गुलाब
७. मा.आल्हाट मंदा उत्तम
८. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
९. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१०. मा.पात्रे राम संभाजी
११. मा.बाबर शारदा प्रकाश
१२. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१३. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१४. मा.उल्हास शेट्टी
१५. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१६. मा.पवार संगीता शाम

१७. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

१८. मा.बो-हाडे शुभांगी संजय

१९. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२०. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२१. मा.भारती फरांदे

२२. मा.आर.एस.कुमार

२३. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२४. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२५. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२६. मा.नंदा विकास ताकवणे

२७. मा.नेटके सुमन राजेंद्र

२८. मा.तरस बाळासाहेब जयवंत

२९. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३०. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३१. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३२. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३३. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३४. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३६. मा.अपर्णा निलेश डोके

३७. मा.अनंत सुभाष को-हाळे

३८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

३९. मा.जयश्री वसंत गावडे

४०. मा.पवार मनीषा काळूराम

४१. मा.प्रसाद शेट्टी

४२. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४५. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४६. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४७. मा.वाबळे संजय मल्हारराव

४८. मा.मडिगेरी वर्षा विलास

४९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५०. मा.सुपे आशा रविंद्र

५१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५२. मा.मोहिनीताई विलास लांडे

५३. मा.अजित दामोदर गव्हाणे

५४. मा.गोफणे अनुराधा देविदास

५५. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५६. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५७. मा.लोंढे शुभांगी संतोष

५८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

५९. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६०. मा.सावळे सिमा रविंद्र

६१. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६२. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६३. मा.पालांडे सुजाता सुनिल

६४. मा.बहल योगेश मंगलसेन

६५. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६६. मा.कदम सदगुरु महादेव

६७. मा.गिता सुशील मंचरकर

६८. मा.कैलास महादेव कदम

६९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७०. मा.टाक अरुण मदन

७१. मा.वाघेरे सुनिता राजेश

७२. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७५. मा.काळे विमल रमेश

७६. मा.पाडाळे निता विलास

७७. मा.विनोद जयवंत नढे

७८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८०. मा.विमलताई सुरेश जगताप

८१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८२. मा.बारणे निलेश हिरामण

८३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८४. मा.बारणे माया संतोष

८५. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८६. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८७. मा.कलाटे स्वाती मयुर

८८. मा.चौंधे आरती सुरेश

८९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९०. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९१. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९२. मा.जवळकर वैशाली राहुल

९३. मा.जगताप राजेंद्र गणपत

९४. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९७. मा.जम सोनाली पोपट

९८. मा.प्रशांत शितोळे

९९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१००. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०३. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०५. मा.संजय केशवराव काटे

१०६. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०७. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०८. मा.पाटील सुजित वसंत

१०९. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.तानाजी शिंदे- अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.गावडे-सह आयुक्त, मा.दुधेकर - सह शहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.आष्टीकर -सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कांबळे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.बरशेट्टी, मा.कांबळे-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

(सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर व मा.उपमहापौर सभागृहात उपस्थित नव्हते.)

**मा.मंगलाताई कदम -** मा.आयुक्त साहेब, मा.महापौर व मा.उपमहापौर सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेचे अध्यक्षस्थान मा.रामदास बोकड यांनी स्विकारावे अशी मी सूचना मांडते.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देते.

**(मा.रामदास बोकड यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)**

**मा.पिठासीन प्राधिकारी -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, उत्तर प्रदेश कानपूर येथे इंदूर पाटणा एक्सप्रेसला झालेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेले नागरीक, नोटाबंदीमुळे बँकेच्या रांगेत देशभरात एकुण मृत्यूमुखी पडलेले सत्तर नागरीक, पद्मविभूषण एम.बालमुरलीकृष्ण - प्रख्यात गायक, सुधाबाई वसंत सातुर्डेकर -ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांच्या मातोश्री, धम्मराज बाळु गायसमुद्रे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.पौर्णिमा सोनवणे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह या सभेमध्ये आपल्या शहरातील ज्या काही सन्मा. व्यक्ती दिवंगत होतात त्यांना आपण श्रध्दांजली वाहतो

परंतु गेल्या काही दिवसात बहिणाबाई चौधरी उदयानामध्ये काही सापांचा मृत्यू आपल्या निष्काळजीपणामुळे झालेला आहे. तेही प्राणीमीत्र आहेत त्यांना सुध्दा याठिकाणी श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी मी विनंती करते.

**मा.शारदा बाबर -** मा.महापौर साहेब, अनुमोदन देते.

**मा.पिठासीन प्राधिकारी** - मृत व्यक्तींना श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, सभा सोमवार दि. २८/११/२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.पौर्णिमा सोनवणे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.पिठासीन प्राधिकारी -** सर्वांच्या संमतीप्रमाणे सोमवार दिनांक २८/११/२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

--------

(बोकड रामदास गेणभाऊ)
**पिठासीन प्राधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ६३**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/०९/२०१६ व दि.२८/०९/२०१६ (दु.२.०० व २.२५), दि.२०/१०/२०१६ व दि.२३/११/२०१६ ची तहकूब सभा )**

दिनांक - २८.११.२०१६ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२३/११/२०१६ ची (माहे-सप्टेंबर २०१६) तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि. २८.११.२०१६ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.जाधव साधना रामदास
९. मा.जाधव राहुल गुलाब
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१३. मा.पात्रे राम संभाजी
१४. मा.बाबर शारदा प्रकाश

१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१७. मा.उल्हास शेट्टी

१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१९. मा.पवार संगीता शाम

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.नंदा विकास ताकवणे

३१. मा.नेटके सुमन राजेंद्र

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३८. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४०. मा.अपर्णा निलेश डोके

४१. मा.अनंत सुभाष को-हाळे

४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४३. मा.जयश्री वसंत गावडे

४४. मा.पवार मनीषा काळूराम

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.मडिगेरी वर्षा विलास

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सुपे आशा रविंद्र

५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५६. मा.मोहिनीताई विलास लांडे

५७. मा.अजित दामोदर गव्हाणे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६०. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६१. मा.लोंढे शुभांगी संतोष

६२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६३. मा.सावळे सिमा रविंद्र

६४. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६६. मा.पालांडे सुजाता सुनिल

६७. मा.बहल योगेश मंगलसेन

६८. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६९. मा.कदम सदगुरु महादेव

७०. मा.गिता सुशील मंचरकर

७१. मा.कैलास महादेव कदम

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.टाक अरुण मदन

७४. मा.वाघेरे सुनिता राजेश

७५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७८. मा.काळे विमल रमेश

७९. मा.विनोद जयवंत नढे

८०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८३. मा.बारणे निलेश हिरामण

८४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८५. मा.बारणे माया संतोष

८६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८८. मा.कलाटे स्वाती मयुर

८९. मा.चौंधे आरती सुरेश

९०. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९१. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९३. मा.जवळकर वैशाली राहुल

९४. मा.जगताप राजेंद्र गणपत

९५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९७. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९८. मा.प्रशांत शितोळे

९९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१००. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०३. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०४. मा.संजय केशवराव काटे

१०५. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०६. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०७. मा.पाटील सुजित वसंत

१०८. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.गावडे-सह आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.दुधेकर, मा.पठाण- सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे मा.आष्टीकर, मा.इंदलकर -सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कांबळे-प्र. शिक्षण अधिकारी (माध्यमिक), मा.तांबे, मा.कुलकर्णी, मा.कांबळे -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.प्रसाद शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- २

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/२२/२०१६ दि.२३/०५/२०१६

२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१६३८४ दि७/६/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.८८२ दि. २०/६/२०१६

४) मा.महापालिका ठ.क्र.८९२ दि. २०/८/२०१६

राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेअंतर्गत महाराष्ट्र शासनाचे उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०८/०६/२०१२ चे पत्रान्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण

अंमलबजावणी सुरु करणेत आलेली आहे. त्यावेळी मा.शहर फेरीवाला समितीची बैठक दि. ०५/०४/२०१३ नुसार फेरीवाल्यांची नोंदणी फी, विक्रेता फी, नुतनीकरण फी, देखभाल फी आणि दंड ठरविणेत आले आहे. नोंदणी फीचे दर र.रु. १०००/- प्रमाणे ठरविणेत आले होते यास मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३३८२ दि. २१/०५/२०१३ व मा.महापालिका सभा ठराव क्रं.२९८ दि. २७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आली आहे. व आदेश क्रं. भूजि/१/कावि/३५७/२०१३ दि.१३/०९/२०१३ अन्वये आदेश निर्गत केलेले आहेत. प्रस्तुत आदेशान्वये ठरविणेत आलेले दर जादा असल्याने सदर दर कमी करणेबाबत फेरीवाला संघटना वारंवार मागणी करीत आहेत. तसेच दि. ३०/०१/२०१६ च्या शहर फेरीवाला समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुणे मनपाकडील नोंदणी फी र.रु.२००/- प्रमाणे शहरातील फेरीवाल्यांची बायोमेट्रीक नोंदणी करणेकामी नोंदणी फी र.रु.२००/- व ओळखपत्र फी र.रु.२००/- करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, याची माहिती दयावी.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेअंतर्गत विषयपत्र मा.महासभेपुढे सादर करण्यात आलेलं आहे. सदरच्या विषयपत्रानुसार राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरामध्ये फेरीवाल्यांचे जे सर्वेक्षण करण्यात आलेलं आहे त्यांच्यासाठी नोंदणी फी एक हजार ठरविण्यात आलेली हाती ती नोंदणी फी पुणे महानगरपालिकेच्या धरतीवर तसेच राष्ट्रीय फेरीवाला समितीची बैठक ३० जानेवारी २०१६ मध्ये झाली त्यात झालेल्या निर्णयाप्रमाणे पुणे मनपाकडील नोंदणी फी प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे फेरीवाला धोरण नोंदणी फी एक हजार ऐवजी दोनशे रुपये करण्यात यावी. पुणे महानगरपालिकेच्या धरतीवर आणि राष्ट्रीय फेरीवाला धोरणाअंतर्गत संघटनेनी मागणी केल्यानुसार शहर फेरीवाला समितीच्या सभेमध्ये एक हजार ऐवजी नोंदणी फी दोनशे करण्याबाबतचा निर्णय ३० जानेवारी २०१६ च्या सभेमध्ये झालेला आहे त्याप्रमाणे एक हजार नोंदणी फी ऐवजी ती दोनशे रु. करावी असे विषयपत्र समितीपुढे सादर करण्यात आलेले आहे.

**मा.शमिम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच राष्ट्रीय फेरीवाला धोरणाअंतर्गत आपण हा विषय आणलेला आहे. ब-याचशा दिवसापासून हा विषय चालू आहे. खरे म्हणजे २०१२ ला राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची आपण अंमलबजावणी सुरु केली. २०१२ ला फेरीवाला संघटनेनी सर्व्हे केलेला आहे. आपल्या आरोग्य विभागाने ते फॉर्म भरुन घेतलेले आहे. २०१२ आता २०१६ आहे आणि २०१७ मध्ये याची अंमलबजावणी होणार आहे. ५ वर्षानंतर आपण अंमलबजावणी करतो तोपर्यंत अनेक फेरीवाले आपल्याकडे तयार झालेले

आहेत. ज्यांना अगदीच आवश्यकता, गरजू आहेत आशेच शहरातील लोक फेरीवाल्यांचा व्यावसाय करतात आणि त्यांच्याकडून आपण दरवर्षी फि घेणार आहोत का दरमहा घेणार आहोत हे येथे काहीच लिहीलेले नाही. नोंदणी फि दोनशे रु. आणि ओळखपत्र फि दोनशे आपण एका वेळी ती घेणार आहेत हे तुमच्या डॉकेटवरुन दिसतं. खरं म्हणजे ते नुतनीकरण करण्यासाठी सुध्दा दरवर्षी त्याच नुतनीकरण व्हावे आणि प्रत्येक वर्षी दोनशे रुपये प्रमाणे नुतनीकरण फि ठेवावी. आता आपल्याकडे उत्पन्नाचे साधनही कमी आहे. त्यामुळे आपल्याला एक उत्पन्नाच साधन होईल. पुन्हा एकदा सर्वेसाठी ज्यांना कोणाला फेरीवाला म्हणून ज्यांना व्यावसाय करायचा आहे त्यांच्यासाठी सुध्दा डिसेंबर एण्ड पर्यंत हे धोरण खुले ठेवावे. काही अर्ज आलेले आहेत, परंतु मुदत काहीच नव्हती. तरी खास अशी काहीतरी मुदत ठेवून त्या मुदतीपर्यंतच अर्ज घेतलेले आहेत. ज्यांचे अर्ज शिल्लक आहेत ते अर्ज शहरातल्या फेरीवाल्यांचे अर्ज पुन्हा एकदा घेण्याचे आदेश दयावेत. ज्यांना आवश्यक आहे अशा फेरीवाल्यांना आपण नोंदणी फि व ओळखपत्र फि घेवून त्यांनाही आपण परवानगी दयावी त्यांनाही ओळखपत्र दयावे अशी विनंती करते. मा.महापौर साहेब, फेरीवाला धोरणाच सगळ ती संघटनाच पाहते का महापालिका पाहते कोणाचे कंट्रोल त्यावर आहे. कोणी देत असेलतर महिनाभरात घ्या. त्याच्यावर कंट्रोल कोणाचे आहे. संपुर्ण तुम्ही संघटनेवर सोपवले का, मग आपण काय करता, त्याला काही मुदत होती का, का अर्ज घ्यायचे थांबविले आहे. संघटनाच सर्व काही आहे का. महापालिकेकडे काही अधिकारी आहेत का नाहीत. आपण मुदत काय ठेवली होती. बाकीच्या फेरीवाल्यांचे अर्ज का घेतलेले नाहीत, का थांबविलेले आहे. तुम्ही सगळे काम लोकांना सांगता आपले प्रशासन काय करते. मा.महापौर साहेब, काही लोकांनी अर्ज दयायला गेलेतर घेतले नाहीत. कोणाच्या इशा-यावर हे चाललेले आहे, कोण करतय हे काम. संघटना महत्वाची का, तुम्ही. आमच्यापुढे विषय का आणला. संघटनेला सांगावे, तुम्ही ठरवावे. मा.महापौर साहेब मी तुम्हांला विनंती करते त्यांचा घेण्याचा तुम्ही आदेश दया नाहीतर आम्हांला उपसूचना दयायला सांगा, दोन्हीतून एक. जोपर्यंत हा निर्णय होत नाही तोपर्यंत मी बसणार नाही. एवढ सहज आणि सोप नाही, मा.महापौर, खुप बेकारी आहे, तरुण बेकार आहेत. कॉन्ट्रॅक्ट शिवाय दुसरा पर्याय नाही. त्यांनी जर नोंदणी केली असती, याच्या आदि मनमानीच झालेली आहे. काही आता जर नवीन उदयोगानी नोंदणी केलीतर त्यांना नवीन उत्पन्नाच साधन मिळेल. मी विनंती करते एक महीनाभराच्या मुदतीत दयावे त्यांचे मुदतीमध्ये प्रशासनाने फॉर्म घ्यावेत

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते नविन फेरीवाल्यांचे अर्ज घ्यावेत त्यांच्याकडून नोंदणी फी व ओळखपत्र फी घेवून नव्याने अर्ज स्विकारावेत व त्यांनाही फेरीवाला धोरणानुसार योग्य ती परवानगी दयावी. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता त्वरीत अर्ज स्विकृती करावी व परवाना देणेसे मान्यता देणेत यावी.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. फेरीवाला धोरण फार वर्षे झाले आपल्या विषयपत्रिकेवर विषय आहे तो विषय ऑलरेडी अगोदर झाला पाहीजे होता. काही तक्रारी होत्या त्यासंदर्भात आता पठाणताईने सांगीतले काही संघटना त्यांच्या पध्दतीने यादी देतात. ते त्यांच काम करतात परंतु महापालिकेमध्ये आपली जी जबाबदारी आहे ती काही संघटनेतर्फे त्या लोकांचे देखील फॉर्म भरुन घेणे आपल काम आहे. वास्तविक पाहता हे फेरीवाले आपला उदरनिर्वाह करण्यासाठी लोकांच्या दारोदार फिरुन भाजीपाला विकत असतात त्यांना वास्तविक पाहता या गोष्टी ऑलरेडी अगोदरच दिल्या पाहीजे होत्या. आज उशिरा का होईना आपण देतो त्याबद्दल मी प्रथमत: आपल्या सगळयांचे याठिकाणी धन्यवाद मानतो. लवकरात लवकर हे फेरीवाल्यांचे धोरण अंमलात आणावे आणि जे काही लोक राहीलेले असतील त्यांची सुध्दा नोंदणी करुन घ्यावी. ब-याचशा लोकांनी बंद सुध्दा केलेले असतील जे गाळलेले असतील त्यांना गाळून टाका आणि नवीन लोक जे असतील त्यांचे फॉर्म जमा करुन घ्या. सरसकट सर्व फेरीवाल्यांचे धोरणात २०० रु. लावलेले आहे ते अतीशय कौतूकास्पद आहे त्यामुळे मी आपल्या सगळयांच अभिनंदन करतो व हा विषय लवकरात लवकर मंजूर करावा अशी मी विनंती करतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय मंजूर करताना मला सांगायचे आहे की फक्त आपण फेरीवाल्यासंदर्भात बोलतो. काही काही ठिकाणी फुटपाथवर असलेले जे फिक्स बिझनेस करतात त्यांच्यासंदर्भात चर्चा करायची आहे की त्यांच्याकडून आपण कुठल्याच प्रकारचा मोबदला घेत नाहीत. ते खर लीगल करायच का नाही करायच मग कशाला चौकाचौकातून आपण फुटपाथवर एवढा खर्च करतो त्याठिकाणी फुटपाथवर लोकांना, ज्येष्ठ नागरीकांना चालण्यासाठी आपण फुटपाथ करतो. परंतु त्याठिकाणी सगळेजण फ्रुट स्टॉल, भाजीस्टॉल घेवून ते बसलेले असतात त्यामुळे गैरसोय मोठयाप्रमाणात होती की चौकामध्ये ॲक्सीडेंट होतात. त्यासंदर्भात प्रशासनाचे काही धोरण आहे का. महापालिकेनी फक्त फेरीवालेसंदर्भातच याठिकाणी विषय आणलेला आहे, तरी त्यासंदर्भात प्रशासनाच काय धोरण आहे. फुटपाथ कशासाठी केला ते क्लेअर करा. मेन मेन चौकामध्ये ज्याठिकाणी ॲक्सिडेंट झोन आहे त्याठिकाणी कोणी विचार करत नाही. टिळक चौकामध्ये कोणी गेले असेलतर त्या परिसरात काय होते हे बघावे. टुव्हीलर, फोर व्हीलर पार्कींगच्या शेजारी मोठमोठया मॉलमध्ये सर्व फुटपाथवर टोटली दोन्ही साईडला हातगाडया टाकून व्यावसाय करतात. मग आपण त्यांना सोडायच आणि हे गोरगरीब, खरंच कष्टकरी आहेत जे घरोघरी फिरुन भाजीपाला, फ्रूटस विकतात त्यांना आपण चार्जेस करायचे आणि यांना मोफत बसायला दयायचे यासंदर्भात महापालिकेचे धोरण काय हा खुलासा करावा.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. फेरीवाला धोरण जे आहे आज खरोखरीच अशी परिस्थिती आहे की पुणे महापालिकेनी केले म्हणून असे नाही

परंतु फेरीवाल्यांचे हातावरचे पोट असते त्यादृष्टिने त्यांच्या फि कमी करतो फि कमी करत असताना, धोरण करत असताना अधिका-यांनी ही दक्षता घेतली पाहीजे की हे धोरण करत असताना अगदी म्हणजे उदा. फेरीवावाल्यात चणे-फुटाणेवाले सुध्दा असतात. त्यांच्या फुटाण्याच्या पुडया लोक खाऊन जागोजागी टाकतात त्याचा जो परिणाम होतो किंवा शहाळेवाला, नारळवाला आहे, केळीवाले असतात, केळीच्या साली टाकल्यानंतर कितीतरी लोक पाय घसरुन पडतात. प्रत्येक हातगाडीवाल्यांना डस्टबीन ठेवण भाग केलं पाहीजे. त्यांना सांगीतले पाहीजे एका ठिकाणी थांबायच नाही, फेरीवाला म्हणजे तो फिरला पाहीजे परंतु तसं होत नाही तो सुध्दा माणुस आहे शेवटी तो प्रत्येक चौकाचौकात अर्धा अर्धा तास, एक एक तास उभाच राहतो. तो उभा राहील्यानंतर त्यांनी विकलेल शाहळं त्याचा जो कचरा पडतो त्यासाठी प्रत्येक ठिकाणी त्यांनी डस्टबीन ठेवल पाहीजे आणि त्यांनी सांगीतल पाहीजे की हा कचरा डस्टबीन मध्ये टाकला पाहीजे. चहाची गाडी लागते प्लॅस्टीकचे ग्लास रस्त्यावर टाकलेले असतात. आरोग्य विभागाची आजची पेपरची बातमी बघीतली असेलतर वाईट आहे शहरामध्ये. आज काय परिस्थिती आहे, सगळीकडे कचरा दिसतो. रस्त्यावर, फुटपाथवर भाजीपालावाले लावतात, कणसाचा कचरा सुध्दा जागेवरच टाकतात. भाजीवाला रस्त्यावरच कचरा टाकतो, फ्रुटवाला सुध्दा फ्रुटचे बॉक्स जागेवरच टाकतो. कोणतीही गोष्ट कोणीच करायला तयार नाही. सगळे आरोग्याच डिस्टर्ब झालेले आहे. धोरण करायलाच पाहीजे. जसं आताच उल्हास शेट्टी यांनी सांगीतल की तुम्ही फेरीवाल्यांचे करणार तस तुम्ही टपरीधारकांचे धोरण सुध्दा केले पाहीजे. त्यांना भाडे किती आकारणार. वार्षीक भाडे किती असणार आहे. हे या धोरणा मध्ये आले पाहीजे, त्यांचे बायोमेट्रीक करणार म्हणजे काय करणार. त्यांना तुम्ही परवाना देणार आहात परवाना देताना त्यांना ते भाडे मान्य आहे का. सभागृहामध्ये भाडे मान्य आहे का हे सुध्दा त्याच्यात उल्लेख आले पाहीजे. याचा कुठल्याही परिस्थितीमध्ये उल्लेख नाही. टपरीवाल्यांना सुध्दा यात घ्यावे त्यांचे सुध्दा भाडयांचे दर ठरविले पाहीजे आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनी जरी घेतल नाहीतरी ज्या माणसाच्या दारामध्ये टपरी आहे तो माणूस भाडं घेतोच. ते काही थोड घेत नाहीत, पाच हजार, सात हजार जसा येईल त्याप्रमाणे भाड घेतात. मग शेवटी तो महापालिकेचा कर भरतोच. प्रत्येक उदयानाच्या बाहेर सगळे ठेले लागतात. भक्ति-शक्ती चौक बघीतलातर इतका सुंदर डेव्हलप केलेला आहे पण परिस्थिती काय आहे. परिस्थिती इतकी वाईट आहे की तुम्ही संध्याकाळी बघा. सगळे गेल्यानंतर कोणी सुध्दा कचरा उचलत नाहीत. आईस्क्रिम खाल्लेल्या काडया सुध्दा तिथंच टाकलेल्या असतात. सगळया प्रकारचा कचरा त्याठिकाणीच असतो. आपले लोक काय करतात, आपण स्कॉड नेमला त्याच काय झालं. मा.आयुक्त साहेब, या गोष्टीवर खुप लक्ष दिले पाहीजे. शहर चांगल्या पध्दतीने डेव्हलपमेंट करतो परंतु आरोग्याच्या दृष्टिकोनातून त्याचा विचार झाला पाहीजे. आरोग्याचा ज्यांच्याकडे चार्ज दिलेला आहे त्यांच्याशी बोलले, तुम्ही तातडीची मिटींग लावावी. लोक

तुम्हांला सारथीवर फोन करतात तुम्हांला मॅसेज देतात. मग तुम्ही मिटींगा का घेत नाहीत. काम वाटून केली पाहीजेत. बीव्हिजीवाल्यांचा संप आता मिटला म्हणून फोन आला तो का झाला हे पण बघीतले पाहीजे. या परिस्थितीमध्ये साथीचे आजार, थंडी जास्त दिवसेंदिवस पडते. कचरा वाढत चाललेला आहे. पाच-पाच, सहा-सहा दिवस ट्रक बंद पडलेतर सगळा आख्ख्या सोसायटीचा कचरा रस्त्यावर येणार. मग आरोग्य विभाग डबघाईला आला का. हॉस्पिटल डबघाईला येणार. याचा विचार कोण करणार. आजार वाढले, मच्छर वाढली सगळी रोगराई वाढली. उदयानामध्ये उंदराचे प्रमाण जास्त झालेले आहे. त्याठिकाणी का उंदर होतात त्याचे कारण शोधलीत का आपण. कितीवेळा तेथील नगरसेवकांनी, समाजसेवकांनी तक्रार केल्यानंतर सुध्दा त्या उपाययोजना होत नाहीत. लॉनवर पाणी मारल्यानंतर उंदीर त्यावरुन फिरतात त्यावरुन जी लोक सकाळी वॉकींग करतात तर बघा कोणता आजार होतो आणि त्यातून माणूस चार दिवसात जातो की नाही. मग या सगळया गोष्टीकडे आपण लक्ष दिले पाहीजे. यातून आरोग्याचा प्रश्न उद्भवणार आहे. उदयानाबाहेर फुटाणे, अमुक तमूक सर्व विक्रेते बसणार आहेत, भेळीच्या गाडया आहेत. हे फेरीवाला धोरण ज्यावेळेला स्विकारणार आहात त्यावेळेला टपरीवाल्यांचे धोरण सुध्दा स्विकारले गेले पाहीजे. वॉर्डवाईज लोकांसाठी फुटपाथ आहेत आणि फुटपाथच्या एका कडेला म्हणजे जेथे फुटपाथ संपतो त्याठिकाणी ऐरीयावाईज दोन दोन टप-या ठेवायला परवानगी दया. प्रत्येक ठिकाणी रस्ता संपल्यानंतर दोन टप-या ठेवायला परवानगी दयावी. ठिकठिकाणी टप-या जर ठेवल्यातर आख्ख शहर बकाल होते. फुटपाथ वरुन लोकांना चालता येत नाही. सकाळी दोन तास दुधाचा बिझनेस आहे, दुधाचा बिझनेस झाल्यानंतर संध्याकाळी, दिवसभर काय आहे हे आपण त्या टपरीमध्ये बघतो का. पान टप-यावर काय चाललं आहे ते कोणी गणती केली का. शहरामध्ये पान टप-यावर काय काय विकल जातं. प्लॅस्टीक बंदी झाली त्याच काय झालं, काही नाही झालं, कामकाज ठप्प आहे. कोणीही काम करायला तयार नाही. प्लॅस्टीकमध्ये गुंडाळून जागोजागी पडलेला कचरा आहे याला जबाबदार कोण आहे. आम्ही प्लॅस्टीक बंदीचा ठराव केला. दुकानदारावर रेड कोणी टाकली पाहीजे. जिथून प्लॅस्टिक पिशव्या बाहेर येतात तिथंच बंदी केली पाहीजे. आम्ही प्रत्येक ठिकाणी जायचे. माझ्या वॉर्डात बर्डव्हॅली आहे त्याठिकाणी लोक पाण्याची बाटली घेतात, बोटींगमधुन जातात आणि ती पाण्याची बाटली तेथेच टाकलेली असते. शेवटी आम्हांला ते ठेकेदाराला सांगाव लागतं मग ते प्लॅस्टीकच्या बाटल्या बाहेर काढतात म्हणजे नगरसेवकांनी, सामाजीक कार्यकर्त्यांनी हीच कामं करायची का. प्रशासनाची जबाबदारी आहे का नाही. ज्यांनी त्यांनी ज्याचे त्याचे विभाग जर व्यवस्थीत सांभाळलेतर काय अडचण येणार आहे. याच्यावर निर्णय झाला पाहीजे. फेरीवाला धोरण मंजूर करताना याच्यामध्ये उपसूचना घ्यावी. टपरीधारकांचे सुध्दा बायोमेट्रीक झाले पाहीजे. रस्त्यांच्या टोकाटोकाला दोन-दोन टप-या दिल्या पाहीजेत. एका ठिकाणी किंवा प्रत्येक कॉर्नर कॉर्नला टपरी नाही. लोकांना फुटपाथ हे

चालण्यासाठी आहेत. त्यादृष्टिकोनातून फुटपाथ रिकामे राहिले पाहीजेत. ज्या पध्दतीच ज्याच लायसेन्स दिल त्याच पध्दतीने टपरीधारकांनी ज्याच त्याच काम केले पाहीजे. भाजीगाडया किती दयायच्या हे तुम्ही ठरवावे. तुम्ही एका ठिकाणी एक लाख भाजीमंडई दिलीतर तुमच्या भाजीमंडईमध्ये कोण जाते. हे धोरण करत असताना या सगळया गोष्टीचा विचार केला गेला पाहीजे. याच्यामध्ये त्यांचे भाडे ठरविले पाहीजे, त्यांचे भाडे ठरविले का याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- आज शहरात लोकसंखेचे प्रमाण वाढले आहे. तसे टप-यांचे व हातगाड्यांचे खूप मोठे प्रमाण वाढले आहे. ते दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. गाड्यांच्या धुरामुळे, पेट्रोलमुळे प्रदूषण होते, तसेच या गाड्यांमुळे देखील प्रदूषण होते आहे. फेरीवाल्यांची बायोमेट्रीक नोंदणी करुन घेतली आहे. जिथे उद्यान असेल, हॉस्पिटल्स असतील त्याठिकाणी कशा प्रकारच्या टप-या दिल्या गेल्या पाहिजेत याचा वॉर्ड वाईज सर्व्हे करावा. साधारणपणे प्रत्येक वॉर्डमध्ये ५ टप-यांचे आणि प्रत्येक प्रभागात पाच गुणिले चार याप्रमाणे २० टप-या असे नियोजन करावे. ज्यांना गरज आहे त्यांना लायसन देण्यात यावे, त्यांच्याकडून भाडे आकारावे. तो फेरीवाला ज्याठिकाणी उभा राहणार आहे, त्याच्या आजूबाजूच्या सोसायट्यांची एनओसी असली पाहिजे. त्याचे शहरातील वास्तव्य २० वर्षापासून आहे याचा पुरावा असावा, हातगाडीवाल्यांचे बाबतीत सुद्धा या अटी लागू करणेत याव्यात. ज्याला खरच गरज आहे व स्वत: दररोज काम करतात असे साधारणपणे ५००० फिरते लायसन विभागवार द्यावेत व मनपाच्या भाजी मंडईच्या आजूबाजूला, गर्दीच्या ठिकाणी लायसन्स देवू नयेत यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.प्रसाद शेट्टी-** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह सन्मा.सदस्यांनी दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याबद्दल सांगतो की आपण फेरीवाला धोरणाअंतर्गत ज्या फेरीवाल्यांचे आपल्याकड सर्वेक्षण झालेले आहे, ज्यांच बायोमेट्रीक झालेले आहे आणि ज्यांना आपण सध्या प्रमाणपत्र देणार आहोत, ओळखपत्रे देणार आहोत त्यांच्याकडून आपण पाच प्रकारची फि वसुल करत आहोत. त्यांच्याकडून आपण नोंदणी फि घेणार आहोत, विक्रेता फि आपण त्यांच्याकडून घेणार आहोत, विक्रेता प्रमाणपत्राची नुतणीकरणाची फि आपण त्यांच्याकडून घेत आहोत, देखभाल चार्जेस आहेत आणि दंड आकारणी सुध्दा फि च्या माध्यमातून करणार आहोत. अशा पाच प्रकारची वसुली आपण फेरीवाला धोरणाअंतर्गत करणार आहोत. आपण यामध्ये नोंदणी फि एक हजार रुपये ठरविलेली आहे जी की आज आपण दोनशे रुपयाची मान्यता दिलेली आहे. पाच वर्षासाठी स्थिर विक्रेत्यासाठी वीस हजार रुपये विक्रेता फि आहे. फिरते विक्रेत्यासाठी दहा हजार रुपये आहे आणि आठवडा बाजारासाठी पाच

हजार फि पाच वर्षासाठी आहे. प्रमाणपत्राचे नुतणीकरणासाठी आपण ठरविलेले आहे. नोंदणी फि एक वर्षासाठी आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आठवडी बाजारात बसलेले लोक डेली बसणार, फेरीवालाचे चेंज होणार, पाच वर्षासाठी कसे काय लावतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाच वर्षाची फि करु नका एक वर्षाची करावी. महिन्याला ५०० करावे आणि वार्षीक प्रमाणे ठरवावे.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा दर आपण सप्टेंबर २०१३ मध्ये ठरवलेला आहे. आज विषय फक्त नोंदणी फि एक हजार वरुन दोनशे करण्याचा विषय आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आठवडे बाजारामध्ये पाच वर्षासाठी लावतात ते महिन्याला लावून टाकावे.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २०१३ ला दर ठरलेले आहेत.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आठवडे बाजारात पाच वर्षासाठी जे बसणार त्यांना फिक्स करणार का, त्याठिकाणी वेगवेगळे लोक येणार आहेत. महीन्याची फि घ्यावी.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर हा विषय आल्यानंतर माझे या विषयाबद्दल प्रचंड अज्ञान आहे. मी विनंती करतो की फेरीवाले आणि बैठे विक्रेते, स्थिर विक्रेता, फिरती विक्रेता, आठवडे बाजार यांची नोंदणी असेलतर त्यांच्याशी संबंधीत असेल. शेवटी असं आहे की बेरोजगारी आहे. भावना आणि मुळ कायदा, फेरीवाले असतील किंबहूना बैठे असतील त्यातून येणारा अडथळा हे एकमेकात पुरक अशा गोष्टी आहेत. याच्या किती नोंदणी आहेत आपल्याकड आणि त्या नोंदणीप्रमाणे तेवढेच लोक असतात का याची शहनिशा केली का.

**मा.दंडवते (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्याकडे राष्ट्रीय फेरीवाला धोरणअंतर्गत सर्वेक्षणामध्ये ८८९० फेरीवाल्यांच्या संख्येची नोंद झालेली आहे. पात्र फेरीवाल्यांपैकी बायोमेट्रीक सर्वेक्षण झालेले ५९०३ आहेत त्यापैकी या फेरीवाल्यांसाठी आपण २४६ ठिकाणी हॉकर्स झोन निश्चित केलेले आहेत. सर्वेक्षणाअंती आपल्याकडे ५९०३ असे पात्र फेरीवाल्यांची नोंद झालेली आहे.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्ही कोणत्याही शहरातील रोडने गेलाततर एक हजार तरी फेरीवाले भेटतील आणि हे काही तुम्ही आहात

म्हणून नाहीतर ते जागा बदलत असतात आम्ही दंडवते बरोबर बोलत नाहीत आम्ही अधिकाऱ्यांबरोबर बोलत आहोत. मुळात एकदा तुम्ही या संदर्भात गांभीर्याने लक्ष दयावे. कोणत्याही विक्रेत्यांना, कोणत्याही स्थिर विक्रेत्यांना, कोणत्याही आठवडे बाजाराला आमचा विरोध नाही. मुद्दा असा आहे की या शहराचे विद्रूपीकरणतर होत नाहीनां किंबहुना आता उल्हास शेट्टी यांनी म्हणल्याप्रमाणे फुटपाथ सुध्दा व्यापलेले आहेत. एका गल्लीमध्ये गेलोतर तुम्हांला सापडतील ही नोंद कोण करतं. आपल्याकडे कसं आहे, एखादया आण्णामध्ये विषबाधा झाली की मग तिथे इन्सपेक्टर गेला होता की नाही आणि मग त्याच्यावर आम्ही जनरल बॉडीमध्ये बोलणार आणि मग तो सस्पेन्ड होणार. त्याच्या अगोदर त्याच धोरण काही निश्चित नाही का. लोकसंख्या वाढलेली आहे. तुम्ही आज २०१३ च सांगताय आज २०१६ आहे दहा वर्षानंतर या शहराची लोकसंख्या किती होती. बीआरटी रोड झालेले आहेत, मोठे रोड आपण ताब्यात घेतलेले आहेत. आज विस्तार वाढलेला आहे, लोकसंख्या वाढलेली आहे. याच संगळ जर नियोजन तुम्ही केलतर त्यासंदर्भात त्या माध्यमातून आपल्याकडे जी यंत्रणा पाहीजे ती यंत्रणाच तुमच्याकडे कार्यान्वित नाही. या सगळया गोष्टीला तुम्ही एकटे जबाबदार नाहीत. आमचे सुध्दा समर्थक त्याठिकाणी भाजीविक्रेते करत असतात. जगताप डेअरी ते डांगे चौक पाहीलतर संध्याकाळी तुम्हांला पाच हजार भाजीविक्रेते भेटतील. हा प्रश्न गांभीर्याने घ्यावा. मा.महापौर साहेब, विषय आल्यानंतरच या विषयाला वाचा फुटते. शहराच्या काही ठिकाणी चालता येत नाही अशी अवस्था आहे. कागदी घोडे नाचऊन उपयोग नाही वास्तव्य काय आहे. जमीनीवर जाऊन काही यंत्रणा निर्माण करावी, कॉन्ट्रॅक्ट दयावे. कारण दहा वर्षापुर्वी आरोग्य खात्यामध्ये लोकांची कमी होते. आता विस्तारपुर्वक जर बघायच म्हणलतर आपल्याकडे एवढी यंत्रणा नाही. ही यंत्रणा नाहीतर मग खासगी यंत्रणा लावावी. जर आपल्याला उत्पन्नाच्या माध्यमातून उत्पन्नाचा स्त्रोत जरी आपण बाजूला ठेवलातरी या शहराचे विद्रूपीकरण होत नाहीना याच देखील नियोजन करणे गरजेच आहेनां. रस्त्याचे रुंदीकरण झालय कोणासाठी, संघटनेला आमचा अजीबात विरोध नाही. परंतु जे आहे त्याचे नियोजनबध्द असावे, त्याचे रेकॉर्ड असावे. कोणकोणते औषध मारतात त्यातून विषबाधा कोणाला झालीतर तुम्हीच अडचणीत येणार आहेत. वास्तव्य स्वरुपात आपण चर्चा करत नाहीत. हा विषय वेगळा असला तरी त्याचे विद्रूपीकरण होऊ नये, कोणावरही अन्याय करण्याची भूमिका नाही, परंतु कोणतीही हानी होण्याच्या अगोदर याची काळजी घ्यावी अशी मी विनंती करतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दंडवते साहेब आताच आलेले आहेत. स्थीर संदर्भात बोलत होते. कमीत कमी चौक यातून वगळले पाहीजे. आपल्याला उत्पन्न मिळतं, दोन पैसे यातून येतात, परिस्थिती वाईट आहे या सगळया गोष्टी मान्य आहेत पण कमीत कमी आपण ज्या दृष्टिकोनातून शहराकडे स्वच्छ शहर म्हणून बघतो यातून चौक तरी वगळले पाहीजेत. मेन मेन चौकामध्ये या गोष्टी होतात. आपण शहर सुंदर

करायचे म्हणतो पण चौकामध्ये गेले की अस वाटत की कुठं आपण मागे पडू. आज लेडीज लोकांना चालताना अडचण होते. काही काही ठिकाणी असं आहे की चौकात व्यावसाय करणारे लोक पाणी वगैरे ते रस्त्यातच टाकतात. जाताना ज्येष्ठ नागरीक वगैरे पडण्याची भिती असते. प्राधिकरणात चार ते पाच हजार फेरीवाले मिळतील, बाकी शहरात शोधायचीच गरज नाही. तुम्ही पाच वर्षाच धोरण करता याला काय अर्थ आहे. सिजनेबल पण सगळे असतात. काही रसवंतीगृहवाले असतात, काही काही लोक संध्याकाळचच बसतात. हे लोक तुमच्याकडे रजिस्ट्रेशन करायला येणार नाहीत. आपण कडक धोरणाची अंमलबजावणी केलीतर त्यांच्यावर परिणाम होईल नाहीतर मुंबई सारखी परिस्थिती होईल. शहरामध्ये करोडो रुपयाच दुकान आणि त्याच्यासमोर चप्पलाच दुकान अशी सगळी दुकान असतात मग याला जबाबदार कोण राहणार. आम्ही प्रभाग कमिटीमध्ये या विषयावर बोलत असतो. कोणाच्या कोणाच्या अशिर्वादाने या गोष्टी चालत असतात. आता निवडणूक आली कार्यकर्ते नाराज होतील यापेक्षा शहराचा कुठतरी विचार केलातर यावर बोलता येईल. आज तुम्ही बघा, चिंचवड चौक बघा, भेळ चौक बघा, टिळक चौक बघा याठिकाणी चालायला जागाच नाही, वॉकींग वगैरे ही तर लांबची गोष्ट आहे. माझातर या गोष्टीला विरोध आहे निदान मेन मेन चौकामध्ये तुम्ही स्ट्रिक्ट वातावरण निर्माण करायला पाहीजे. आपल्याकडे अतिक्रमण विभाग पण नाही. याबाबत तुम्ही काहीतरी कडक धोरण करावे. नाहीतर रोज दिवसेंदिवस एक एक वाढत चाललं आहे आणि कोण कुठला आला, कोण कुठला गेला, कोण काय बिझनेस करतो, कोण कुठे बसतो. आज आईस्क्रीम विकतो, उदया वडापाव विकतो, संध्याकाळी दुध विकतो. नंतर तो रसवंतीगृहाच गु-हाळ टाकतो. काही सुध्दा समजत नाही. चायनीजच्या गाडया आहेत. ज्येष्ठ नागरीकांचा कोणी विचार करत नाहीत. महापालिकेला दोन पैसे मिळतात म्हणून बसू दया. कोण कलेक्शन करते. तुम्ही बाहेर पडा. चौका संदर्भात चांगले धोरण अंमलबजावणी करावी अशी विनंती करतो.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रत्येक नगरसेवक तळमळीने या विषयावर बोलत असतो. "जखम डोक्याला आणि पट्टी गुडघ्याला" अशाप्रकारची कारवाई प्रशासनाची चालू आहे. मा.महापौर, एक विषय म्हणून याच्याकडे न बघता संपुर्ण शहराच्या सौंदर्यामध्ये जे विद्रूपीकरण करणारा हा विषय आहे. तुम्ही कुठल्या समितीच्या माध्यमातून करता याच्याशी आम्हांला काही देनंघेणं नाही. परंतु या समितीचे काम करतात ते जे काही कोण नेते आहेत, तुम्हांला कदाचित माहिती नसेल ते पण त्या लोकांकडून पैसे गोळा करतात. एका व्यक्तीच्या नावे आठ-आठ, दहा-दहा प्रकारच्या स्वत:च्या गाडया आहेत. ५०० रुपये दिवसाला भाडे आहे. एवढया मोठया शहरामध्ये हे विद्रूपीकरण होत असताना महापालिका गप्प आहे कारण हे जे नेते आहेत ते शहरातील काही पुढा-याचे फोटो आपल्या बरोबर लावतात आणि महापालिकेच्या अधिका-यांवर, कर्मचा-यांवर त्यांचा दबाव असतो. म्हणजे एका हाताने

टाळी वाजत नाही. तुम्हांला जर कारवाई करायची असेलतर, माझी एक सूचना आहे आतापर्यंत केलेला सर्व सर्व्हे रद्द करायचा आणि आजपर्यंतचा नव्याने तुम्ही सर्वे करा. त्यामध्ये अटि, शर्ती कराव्यात, कुठले पदार्थ विकले पाहीजेत. सर्रास शाळेच्या आवारामध्ये आमली पदार्थ विकले जातात. मांस, मच्छी, दारु विकली जाते. आपण कुठे राहतो हे आपण आत्मपरिक्षण केल पाहीजे. एकीकड आपण चांगली काम करत असताना हे जे वाईट काम आहेत ही जर महापालिका प्रशासनाने नाही थांबवलीतर, कोण नगरसेवक जाऊन थांबवणार का. ज्या नगरसेवकांन वाटत माझ्या वॉर्डमध्ये या गोष्टी नकोत, ॲक्सीडेंट झाल्यानंतर कोणी मेल्यानंतर ज्या टर्नला उल्हास शेट्टी जीव तोडून सांगतात रोज चौकामध्ये ॲक्सीडेंट असतो, गाडयांचे नुकसान होत असते. या गोष्टीची कोण जबाबदारी घेणार. महासभा सर्वोच्च आहे, आम्ही बोलतो, बाकीचे करणारे करतात. आयुक्त बदलत जातात, एक आयुक्त बदलले की पॉलीसी बदलते. तुमची काय जबाबदारी आहे. अतिक्रमणच्या बाबतीत ती कारवाई करत असताना कोणी करत नाही त्यांच्यावर काय जबाबदारी निश्चित करणार आहेत तुम्ही. नुसते विषय आणायचे, पाच वर्षासाठी मंजूरी, दोन वर्षासाठी मंजूरी. विषयाला उपसूचना, त्याच्यामध्ये काय होते ते कोणाला माहिती नाही आणि जबाबदारी मात्र सगळया नगरसेवकांवरती. एवढे अनधिकृतपणे ज्याठिकाणी टप-या असतील, फेरीवाले असतील आमचे कार्यकर्ते आम्हांला विचारायला येतात की आम्हांला आज एखादी टपरी टाकायची तर, आम्ही सांगतोत की अनधिकृतपणे टाकू नका महापालिकेचे लोक उचलून नेतील. तुमची टपरी उचललीतर आम्हांला पण काही बोलता येणार नाही. असं आम्ही आमच्या लोकांना सांगत असतो. पर्यायाने गुन्हेगारी जी वाढते ती फेरीवाला आणि टपरीवाल्याच्या माध्यमातून जास्त प्रमाणात वाढते. काय टप-यांच राजकारण करायची गरज नाही किंवा काही करायची गरज नाही. जर तुम्ही तुमचा कायदा पाळला नाहीतर, याच्यावर जर अंमलबजावणी केली नाहीतर कोण करणार आहे. पोलीस काय करणार तुमचे नियम आहेत. पोलीसांचे नियम नाहीत. तुम्ही कोणाच्या दबावाला बळी पडू नका. माझीतर विनंती आहे की हे सगळ रद्द करुन नव्याने करा, अटि/शर्ती ठेवा. या शहरातील कमीत कमी वीस वर्षाचे त्यांच्याकडे वास्तव्याचे पुरावे पाहीजेत. आमच्या बरोबर काम करणारी जी बाकीची जनता आहे त्यांचा याठिकाणी व्यावसाय करण्याचा हाक्क आहे. त्यांना वीस वर्षाची अट लावा. विधवा, निराधार, अपंग हे पुर्वीचे आहेत त्यांना याप्रकारच्या परवानग्या दया. कुणाचा कुणाला ताळमेळ नाही, आमच्याकडून मंजूरी करुन घ्यायच्या आणि आमच्या आमच्यात भांडण लावायची आणि तुम्ही मात्र निर्धास्त बसायच. याच्यामध्ये तुम्हांला काही इन्कम नाही, कमीशन नाही म्हणून कोणीही प्रशासनानं या विषयाकड लक्ष दयायच नाही. मा.महापौर साहेब, विनंती आहे अशाप्रकारचे विषय करत असताना सारासार तुम्ही सगळयाच्या बैठका घेवून सगळयांचे विचार लक्षात घेवून अशांची अंमलबजावणी भविष्यात करावी, धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यापुर्वी अनेकवेळा या फेरीवाल्याच्या संदर्भात बोललो होतो. आमच्या भागामध्ये थरमॅक्स चौक, साने चौक हा रहदारीचा रस्ता आहे. त्याठिकाणी जे व्यापारी लोक आहेत त्यांच्या दुकानासमोर हातगाडीवाले, टपरीवाले, अन्य लोक बसलेले असतात. व्यापा-यानी लाखो रुपयाला दुकान खरेदी करुन घेतलेले आहेत. या लोकांना त्यांच्या दुकानामध्ये येण्यासाठी सुध्दा जागा नाही प्रभागाच्या माध्यमातून अनेवेळा हा रस्ता क्लेअर करावा असे सांगीतलेले असताना कधीही त्याच्यावर कारवाई केली जात नाही. त्याठिकाणी अनेकवेळा ॲक्सिडेंट झालेले आहेत. आम्हांला साने चौकातून आकुर्डीला यायचे असेलतर अर्ध्या किमी. रस्त्यासाठी एक एक तास लागतो. सर्व लोकांनी रस्ते वेठीस धरलेले आहेत. मा.आयुक्त साहेबांची व्हिजीट झाली त्यावेळेला सुध्दा सांगीतलेले आहे. एक वेळेस कारवाई होते दुस-यावेळेस ते लोक त्याठिकाणीच असतात. कारवाईची वेळ सुध्दा चुकीची आहे. व्यावसाय करणारे सायंकाळी चार ते दहा बसलेले असतात. आपले अतिक्रमणचे पथक सकाळी १० ते ५.३० पर्यंत असते. त्याठिकाणी मारामारी झालेली आहे. हे होत असताना नाहक नागरीक भरडले जातात. परवा तीन दिवसापुर्वी त्याठिकाणी खुण झालेला आहे, गुन्हा दाखल झालेला आहे. आज एक माणुस हॉस्पिटलला आहे. आठ दिवसापासून असे असताना आपले लोक त्याठिकाणी येतात. यापुर्वी सुध्दा मी दाखऊन दिलेले आहे. आपले अतिक्रमणवाल्यांचे सुध्दा हाप्ते चालू आहेत. यापुर्वी नाव पण सांगीतल होतं. असे असताना त्या लोकांचे हाप्ते असतीलतर, संघटना कोणी पैसे घेत असतीलतर आम्ही याठिकाणी बोलून काही फायदा नाही. यांना तुम्ही फुकट जागा देतात, रस्ता आपला आहे, आपण सगळ करायचं आणि त्यांनी तिथ हजार पाचशेचा धंदा करायचा. आम्ही भाजीमंडई बांधुन दिलेली आहे. भाजीमंडईचा विषय सुध्दा पाठीमागे पडला. तीन वर्ष झाले ती भाजीमंडई सडत चाललेली आहे. आज त्याठिकाणी अजून बसण्यासाठी कोणी गेलेले नाही. या विषयावर अनेकवेळा चर्चा होऊन असे प्रकार होत असतीलतर ते योग्य नाही. त्या भागामध्ये जेवढे अतिक्रमणवाले बसतात ते उठवण्यासाठी आदेश दयावेत. त्याठिकाणी नो हॉकर्स झोन साने चौक, थरमॅक्स चौकामध्ये नोहॉकर्स झोन डिक्लेअर केला आहे. त्याठिकाणी नागरीक बसत असतीलतर वाईट अवस्था आहे. अनेकवेळा यासंदर्भात बोललो आहे. माझी विनंती आहे ज्या ज्या ठिकाणी रस्त्यावर अतिक्रमण भाजीविक्रेते आहेत, त्यांना उठवण्यापेक्षा त्यांना कुठेतरी जागा दया आणि नागरिकांचा त्रास वाचवा आणि कारवाई करावी अशी विनंती करतो.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हॉकर्स झोनची निर्मीती का करतो. शासनाचे आणि केंद्रशासनाचे आदेश आहेत म्हणून करतो का आपल्याला आपले शहर स्वच्छ, सुंदर ठेवायचे म्हणून करतो. आज रोजी भरपूर परप्रांतीय ठिकठिकाणी पाणीपुरीचे ठेले लावतात ते आरोग्याला कितपत योग्य आहे याची चाचणी आपण कधीच करत नाहीत. मी पत्र दिलेल होत की पाणीपुरीचे हे ठेले चौका चौकामध्ये आहेत, हे लोक कुठून

येतात पाणीपुरी कशी बनवतात काही माहिती नाही. चायनीजवाले नेपाळचे लोक आहेत. कुठल्या पध्दतीने आपण आपल्या नागरीकांचा विचार करतो हे कळत नाही. आपल्याला चांगले शहर करायचे आहे. हॉकर्स झोन पाहीजे असेलतर हॉकर्स झोनमध्ये बसणारे सर्व नागरीक किंवा जे काही विक्रेते आहेत ते पिंपरी चिंचवडचे रहिवासी पाहीजे, त्यांच्याकडे आधारकार्ड पाहीजे, रेशनकार्ड पाहीजे, तो पिंपरी चिंचवडचा पाहीजे आणि आपण झोन बघताना पण पार्कींगला जागा असणार का, का नुसती जागा बघीतली, मंजूर केली आणि परत त्याठिकाणी गर्दी करणार आहेत. नक्की आपला उद्देश काय, या सर्व गोष्टीची अडचण काय होते पहील्यांदा आपण सर्वांना सूचना केलेली योग्य आहे. पुन्हा एकदा फेररचना बघीतली पाहीजे. भाऊसाहेबांनी सांगीतल की एकाच रस्त्यावर हजारो हातगाडी भेटतील अशी परिस्थिती आहे. हे लोक आली कुठून हे लोक कुठले आहेत काहीच माहिती नाही. सर्वांना स्वत:चे जीवन जगण्यासाठी व्यावसाय करता यावा परंतु हा व्यावसाय करताना नागरीकांना त्रास होऊ नये रहदारीला त्रास होऊ नये या सगळया गोष्टीचा विचार झाला पाहीजे. फक्त केंद्रशासनाचे, राज्यशासनाचे आदेश आला हॉकर्स झोन तयार करा आणि दया म्हणून हा विचार करत असूतर योग्य नाही. दंडवते साहेबानी पुन्हा एकदा पाहणी करावी. चांगले हॉकर्स झोन तयार करताना सगळया गोष्टीचा विचार करुन त्याची निर्मीती करावी अशी इच्छा आहे. मा.महापौर साहेब, आपण सुध्दा आदेश दयावेत अशी मी विनंती करतो.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर फेरीवाले धोरण मला वाटते आम्ही २०१२ ला निवडून आलो तेंव्हा पासून आम्ही विषय ऐकतो, आणि ज्यावेळेस चर्चा ऐकायला मिळाली त्यावेळेस कळाल की २००८ पासून चालू आहे तो काही नवीन विषय नाही. काही सिनीअर नगरसेवक असतील की जे अनेकवेळा त्यांच्या वॉर्डामध्ये लोकांना शब्द दिलेला असतो की आता धोरण होणार आहे, धोरण होणार आहे. तेव्हापासून खेळत खेळत किती दिवस आपण टेस्टमॅच खेळायच्या, आता टेस्टमॅच खेळून आपण वनडे आणि वनडेनंतर ट्वेन्टी ट्वेन्टी यामध्ये सुध्दा निवांत प्रोसेस चालू आहे. कोणत्याही धोरणाला अंमलबजावणी करण्याची एक मर्यादा असली पाहीजे. ही मर्यादा कधीच प्रशासन स्वत:ला लागून घेणार नाही का. आमच्याकडून एकदा जीबीची मान्यता घ्यायची असं म्हणायच, तुमच्या कारवाईला तुम्ही किती दिवस लावणार आहेत. याला काही मर्यादा ठरलेल्या असायला पाहीजे. अनेकवेळा हा विषय आमच्या जीबीमध्ये येतो, अनेकवेळा आम्ही प्रभाग समितीच्या मिटींग मध्ये मांडतो. परंतु त्याच्यावरती अंमलबजावणी करताना प्रशासन मात्र स्तब्ध असतं, स्तब्ध, स्थिर एकदम स्टॅच्यू झालेल असतं. खरंतर हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. पिंपरी चिंचवड शहर म्हणजे येथे कामगार नगरी आहे. अनेक कंपन्या दिवसेंदिवस बंद पडत चाललेल्या आहेत त्याला पर्यायी मार्ग म्हणून अनेक लोक हातगाडया घेतात आणि रस्त्यावर येतात. त्यामुळे ते नागरीक चुकीचे आहेत का आपल धोरण चुकीच आहे याचा कुठेतरी एक निर्णय घेतला पाहीजे. समजा

एखादयाला वाटल की उदया एखादा व्यावसाय करायचा तर त्यालाही काहीतरी पर्यायी व्यावस्था असली पाहीजे. समजा अचानक माझी काही कंपनी बंद पडली मलाही वाटत एखादा व्यावसाय करावा. मला प्रशासनाकडून आपल्या महानगरपालिकेची परवानगी घेण्याची काहीतरी प्रक्रीया असली पाहीजे. मी कोणत्या ठिकाणी गाडी लाऊ शकते, काय करु शकते याच्यावर कोणताही निर्णय आपलं प्रशासन घेत नाही हे अत्यंत चुकीच आहे. ज्याला वाटल गाडी काडायची त्यांनी घ्यायची गाडी. मला वाटल उदया वडापाव टाकायचा वडापावची गाडी घ्यायची रस्त्यात जिथ जमेल तिथ आपल ॲडजेस्टमेंट करायची अशाप्रकारच कामकाज या पिंपरी चिंचवड शहरत्त चालू आहे. तुम्ही कुठेही जा, दापोडीत जा, पिंपरीमध्ये जा, सांगवीमध्ये जा, थेरगावला जा, भोसरीमध्ये जा. रात्री संध्याकाळी सहानंतर गाडी चालविणं, एखादया कार्यक्रमाला जाणं किंवा एखादी वाईट घटना घडली आणि त्या ठिकाणी वेळेत पोहचायच म्हणलतर अशक्य गोष्ट आहे. म्हणजे एखादया कार्यक्रमाची आपल्याला वेळ माहित असेलतर त्या अगोदर दोन तास निघालतर आपण त्याठिकाणी कदाचित पोहचू. त्यावर हे धोरण जे आहे ते या धोरणाची अंमलबजावणी न करता आपण प्रशासनाला आदेश दया की या धोरणात तुम्ही उपयुक्त बदल करा व जीबीपुढे आणा व मंजुरीनंतर महीनाभरात त्याची अंमलबजावणी केली पाहीजे. ना नागरिकांना प्रशासनाची भीती आहे किंवा महानगरपालिकेची भिती आहे. रस्त्याच रुंदीकरण करत असताना अनेकाची घर, व्यावसाय उध्दवस्त झालेली आहेत. आज काय पाहीला मिळत कोणतरी एखादा व्यक्ती येतो आणि त्याठिकाणी हातगाडी लावतो व व्यावसाय करतो. मग ज्यांनी आपल्या घराचा, व्यावसायाचा त्याग केला त्यांच्यावरती पुन्हा गदा नाही का. मग रस्तारुंदीकरण केलं ते कुणासाठी. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की ज्यावेळेला आपण सर्व ही प्रक्रीया करणार आहेत त्यावेळेस आपण एखादया खाजगी यंत्रणेची मदत घ्या, खाजगी संस्थेची मदत घ्या व त्यांना आदेश दया की एक महिनाभरात ही प्रक्रीया पुर्ण करा त्याचे नियम ठरवा आणि मग त्याची पुढची कारवाई आपल्याला चांगल्याप्रकारे अदयावत करता येईल. २००८ पासून २०१६ पर्यंत दहा वर्षे आपण या सगळया गोष्टीशी खेळतोय हे योग्य नाही. बायोमेट्रीक केलेली आहे पुन्हा बायोमेट्रीक करायची त्यातील काही लोक हयात सुध्दा नसतील तरी आमच्या धोरणाची अंमलबजावणी होत नाही. अनेक ठिकाणच्या गाडयावर अनेक लोक व्यावसाय करतात, जे लोक बसतात त्यांच्याकडून पाचशे, शंभर, दोनशे रुपये भाड येतं. त्या लोकांच्या हातामध्ये दहा-पाच आंगठया असतात, दोन-चार तोळयाची चैन असते. असे लोक ते व्यावसाय करतात. त्यांना त्या व्यावसायाची गरज नसते किंबहूना त्यांनी कोणालातरी चालवायला दिलेल असतं. मा.महापौर साहेब, येथून पुढच्या काळामध्ये ज्या सुचना मांडलेल्या आहेत त्या सगळयांच एकत्रीकरण केल पाहीजे आणि खरंच ज्याला व्यावसायाची गरज आहे, त्याच कुटूंब त्याच्यावर चालणार आहे, उदरनिर्वाहाची त्याला गरज आहे अशा सगळया लोकांचा विचार त्याठिकाणी आपण करणं गरजेच आहे. चुकीच्या पध्दतीने या रस्त्याची, नागरीकांचा

छळ होतो जे व्यवसाय करत नाहीत, ज्यांना कामाला जायच आहे ते मात्र वेळेत जाऊ शकत नाहीत ही अत्यंत दुर्दैवी आणि खेदाची गोष्ट आहे. टप-या भाडयाने दिल्या जातात. हातात चार आंगठया आहेत, गळयात पाच तोळयाची चैन असते आणि यांचे गाळे भाडयाने दिलेले असतात. इथ पालीकेकडे पन्नास रुपये भरायचे आणि तिथं मात्र व्यावसाय करणा-याकडून हजारो रुपये उखळायचे म्हणजे त्यांचा तो पुन्हा पर्यायी व्यावसाय होतो. आपल प्रशासनाचा अतिक्रमण जो विभाग आहे नागरीकांचे घर पाडले जे चुकीचा  व्यावसाय करतात त्यांचे ना बंद केले तरी सुध्दा शहराचे विद्रूपीकरण आहे ते कमी करण्यात ना आपल्याला मदत होणार कित्येकदा आम्ही सांगतो आमच्या येथील हातगाडया काढा आम्हांला जाता येत नाही, त्यांच्याशी काही कारण नसताना आम्ही वाद घालायचा मग आपल प्रशासन काय  झोपत का. त्यांनी सांगाव मागच्या सहा महीन्यात त्यांनी किती कारवाया केल्या आणि त्याच्यामध्ये काय यश संपादन केलं. आज कारवाई करायची आणि पुन्हा सहा महीने तीकड जायचच नाही. तेव्हा लोकांना माहीती कारवाईमध्ये टेबल नेलातर जाऊ दे किती पाचशे हजार रुपयाचा टेबल गेला असेल परंतु पुन्हा मला सहा महीने व्यावसाय करता येणार आहे याची त्यांना खात्री असते अ,ब,क हे  क्षेत्रीय कार्यालय आहेत त्या प्रत्येक कार्यालयामध्ये जी यंत्रणा आहे त्या यंत्रणेनी प्रत्येक आठवडयामध्ये ज्याठिकाणी प्रामुख्याने गर्दी होते त्याठिकाणी कारवाईला गेलच पाहीजे. एकदा तो धाक जर व्यावसाय करणा-याना बसलातर निश्चितपणे बदल होणार आहेत. आज बघायच आणि पुन्हा सहा महीने त्याच्याकड बघायचच नाही असं आपल्याकडे आहे. त्यामुळे व्यावसाय करणाराना त्याची सवय लागलेली आहे. त्यामुळे ते सुध्दा गाफील राहतात. होणार जे नुकसान हजार पाचशेच असत ते सहन करण्याची त्यांची मानसीकता असते. कारण त्यातून ते लाखो रुपयाचा व्यावसाय संपादन करत असतात. ते पैसे कमावतात याच दु:ख आम्हांला अजीबात नाही परंतु शहराच विद्रूपीकरण असेल त्याचबरोबर जे शहरातील करदाते नागरीक आहेत त्यांना होणारा त्रास असेल याला कोण जबाबदार आहे. निश्चितपणे याठिकाणी प्रशासन जबाबदार आहे त्यांचा गलथान कारभार त्यास जबाबदार आहे. त्यामुळे सन्मा. महापौर मी आपल्याला पुन्हा एकदा विनंती करते या सगळया प्रक्रीयेमध्ये त्वरीत कारवाईचे आपण आदेश दयावेत, धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी पहील्यांदा प्रशासनाचा मी जाहीर निषेध करतो की अशाप्रकारचा सगळा ठिसूळ कारभार महापालिका बघते आणि बघायची भूमिका करते. वास्तवीक पाहता लोकप्रतिनिधी हे वारंवार सांगतात की रस्ते बकाल झालेले आहेत, शहर बकाल होतय. दिवसेंदिवस टप-या वाढत चाललेल्या आहेत. बेकायदेशिर आणि अधिकृत बांधकाम सुध्दा चालू आहेत परंतु प्रशासन काहीही कारवाई करत नाही. बघ्याची भूमिका करतय. आता मला असं वाटायला लागल की आपल प्रशासन हे भैर तर आहेच आहे आंधळ पण आहे आणि काहीच करत नाही का कारवाई होत नाही. मागे गावडे

साहेबांकड क प्रभागाचा चार्ज होता त्यावेळेला त्यांनी सांगीतल्यानंतर थोडीफार कारवाई केली. तद्नंतर आतापर्यंत स्वत: दहावेळेस फोन करुन सांगीतल असेल आदल्या दिवशी कारवाई झाली रातोरात त्यांनी आपल्या अधिका-यांना दम दिला दुस-या दिवशी याठिकाणी अधिकारी फिरायचे बंद झाले, घाबरले आणि रातोरात त्याठिकाणी आहे तशी किंबहूना त्यापेक्षा दुप्पट तीप्पट टपरी सर्रास रोडवर बांधुन परत सुरु केली. काय केल प्रशासनानं, उलट असं सांगीतल की आपल्या अधिका-याच्या अंगावर धाऊन जाणारी ही मंडळी, पोलीस पण तिथं बघ्याची भूमिका करत होते. या पोलीस यंत्रणेसाठी महापालिका पैसा खर्च करते, त्यांना आपण पगार देतो मग कशाचा पगार देतो.  मागे आपल्याला हायकोर्टाने निदेश दिल्याप्रमाणे त्या अनुषंगाने आपण  नौकरभरती केली, अधिकारी घेतले, बीट निरीक्षक घेतले, सुपरवायझर घेतले, मशिनरी घेतली सगळ काही घेतल परंतु त्याचा उपयोग होतोय का. मा.महापौर साहेब, याठिकाणी सर्व पक्षाचे लोक आहेत तुम्ही आता काहीतरी आदेश दया. हे कधी थांबणार आहे. दुसर याठिकाणी साहेबांनी सांगीतल की पाच प्रकारच्या फि आपण फेरीवाला धोरणामध्ये घेतो. संततुकारामनगरमध्ये हॉकर्स स्टेडीयममध्ये आपण जी लोक रस्त्यावर भाजीवाले, टपरीवाले होते त्यांना तेथे बसवल आहे. त्यांच्याकडून आपण भूईभाड पण  घेतोय आणि महापालिकेचा टॅक्स पण घेतोय. पण शहरामध्ये कुठेच अशाप्रकारची मागणी नसताना अशी बेकायदेशीर वसुलीच आपण कशी काय करतो. आपण त्यांना बांधुन दिलेल नाही फक्त भूई वापरतात त्यांनी स्वत:च्या खर्चाने भिंत बांधली, कोबा केलेला आहे, भिंत बांधुन, शटर लावुन, लाईटसह स्वत: केलेल आहे. मग त्याठिकाणी आपण टॅक्स कसाकाय घेतो. त्याठिकाणी फक्त भूईभाड घेतल पाहीजे त्या व्यतिरीक्त पुन्हा आपण त्यांच्याकडून हे पाच प्रकारच्या फि लावत आहोत परंतु प्रत्येक वॉर्डाच सर्वेक्षण व्हायला पाहीजे. त्या वॉर्डामध्ये पादचा-यांना, नागरीकांना, महीलांना, लोकांना त्रास होणार नाही अशा ठिकाणी परवानगी दयायची नाही, व आपण तशी परवानगीच दिलेली नाही. इतक्या वर्षापासून आपण त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारच मुल्य घेत नाहीत, फि घेत नाहीत, त्यांना लायसेन्स देत नाहीत. फक्त बायोमेट्रीक पध्दतीने ५९०३ आपण आयडेन्टीफाय केलेले आहेत. कोणालाही मान्यता दिलेली नाही मग असं असताना संबंध शहरामध्ये अशाप्रकारच बकाल रुप असताना प्रशासन कारवाई का करत नाही याच पहील आम्हांला उत्तर पाहीजे. फेरीवाला धोरणाअंतर्गत जर त्यांना काही संरक्षण दिलेल असेलतर त्याच्या काही गाईडलाईन आहेत आणि त्या गाईडलाईन प्रमाणे प्रत्येक वॉर्डा मधला सर्वे केला पाहीजे. सर्वे करुन त्याठिकाणी पादचारीला त्रास होणार नाही, म्हणजे एका कोप-याला जर आपण सर्वजण एकत्र बसवलेतर मात्र पर्याय नसल्यामुळे लोकांना तिथ जाऊन खरेदी करावी लागेल.  परंतु ज्याच्या मनाला येईल तिथ तो रोडचा कॉर्नर असेल, सर्कल असेल आणि प्रमुख चौक असतील त्याठिकाणी वाहनव्यवस्था टपरी केलेली आहे ही नवीन  व्यवस्था आहे मग तो फ्रूटवाला असेल, तो भेळ वाला असेल, तो आईस्क्रीमवाला असेल, तो कुल्फीवाला असेल अगदी

गाडी आमच्या समोर लावतात. मग त्या गाडीच्या शेजारी हातगाडी लागते त्या शेजारी दुसरी चहाची गाडी लागते अशा पध्दतीने दिवसेंदिवस हया टफ्या वाढत चाललेल्या आहेत. दिवसेंदिवस अशाप्रकारे व्यवसाय वाढत चाललेले आहेत. याच्यावर आपल नियंत्रण काय. कुठतरी महानगरपालिकेनी याचा विचार केलाच पाहीजे की ज्याठिकाणी असे भर चौक आहेत त्या भर चौकामध्ये ट्रॅफीकला अडचण होते, ॲक्सीडेंट  होतात, लोकांना चालायला मार्ग नाही. रिक्षावाल्यांच पण असेच झालेल आहे, कुठही आपण  झोन केलेले नाहीत. त्यांच्या मनाला येईल तिथ रिक्षा उभी करतात. बसस्टॉप असतो त्याच्या समोर रिक्षा उभी केलेली असते. त्यामुळे नियोजन शुन्य प्रशासन आहे. नियोजनाचा अभाव आहे आणि हे नियोजन जर तुम्ही केल नाहीतर या शहराच वाट्टोळ झाल्या शिवाय राहणार नाही हे पुन्हा फुन्हा सांगतो. नियोजन करण गरजेच आहे तुम्ही शंभर रुपये फि घ्या, दोनशे रुपये फि घ्या किंवा फि घेवू नका तो विषय नंतरचा आहे. परंतु प्रशासनाच कंट्रोल, प्रशासनाचा वचक, त्या वॉर्डामध्ये असलेली टपरीवाल्यांची संख्या, फेरीवाल्यांची संख्या ही निश्चित व्हायला पाहीजे आणि ती जर निश्चित झाली नाहीतर मी सांगीतले प्रमाणे शहर बकाल होणार म्हणजे होणार आणि म्हणून प्रशासनाने फक्त बघायची भूमिका घेऊ नयेतर प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावेत. अशाप्रकारची विनंती करतो आणि थांबतो.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला एवढच निदर्शनास आणायच आहे की मागच्या वेळेस दापोडीतील तुमच्या येण्या जाण्याच्या रस्त्यावर चर्चच्या ठिकाणी परिस्थिती अशी आहे ती तुमच्या पासून काही लपलेली नाही. मोठया प्रमाणात त्याठिकाणी तीस मीटरचा रस्ता आहे पण ज्यावेळेस शनिवार, रविवारी, सोमवार असतो त्या दिवशी परिस्थिती अशी होती की आहे त्यात दहा फुट रस्ता फक्त जाण्या येण्यास राहतो. त्याठिकाणी टप-या, हातगाडया मोठया प्रमाणावर असतात. आम्ही अनेकवेळा तक्रार देवूनही तुम्हांला कुठल्याही प्रकारचा गंध येत नाही.  सगळयात महत्वाच म्हणजे तो रस्ता हॉकर्स झोन म्हणून डिक्लेअर करुन घेतला आहे आणि तरीही तुमची कार्यवाही त्याठिकाणी होत नाही. संध्याकाळी ख-या अर्थान चार नंतर त्याठिकाणी हातगाडया लागतात. आपण कारवाई कधी करतो सकाळी येऊन जातो परत कारवाई झाली म्हणून दाखवतात. याच्यामध्ये त्या अधिका-याला काही चिरीमीरी मिळतात की काय हे समजत नाही. प्रत्येकवेळेला त्याच्याकड दुर्लक्ष केल जातं हा काय प्रकार आहे. म्हणून कृपा करुन मा.महापौर साहेब, आपण आदेश दयावेत आणि पुढच्यावेळेस ते दिसणार नाहीत एवढी खबरदारी घ्यावी ही विनंती.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या शहरामध्ये पाहीलतर अनेकवेळा अधिका-यांनी, आयुक्तांनी  व्हिजीट दिलेल्या आहेत  मिटींगमध्ये आपण चर्चा केलेली आहे.  आपले फुटपाथ आणि रस्ते हे संपुर्ण मोकळे पाहीजे पण तसे कधीच होत नाही. प्रभागाची मिटींग असो, जीबी असो त्यावेळेस मागच्या आयुक्त साहेबांची व्हिजीट

झालेली आहे तरी सुध्दा काहीही बदल झालेला नाही. अधिकारी वर्गाकडून काहीही त्याची दखल घेतली जात नाही कारण आपण पिंपळेगुरव परिसरामध्ये पाहील, सांगवी परिसरामध्ये पाहीलतर कृष्णबाजार चौक असेल, काटेपुरम असेल, साईचौक असेल, अशी परिस्थिती आहे मी तेथे चौकशी केलीतर त्या हातगाडयावर लाईट लावून व्यावसाय करतात. दोन्ही रोडच्या साईडने बसतात. ते समोरच्या दुकानदाराला भाड देतात आणि त्या रोडवरती थांबतात. मध्यंतरी अधिका-यांना मी सांगीतल की आपले सगळे फुटपाथ लोकांना पायी चालण्यासाठी आहेत. परंतु एकाही फुटपाथ वरती पायी चालण्यासारखी परिस्थिती नाही. ज्या ज्या ठिकाणी भाजीमंडई असतील त्या भाजीमंडई मोकळया पडल्यात. जो तो रस्त्याला येतो अशा परिस्थितीमध्ये आपण अधिका-यांना सांगीतलतर तेवढया एका चौकामध्ये फोन केल्यानंतर येतात. दुसरा चौक मोकळा असतो तिथं परत तीच परिस्थिती. हे आले की ते परत गल्लीबोळामध्ये जाऊन परत त्याठिकाणी येतात. पण अधिका-यांनी तेवढया चार पाच हातगाडया उचलल्या एक चौक झाला की दुसरा राऊंड दयायला परत त्यांना महीना लागतो, पंधरा दिवस लागतात. अशी परिस्थिती असेलतर कशावरुन गाडीवाले थांबणार नाहीत. आपल्या आरक्षणाच्या जागा आहेत काही आरक्षण आपल्याकड ताब्यात आलेली नाहीत, जी ताब्यात आलेली आहेत ती अर्धवट आलेली आहेत. जिथ अर्धवट आरक्षण ताब्यात आलेली आहेत तिथ तरी महापालिकेनी विचार केला पाहीजे की तिथ जरी या लोकांना जागा दिलीतर हे रस्त्यावर येणार नाहीत. अशा पध्दतीने केलतर मला वाटत रस्ते मोकळे होतील. प्रत्येक चौक पॅक आहेत. हातगाडीवाले लाईट लाऊन त्याठिकाणी व्यावसाय करतात, ते कुणाला घाबरत नाहीत. जाता सुध्दा येत नाही लोकांना अशी परिस्थिती आहे. म्हणून मा.महापौर साहेब, आपण याचा विचार करुन सगळया शहराचा विचार केलातर बरे होईल. प्रत्येक ठिकाणी अशीच परिस्थिती आहे म्हणून याच्यावर नीट विचार करुन सगळयाच प्रभागाच्या अधिका-यांना कामाला लावल पाहीजे. ते फक्त ऐकतात तेवढयापुरती आपली गाडी पाठवतात आणि आम्ही त्याठिकाणी गेलो साफ केलेल आहे एवढच सांगतात, धन्यवाद.

**मा.आर.एस.कुमार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राष्ट्रीय फेरीवाला धोरणाबद्दल आता चर्चा चालू आहे. मी आपल्याला भक्ति-शक्ती चौकाकडे वळऊ इच्छितो. या चौकात दोनशे फेरीवाले आहेत. शंभर लोकतर खालीच बसलेले आहेत. खेळणी आहे आणि आता रेलगाडी पण सुरु झालेली आहे. झुकझूक गाडी पण सुरु झाली आहे म्हणजे दोनशे पेक्षा जास्त फेरीवाले त्या रस्त्यावर आहेत. बॉम्बे पुणे रस्त्याला जाणारा तो पुर्ण रस्ता ब्लॉक असतो अनेक वेळा आम्ही प्रभाग मिटींगमध्ये सुध्दा बोललो की त्यांना उचला. अतिक्रमण काढा, पण काहीही नाही. एखादी गाडी ब्रेक फेल झालीतर पाच पंचवीस लोक मरणार आणि त्यासाठी कॉर्पोरेशनचे अधिकारी जबाबदार असणार. आम्ही सुध्दा वेळोवेळी विनंती केलेली आहे की येथे अतिक्रमण कारवाई करा. हा रोड क्लेअर करा, एखादया लाईनला बसलेले असतात तो पुर्ण

ब्लॉक झालेला असतो याबद्दल अनेकवेळा जनरल बॉडीमध्ये आणि प्रभागामध्ये चर्चा झालेली आहे पण काही कारवाई होत नाही. कारवाई एक दिवस झाली की दुस-या दिवशी बसतात. गुप्ता म्हणून गेले वीस वर्षे बसत होता आज तिथ पण दहा ते पंधरा जण आलेले आहेत प्रशासन काय करतं हे समजत नाही, हॉकर्स झोन गेली तीस वर्षे जनरल बॉडीमध्ये हॉकर्स झोन बद्दल आम्ही चर्चा केली पण अनेक वॉर्डामध्ये हॉकर्स झोन झालेलं नाही. नेहमी असं सांगतात आता आम्ही प्लॅनिंग केल, आता आम्ही जाहीरात दिल्या आता हे करतो, आता ते करतो पण तीस वर्षात या शहरात हॉकर्स झोन बद्दल काहीही निर्णय घेतले गेले नाहीत आणि वॉर्डात अनेक ठिकाणी टप-या आणि हातगाडया उभ्या राहतात त्यांच्यावर कधीतरी एकदा कारवाई होते. पण परत कारवाई होत नाही आणि यामुळे ट्रॅफिकला अनेक ठिकाणी अडथळा येतो. प्राधिकरणामध्ये तुम्ही बघीतलतर दहा ते पंधरा गाडया टर्निंगला उभ्या असतात तिथ सुध्दा कारवाई करा कारवाई करा म्हणून विनंती केलीतर कारवाई करत नाहीत. कधी कधी आम्हांला असं वाटत की काही पॉल्टीकल आणि प्रशासनामधील लोक हाप्ता घेतात की काय. काही ठिकाणी नगरसेवक कारवाई करु नका म्हणतात येथे आम्ही म्हणतो कारवाई करा. पण कारवाई करत नाहीत. का म्हणून कारवाई करत नाहीत. एखादा माणुस मेल्यानंतर कारवाई करणार का. मला प्रशासनाला विनंती आहे की भक्ति-शक्ती चौक क्लेअर करावा आणि हॉकर्स झोन कधी निर्माण करणार कधी पॉलीसी डिसाईड करणार याबद्दल माहीती दयावी. निर्णय दया या या तारखेपर्यंत आम्ही निर्णय देवून डिक्लेअर करु म्हणून. तीस वर्षे झाले याच्यावर चर्चा चालू आहे पण तरीही निर्णय नाही.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रत्येकानी प्रत्येकाच्या वॉर्डामधले प्रश्न मांडलेले आहेत. खरतर अतीक्रमण, हातगाडी, टप-या आणि रस्त्यावरची ट्रॉफिक हे प्रत्येकाच्या वॉर्डामधील प्रश्न आहेत. कोणाची वडापावची हातगाडी असेल, कोणाची पावभाजीची टपरी असेल कोणाची भेळपुरी असेल अशा पध्दतीने ज्याचा त्याचा व्यावसाय असतो. डांगे चौक, सोळा नंबर याठिकाणी ट्रॅफिकची अडचण होते. मागच्यावेळेस सुध्दा मी जीबीमध्ये बोलले होते, बोलल्या नंतर अधिकारी जागे होतात आणि ती त्यांची कारवाई एक ते दोन दिवस चालते परत आहे तेच परत ते थंड राहतात. त्यांना शिस्त लागली पाहीज. व्यावसाय करणाराचे पण पोटापाण्याचा प्रश्न आहे. परंतु व्यवस्थितपणे रस्ता सोडून त्यांनी केले पाहीजे. फुटपाथ लोकांना चालण्यासाठी आहे. पण फुटपाथवर सुध्दा त्यांच्या हातगाडया, पथारीवाले असतात एवढच काय पण रस्त्याच्या मध्ये सुध्दा बसलेले असतात. परंतु आपल्या अधिका-यांनी त्यांना शिस्त लावली पाहीजे. स.नं. ९ मध्ये असेच गाळे काढले होते त्याठिकाणी सुध्दा व्यावसायवाल्यांची सोडत काढली होती त्याच्यामध्ये ज्याच्या त्याच्या पध्दतीने त्यांना गाळे मिळाले होते. परंतु थोडयाच दिवसामध्ये त्यांचा व्यावसाय आतमध्ये जास्त चालत नाही म्हणून थांबला होता परंतु ती सर्व भाजीमंडई काढून टाकली आणि तीथ

रिक्षा, हातगाडया लावातात. तिथ मच्छीमार्केटच सुध्दा बांधकाम केलेल होतं. अशा ठिकाणी महापालिकेच्या जागा आहेत त्याठिकाणी चांगल्या पध्दतीने भाजीमार्केटच त्यांना जर चांगल्या पध्दतीने बांधकाम करुन दिल किंवा गाळे दिले तर जी रस्त्यावर येणारी गर्दी आहे ती कमी होईल आणि त्या लोकांना सुरक्षीत व्यावसाय करता येईल. मला एकच विनंती करायची आहे की अशा ज्या महापालिकेच्या जागा आहेत त्या जागेमध्ये व्यावसाय करणा-यांच्यासाठी आपण खरोखर प्रयत्न केले पाहीजेत. कारण अनेक लोक आहेत की त्यांच हातावरच पोट असतं. त्यांना व्यावसाय केल्याशिवाय पर्याय नसतो. याठिकाणी एवढच सांगू इच्छितो की आपण या लोकांसाठी चांगल्या पध्दतीने गाळे बांधुन मिळावेत एवढीच मी आपल्याला विनंती करते, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपण बघत असतो गाडयांच प्रमाण जसं वाढलेल आहे तसं टप-या आणि हातगाडयांच प्रमाण वाढलेल आहे आणि वाढत जाणार आहे. जसं गाडयांच्या धुरामुळे प्रदुषण होतं तसच या गोष्टीच सुध्दा दिवसेंदिवस होणार आहे. दंडवते साहेबांना मी सगळयांच्या वतीने विनंती करते की तुम्ही बायामोट्रीक करुन घेतलेली आहे, वॉर्डवाईज सर्व्हे करा त्या भागामध्ये एखाद हॉस्पिटल असेल, एखाद गार्डन असेलतर तिथ कशा टप-या दिल्या गेल्या पाहीजेत. प्रत्येक वॉर्डमध्ये तुम्ही पाच टप-याच नियोजन करा. साधारण चार जरी पकडले तरी एका प्रभागामध्ये वीस टप-या होतात. ज्यांना गरजेच आहे त्यांनाच तशा पध्दतीने लायसेन्स दिल पाहीजे. त्यांच्याकडून भाड आकारा आणि ज्या ठिकाणी उभा राहीलेत त्याच्या आजुबाजूच्या सोसायटीची त्यांच्याकडे एनओसी असली पाहीजे आणि त्या माणसाचा पिंपरी चिंचवडचा वीस वर्षाचा पुरावा पाहीजे. हातगाडयांचे सुध्दा त्यांचे सुध्दा पुरावे असले पाहीजेत कारण हातगाडया भाडयाने देण्याची जास्तीत जास्त संख्या शहरामध्ये आहे. हातगाडी सकाळी घेवून जायची भाडयाने आणि संध्याकाळी आणुन जमा करायची असं आहे. दोन दिवस माणुस काम करतो परत बंद करतो परत चौथ्या दिवशी दुसरा माणुस येतो ज्याच्या त्याच्या सोईने काम करतात. शहरामध्ये साधारण पाच हजार हातगाडया पुरते लायसेन्स दयावेत. तुम्हांला ते कसं विभागवार दयायच आहे ते दयाव.

**मा.महापौर -** रस्ते, फुटपाथ यावर हातगाडयांची गर्दी होणार नाही, शहराच्या सौंदर्यात कुठही बकालपणा येणार नाही याची काळजी प्रशासनाने घेतली पाहीजे, योग्य ती कारवाई झालीच पाहीजे. लिमीटेड हातगाडया झाल्या पाहीजे. आता मंगलाताई म्हणाल्या की वीस वर्षाचा पुरावा पण ताई मी सांगते वीस वर्षापुर्वी एवढी लोकसंख्या नव्हती पण या दहा वर्षात जास्त लोकसंख्या वाढलेली आहे. प्रत्येक नागरीकांना वाटत की आपल्या शेजारी कुठतरी भाजीपाला मिळावा. जी लोक व्यावसाय करतात त्यांच्याकडून योग्य पध्दतीने नागरीकांना त्रास होणार नाही अशा पध्दतीने हे अधिका-यांनी केलं पाहीजे. त्यांनी हे नियोजन केल नाहीतर पुढच्या जीबी मध्ये सुध्दा आम्ही त्यांना धारेवर धरणार. कारण शहरात काय चालल आहे, आमचे

नगरसेवक एवढ जीव तोडून सांगतात त्यांच्याकड जर अधिका-यांनी आता लक्ष दिल नाहीतर पुढच्या वेळेस नक्कीच त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल आणि हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकण्यात आला असता-

ठराव क्रमांक - ९२५ विषय क्रमांक- २

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/२२/२०१६ दि.२३/०५/२०१६

२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१६३८४ दि७/६/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.८८२ दि. २०/६/२०१६

४) मा.महापालिका ठ.क्र.८९२ दि. २०/८/२०१६

राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेअंतर्गत महाराष्ट्र शासनाचे उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०८/०६/२०१२ चे पत्रान्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी सुरु करणेत आलेली आहे. त्यावेळी मा.शहर फेरीवाला समितीची बैठक दि. ०५/०४/२०१३ नुसार फेरीवाल्यांची नोंदणी फी, विक्रेता फी, नुतनीकरण फी, देखभाल फी आणि दंड ठरविणेत आले आहे. नोंदणी फीचे दर र.रु. १०००/- प्रमाणे ठरविणेत आले होते यास मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३३८२ दि. २१/०५/२०१३ व मा.महापालिका सभा ठराव क्रं.२९८ दि. २७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आली आहे. व आदेश क्रं. भूजि/१/कावि/३५७/२०१३ दि. १३/०९/२०१३ अन्वये आदेश निर्गत केलेले आहेत. प्रस्तुत आदेशान्वये ठरविणेत आलेले दर जादा असल्याने सदर दर कमी करणेबाबत फेरीवाला संघटना वारंवार मागणी करीत आहेत. तसेच दि. ३०/०१/२०१६ च्या शहर फेरीवाला समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुणे मनपाकडील नोंदणी फी र.रु.२००/- प्रमाणे शहरातील फेरीवाल्यांची बायोमेट्रीक नोंदणी करणेकामी नोंदणी फी र.रु.२००/- व ओळखपत्र फी र.रु.२००/- करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच नविन फेरीवाल्यांचे अर्ज घ्यावेत त्यांच्याकडून नोंदणी फी व ओळखपत्र फी घेवून नव्याने अर्ज स्विकारावेत व त्यांनाही फेरीवाला धोरणानुसार योग्य ती परवानगी दयावी. त्वरीत अर्ज स्विकृती करावी व परवाना देणेसे मान्यता देणेत येत आहे. तसेच आज शहरात लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. तसेच टप-यांचे व हातगाड्यांचे खूप मोठे प्रमाण वाढले आहे. ते दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. गाड्यांच्या धुरामुळे पेट्रोलमुळे प्रदूषण होते, तसेच या गाड्यांमुळे देखील प्रदूषण होते आहे. फेरीवाल्यांची बायोमेट्रीक नोंदणी करुन घेतली आहे. जिथे उद्यान असेल, हॉस्पिटल्स असतील त्याठिकाणी कशा प्रकारच्या टप-या दिल्या गेल्या पाहिजेत याचा वॉर्ड वाईज सर्व्हे करावा. साधारणपणे प्रत्येक वॉर्डमध्ये ५ टप-यांचे आणि प्रत्येक प्रभागात पाच गुणिले चार

याप्रमाणे २० टप-या असे नियोजन करावे. ज्यांना गरज आहे त्यांना लायसन देण्यात यावे, त्यांच्याकडून भाडे आकारावे. तो फेरीवाला ज्याठिकाणी उभा राहणार आहे, त्याच्या आजूबाजूच्या सोसायट्यांची एनओसी असली पाहिजे. त्याचे शहरातील वास्तव्य २० वर्षांपासून आहे याचा पुरावा असावा, हातगाडीवाल्यांचे बाबतीत सुद्धा या अटी लागू करणेत याव्यात. ज्याला खरच गरज आहे व स्वत: दररोज काम करतात असे साधारणपणे ५००० फिरते लायसन विभागवार द्यावेत व मनपाच्या भाजी मंडईच्या आजूबाजूला, गर्दीच्या ठिकाणी लायसन्स देवू नयेत यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ३

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/७६/२०१६ दि.६/८/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२५ दि.९/८/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.९११ दि. २९/८/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील आरक्षण क्र.१/१३३ यामध्ये शाळेचे आरक्षण एकुण क्षेत्र १८००० चौ.मी. आहे. या क्षेत्रापैकी ४७५४ चौ.मी. क्षेत्र हे महानगरपालिकेने FSI/TDR बदल्यात ताब्यात घेतले आहे. उर्वरीत क्षेत्राचा ताबा सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांचेकडे आहे. आरक्षणाचे संपुर्ण क्षेत्र माध्यमिक शाळा आरक्षण तरतुदीन्वये विकसित करणेसाठी महानगरपालिकेच्या ताब्यातील ४७५४ चौ.मी. जागा जागेसाठी नगररचना विभागाने ठरविलेल्या दरानुसार ३० वर्ष कालावधीसाठी ई-निविदा नोटीस क्र.१/२०१६-१७ अन्वये दर मागविणेत आले होते. (निविदा रक्कम रुपये २,५१,४८,६६०/-) सदर कामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांची एकमेव निविदा पात्र ठरली असून त्यांनी सदरकामी निविदा रक्कमेपेक्षा ०.५०% जास्त असा दर सादर केला आहे. सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे या निविदाधारकांची निविदा, निविदा दरापेक्षा ०.५०% जास्त रक्कम रुपये २,५२,७४,४०३/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी बावन्न लाख चौ-याहत्तर हजार चारशे तीन फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्ष कालावधीसाठी लीज दराने देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळूंके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.अमिना पानसरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ९२६ विषय क्रमांक- ३

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/७६/२०१६ दि.६/८/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२५ दि.९/८/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.९११ दि. २९/८/२०१६

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९२७ विषय क्रमांक- ४

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- **१)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/भांडार/कावि/१०२/२०१६,दि.१६/०८/२०१६

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.९८ दि.१९/०८/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत दवाखाने / रुग्णालयास वेळोवेळी वाटप केलेले साहीत्याचे पॅकिंग व औषधे पॅकिंगचे निकामी साहीत्य तसेच एक्स-रे विभागात उपलब्ध होणारे निकामी हायपोसोल्युशन कच-यात न जाता जसे उपलब्ध होईल. त्या परीमाणाचे प्राप्त दराने लेखा विभागात रक्कम भरणा करुन त्याची विक्री करुन मनपास आर्थिक फायदा होणार असल्याने निविदा सुचना क्रमाक 17/2015-16 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन दर मागविण्यात आले आहेत. प्राप्त निविदाकारांमधील मनपास जास्तीत जास्त दर

देवून निकामी साहीत्य विकत घेणेकामी उच्चतम निविदाकार मे. बालाजी ट्रेडर्स. यांचे दराचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | बालाजी ट्रेडर्सयांचे प्राप्त दर | |
|---|---|---|---|
| 1. | रिकम्या काचेच्या बाटल्या ( सलाईन, इंजेक्शन, व्हायरल्स इ.) प्र.किलो | 1.60 | प्र.किलो. |
| 2. | प्लास्टिक बाटल्या व डबे (लहान / मोठे) | 10.00 | प्र.किलो. |
| 3. | पुठ्याची खोकी (पुट्ठा) | 5.00 | प्र.किलो. |
| 4. | पत्र्याचे डबे (लहान / मोठे) | 10.00 | प्र.किलो. |
| 5. | लाकडी खोकी | 1.10 | प्र.किलो. |
| 6. | 1 लिटरचे प्लास्टीक जार | 18.00 | प्र.किलो. |
| 7. | 5 लिटरचे प्लास्टीक जार | 20.00 | प्र.किलो. |
| 8. | मनपाचे सर्व रुग्णालयाकडील उपलब्ध होणारे हायपोसोल्युशन | 35.00 | प्र.लिटर |
| 9. | थर्माकॉल बॉक्स | 1.50 | प्र.किलो. |
| 10. | खराब क्ष- किरण फिल्म | 25.00 | प्र.किलो. |

महानगरपालिकेच्या दवाखाने / रुग्णालयातील निकामी भंगार साहीत्य व हायपोसोल्युशन वारंवार उपलब्ध होत असल्याने त्याची प्रत्यक्ष दवाखाने / रुग्णालयातुन विक्री करुन मनपास आर्थिक फायदा होणार आहे. त्यानुषंगाने मे. बालाजी ट्रेडर्स यांचे प्राप्त दर मा. आयुक्त सो. यांनी दिनांक ३०/०७/२०१६ चे प्रस्तावान्वये स्विकृत केलेले आहेत. मनपाचे दवाखाने / रुग्णालयातील निकामी पुट्ठे, काचेच्या बाटल्या, प्लास्टीक जार व लोखंडी साहीत्य तसेच निकामी हायपोसोल्युशन निविदेतील उच्चतम दराने मे. बालाजी ट्रेडर्स यांना दोन वर्षासाठी देण्यात येणा-या कामकाजाची अंदाजे एकत्रित किंमत रक्कम रुपये. ८,६२,५०२/- इतकी येत आहे. ही किंमत र.रु. ५००/- पेक्षा जास्त असल्याने त्या साहीत्याची विक्री करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळूंके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ५

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१००८/२०१६, दि.२८/०३/२०१६

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ६१ दि.२१/४/२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ८६८ दि.२०/६/२०१६

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.९०१ दि.२०/८/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मौजे वाकड येथील स.नं. २१० मध्ये पार्क स्ट्रीट हा गृहप्रकल्प आहे. सदर गृहप्रकल्पात औंध रावेत हा पोहोच रस्ता आहे. सदर गृहप्रकल्पाचे पाठीमागील बाजूने नाशिक फाटा ते वाकड मुंबई बेंगलोर हायवे हा रस्ता आहे. सदरच्या रस्त्यापर्यंत पोहोच रस्ता आवश्यक आहे. सदरचा नाशिक फाटा ते वाकड मुंबई बेंगलोर हायवे रस्ता व पार्क स्ट्रीट या गृहप्रकल्पादरम्यान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पिंपळे निलख सनं. २७ मधील आरक्षण क्र. ३८७ उद्यान आरक्षण आहे. सदरचे उद्यानचे आरक्षण भागशः विकसित झालेले आहे.

मा.ड प्रभाग समिती मध्ये ठराव क्र. ५६ दिनांक – १३/०३/२०१५ नुसार खालीलप्रमाणे ठराव मंजूर झालेला आहे.प्रभाग क्र. -५४ पिंपळे निलख प्रभागातील मौजे वाकड येथील स.नं २१० रहिवासी विभागातील मिळकतधारकांसाठी रस्त्याची आवश्यकता असल्याने महापालिकेच्या मंजूर आराखड्यातील ४५.०० मी डी.पी.रस्त्यापर्यंत मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ मधून १८.०० मी रुंद रस्ता हा मौजे वाकड येथील स.नं. २१० मधून ४५ मी. रस्त्यापर्यंत मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८.०० मी नॉन डी.पी. रस्ता घोषित करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला आहे.”

मा. आयुक्तसो. यांचेकडील दि. ०९/०९/२००४ चे कार्यालयीन मंजूर टिपणी अन्वये कलम २०५ खालील सर्व कार्यवाही प्रभागामार्फत करण्यात येते. ही कार्यवाही म्हणजे नविन रस्ते करण्यासाठी ठराव मंजूर करणे. त्यानंतर नगररचना विभागाकडून नविन प्रस्तावित रस्त्याबाबत वर्तमानपत्रात जाहीरात देऊन लोकांकडून/सुचना/हरकत मागविण्यात येतात जर सुचना/हरकती आल्या तर त्यावर सुनावणी घेऊन मा. आयुक्तसो यांची अंतिम मंजुरी घेण्यात येते त्यानुसार सदरचा ठराव मंजूर झालेला आहे.

सदर ठिकाणी या विभागाने साईट व्हीजीट केली असता, उपरोक्त मंजूर ठरावानुसार सदर ठिकाणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८.०० मी नॉन डी.पी. रस्ता घोषित करावयाचा झाल्यास आरक्षण क्र. ३८७ च्या पश्चिम बाजूकडील ऐश्वर्यम या

गृहप्रकल्पाच्या शेजारील व पिं.चिं.मनपाच्या आरक्षण क्र. ३८७ मधील अंदाजे २६०.९३ चौ.मी. जागा प्रस्तावित रस्त्याने बाधित होईल.त्याबदल्यात उद्यानास लागून अंदाजे २६१.०० चौ.मी. क्षेत्र रामा को-ऑफ हौ.सो.वाकड ही मनपास देणेस तयार आहे. (सोबत अवलोकनार्थ नकाशा जोडला आहे. कृपया अवलोकन व्हावे.) तसेच सदर ठिकाणी मनपाने सिमाभिंतीचे काम पुर्ण केलेले आहे. मनपाचे ताब्यात द्यावयाचे क्षेत्र सिमाभिंतीच्या बाहेर असून सदरची वाढीव सिमाभिंतही बांधून देणेस रामा को-ऑफ हौ.सो.वाकड तयार असलेबाबत मनपास कळविले आहे.बांधकाम परवानगी विभागाकडील मंजूर आराखड्यातील २६१.०० चौ.मी. क्षेत्र अर्जदार मनपाचे ताब्यात देणार आहेत. तरी सदर क्षेत्राचा चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळणेत यावेत.सदरबाबत अर्जदार यांनी दिनांक – २४/०९/२०१५ चे हमीपत्रान्वये एफएसआय/टीडीआर अथवा इतर कोणताही मोबदला पिं.चिं.मनपाकडे मागणार नाही असे हमीपत्र सादर केलेले आहे. तसेच सदर क्षेत्रास मनपाचे नांव ७/१२ उता-यावर लावण्यात यावे या अटीवर मान्यता देण्यास हरकत नाही.

सदरचा रस्त्याचा उपयोग पार्क स्ट्रीट या गृहप्रकल्पाबरोबर ऐश्वर्यम या गृहप्रकल्पाच्या पाठीमागील मिळकतधारकांसाठी सुध्दा होईल. तसेच सदरबाबत मा. ड प्रभाग समितीनेही १३/३/२०१५ रोजी ठराव मंजूर केलेला आहे.सदरचा प्रस्ताव मान्य झालेनंतर मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत मनपा रस्ता घोषित करणेबाबतची पुढील कार्यवाही करीता हरकती/सुचना मागविणेत येतील.

अर्जदार यांचे निवासी भागातील २६१.०० चौ.मी. क्षेत्र मनपाचे ताब्यात घेऊन त्याचे १८.०० मी.रस्त्यासाठी मनपाकडून आरक्षण क्र. ३८७ मधील अंदाजे २६०.९३ चौ.मी. जागा अदलाबदल करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळूंके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सुचना मी मांडते.

**मा.अमिना पानसरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ९२८ विषय क्रमांक- ५

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१००८/२०१६, दि.२८/०३/२०१६

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ६१ दि.२१/४/२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ८६८ दि.२०/६/२०१६

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.९०१ दि.२०/८/२०१६

विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९२९ विषय क्रमांक- ६

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.पअक/३/कावि/२८६/२०१६ दि.५/०८/२०१६

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.९१७ दि.२९/८/२०१६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७ (अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधीचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल, अशा पध्दतीने दरवर्षी मा.महापालिका सभेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१५-१६ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डी.पी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१५-१६ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत आला.

**मा.सविता साळूंके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महानगरपालिका पर्यावरणाच्या संदर्भात इतकी गंभीर आहे इतकी गंभीर आहे त्या गंभीरपणाचा गंभीरपणा सुध्दा

निघुन गेलेला आहे. मा.महापौर साहेब, खरंतर पर्यावरणाचा अहवाल हा ३१ जुलै पुर्वी आणणं हे कादयाने बंधनकारक आहे असं स्वत: तानाजी शिंदे हे त्यांच्या मनोगता मध्ये सांगतात आणि तरी हा पर्यावरण अहवाल ऑगष्टमध्ये का आणला हे आम्हांला न कळण्याजोग आहे. मा.महापौर साहेब, पर्यावरण अहवाल आपण केवळ छापायचा म्हणून छापतो का हेही या ठिकाणी आवर्जून सांगावस वाटतं. यामध्ये जे पहील पान लिहील आहे ते खरंतर आपली महानगरपालिका पर्यावरणाच्या संदर्भात काय करते याची कात्रण याठिकाणी लावायला पाहीजे होती. परंतु याठिकाणी पुणे महानगरपालिकेचे कात्रण लावलेली आहेत पुणे महानगरपालिका त्याठिकाणी पर्यावरणाच्या संदर्भात काय करते याचे जर आपण पहील्यापासून धडे घेतले असतेतर मला वाटत पर्यावरण अहवालावर आपल्याला बोलण्याची वेळच आली नसती. एक कात्रणतर डबल डबल छापलेल आहे. पान भरायचीच असेलतर मुल जी ड्रॉईंग काढतात त्यातली कात्रण जरी काढून लावली असतीतरी चाललं असतं. मा.महापौर साहेब, हा पैशाचा क्रिमीनल वेस्टेज आहे. करदात्या नागरीकांचे पैसे मनमानी पध्दतीने पर्यावरण विभागाचे अधिकारी उधळतात. त्यांना लोकांच्या पैशांच काहीही घेणदेण नाही. आपल मनोगत असेल, आयुक्तांच मनोगत असेल हे मनोगत मागच जे होत तेच पुढे लावलेल आहे नवीनतर काही केलेल नाही. जे जूने आहे तेच याठिकाणी परत शब्दाचा फेरफार करुन याठिकाणी सांगीतलेल आहे. मा.महापौर साहेब, शहरातील जल प्रदुषण पावसामुळे काहीतरी नियंत्रणात आहे अन्यत शहरातील पर्यावरण विभाग आणि जल प्रदुषणनिगडीत काही ठेकेदार या विभागाक्डे चरण्याच कुरण म्हणूनच पाहतात. केलेल्या उपाययोजना या केवळ, मला असं वाटत पर्यावरण विभागाच असं मत झालेल आहे की ज्याठिकाणी मलनिस्सारणाचे आपले प्रोजेक्ट चालू आहेत त्याच ठिकाणी फक्त जलप्रदुषण होते की काय असं पर्यावरण विभागाच मा.महापौर साहेब मत झालेल आहे. नागरिकांच्या जीवाशी हे लोक खेळतात. पर्यावरण विभागाला माहिती असल पाहीजे की ज्याठिकाणी मलनिस्सारणाच्या नलिका आहेत, ज्याठिकाणी आपले प्रोजेक्ट आहेत त्याठिकाणी जलप्रदुषण होत नसुन ते वेगवेगळया ठिकाणी खरतर त्यांनी पाण्याचे नमुने घ्यायला पाहीजे होते परंतु ते घेतले नाहीत. केवळ पाटया टाकायच काम करतात म्हणून मा.महापौर साहेब, मी पहीली मागणी करेल पर्यावरण विभागाच्या संजय कुलकर्णी यांना आपण डिसमीस केल पाहीजे. एवढ जर काम करण्याचा त्यांना त्रास होत असेलतर त्यांना आपण पर्यावरणाच अधिक्षक म्हणून नेमलेल आहे. मा.महापौर साहेब, याठिकाणी आपण पर्यावरणाच्या संदर्भातील सगळे मानांकन जर पाहीलीतर सगळी मानांकन पायदळी तुडवली गेलेले आहेत. पर्यावरण बिघडते की काय असा पर्यावरण विभागाचा समज झालेला आहे आणि त्याच ठिकाणी तुमचे घेतलेले नमुने याठिकाणी नमुद केलेले आहेत म्हणून असं वाटत की त्यांना एकदा आपण खरंतर परत एकदा शिक्षण घेण्यासाठी पाठवा, काही वर्षासाठी डिसमीस करा आणि त्यांचा पुर्ण अभ्यास होऊ दया आणि परत पालिकेमध्ये घ्या आणि त्यांच शिक्षण घेण्यासाठी

पालिकेचे पैसे खर्च करा. मा.महापौर साहेब, पाण्यामध्ये आढळणारे घटक, पाण्यात येऊन होणाऱ्या जलप्रदुषणावर कुठलीही उपाययोजना केलेली दिसत नाही. खरंतर पर्यावरण विभागाच्या या पुस्तकावर जर बोलायला लागलतर तीन चार तास कमी पडतील त्यातला काही सारांश सांगते. शहरातील विवीध तलाव असतील त्याठिकाणी पाण्याच प्रदुषण मनपाने अभ्यासलेल नाही. ज्याठिकाणी आपण कृत्रीम तलाव तयार केलेले आहेत, भोसरीमध्ये तलाव आहे याठिकाणी खरतर पाण्याचे नमुने तपासायला पाहीजे होते परंतु ते तपासले गेलेले नाहीत त्यांचा अकार्यक्षमपणा लपविण्यासाठी त्यांनी त्याठिकाणचे नमुने घेतले नाहीत असा माझा याठिकाणी स्पष्ट आरोप आहे. शहरातील जे ३५ नाले आहेत केवळ चार नाल्यामधील पाण्याचे नमुने मनपाने तपासलेले आहेत. सगळे नाले वेगवेगळया भागातून, वेगवेगळया दिशातून येतात, काही एमआयडीसी भागातून येतात. त्याठिकाणाहून होणार प्रदुषण वेगवेगळया प्रकारच असणार त्याची गंभीरता किती असणार आहे. ज्याठिकाणी सांडपाणी मिश्रण असेल त्याठिकाणचे प्रश्न गंभीर असणार आहेत. ३५ नाल्यापैकी केवळ ४ नाल्यांचे नमुने तपासून काय दिवे लावले आहेत यांनी. कशासाठी अहवाल याठिकाणी प्रसिध्द करतात. एकतर जुलै महीन्यामध्ये करायचातर करता ऑगष्ट महीन्यामध्ये आणि परत फुशारकीने सांगतात ३१ जुलै पुर्वी सभागृहापुढ आणणं बंधनकारक राहील आणि अहवाल ऑगष्टमध्ये आणतात, त्यांच्या त्यांच्यातच ताळमेळ नाही. मा.महापौर साहेब, खरंतर अशाप्रकारची ही नागरीकांची फसवणूक महानगरपालिकेच्या वतीने होते. महानगरपालिकेच्या वतीने अशी फसवणूक होत असेलतर नागरीकांनी कोणाच्या तोंडाकड बघायच. खरंतर या महानगरपालिकेचे हे करदाते नागरीक आहेत. पाण्यामधुन होणारे विवीध आजार असतील त्या आजारावरती जर पर्यावरण विभागाने योग्य तपासणी केली नाहीतर, त्या आजारावर काही केल नाहीतर त्यावरती डॉक्टर सुध्दा योग्य प्रकारचे उपचार करु शकणार नाहीत. एवढा गंभीर प्रकार असताना सुध्दा पर्यावरण विभाग याच्याकड दुर्लक्ष करत आणि आपण दरवर्षी तो अहवाल केवळ वाचायचा म्हणून वाचतो किंवा पास करायचा म्हणून करतो. मा.महापौर साहेब, पर्यावरण विभाग शहरातील जलप्रदुषण आणि जलप्रदुषके यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुर्णपणे अपयशी ठरलेले आहे मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने सद्स्थिती पर्यावरण अहवाल २०१५-१६ हा अमेरा बायोटेक प्रा.लि. या खाजगी कंपनीकडून करुन घेताना उपलब्ध केलेली आकडेवारी बघुन आश्चर्य होते की उपलब्ध आकडेवारी केवळ, ध्वनीप्रदुषण संदर्भात मा.महापौर साहेब, आपण ही आकडेवारी जर पाहीलीतर अमेरा बायोटेक प्रा.लि. या खाजगी कंपनीने घेतलेली आहे ती मा.महापौर साहेब, केवळ गणेश उत्सव आणि दिपावलीच्या काळातीलच आहे. मग शहरातील ध्वनिप्रदुषण फक्त एकाच धर्माच्या लोकांकडून ध्वनिप्रदुषण होत की काय आणि बाकीचे जे दहा आकरा महीने उरतात त्यामध्ये कुठलेच उत्सव होत नाहीत का. आयुक्त साहेब, खरच यांना शहरातील पर्यावरणाची काळजी आहे का. शहरातील जे जे नागरीक याठिकाणी

पर्यावरणाच्या संदर्भातील काम करतात त्यांची सुध्दा खिल्ली उडवली जाते. त्यांच सुध्दा कुठतरी मत घेण आवश्यक आहे. गणपती आणि दिपावलीच्या काळामध्ये मग गणपतीमध्ये दहा दिवस सांऊड सिस्टम लावतात म्हणून आणि दिपावलीमध्ये फटाक्याचा आवाज याच्या पलीकडे आपल्याकडे कुठलेही सण-उत्सव कुठल्याही जाती धर्माचे साजरे होत नाहीत? केवळ तुम्ही एखादया समाजाचे भांडण लावण्याचे काम करता. तुमच काम कमी करायच किंवा तुम्हांला फाईंडआऊट करण्याचा कंटाळा आहे म्हणून तुम्ही जर अशाप्रकारचा अहवाल सभागृहात सादर करणार असालतर मा.महापौर साहेब, मी तीव्र शब्दात पर्यावरण विभागाचा धिक्कार करते, त्यांचा निषेध नोंदविते. केवळ दोन पानांचा याठिकाणी त्यांनी उल्लेख केलेला आहे. इतका अक्षम्य हलगर्जीपणा, इतका निष्काळजीपणा, इतका नालायकपणा केवळ तोच विभाग करु शकतं. मा.महापौर साहेब, ध्वनि प्रदुषण विभागाने रिस्पॉन्स म्हणून जी केलेली कामे आहेत. कामे आणि पर्यावरण सद्स्थिती अहवालाची जाहीर आकडेवारी याचा काहीही संबंध नाही. कारण यांनी दोनच उत्सवाची याठिकाणी आकडेवारी घेतलेली आहे. केवळ त्यांचा आणि याचा आकडेवारीचा ताळमेळ जमुन येत नाही. कट, कॉपी, पेस्ट यावेळी सुध्दा आहे. खरतर मा.महापौर साहेब, खरंतर पर्यावरण विभाग ज्या ज्या ठिकाणी हॉस्पिटल आहेत त्या त्या ठिकाणी शांतता क्षेत्र घोषीत करुन आपल काम संपलय अस त्यांना वाटल की काय एवढयापुरतच मर्यादीत राहीलेल आहे. याच कारण असं आहे की हे त्याठिकाणी जाऊन आकडेवारी घेतच नाहीत. ध्वनि प्रदुषणाचे हॉर्न वाजवत असतील किंवा इतर काही शेजारी कारखाने असतील काय परिणाम रुग्णावरती होतो याच कुठेही त्यांनी या अहवालामध्ये नमुद केलेल नाही. मग शांतता क्षेत्र म्हणून त्याठिकाणी पाटया लावल्या त्या पाटयाच बील आदा केलं एवढयापुरत पर्यावरण विभाग त्याठिकाणी मर्यादीत राहीलेल आहे. आपल्या शहरामध्ये डॉ. आय्यरसर असताना, डॉ.श्रीकर परदेशी साहेब असताना ई-कच-याच्या संदर्भात आपण एक गाडी फिरवली होती. ई-कच-याची विल्हेवाट लावण खरंच कठीण आहे. मी मोबाईल वापरते ज्यावेळेस रिलायन्स पहील्यांदा आला तो पांढरा हॅण्डसेट तसाच अजून माझ्याकडे आहे. त्याच काय करु हे मला कळत नाही. त्यानंतर वेगवेगळे हॅण्डसेट घेतले ते अजून तसेच आहेत ते खराब झाल्यानंतर. खरंतर हा इतका प्रश्न गंभीर आहे की ते कुठे जमा करावेत हे आम्हांलाही कळत नाही. यासंदर्भात आपण एक त्यावेळेस गाडी फिरवली होती आणि त्यामध्ये जो तुमच्याकडचा ई-कचरा असेल तो जमा करा. त्यानंतर आपल्याकडे कुठलीही हालचाल झालेली नाही. आजही भंगारवाले ई-कचरा घेतात. मा.महापौर साहेब, त्यांच्याकडे काही वैधानीक पध्दतीने विल्हेवाट लावण्याची यंत्रणा नाही. त्यामुळे ते काय करतात याच्यावर आपल नियंत्रण नाही. आणि म्हणून वेगवेगळया आजाराच प्रमाण शहरामध्ये वाढतय याच्याकडे आपल पुर्णपणे दुर्लक्ष होत आहे. कारण की आपला पर्यावरण विभाग सक्षम नाही. आपल्या शेजारी हिंजवडी सारखा, तळवडे सारखा आयटी पार्क आलेला आहे. याच्यावरती विल्हेवाट लावण्यासाठी पर्यावरण

विभागाने काय यंत्रणा केलेली आहे याच आपल्याकडे उत्तर नाही. आणि मग आपल्याला दहा लाखाचा पुरस्कार मिळाला काय आणि दहा कोटीचा मिळाला काय, काय फरक पडतो. ज्या पुरस्काराचा आणि सर्वसामान्य नागरीकांचा कुठेही अर्थाअर्थी संबंध येत नाही त्या पुरस्काराचा काय संबंध आहे. पुरस्कार घेऊन काय करायच. आजही घरातला कॉम्प्यूटर कुठ टाकायचा कळत नसेल आणि तो जर आम्ही कच-याच्या गाडीत देत असूतर यातच सगळ आलनां. खरतर मा.महापौर साहेब, याठिकाणी कच-याच वर्गीकरण होणं इतक गरजेच आहे, आता गरजेच आहे का नाही, मग गरजेच नव्हत तर मागच्यावेळेस डस्टबीन का दिल्यात, कच-याच वर्गीकरणक करायला लावलं. एकीकडे ओला कचरा, सुखा कचरा वेगवेगळा झाला पाहीजे तसच आपण ई-कच-याच्या संदर्भात काहीतरी पाऊल उचलायला पाहीजे होते, ती आपल्याकडून उचलली गेली नाहीत. आणि मग साडेतीन हजार कोटीच बजेट असणारी महानगरपालिका ई-कच-यावरती आपण शुन्य काम करतो याची लाज सुध्दा पर्यावरण विभागाला वाटली पाहीजे आणि ती वाटत नाही याच मा.महापौर साहेब, दुःख आहे. मा.महापौर साहेब, खरंतर अशा या सगळया इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आहेत याच्यावरती प्रक्रीया करुन जर पुर्नरवापरात येतील का तर येऊ शकतात आणि त्या परत परत आणतात सुध्दा. इतर शहरात मोठमोठे त्याचे प्राजेक्ट आहेत आपल्याकडे ते नाहीत याकडे सुध्दा मामहापौर साहेब, आपण गांभीर्याने बघाव. मोशी येथील कचरा डेपो इंद्रायणी नदी किना-यापासून १.७५ कि.मी अंतरावरती असणारे, कुजत असणा-या कच-यामधुन बाहेर पडणारे द्रव्यप्रदुषके मोठया प्रमाणावर नाल्याव्दारे नदीपात्रात मिसळत असल्याने या भागातील पाणी पाऊस पडल्यानंतर मोठया प्रमाणात प्रदुषीत होत असल्याने जलप्रदुषणाच्या आकडेवारीवरुन समजते. खरतर ती आकडेवारी एवढी मोठी आहे मा.महापौर साहेब, याची आपल्याला प्रचंड गरज आहे किमान त्याच्यावरती सर्जरी तरी करता येईल. आपल कसं आहे जखम झालीतरी ती बांधून ठेवायची, पट्टीने बांधल्यामुळे ती जखम काही भरुन येत नाही. ती दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. याच कारण असं आहे मा.महापौर साहेब, त्याच्यावर योग्य प्रकारचे आपण औषध लावत नाहीत आणि ते औषध लावणं खरंतर पर्यावरण विभागाच काम आहे परंतु ते पर्यावरण विभाग करत नाही. संपुर्ण शहराचा किंवा गावाचा घनकचरा एकत्र गोळा करण्यापेक्षा त्याची अनेक छोटयाछोटया केंद्रावर विल्हेवाट लावण हे अधिक उपयुक्त ठरेल. एखादया वॉर्ड मध्ये जमा होणारा अजैवीक कचरा शहराच्या बाहेर टाकण्यापेक्षा त्याची त्याच वॉर्डमध्ये अधुनिक तंत्रज्ञान वापरुन जर विल्हेवाट लावता आलीतर मा.महापौर साहेब, यापेक्षा दुसर पुण्याच काम आपल्या साठी होणार नाही. आज प्रत्येकाच्या घरामध्ये टिव्ही आहे, कॉम्प्युटर आहे, मोबाईल आहेत वेगवेगळी इलेक्ट्रॉनिक्सची उपकरणं आहेत. त्याठिकाणी जर का तुम्ही आवाहन केल, वेगवेगळया कंपन्या बोलावल्यातर आणि त्यांना आपल्या महापालिका खर्चातून अशाप्रकारचे उपकेंद्र चालू करुन दिलेतरी मला असं वाटत ते वावग ठरणार नाही. ते नागरिकाच्या हिताच्या दृष्टिकोनातून असणार आहे, करदात्या

नागरिकांच्या पैशातून होणारा जो काही तो उपक्रम असेल मला वाटत त्यातून आपल्या शहराच प्रदुषण थांबवण्यास मदत होईल आणि मा.महापौर साहेब, आपण अशा प्रकारचे उपक्रम राबवावेत अशाप्रकारची मी विनंती करते. मा.महापौर साहेब, आपल्याकडे एकच कचरा डेपो आहे. नव्या प्रक्रीयेचा, नव्या प्रकारचा डेपो आपण आणला पाहीजे. किती दिवस एकाच मोशीच्या कचरा डेपोवर आपण भागवणार आहोत. आज त्या कचराडेपोमध्ये आपण गेलोतर जे लॅण्डफिलींग होतय मला वाटत या वर्षभरामध्ये कचरा डेपोमध्ये जागा सुध्दा राहणार नाही. त्याठिकाणी जी यंत्रणा काम करते, रोज येथून कचरा न्यायचा त्याच्यावर फवारणी करायची, खड्डा खोदायचा खाली जाळी टाकायची आणि सांगतात आम्ही जैविक पध्दतीने जिरवतो म्हणून आपण जैविक हा शब्द वापरायचा. कारण तो जर जैविक असतातर मा.महापौर साहेब, आमच्या इंद्रायणीनगरला सोसायटयापर्यंत जलवायु विहार पर्यंत त्याचा वासच आला नसता. पाऊस जर पडला आणि एखादयाच्या घरात तुम्ही गेला आणि पाणी प्यायला घेतलतर त्या पाण्यामध्ये सुध्दा तसाच वास येतो त्या कच-याचा. मग जैविक कशाला म्हणतात मला माहित नाही. खरंतर माझ त्याविषायी अज्ञान असेल म्हणून मला ते कळत नसेल परंतु एवढतर नक्कीच कळतं की त्याठिकाणी वास आला नाही पाहीजे यासाठी काय करता येईल ते करा. खरतर मा.महापौर साहेब, किंतीही प्रक्रीया केलीतरी काही प्रमाणात काही कचरा हा उरतो. मग त्याला जर का तुमच्या शास्त्रीय भाषेमध्ये जैविक पध्दतीने जर जाळता आलातर ते उत्तम होईल. आता जो कचराडेपो आहे तो पुर्णपणे अशास्त्रीय पध्दतीने बांधलेला आहे. शास्त्रीय पध्दतीने नवीन कचरा डेपो आपण बांधुन आजुबाजूच्या परिसराला त्याचा परिणाम होणार नाही याची सुध्दा काळजी घेणं आपलच काम आहे नव्हेतर ते आपलं अद्य कर्तव्य आहे. त्या कच-याचा आपल्याला विसर पडलेला आहे. मा.महापौर साहेब, पर्यावरण अहवालामध्ये शहरभरामध्ये शंभर मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्या सर्रास विक्री चालू आहे. २००७ ला मी नवीन नगरसेवक झाल्यानंतर त्यावेळेस मला आठवत की डॉ.नागकुमार साहेबांनी स्वत: पिंपरी मार्केटमध्ये वेगवेगळया भागात फिरुन त्यांनी या पिशव्या जप्त केल्या होत्या, कारवाई केली होती आणि काही दिवसानंतर त्या बंद झाल्या होत्या. परंतु आता त्या चालू आहेत आपल्या पालिकेच्या अधिका-यांना उन्हात फिरलतर रंग काळा पडेल याची त्यांना भीती वाटते ते कुठच जात नाहीत. कधीही गेलतर केबीनलाच बसून असतात. दोन-चार चमचे असतात, अकबर, बीलबरचा सगळा प्रकार तीकडे चालू असतो. ते पाहील्यानंतर इतका संताप येतो. कधीतरी जाव, साईडवरती जाऊन बघाव कारण त्या पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या आहेत का नाहीत हे बघीतल का. आता माझ्या बरोबर चला मी तुम्हांला दाखविते. खोट काम करायच पण रेटून बोलायचं. मा.महापौर साहेब, प्लॅस्टिक कचरा व्यावस्थापना बाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच अवमान होत असून पर्यावरण रक्षण कायदा १९८६ वायूप्रदुषण नियंत्रण कायदा १९७४ व प्लॅस्टिक कचरा व्यावस्थापन व हाताळणी नियम २०११ च्या

तरतूदीचे मोठया प्रमाणात उल्लंघन होते. मला असे वाटते की ज्या दिवशी एखादी याच्या बद्दल परत एक रिट दाखल होईल. जोपर्यंत आपल्याला दंड लागणार नाही तोपर्यंत आपण जागेवर येणार नाहीत. आपण वाट बघतो की काय असं मला वाटायला लागल आहे. मा.महापौर साहेब, दैनंदिन ५५० मेट्रीक टन एवढया कच-याची आपण लॅण्ड फिलींग करतो. महापालिकेच्या सद्यस्थिती पर्यावरण अहवालात प्रदुषणाचा उल्लेख नाही ही चिंतेची बाब आहे. पर्यावरण अहवाल म्हणजे काय? पर्यावरण अहवालामधे जर प्रदुषणातला आकडाच जर आपण नमुद करत नसुतर हा अहवाल फेक आहे, खोटा आहे आणि हा तुमच्या आमच्या जीवाशी खेळणारा आहे म्हणून मी या अहवालाचा निषेध करते. असा अहवाल तयार करणा-या अधिका-यांचा पण मी कडक शब्दात निषेध करते. प्रदुषण आहे हे मान्य करायलाच जर ते तयार नसतीलतर तो कचरा डेपो बंद करून टाका, लागु दयानां नागरीकांच्या घराजवळ कच-याचे ढिग. जर तुम्हांला तुमच्या पर्यावरण अहवालामध्ये प्रदुषण होतय हे मान्य करायच नसेल आणि खोट बोलायच असेलतर तो अहवाल सुध्दा प्रसिध्द करु नका आणि त्याच्यावर पैसे खर्च करु नका. मा.महापौर साहेब, या पर्यावरण अहवालाची जितकी निंदा करावी, जिंतका निषेध करावा तेवढा तो कमी आहे. मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या खरंतर झपाटयाने वाढते आहे. मागील दशकात ५५ टक्के लोकसंख्या या शहराची वाढलेली आहे. याचाच अर्थ लोकसंख्या वाढीचा दर सरासरी साडेपाच टक्के इतका आहे. पिंपरी चिंचवड सद्यस्थिती पर्यावरण अहवालानुसार २०१५-१६ या वर्षाची शहराची लोकसंख्या २० लाख इतकी गृहीत धरली असून २०३० पर्यंत शहर ३० लाख लोकसंख्या पार करणार आहे. लोकसंख्येच्या झालेल्या व होणा-या सदरच्या वाढीमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीवर याचा निश्चितच ताण होणार आहे. भविष्यात नियोजन करण्यात मनपा प्रशासन ढिलाई करत राहील्यास ताण वाढणार आहे. सद्स्थितीस शहरी घणकचरा व्यावस्थापन आरोग्य विषयक समस्या वाढत आहेत. लोकसंख्येची घणता वाढल्यानंतर संसर्गजन्य रोगाच्या प्रमाणात वाढ होत असल्याची बाब पर्यावरण सद्स्थिती अहवालामध्ये नमुद करण्यात आलेली आहे. पाणी, ध्वनि व वायुप्रदुषणामुळे आरोग्यावर घातक परिणाम होऊन नागरीकांची प्रतिकार शक्ती खालावत असल्याची कबुलीच अहवालामध्ये देण्यात आली आहे. सन २०१४-१५ च्या तुलनेत जलप्रदुषण, वायुप्रदुषण प्रदुषणाने बाधित होणा-या रुग्णांचे प्रमाण वाढल्याची कबुली देखील पर्यावरण सद्स्थिती अहवालामध्ये देण्यात आलेली आहे. परंतु मा.महापौर साहेब, त्यावरती उपाययोजना काय. ठिक आहे आम्ही याच्यावर टिका करतोय किंवा त्यांनी सुध्दा सांगीतल आहे. परंतु त्याच्यावरती आपण उपाययोजना काय करतो हे जोपर्यंत सांगत नाहीत तोपर्यंत तो पर्यावरण अहवाल पुर्ण होत नाही. मग त्यासाठी कुठल्या यंत्रणा आपण राबवतो. उघडयावरती शौचालयास बसु नये यावरती जाहीराती सोडल्या, मनपा म्हणून तुम्हीजर वेगवेगळया भागामध्ये पथनाटय असतील, छोटया छोटया तीन-तीन मिनीटाच्या व्हिडओ क्लिप असतील, चित्रफीत असतील या जर तुम्ही

नागरिकांपर्यंत, सोसायटयामध्ये पोहचविल्यातर मला वाटत जास्तीत जास्त लोक याचा वापर करतील किंवा तुमचा कचरा तुम्हीच जिरवा. मा.महापौर साहेब, काही सोसायटयांना आपण बंधनकारक करणं, आपल्या डीसी रुलमध्ये सुध्दा आपण बंधनकारक केलं होतं की शंभर टक्के ज्याचा फ्लॅट असेल त्यांचा स्वतःचा ज्याठिकाणी कचरा निर्माण होईल त्याच ठिकाणी तो जिरवण्याचा उपक्रम राबवला गेला पाहीजे अशी आपण डीसी रुलमध्ये तरतूद केलेली आहे. मैला शुध्दीकरण प्रकल्प सुध्दा त्यांचा असला पाहीजे याची सुध्दा डीसी रुलमध्ये तरतूद आहे तरतूदीच सर्रास उल्लंघन, आपल्या येथे झालेल असताना त्याची काळजी आपल्या परवाना विभागाने घेतलेली नाही, बांधकाम विभागाने घेतलेली नाही आणि पर्यायाने त्याचा ताण जो आपण सर्वसामान्य नागरीकांसाठी उपक्रम राबवतो त्यावर येतो. मा.महापौर साहेब, पर्यावरण विभागावरती बोलाव तेवढ कमी आहे. परंतु पर्यावरण अहवालाला केलेला उशिर, त्यांनी दिलेली कबुली, त्यावरती न केलेल्या उपाययोजना या सगळयांचा मी याठिकाणी धिक्कार करते, थांबते. जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पर्यावरण अहवाला संदर्भात विषय आलेला आहे. वास्तविक पाहता पर्यावरणाचे कुलकर्णी याठिकाणी नाहीत. आपण आपल्या मागणीनुसार जैव विवीध कमिटीचे काही सदस्य निवडले होते. सदस्य निवडल्यानंतर तीन महीन्यात त्याची मिटींग घ्यायची ठरली. आम्ही ब-याच जणांनी प्रयत्न केले, माहीती घेतली, चौकशी केली पर्यावरण संदर्भात, पर्यावरण विषयावरती काम करण्यासंदर्भात आम्ही मनापासून लक्ष घालण्याचा प्रयत्न केला. परंतु कुलकर्णी हे स्वतःचच डिपार्टमेंट आहे अशा पध्दतीने वागतात. कुठल्याच गोष्टीची कल्पना देत नाहीत, मधल्या काळामध्ये नदीसुधार योजना, आपल्याला नदीच्या संदर्भात माहिती घ्यायची होती, पाहणी करायची होती. कुलकर्णी साहेबांना सांगीतल होतं की त्या नदीला किती नाले जोडलेले आहेत त्यातून घाण पाणी नदीला येतं. त्यासाठी आपल्याला ट्रिटमेंट प्लॅन्ट कुठ करता येईल का. यासंदर्भात त्यांच्याकडून मी माहीती मागवली होती. त्याठिकाणी व्हिजीट दयायचीतर आमचे भोंडवे साहेब, चेअरमन, झामाताई बारणे, आर.एस.कुमार, राजू मिसाळ, अपर्णाताई डोके या आम्ही सर्वानी वेळोवेळी त्यांच्याशी पाठपुरावा केला पण त्यांनी सांगीतल माझा आणि जैव विवीध कमिटीचा काहीही संबंध नाही. जैव विवीध कमिटी म्हणजे पर्यावरणाचा विषय असतो आणि पर्यावरणाचा विषय असल्यानंतर त्यांनी आम्हांला डायरेक्ट सांगीतल माझा काहीही संबंध नाही. मला सांगा दुस-या मजल्यावरती एवढ मोठ ऑफीस केलेलं आहे त्याठिकाणी शिपाई आहे, चेअरमनला गाडी दिलेली आहे आणि काम पाहीलतर आमच काय झिरो काम आहे नुसती नावाला दिली का कमिटी. पर्यावरणाच्या संदर्भामध्ये आज मी ज्या भागात राहतो त्या भागामध्ये देहूरोड कॅन्टोन्मेंटचा कचरा त्याठिकाणी पडतो त्यामुळे प्रदुषण इतक होतं आहे की त्याठिकाणच्या लोकांना राहणं मुश्किल झालेल आहे. लोक आजारी पडलेले आहेत त्यासंदर्भात देखील मागे

मिटींग घेतली. त्याठिकाणी देखील कुलकर्णी साहेबांनी हात वर केले. मा.महापौर साहेब, त्यांना जर काम करायच नाहीतर सस्पेन्ड करुन टाकानां. पर्यावरणाचा अहवाल छापलेला आहे, जैव विवीधताच्या संदर्भात त्याठिकाणी आम्हांला काहीही कल्पना नाही. परस्पर मनमानी कारभार चाललेला आहे. नदीमध्ये जलपर्णी वाढतात त्याच मुळ कारण आपलं ड्रेनेज त्या नदीला जोडलेले आहे. साईडचे दोन नाले बाहेरची बाहेर काढलेतर कासारवाडी जलशुदीकरण केंद्र आहे त्याठिकाणी आपण फिल्टर करु शकतो. पण या कुठल्याही गोष्टीच त्यांना देणंघेणं नाही. कचरा डेपोमध्ये पाहीलतर काही जागा बीव्हिजीला देऊन ठेवलेल्या आहेत. त्याठिकाणी त्याच्यावर विजनिर्मीती करणं, ऑईल काढणं, पेट्रोल काढणं काही नाही, आज आम्ही कमिटीवर आहेत दोन मिटींग आतापर्यंत झाल्या असतील. आजपर्यंत मिटींगच्या संदर्भात आम्ही वेळोवेळी सांगतो त्याच काहीही उत्तर देत नाहीत, मिटींगा घेत नाहीत. ही जैव विवीधता कमिटी बरखास्त करुन टाका, मा.महापौर. केंद्रसरकारने आणि राज्यसरकारने ज्या आपल्याला सुचना दिल्या की आपल्या महापालिकेमध्ये जैव विवीधता कमिटी अस्तित्वात आली पाहीजे. जेणेकरुन आपल्या भागातील पक्षी असतील, मासे असतील, झाड असतील यासंदर्भातील डिटेल आपल्याला माहीती पाहीजे. ती गोळा करण्यासंदर्भात चौकशी केली, माहीती घेतली आम्हांला कुठल्याही प्रकारचा रिस्पॉन्स मिळत नाही. मी याठिकाणी पर्यावरण विभागाच्या कुलकर्णीचा निषेध करतो आणि आमची जैव विवीधता कमिटी बरखास्त करावी अशी विनंती करतो.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, अनुमोदन देते.

**मा.शमिम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पर्यावरण बद्दल मागच्या वर्षीही चर्चा केलेली आहे. पुन्हा दरवर्षा प्रमाणे हा अहवाल आलेला आहे. आता काही सन्मानीयांनी या बद्दल विचार व्यक्त केले. पण पर्यावरण आणि त्यांच प्रदुषण म्हणल की जलप्रदुषणाचा मोठया प्रमाणात विचार केला जातो. महापालिकेकडून प्रयत्न होतात. शंभर टक्के ते प्रयत्न करतात, शंभर टक्के आपल प्रदुषण उत्तम आहे असंही म्हणता येत नाही पण काहीच करत नाहीत असंही म्हणता येत नाही. आपल्याकडे एवढया मोठया प्रमाणात एसटीपी आहेत जे मलशुध्दीकरणाचे प्रकल्प आहेत त्यामधुन मोठया प्रमाणामध्ये आपण हे प्रदुषण रोखतो. मी माहीती घेतली त्यानुसार ८० टक्के पाण्याच आपण एसटीपी मध्ये शुध्दीकरण करतो आणि २० टक्के पाणी असंच नदीमध्ये सोडल जातं. मला याठिकाणी सन्मा.सभागृहाला एक विनंती करायची आहे की, आपण महापालिकेतच प्रशासनान काय केल एवढ पाहतो. हे २० टक्के पाणी जे आहे ते कुठून येतं. एमआयडीसीच रसायनमिश्रीत पाणी असतं ते पाणी कुठ जात. एमआयडीसीचे असे किती प्रोजेक्ट आहेत की ते त्यांनी पाणी शुध्द करुन मगच नदीत सोडाव. एमआयडीसी म्हणजेच महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र शासन याबाबत अजीबात जागृत नाही. अजीबात काहीही करत नाही असं आपल्याला म्हणाव लागेल आणि म्हणून नदी प्रदुषीत होते असा माझा आरोप आहे. आपण याठिकाणी ध्वनि प्रदुषणाबद्दल दिलेल आहे. एमपीसीबी

ही जी संस्था आहे यांच्याकडे ध्वनि प्रदुषणाचे अधिकार दिलेले आहेत आणि शासनाने पोलीसानाही अधिकार दिलेले आहेत की ध्वनि प्रदुषण कुठ मोठया प्रमाणावर होतं तरी त्यांना त्यावर कारवाई करण्याचे अधिकार दिलेले आहेत. म्हणजे महाराष्ट्र शासनाने प्रदुषणाच्या बाबतीत किंवा पर्यावरणाच्या बाबतीमध्ये जी याठिकाणी उदासीनता दाखवली आहे त्याकडे मी मा.सभागृहाच लक्ष वेधु इच्छिते एवढच सांगते आपल काम खर म्हणजे शंभर टक्के चांगल आहे असं मला मुळीच म्हणायच नाही. सगळयात महत्वाच म्हणजे प्लॅस्टिककडे आपल जे दुर्लक्ष झालेल आहे ते अक्षम्य असं आहे त्याबाबतीत आपल्या प्रशासनाने लक्ष दयाव. जलप्रदुषणात मागच्यावेळेस जी चर्चा झालेली आहे त्या प्रमाणात यावेळेस झालेली नाही. मागच्यावेळेस खुपच अभ्यास पुर्ण अशी चर्चा झालेली होती आता मात्र आपल्या विभागाने नदीच्या उगमापासून तर शेवटपर्यंत पिंपरी चिंचवडच्या हद्दीमध्ये त्यांनी पाण्याचे सँपल घेतलेले आहेत. म्हणजे काम होतय परंतु एमआयडीसी कडून जे दुर्लक्ष होतय त्याबाबतीत आपल्याला काही करता येतय का ते पहाव एवढच याठिकाणी सांगते.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पर्यावरण विभागाने जो अहवाल दिलेला आहे तो फॅब्रीकेटेड बोगस अहवाल आहे. कचरा डेपोमध्ये पेट्रोल निर्माण करायच २००७-२००८ मध्ये आपण कॉन्ट्रॅक्ट दिलं होतं. त्याच काय झाल. मला नाही वाटत आपल्याला पेट्रोलचा सप्लाय मिळाला. करोडो रुपये पाण्यामध्ये गेले. दोन एक्कर जागा दिली होती तेही कुठ गेल ते म्हणतात माहिती नाही. त्यानंतर हैद्राबादच्या एका पार्टीला काम दिलेल होतं तेही काय परिस्थितीमध्ये आहे हे माहिती नाही. पर्यावरण विभागाला काम आणि इन्फ्रास्ट्रक्चर आहे का. किती लोक आहेत हे सांगावे. पर्यावरण सारख्या महत्वाच्या विषयाकडे प्रशासनाच आणि कमीशनरांच निग्लीजेस आहे. पर्यावरणाचा कुठलाही प्रोजेक्ट बघा भ्रष्टाचार आहेतच. अनेक भ्रष्टाचार आले, नजीकच बघायच झालतर गॅस शव दाहीनी काय झालहो त्याच. एक बसवले त्यात भ्रष्टाचार आहे म्हणून अहवालामध्ये सांगीतल, पाच बसवणार तोही अहवाल दयायला पाहीजे होता तो दिलेला नाही. अहवाला बद्दल पेपरमध्ये आलेल आहे त्याच्यामध्येही काय भ्रष्टाचार झालेला आहे ते दिलेल आहे. वर्कऑर्डर दिली असतीतर किती कोटी रुपयाचा भ्रष्टाचार झाला असता. मग या डिपार्टमेंटला महत्व का मिळत नाही. बिल्डींग परमीशनला कसं महत्व मिळत. स्थापत्याला कसं महत्व मिळतं. या कमिटीला महत्व मिळत नाही. या कमिटीकडे सर्वांचे दुर्लक्ष आहे आणि म्हणून रिपोर्टमध्ये प्रत्येक पेजमध्ये जे काही मेन्शन केलेल आहे ते फॅब्रीकेटेड फिगर आहेत. त्यामुळे या रिपोर्ट बद्दल परत अभ्यास करायला सांगा आणि खरी परिस्थिती आमच्या समोर आणायला सांगा. आता तानाजी खाडे यांनी सांगीतल जैव विवीधता समितीची निर्मीती झाली. एकदम पॉश केबीन, ऍण्टी चेंबर, फर्निचर, टेलिफोन सगळ दिलं. काय झाल त्या कमिटीमध्ये कामकाज चालू आहे, मलाही त्या कमिटीचा नंतर मेंबर केलं. चेअरमन येतात, पहील्या दोन तीन महीने त्या कमिटीला कोण अधिकारी

दिला हे माहिती नाही. कुलकर्णी साहेबांना दिले ते घ्यायला तयार नव्हते नंतर नवीन कमीशनर आल्यानंतर घेतो म्हणले. पर्यावरण आणि ही कमिटी इन्टरलींक आहे. जर त्या कमिटीमध्ये पर्यावरणाबद्दल प्रश्न विचारलेतर कुलकर्णी साहेबांच उत्तर असायच की ही कमिटी पर्यावरणाची कमिटी नाही. मग हे विषय पर्यावरणाशी रिलेटेड आहेत हे मात्र तेवढच खरं आहे. मग या कमिटीला सेंट्रल गव्हर्मेंट आणि स्टेट गव्हर्मेंटन जेवढ महत्व देवून ही कमिटी निर्माण करायला सांगीतल पण या कमिटीमध्ये कामकाज झिरो आहे याच्याकडे कमीशनर, ॲडीशनल कमीशनर कोणाचे लक्ष नाही. ॲक्च्युली या कमिटीमधुन काही मिळत नाही. यामध्ये प्रशासनाचा इन्ट्रेस्ट नसतो. परंतु या कमिटीच महत्व ओळखून कामकाज व्यवस्थीत चालवायला पाहीजे. आतातरी हे लक्षात घ्या आणि हे पाच वर्षेतर संपल पुढे नवीन कमिटी येणार त्या कमिटीला शाखाधिकारी दया, इन्फ्रास्ट्रक्चर दया. एक माणुस तुम्ही पर्यावरणसाठी अपॉईंट करणार. त्यांच कामकाजावर लक्ष आहे का. स्थापत्यावर लक्ष आहे, बिल्डींग परमीशनवर लक्ष आहे. या कमिटीवरती मात्र लक्ष नाही आणि म्हणून पर्यावरण ईज द फ्लॉप शो. जर जैव विवीधतेमध्ये पर्यावरण नाहीतर पर्यावरणाची सेप्रेट कमिटी करा आणि त्या कमिटीला स्टाफ घ्या अन्यत: पर्यावरण पर्यावरण आपण बोलणार आहोत काहीही होणार नाही. आमच्याकडे प्राधिकरणामध्ये गणेश तलाव येऊन बघा. तो कशा परिस्थितीमध्ये आहे. कचरा साठलेला आहे. शेजारच गार्डन आपण बीव्हिजीला चालवायला दिलं. गार्डन डिपार्टमेंटला सांगीतलतर म्हणतात गणेश तलाव आमच्याकडे नाही. स्थापत्याला सांगीतलतर म्हणतात गणेश तलाव आमच्याकडे नाही. आरोग्याला विचारलतर ते म्हणतात गार्डन डिपार्टमेंटकडे देखभालीसाठी आहे. मग तो गणेश तलाव कोण साफसफाई करणार. त्या डिपार्टमेंटला पत्र लिहीलतर कोणी उत्तर देत नाही. मी आयुक्तांना विनंती करतो वीर सावरकर उदयान बीव्हिजी देखभाल करते तशी गणेश तलावाची जबाबदार त्यांच्याकडे आहे का नाही. त्या ॲग्रीमेंटमध्ये आहे का नाही. असेलतर त्यांना साफसफाई करायला सांगा. अन्यत: आरोग्य हे साफसफाई करणार का नाही हे सांगा. निगडीमध्ये ओटा स्किमच्या शेजारी कॅण्टोण्मेंटचा एक कचरा डेपो आहे त्या डेपोमध्ये महिन्यातून एकदातरी आग लागते आणि  एकदा आग लागली की ती प्राधिकरण, आकुर्डी रेल्वे स्टेशन पर्यंत त्याचा त्रास होतो. आपल फायरब्रीगेड जातं ते आग बुजवत सगळ होतं. पण ही आग लागल्यानंतर आम्हांला प्राधिकरण मध्ये एवढा त्रास होत असेलतर ओटा स्किम मध्ये त्या लोकांना किती त्रास होत असेल याचा विचार करा. हे पर्यावरणमध्ये येत नाही का. तुम्ही म्हणणार कॅण्टोन्मेंट बोर्ड कडे आहे. पण कॅण्टोन्मेंट बोर्डला तुम्ही सांगायला पाहीजे. आपल्या रहिवाशाना याबद्दल त्रास होतो, किती वेळा प्रशासनाला याबद्दल सांगीतलं. मला असं वाटत आधिकारी लोकांना तुम्ही शिफ्ट करत राहा. काही वर्षे पर्यावरणमध्ये काम करायलाच पाहीजे. जसं पाणीपुरवठयामध्ये तुम्ही नवीन ईंजिनीअर अपॉईंट केल, पाच वर्षे पाणीपुरवठयामध्ये काम

करायलाच पाहीजे असच काहीतरी कम्प्लशन ठेवा. पर्यावरण विभागाने जे काही कामकाज करायला पाहीजे त्याकडे लक्ष दया एवढीच विनंती करतो.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पर्यावरणाच्या या चर्चेमध्ये अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत त्याच पर्यावरणाला धरुन मी थेरगाव मधला विषय सांगते. थेरगावमध्ये अशी परिस्थिती आहे, पर्यावरण, स्वच्छता मोहीम आपण राबवतो परंतु थेरगावामध्ये अशी परिस्थिती आहे की स्मशानभुमीकडे जाताना, थेरगाव गावठाण हा परिसर अक्षरश: खेडेगावच्या पलीकडचा आहे. काही खेडेगावलातरी स्वच्छतेमध्ये पुरस्कार मिळालेले आहेत परंतु आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या या भागामध्ये थेरगाव गावठाण परिसर हा स्वच्छतेच्या बाबतीत एवढा मागे आहे. अशी परिस्थिती आहे की स.नं. ९ महापालिकेचा ताबा आहे, गायरानाची जागा आहे परंतु त्याठिकाणी कचरा डंपींग करतात त्यामधील त्या प्लॅस्टीकच्या पिशव्या, कागद त्या परिसरामध्ये एवढी दुर्गंधी असते त्या परिसरातल्या सोसायटयामध्ये, गावातल्या गावठाणामध्ये या दुर्गंधीचा परिणाम त्यांच्या आरोग्यावरती किती प्रमाणामध्ये होत असेल याची प्रशासनाला काही काळजी नाही. स्मशानभुमीला जाताना उघडयावरती शौचालयाला बसलेले असतात त्या उघडयावरची घाण असते. कोणाची मयत झालेली असेलतरच त्या रस्त्याची सफाई झालेली असते. त्याठिकाणी अनेक बाहेरगावची लोक येणार आणि अशी दुर्गंधी. इतर वेळेला स्वच्छता होत नाही. कचरा डंपींग केल्यानंतर पाऊसामध्ये त्याची दुर्गंधी येते तेथून जायच म्हणलतर लोक नाक दाबुन जात असतात. स्मशानभूमीच्या तेथे सुध्दा स्वच्छतागृह पाहीजे. कारण तेथे लोकांना बाहेर उघडयावरती जाव लागतं. काही वयस्कर लोक असतात मयतीच्यावेळेस त्यांना दोन-दोन आडीच आडीच तास तेथं बसाव लागतं. प्रशासन म्हणतं प्रोसीजर चालू आहे. करणार आहे, कधी करणार आहे, पाच वर्षे आमची संपली. थेरगाव परिसरामध्ये स्वच्छतेच्या बाबतीत आपल्या प्रशासनाचा निष्काळजीपणा आहे. त्याठिकाणी आरोग्याच ऑफीस आहे पण त्याचा काही उपयोग नाही. त्याठिकाणी जे कोण अधिकारी आरोग्याचे असतील त्यांनी त्याची दखल घ्यावी. व त्याठिकाणी चांगल्या पध्दतीने स्वच्छता मोहीम राबवली पाहीजे. महीन्यानी किंवा चार महीन्यांनी जरी स्वच्छता केलीतरी चांगल होईल. आम्ही किती पाठपुरावा करायचा. जनावरामाग वळवायला जसं काठी घेवून जाव लागत तस त्या आरोग्याच्या लोकांच्या माग लागाव लागत. मी अनेकवेळा हा प्रश्न मांडलेला आहे परंतु काहीही कारवाई होत नाही. आरोग्याच्या लोकांची जबाबदारी नाही का, नगरसेवकांनीच पाठपुरावा केला पाहीजे का. आताच कुमार साहेबांनी जे सांगीतल पर्यावरणामध्ये न माहीती होता आम्हांला त्या कमिटीमध्ये घेतलं. ती नुसती नावाला कमिटी आहे. पर्यावरणा विषयी काही आम्हांला विचारलतर त्याची मिटींगच झाली नाहीतर माहिती कुठून मिळणार आहे. अशी नुसती नावाला ती कमिटी राहीलेली आहे. आताच तानाजी खाडे यांनी निषेध केलेला आहे त्याला मी अनुमोदन दिलेल आहे. खरोखर

कमिटीचा काही उपयोगच झालेला नाही, एक दोन मिटींगमध्ये कुठली माहिती मिळणार आहे. त्या मिटींगला कोणी अधिकारी नसते त्यामुळे त्याची काही माहितीच नसते. म्हणून ही कमिटी बरखास्त करावी असे मी सांगू इच्छिते. थेरगाव गावठाणामध्ये त्या कच-याची विल्हेवाट कुठतरी बाजूला झाली पाहीजे. त्याठिकाणी कचरा डंपींग करायच नाही एवढच मी याठिकाणी सांगू इच्छिते.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण)** **-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये बायोडायव्हरसिटी ॲक्टनुसार बायोडायव्हरसिटी कमिटी स्थापन करण्यात आलेली आहे. मा.महापौरांनी ती समिती स्थापन केलेली असून त्यात सदस्य निवड केलेली आहे. बायोडायव्हरसिटी कमिटीचे अधिकार काय, वैशिष्टये काय आणि कर्तव्य काय याबाबत महाराष्ट्र शासनाच्या तज्ञ सल्लागाराकडून सर्व माहिती समितीला देण्यात आलेली आहे. पहील्या समितीला स्वत: मा.आयुक्त साहेब होते आणि नंतरच्या दोन मिटींग झालेल्या आहेत त्यानुसार शहरातील विवीध विषयातील तज्ञ सल्लागार सात निर्णयाची प्रक्रीया आपण केली सातपैकी जे अर्ज आले होते ते समिती समोर त्यांच सादरीकरण झाल्यानंतर त्या सल्लागारांची नेमणुक केलेली आहे. यामध्ये फक्त बायोडायव्हरसिटी रजिस्टर मेन्टेन करणे आणि या परिसरातील जी जैव विवीधता आहे ते संवर्धन करण्यासाठी त्याच रेकॉर्ड करुन ठेवणं आणि त्याच रजिस्टर मेन्टेन करणं एवढ मर्यादीत त्या कमिटीच काम आहे. त्यानुसार आपण कार्यवाही केलेली आहे आणि सल्लागारांना नेमलेल आहे. पुढे ते रजिस्ट्रर मेन्टेन करण्याच काम आपण करणार आहेत.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. कमिटीला अस्तित्वात येऊन एक वर्षे झालं. तीन महीन्यातून एकदा कमिटी मिटींग घ्यायची, दोन मिटींगा झालेल्या आहेत.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण)** **-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महाराष्ट्र शासनाचे जे सल्लागार आहेत, तज्ञ आहेत त्यांनी येऊन कमिटी समोर प्रेझेन्टेशन दिलं होतं. त्यानुसार पुढच्या आपण दोन मिटींग घेतल्या. त्यानंतर त्यांचे सल्लागारांचे अर्ज मागवले त्यानंतर त्यांच्या मुलाखती झाल्या त्यांच प्रेझेन्टेशन झाल आणि सल्लागारांची नेमणुक पण झालेली आहे. त्या कमिटीचे चेअरमन मा.मोरेश्वर भोंडवे आहेत.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. एक वर्षे झाले कमिटी अस्तित्वात येऊन दोन मिटींगा झाल्या त्याच्यानंतर आपण म्हणल होतं की नदी पाहणी करायची आहे. नदीमधील माशासंदर्भात तो विषय होता. नदीतील जलपर्णीचा विषय होता. या सगळया गोष्टी संदर्भात आपली एक पाहणी करायच ठरलं होतं. त्या पाहणीच काय झालं.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपण सल्लागार नेमलेले आहेत, मासे किंवा वनस्पतीतलेच सल्लागार नेमलेले आहेत. ती नेमणुक झाल्याच्यानंतर आपण सगळयांच्या बरोबर पाहणी करणार होतो. त्याची आपण मिटींग पण लावली होती पण नंतर आचारसंहिता लागल्यामुळे या कमिटीची पुढची मिटींग झाली नाही. मा.आयुक्त साहेबांनी बोलवून सांगीतलेल होत तुमच्या लेव्हलला मिटींग घ्या. त्यानंतर आपण मिटींग ठरवली होती परंतु नंतर आचारसंहिता लागल्यामुळे आपली मिटींग झाली नाही.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आचारसंहिता कधी लागली होती.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. ज्यावेळेस मिटींग ठरवली होती त्यावेळेस आचारसंहिता लागली होती. मी जैव विवीधता समितीचा सचिव नाही.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मा.महापौर हाच विषय तुम्हांला, सभागृहाला ऐकवायचा होता. त्यांनी त्यांच आंग काढून घेतल त्यांचा काही संबंध नाही. जैव विवीधता कमिटी केलेली आहे, कमिटीस गाडी दिलेली आहे, ऑफिस दिलेलं आहे सर्व दिलेल आहे. काम काय करायच आम्ही. आम्हांला पत्रकार विचारतात जैव विवीधता कमिटीमध्ये काय ठरवल, काय धोरण घेतलं. आम्ही काय उत्तर दयायच. पर्यावरण आणि जैव विवीधता वेगवेगळ आहे. जैवविवीधता आणि पर्यांवरणाचा संबंध आहे का.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पर्यांवरणामध्ये बरेच विषय येतात पण सर्व विषय महानगरपालिकेत पर्यावरण विषया मध्ये येणारे विषय, विषयामध्ये कंट्रोल करण्यासाठी बरेच विभाग आहेत. घनकचरा आरोग्य विभागाकडे आहे, जलनिस्सारण ड्रेनेज विभागाकडे आहे. पर्यावरण सद्स्थिती अहवालामध्ये फक्त आपण वीस-एक डिपार्टमेंटकडून माहिती घेवून सद्स्थिती काय आहे प्रत्येकाची याबद्दलची माहिती पर्यावरण सद्स्थिती अहवालामध्ये घेतो. पण प्रत्येक विभागावर पर्यावरण विभागाच नियंत्रण नाही.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खुप चर्चा झाली, सभागृहाची धुळफेक आयुक्तांसमोर कुलकर्णी साहेब आपण गेलो होतो त्यावेळेस आयुक्तां समोर कोणी जबाबदारी घेतली होती.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. कमिटीमध्ये माहिती देणे हे आपण पाहतो पण मी त्या कमिटीचा सचिव नाही असं मी सांगीतल होतं.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. त्यावेळेस जबाबदारी कोणी घेतली हे सांगा. काम बघण्यासाठी तुम्ही साहेबांना होकार दिला का.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हो, होकार दिला. साहेबांनी मला काम बघायला सांगीतल, कमिटीच्या मिटींग ठेवण हे मीच करतो. आताच्या ज्या तीन मिटींग झाल्या त्या मीच ऑर्गनाईझ केल्या होत्या. चौथी पण मिटींग आपण ठेवणार होतो त्यावेळी आचारसंहिता लागली.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब, हे तुम्ही ऐकल आहे. आता त्यांनी सांगीतल माझा काही याच्याशी संबंध नाही. आयुक्तांकडे ज्यावेळेस गेलो त्यावेळेस त्यांनी स्वत: सांगीतल होतं मी कमिटीच काम पाहतो. काम काय पहायच, मिटींग घ्यायची, मिटींग बोलवायची. दोन मिटींगा झाल्या तीसरी मिटींग बोलवली नाही बोलवली, आम्ही माहिती मागवली त्याच काही उत्तर नाही. सभागृहामध्ये आम्हांला असे उत्तर मिळत असेलतर मी निषेध करतो आणि ही सभा तहकूब करावी अशी विनंती करतो, यांचा निषेध करुन सभा तहकूब करावी.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पेट्रोल तयार करणे आणि फर्टिलायझरचे ऑर्डर दिलेल होतं या दोन्ही प्रोजेक्ट बद्दलची माहिती दयावी. आता प्लॅस्टिक मधुन पेट्रोल काढतात का आणि किती पेट्रोल काढतात. आपण किती इन्व्हेस्टमेंट केली होती, आपण जागेमध्ये इन्व्हेस्टमेंट केलं होतं मग त्याच काय झालं. बीव्हीजीने किती पेट्रोल दिलं. आता पेट्रोल देतात का याबद्दल सांगाव. हैद्राबादच्या एका पार्टीला फर्टीलायझर पॅकींगची ऑर्डर दिली होती, ते आता चालू आहे का ते कुठपर्यंत बांधल या दोन्ही प्रोजेक्ट बद्दल माहिती दयायला सांगावी.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. २००७-०८ मध्ये प्लॅस्टिक पासून इंधन निर्मीतीचा प्रकल्प बीओटी तत्वावर, पीपीपी तत्वावर दिलेला होता. त्यामध्ये ज्यांनी स्वत:च्या खर्चाने तिथ इन्व्हेस्टमेंट करुन तो प्रकल्प राबवायचा होता त्यामध्ये आवश्यक जे इन्फ्रास्ट्रक्चर होतं शेड आणि बाकी रस्ता उपलब्ध करुन दयायचा ते महापालिकेनी त्यावेळी पुरवलेलं होतं. डॉ.नागकुमार असताना तो प्रोजेक्ट झालेला आहे. त्यामध्ये जे प्लॅस्टिकपासून इंधन निर्मीती होते त्यामध्ये जे इंधन आहे त्याला ॲटोमोबाईल ॲक्टनुसार तो इंधन म्हणून वापरायला मोटारसायकल मध्ये किंवा व्हेईकल मध्ये वापरायला परवानगी नाही. त्यामुळे ते जे तयार होत ते फर्निश ऑईल म्हणून इन्डस्ट्रीमध्ये सध्या वापरल जात आणि त्या ॲग्रीमेंटनुसार तयार होणा-या प्रत्येक लीटरसाठी एक रुपया रॉयल्टी महापालिकेला जमा कराव असं आहे. मागच्या महीन्यापर्यंत जवळ जवळ दोन लाख

लीटर ऑईल तयार झालेल होतं. त्यानुसार आपल्याकड ते रेकॉर्ड अव्हेलेबल आहे. हैद्राबादच जे सांगतात त्याबददल माझ्याकड माहिती नाही किंवा मला त्या प्रकल्पाची कल्पना नाही.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. या प्रोजेक्ट मध्ये तुम्ही कबुल केल होतं की इतक डिझेल, इतक पेट्रोल करता येईल.

**मा.संजय कुलकर्णी (कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. ॲग्रीमेंटमध्येच असं लिहील होतं की प्रायोगीक तत्वावर अभ्यास करण्यासाठी हा प्रकल्प उभा रहायचा तो उभारला गेला त्यानंतर वेळोवेळी हा पहीलाच प्रकल्प असल्यामुळ त्यात आरएनडी होत राहील आणि आरएनडी होत राहील्यानंतर त्यामध्ये त्या प्लॅनमध्ये चेंजेस होत राहील्या आणि आता जो प्रोजेक्ट चालू आहे तो दोन वर्षापासून चालू आहे

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हे खोटे उत्तर आहे. आपण त्यांना दोन कोटीचा ॲडव्हान्स पण दिलेला होता.

**मा.संजय कुलकर्णी (कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. ॲडव्हान्स दिलेला आपण व्याजासकट त्याचवेळी वसूल केलेला आहे. आपली काहीही इन्व्हेस्टमेंट त्यामध्ये नाही.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. तुम्ही कबुल करा. स्थायी समितीच्या हॉलमध्ये दाखवल होतं आणि स्वप्न दाखवल होतं इतक मिळणार इतक मिळणार म्हणून आणि आता म्हणता प्रायोगीक तत्वावर.

**मा.संजय कुलकर्णी (कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. प्रायोगीक तत्वावर एक एक्कर जागा दिली होती. पैसे फक्त दोन कोटी रुपये ॲडव्हान्स दिलेले होते ते काही वर्षानी त्यांनी रिटर्न दयायचे होते आम्ही चार्ज घेतल्यानंतर बघीतल आणि ते व्याजासकट पुर्ण वसुल केलेले आहे महापालिकेची आता त्यामध्ये काहीही इन्व्हेस्टमेंट नाही.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आम्हांला सांगण्यात आल होत डिझेल आणि पेट्रोल तयार करुन मिळणार हे खरं आहे का खोट आहे हे सांगा.

**मा.संजय कुलकर्णी (कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. डिझेल आणि इन्डस्ट्रीएल ऑईल म्हणून वापरल जात ते तेथे सध्या तयार होते.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपल्या कचरा गाडयांना ते डिझेल सप्लाय करणार होते. कॉर्पोरेशनच्या अधिका-यांनी आणि त्या पार्टीने

दोघांनीही डेमोन्स्ट्रेशनच्यावेळेस हे सांगीतल आहे. तुम्ही अजूनही कबुल करत नाहीत तो प्रोजेक्ट टोटल फ्लॉप आहे.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. तेथे जे तयार होत ते व्हेईकलमध्ये वापरण्यास परमीशन नाही.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हे तुम्ही आता सांगताय. डेमोन्स्ट्रेशन करताना काय सांगीतल, डिझेल आणि पेट्रोल मिळणार आपल्या गाडयांना.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, शेडवर किती खर्च झाला ते सांगा.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. ५० लाखपर्यंत खर्च शेडवर झाला असेल व एक एक्कर जागा आहे. पाच एक्कर दयावी असं ॲग्रीमेंट होत पण एक एक्कर दिलेली आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. तुम्ही याला इन्क्वॉयरी कमिटी लावा आणि त्या इन्क्वॉयरी कमिटी मार्फत त्यावेळेस प्रोजेक्टमध्ये कुलकर्णी हे नव्हते हे मी कबुल करतो पण आता ते ॲक्सेप्ट करत नाहीत प्रोजेक्ट टोटल फ्लॉप आहे. स्वप्न दाखवल होतं डिझेल आणि पेट्रोल मिळणार म्हणून आणि आता म्हणतात ॲटोमोबाईलला वापरु शकत नाहीत. मा.महापौर साहेब, तुम्ही तुमच्या लेव्हलवर याची इन्क्वॉयरी करा आणि पुढच्या मिटींगला याचा रिपोर्ट दया. फर्टीलायझर बद्दल सुध्दा माहीती देत नाहीत. ते माहीती नाही म्हणतात पण आता तो प्रोजेक्ट चालू आहे का नाही ते तरी माहीती दया.

**मा.संजय कुलकर्णी** **(कार्यकारी अभियंता,पर्यावरण) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. फर्टीलायझरच्या तिथ एक गांडूळखत प्रकल्प चालू आहे आणि एक मेकॅनिकल कंपोस्टींग प्लॅन्ट चालू आहे. त्याच्यामधुन फर्टीलायझर तयार होतात घनकच-यामधुन. त्या पार्टीने मार्केटमध्ये विकायच अस ॲग्रीमेंट आहे. पीपीपी तत्वावर गांडूळखत प्रकल्प त्यांनी चालवायचा आणि त्यामध्ये जे खत तयार होतं ते त्यांनी मार्केटमध्ये विकायच. महापालिकेला आवश्यक असेलतर ते खत २० टक्के कमी दराने दयाव अस त्यामध्ये कंडीशन आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. उत्तर दयायच म्हणून तुम्ही देता हे दोन्ही प्रोजेक्ट फ्लॉप आहेत. चेक करा. पर्यावरण विभागाला त्यांना ॲडीशनल स्टाफ दया. या विभागाला इम्पॉर्टन्ट दया. आयुक्त साहेबांनी पर्यावरण डिपार्टमेंटकडे लक्ष दयावं.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरंतर पर्यावरण सद्स्थिती अहवाल म्हणजे खरंच पर्यावरण विभागाच मनापासून कौतूक केल पाहीजे. पर्यावरण विभाग कशाप्रकारे चालतो, नाही चालत, सगळया नगरसदस्यांची तळमळ त्यांचे विचार मांडले. परंतु खरंच कौतूक का केल पाहीजे या पर्यावरण विभागाचं. तो अहवाल सूंदर छापला आहे, देखणा आहे, अत्यंत सुरेख म्हणजे बघीतल की प्रसन्न वाटेल इतका देखणा अहवाल छापला आहे. एवढी कुवत या विभागाचे संजय कुलकर्णी यांची आहे असं दुर्दैवान म्हणाव लागतं. आता कदाचित चुकून का होईना बोलता बोलता त्यांनी सांगीतल की माझी काही जबाबदारी नाही हे सगळे विषय वेगवेगळया डिपार्टमेंटकडून येतात, सगळयाकडून आकडेवारी घेवून हे छापण्याच काम मी करतो असं बोलताना खरं बोलले. म्हणजे आकडे छापण्यासाठी आपल्याला एक डिपार्टमेंट किंवा पर्यावरण विभागाची गरज नाही अस सभागृहाला निश्चितपणे वाटत असेल. आकडेवारी छापण्यासाठी आपल्याकडे एखादा क्लार्क सुध्दा चांगल्या प्रकारे कामकाज करु शकेल. मग त्याठिकाणी एवढा मोठा पगार देवुन एखादया अधिका-याची नेमणुक करण्याची गरज आहे का. मा.महापौर साहेब, याठिकाणी मी तुमच लक्ष वेधते की त्यांनी स्वत: सांगीतल की मी काहीच करत नाही मी सगळयाकडची आकडेवारी घेतो आणि काम करतो. खरंतर पर्यावरण विभागाची दुरावस्था कशी आहे याचा अहवाल आम्ही मागच्या वर्षी आमचे सारंगजी कामतेकर भाजपचे सरचिटणीस यांनी छापला होता. आम्ही एकदा प्रयोग केला त्यांना वाटल की आपण हा दिल्यानंतर कुठेतरी या विभागाला वाटेल अशी अवस्था आहे आणि आपण छापतोय काय. पर्यावरण ही त्यांची गरज नाही आपल्या शहराची गरज आहे. निश्चितपणे त्यांनी त्या अहवालाचा जर काही विचार केला असतातर त्यांच्या बद्दल वाईट लिहील किंवा आपल्या चुका दाखवल्या यापेक्षा त्यांनी ते पॉझिटीव्ह अँगलन घेतल असततर निश्चितपणे आजच्या सभागृहात ही चर्चा टाळू शकले असते. परंतु कुठेही त्यांची मानसीकता आहे असं दिसत नाही. फक्त आकडेवारी घ्यायची, सुंदर सुंदर छापायच. मागच्या वर्षी सुध्दा आम्ही सांगीतल आहे की कॉपी पेस्ट हा प्रकार घडतो. पर्यावरण सद्स्थिती अहवाल त्यात त्यांनी जवळपास नऊ ते दहा क्रम दिले ते कसं नेम्स्तात, समिती कसं पाहते. सल्लागार समितीची बैठक होते त्याच्यावर विचारविनीमय होतो मग सारांश काढला जातो, वगैरे वगैरे वगैरे असे नऊ प्रकार याठिकाणी येथे मांडले. पहील्याच पानांवरती एक बातमी अर्धवट तीच बातमी येथे झुम करुन लावली असं कसं करु शकतात ते. इतका अंधळा कारभार यांचा असु शकतो का. इतकी वाईट परिस्थिती आहे बातमी छापताना जर काही त्यांच्या नजरेत इतका दोष असेलतर ते काम कसे करु शकत असतील याचा विचार सन्मा.महापौर साहेब आपण याठिकाणी केला पाहीजे. ज्यावेळेस राजीव जाधव आयुक्त म्हणून होते याठिकाणी दोन बकेट पुर्ण शहराला वाटले तो सात कोटीचा प्रकल्प होता. अनेकवेळा त्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा झाली आणि सांगीतल गेल की दोन बकेट देणार आहेत, स्टॅण्डीगमध्ये सुध्दा त्या विषयावर चर्चा

केली होती. त्यावेळेला आपल्याला आयुक्तांनी सांगीतल की मी डिले का करतो का तर आपल्याकडे कच-याच्या गाडया आहेत त्या दोन प्रकारच्या आहेत त्याच्यामध्ये ओला कचरा आणि सुखा कचरा नेण्याची व्यवस्था केली पाहीजे तशाप्रकारच विघटन झाल पाहीजे आणि मग योग्य प्रकारची विल्हेवाट लावता येईल. म्हणून मी डिले करतो. आता ती स्थिती चांगली झालेली आहे शहरातील कचरा व्यवस्थपनाची त्यामुळे आता त्या बकेट वाटू यात आणि आपण कासारवाडीमध्ये पहीला उद्‌घाटनाचा कार्यक्रम घेतला होता. खुप पाठपुराव्यानंतर त्यात यश आल का नाही. सात कोटी रुपये या शहरातील जनतेचे करदात्या नागरिकांचे आपण असेच उधळले. अशाप्रकारे आपले अधिकारी आपल प्रशासन नागरिकांचे पैसे, सात लाख काय सात हजार सुध्दा त्यांना महत्वाचे असतात असे सात सात कोटी रुपये आपण या करदात्या लोकांचे याठिकाणी उधळतो असं दुर्दैवाने याठिकाणी म्हणावे लागतं आता संजय कुलकर्णी यांनी सांगीतल की एवढच माझ काम आहे. परंतु पर्यावरण विभागाचा एचओडी म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी असताना त्यांनी मग जलपर्णी हा विषय जर विचारात घेतला तर अनेक कॉन्ट्रॅक्टर जलपर्णी काढण्यासाठी आपण नेमतो. मला वाटतं पावसाळयाच्या तोंडवरती उन्हाळयामध्ये अनेक शहरामध्ये डास होतात, लोक आजारी पडतात आमच सगळ सभागृह अत्यंत पेटवून उठतं त्याच्यावर चर्चा होते पाऊस पडला की जलपर्णी वाहून जाते, हा नित्याचा नियम आपल्या शहरासाठी झालेला आहे. या जलपर्णी वरती संजय कुलकर्णी काय करतात. जर आरोग्य डिपार्टमेंट हे काढत नसेलतर संजय कुलकर्णींनी त्या डिपार्टमेंटशी किती वेळा पत्रव्यवहार केला. ते खोटे आकडे चांगल्या प्रकारे छापू शकतात आणि म्हणून त्यांच्याकडे हि व्यवस्था देणेच काम आपल्याकडून केल की काय असा प्रश्न मला पडतो. त्याच बरोबर शहरामध्ये वाजत असणारे हॉर्न पुन्हा एकदा ही जबाबदारी संजय कुलकर्णी यांची नाही. सन्मा. सदस्य आता म्हणाले की महाराष्ट्र शासनाकडे ही जबाबदारी आहे ते काम पाहत नाही किंवा हे पोलीस डिपार्टमेंटच काम आहे, तर निश्चितपणे त्या डिपार्टमेंटच काम आहे. परंतु जर माझ्या पिंपरी चिचवड महानगरपालिकेच हित लक्षात घेवून आपण जर ते डिपार्टमेंट ओपन केल असेल त्याच्यावर जर एखादा सक्षम अधिकारी फक्त म्हणण्यापुरता बसवला असेलतर त्या डिपार्टमेंटनी आजपर्यंतचे केलेले पत्रव्यवहार त्यांनी या सभागृहासमोर सादर करावेत. त्यांनी सांगाव शहरात असणारे हॉर्न असतील, शहरामधील गाडयाना लावलेले लाईट असतील त्यामुळे शहरातील नागरिकांना त्रास होतो असे ज्या ज्या ठिकाणी त्यांनी पत्रव्यवहार केले असतील व त्यांनी ते निदर्शनास आणून दिलेले असतील तर त्यांनी ते या सभागृहा समोर सादर करावे. मला वाटत धुरामुळे वायु निर्माण होत नाही. त्यांनी पुस्तकात लिहील आहे शहर प्लॅस्टिकमुक्त केलं अस ते म्हणतात परंतु त्यानी सगळया नदीच्या कडेनं फिराव किंवा ज्या ठिकाणी भंगारवाले असतात त्याठिकाणी किती मोठा कचरा जाळला जातो. त्यापासून होणा-या प्रदुषणावरती त्यांनी आजपर्यंत काय कारवाई केली ते सांगावे. सद्‌स्थिती अहवाल म्हणजे काय

हे असं असं खोटे आकडे देण्याची काहीच गरज नाही. आम्ही खरे आकडे आमचे पैसे घालून मागच्यावेळेला तो अहवाल तयार केला. त्याच्यात आणि याच्यात तफावत का मिळते. तुम्ही याच शहरातील पाण्याचे नमुने सांगता आम्ही पण याच शहरातील पाण्याचे नमुने दिलेले आहेत. आकडयांची हेराफेरी करण यासाठी संजय कुलकर्णीची निर्मीती आहे का याचा विचार आपण केला पाहीजे. आपण सीएनजी किट देतो असा यामध्ये विषय मांडला आहे. खुप चांगली गोष्ट आहे त्यासाठी अनुदान देतो. अत्यंत चांगली कौतूकास्पद गोष्ट आपल्या पर्यावरण विभागाकडून होते. परंतु अनेक रिक्षातून खुप मोठया प्रमाणात धुर बाहेर पडतो त्यांच्या मागे आपल्याला गाडी चालविण सुध्दा आवघड आहे. यावर कारवाई करण पुन्हा संजय कुलकर्णी यांच्या हातात नाहीच. त्यानी पत्रव्यवहार कुठला केला हे सांगावे. या सगळयावर आपण कोणत्या प्रकारे कारवाई केली, कोणत्या प्रकारे पत्रव्यवहार केला हे त्यांनी सांगावे. या तीन वर्षातील डेंग्युची संख्येची आकडेवारी पहा. ५९९ डेंग्युचे रुग्ण आपल्या शहरामध्ये आपल्याला दिसतात. हे पर्यावरण विभागाच नाही का मग चांगल सगळ आमच. चांगल झाल की आम्ही भारी करतो वाईट झाल की मग शहर. या अहवालामध्ये एक पॅरेग्राफ दिलेला आहे. पिंपरी चिंचवड शहराचा सध्याचा साक्षरतेचा स्तर त्या साक्षरतेच्या स्तरामध्ये ७९.५० टक्के म्हणजे जवळपास ५० टक्के नागरिक या शहरातील साक्षर आहेत अस म्हणण आहे, जर तसं असेलतर का बर या पर्यावरणाची जनजागृती करण्याचा प्रयत्न आपण किती मोठया प्रमाणात केला, हे त्यानी सांगाव. खरतर मला अजून पुर्ण खात्री आहे जसं मोदी सरकारने नोटा बंद केल्या आणि त्यांनी सांगीतल सहकार्य करा आणि सगळया जनतेनी साथ दिली. तोच प्रकार आपल्या पर्यावरण विभागात सुध्दा होऊ शकतो. आपण साक्षरतेच प्रमाण ८० टक्के आहे असं म्हणत असूतर लोकांना आपण जर सांगीतल आणि तेवढया चांगल्या प्रकारची यंत्रणा या शहरात निर्माण करुन दिलीतर माझ्या शहराचा नागरीक हा सुज्ञच आहे त्याला सुध्दा घाण नकोच आहे परंतु आपल्याकडच योग्य यंत्रणा नसते आणि आपल अपयश आपण नागरीकांच्या माथी मारतो. जर साक्षरता ८० टक्के असेलतर का कच-याच्या गाडया वेळेवर जात नाहीत, का कचरा नीट उचलला जात नाही. जो कचरा उचलला जातो त्यावेळेला ज्या गाडया येतात त्याच्यातून किती मोठया प्रमाणात कचरा बाहेर पडतो त्याच्यावर कोणी लक्ष देत नाही. संजय कुलकर्णी म्हणत असतील फक्त आकडे देण्याचच काम त्यांच्याकड असेलतर निश्चितपणे मी या महासभेमध्ये त्यांचा निषेध करते. आम्हांला इतक्या मोठया अधिका-यांची गरज नाही अस याठिकाणी वाटतं. मग आम्ही आता नेमक काय केल पाहीजे. तुम्हांला मगाशी मी सांगीतल की वाईट, वाईट, वाईट त्याच्यावर उपाययोजना काय हे तीतकच महत्वाच आहे. आपल्या शहरामध्ये पर्यावरण दिन हा वर्षातून एकदा सणासारखा सेलीब्रेट केला जातो. कारण त्या दिवशी आम्हांला फोटो काढायचे असतात, ते फोटो आमच्या पर्यावरण अहवालामध्ये छापायचे असतात. त्याच डेकोरेशन करायच असतं. हे सगळेच मुद्दे त्यातून निर्माण होतात मा.महापौर

साहेब, आमची सक्षम यंत्रणा कशी आहे, नागरीकांना पर्यावरण विभागाने अवाहन केल की आम्हांला पर्यावरण दिन हा वर्षातून एक दिवस न करता आठवडयातून एक दिवस प्रत्येक शनिवार जर आपण राखीव ठेवला, की त्यांदिवशी आपल्या अजूबाजूचा परिसर हा पर्यावरण विभागाने आपली जास्तीची यंत्रणा राबवून जे काही प्रॉब्लेम प्रत्येक विभागाकडून राहीले असतील त्याच्यावर अंमलबजावणी केलीतर निश्चितपणे आपला पर्यावरण विभाग सुधारल्या शिवाय राहणार नाही. याठिकाणी गॅसशव दाहीनीचा पण उल्लेख केला आहे. म्हणजे जी गॅस शव दाहीनी त्यांच्या प्रचंड कौतूकामुळ गाजली म्हणजे गॅस शव दाहीनी जी आहे ती फक्त संजय कुलकर्णी यांची निर्मीती आहे अस देखील याठिकाणी मान्य केलेल आहे. याच्याकडे आपण गांभीर्याने विचार करावा. पुढच्या वेळेस अशाच प्रकारचा अहवाल आलातर त्याच्या वरती मगाशी कुणीतरी म्हणल की ऐंशी टक्के चांगल आहे त्याच उत्तर सांगता आल नाही. परंतु पर्यावरण अहवाल चांगला आहे का संजय कुलकर्णी चांगल काम करतात का, बरं आहे, चुकीच आहे हे म्हणल्या गेल. वस्तुस्थिती सांगते कसंबस आकडे दिल्यामुळे २० टक्के काम आपण चुकीचे आकडे दिल्यामुळे करतो आणि ८० टक्के आपल्या पर्यावरण विभागाचा गलथानपणा आहे तो पुढच्या अहवालापर्यंत आपण त्याच्यात बदल योग्य प्रकारे करावेत असा आदेश मा.महापौर आपण त्यांना दिलातर निश्चितपणे चांगल काम करतील अशी अपेक्षा याठिकाणी करते. पुन्हा एकदा पर्यावरण विभागाचा निषेध नोंदऊन थांबते, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.वसंत लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह प्रदुषण आणि पर्यावरण या विषयावर आपण बराचवेळ चर्चा करतो. खरतर महापालिका प्रदुषण रोखण्यासाठी भरपूर प्रयत्न करतं. हवा शुध्द राहण्यासाठी भरपूर झाडाची आपण लागवड करतो. पाणी शुध्द राहण्यासाठीही आपले भरपूर प्रयत्न आहेत. कारण पंपींग स्टेशन, मैलाशुध्दीकरण अनेक ठिकाणी आपण केलेले आहेत. प्रामुख्याने ध्वनिच, पाण्याच, हवेच प्रदुषण कोण करतं एमआयडीसी आणि एमआयडीसीवर आपल अजीबात लक्ष नाही. पुर्वीची मॉरीशीस कंपनी आता ती हिनोदय म्हणून कंपनी आहे. त्यांच अत्यंत दुषीत, लाल कलरच पाणी आपल्या ओढयाला, नाल्याला सोडल जातं. अनेक कंपनी केमीकल फॅक्टरी आहेत. नाव वेगळ आहे पण काम चालत केमीकलच. त्यांनी कुठेही ट्रिटमेंट प्लॅण्ट केलेला नाही. ते पाणी सरळ नाल्यात सोडल जातं. ती महाराष्ट्र शासनाची कमिटी आहे. त्यांचे काय अधिकार आहेत ते आपण शोधायला पाहीजे. मला वाटत आपल्या कमिटीला एवढे अधिकार नसतील. आपण आपल्या मर्यादेपुरत पाहतो कारण मी कुलकर्णीना हिनोदय कंपनीमध्ये घेवून गेलो होतो. त्यांनी त्यांना नोटीस दिली पण त्या नोटीसचा काहीही उपयोग झालेला नाही. अजूनही त्या पंधरा ते वीस कंपनीमधुन लाल रंगाच पाणी सोडल जातं. त्यामुळे हवा प्रदुषीत होते, शेजारील झाड सुध्दा लाल पडलेले आहेत. तो अधिकार कोणाला आहे ते पहील शोधाव. महापालिका यासाठी भरपूर प्रयत्न करते. ट्रिटमेण्ट प्लॅण्ट, मैलाशुध्दीकरण केंद्र आपण केलेल आहे, झाड लावतो हे सर्व आपण करतो.

पण एमआयडीसीकड आपल दुर्लक्ष आहे. ते खरी घाण आपल्या शहराची करतात त्याकड लक्ष दयाव हीच विनंती आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पर्यावरणाच्या अहवालावर येथे चर्चा चालू आहे. १०० टक्के जरी आपण बरोबर नसलोतरी सुध्दा पर्यावरणाच काम आपल चांगल आहे. काहीतरी कडक निर्णय सुध्दा प्रशासनाच्या वतीने घेण्यात आले पाहीजेत. या कंपन्या जसं डायरेक्ट पाणी नदयांना सोडतात त्याचा आसर हा सगळा पर्यावरणावर येतो किंवा नदी प्रदुषणामध्ये हा येतो. आपल्याला त्या कंपन्यांना सिल करायला परमीशन आहे का, आपल्याला सिल करायला परमीशन नाही. जैवीकची कमिटी स्थापन कराव म्हणून आपल्याला महाराष्ट्र शासनान पाठवल पण त्याच्या बरोबर कोण कोण अधिकारी आहेत, कुणाला काम दिल पाहीजे, नगरसेवकांना कमिटीवर घेतल, गाडी घेतली, चेअरमन करुन घेतल, सगळ घेतल परंतु त्यांच जे कामकाज आहे हे कामकाज केल गेल पाहीजे. कमिटी आहे म्हणजे त्याच कामकाज केल पाहीजे नाहीतर उदया विधी समितीही बंद करा, स्थायी समिती बंद करा. सगळयाच कमीटया बंद करा. मग हे कामकाज कस केल गेल पाहीजे या दृष्टिकोनातून विचार केला गेला पाहीजे. आज शहरामध्ये आपण शंभर टक्के अंडरग्राऊण्ड करण्याचा प्रयत्न करत आहोत. नदया नाल्यान गाव जोडलेली आहेत त्या सगळयांना आपण अंडरग्राऊण्ड ड्रेनेज करतो. पहील अंडरग्राऊण्ड ड्रेनेज पुर्ण झाल पाहीजे. हे खोदकामाच काम पुर्ण पहील्यांदा व्हायला पाहीजे. ज्या त्या भागातील आरक्षण आली पाहीजेत यासाठी प्रयत्न केले गेले पाहीजेत. ट्रिटमेंट प्लॅण्टची आरक्षण पहील्यांदा ताब्यात घेतली गेली पाहीजेत. मी काही त्यांना पाठीशी घालत नाही परंतु एखादया व्यक्तीला बोलून कही अर्थ आहे का. सगळया फळीन काम केल गेल पाहीजे. सद्स्थितीमध्ये पर्यावरण हा विषय फार मोठा आहे. ग्लोबल वॉर्निंग आहे. पर्यावरण कशाला म्हणल पाहीजे हा पण विषय आहे, आता कोणी कच-याचा विषय काढला कोणी पर्यावरणाचा काढला. पर्यावरणामुळे कधीही पाऊस पडतो ग्लोबल वॉर्निंग त्याच्यामुळेच झालेल आहे आणि म्हणून प्रत्येकान त्याच्यावर काम केल गेल पाहीजे. यामध्ये आजून पोस्ट वाढवायच्या असतीलतर त्या वाढविल्या पाहीजेत. एका व्यक्तीला बोलून काहीही उपयोग होणार नाही. त्यांना माणस दया, मोठ डिपार्टमेंट समजल गेल पाहीजे. मगाशी डेंग्यू पण आला, बाकीच्या गोष्टी पण आल्या, मोशी कचरा डेपो आला. वेगवेगळी वीस डिपार्टमेंट आहेत. वीस डिपार्टमेंटच हेड ऑफ कुलकर्णी, पर्यावरण असं कसं होऊ शकतं. या वीस लोकांनी दिलेला अहवाल छापण्याच काम त्यांच्यामध्ये आहे. मग हे काम करत असताना त्याला ते वीस डिपार्टमेंट पण जबाबदार आहेत. मग त्यांनी कसा काय अहवाल दिला. मग त्या अहवालाप्रमाणे आपण काम केल पाहीजे. ई-कच-यावर येथून पुढे शहरामध्ये काहीतरी उपाययोजना केली पाहीजे. ई-कच-यासाठी प्रत्येक प्रभागवाईज अ,ब,क,ड,इ,फ आपल केंद्र स्थापन झाल पाहीजे. नागरीकांचा कचरा त्याठिकाणी गेला पाहीजे. कचरा डेपोचे किती आरक्षण

आहेत, नुसतच मोशीत करुन चालणार आहे का. बाकीच्या ठिकाणची जेवढी कचरा डेपोची आरक्षण आहेत ती ताब्यात घेतली पाहीजेत आणि त्या ठिकाणी कच-याच विघटण केल गेल पाहीजे. त्याच्यावर उपाययोजना शोधल्या गेल्या पाहीजेत. प्रत्येक वॉर्डाचा त्या त्याठिकाणी कचरा जिरवण्यासाठी आपण काम केल गेल पाहीजे. शहरामध्ये प्लॅस्टिक दिसत आहे मोठया प्रमाणावर कारवाई करायला पाहीजे. प्लॅस्टिकच ज्यांना ऑईल करण्यासाठी दिलेल आहे त्या लोकांना सांगाव शहरातील सगळ प्लॅस्टिक गोळा करा म्हणून. नुसतेच शेड बांधुन दिली एवढा खर्च करुन जर आपले दोन लाख जमा होणार असतीलतर दोन लाखासाठी एवढी मोठी मोशीची जागा देतो आज त्या जागेच व्याज किती झाल. दुस-याला चालवायला दिलतर जागेच भाड कॉर्पोरेशन भरेल. आपण प्रायोगीक तत्वावर केल पण किती वर्षे प्रायोगीक तत्वावर करायच याचा पण विचार केला गेला पाहीजे. आपण एखादा बिझनेस सुरु केलातर तो काही कायमस्वरुपी प्रायोगीक तत्वावर करतो का. तसं प्लॅस्टिक गोळा करणं, छापे टाकणं, भाजीवाल्यांकड, दुकानदाराकड जिथ प्लॅस्टिकची निर्मीती होते आणि प्लॅस्टीक माल जिथ येतो त्याचेवर मोठा दंड आकारा की परत त्यांना प्लॅस्टीक मार्केटमध्ये आणलच नाही पाहीजे. हा अहवाल सादर करताना कंपन्यांच पाणी ट्रिट करुन सोडल पाहीजे. एकतर महाराष्ट्र प्रदुषण मंडळाच येथे ऑफीस असल पाहीजे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेनी परवानगी दिली पाहीजे. डॉ.नागकुमार सारखी काही माणस आपल्याकड होती. बीनधास्त जाऊन ते लॉक करायचे. मला आठवतय थेरगावमध्ये पद्मजी मीलला त्यांनी सिल केलं होतं. आता तशी परिस्थिती राहीलेली नाही. लोक विचारतात तुमच्याकडे काही आहे का तुम्हांला तरतूद दिली का. रस्त्यामध्ये झाड आपण लावतो हे उदयान विभागाकडे येते. मध्यंतरी वृक्षतज्ञ होते त्यांना विचारल ते म्हणाले जी तुम्ही कन्हेरीची झाड रस्त्याला लावता ती इतकी कडू असतात की जनावर सुध्दा त्याला तोंड लावत नाहीत परंतु ती विषारी वायू बाहेर फेकतात आणि तोच आपण श्वास घेत असतो. याचा सुध्दा आपण अभ्यास केला गेला पाहीजे. लांब देठाची मोठी फुल असतात ती सुध्दा विषारी वायू बाहेर फेकतात मग या झाडाची आपण संख्या बघीतली पाहीजे. हे एका माणसाकडून होईल असं नाही तर प्रत्येक व्यक्तीने, प्रत्येक डिपार्टमेंटने या गोष्टीकडे मोठया प्रमाणावर लक्ष घातल पाहीजे. बकेटचा प्रश्न आला. नागरीकांच्या कराच्या पैशातून हे करतो. शंभर टक्के बकेटचा वापर झाला अस मी म्हणणार नाही. त्याच्यामध्ये कचरा विघटन होत नाही. आपण दोन बकेट दिल्या परंतु त्या कच-याच विघटन झाल पाहीजे. पुर्वी कोणत्याही फुटपाथवर थरमॅक्स चौकापासून दोन्ही साईडला कधीही कचरा दिसायचा नाही आज बघा तेथे फुटपाथवर किती वाईट अवस्था आहे. मोठमोठे ढिग लावलेले आहेत. कचरा उचलायला लोक नाहीत अशी अचानक परिस्थिती काय झाली. का कोण ही परिस्थिती निर्माण करतय. आज कच-याचे ट्रक ड्रायव्हर संपावर. मी आज सकाळी आढावा घेतला माझ्या वॉर्डामध्ये कॉर्पोरेशनची एक कर्मचारी हजर आहे बाकीचे सगळे सुट्टीवर. मग तो सुपरवायझर

तरी काय करणार. शिवाय गाडयांचे संप, रोडस्विपर नाहीत, कचरा उचलणा-या गाडया नाहीत सगळे संपावर. त्यांच रोलींग का होत नाही मग कार्यक्षमता नाही का. याचा अर्थ प्रशासनाची खालच्या लोकांवर बिलकुल पकड नाही. इतक छान पिंपरी चिंचवड असताना काही गोष्टीसाठी असं ओरडण्याची वेळ येत असेलतर हे दुर्दैव समजायला पाहीजे. मागच्या पंधरा दिवसापुर्वी आम्ही आरोग्याची मिटींग घेतली होती. तुमची मिंटींग होती तुम्ही व्हीडीओ क्लिप बनवा नागरीकांना दया, छोटे छोटे बोर्ड बनवा ते लावा. त्यादिवशी या सगळया गोष्टी सांगीतल्या. परंतु या गोष्टी अंमलात आल्या पाहीजेत. नुसत आम्ही सांगणार कृतीत काहीच होणार नसेलतर आपल पर्यावरण कसं चांगल होईल. पर्यावरण हा विषय मोठा आहे सगळ मिक्सींग याच्यामध्ये करुन काहीही होणार नाही आणि म्हणून यामध्ये जे जे डिपार्टमेंट आहेत त्यांनी या गोष्टींचा चांगला विचार केला पाहीजे. शहरातील नागरीकांना जसं पाणी लागत तस कचरा पण करत असतात आणि त्या पध्दतीने नागरीकांच्या कच-याची सुध्दा विल्हेवाट व्यवस्थित रीत्या लागली गेली पाहीजे. लहान मुलांना डायफर वापरली जातात, दुधाच्या पिशव्या आहेत. सकाळ पासून हा पर्यावरणाचा विषय चालू होतो मला कुणालाही पाठीशी घालायच नाही. प्रशासनाने पर्यावरणावर चांगल काम केल पाहीजे. ग्लोबल वॉर्निंगसारख्या देशामध्ये आज आपण आहोत. त्याला फेस करायच असेलतर खुप चांगल्या पध्दतीने पर्यावरणामध्ये सगळयांनी काम करण गरजेच आहे, हा विषय मंजूर करावा.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आताच पक्षनेत्यानी ब-यापैकी विश्लेषण केलेल आहे, त्यांच्या मताशी मी सहमत आहे. याच्या आदि असं विश्लेषण सभागृहामध्ये ब-याचवेळेला झालेल आहे. आपण बोलतो, प्रशासन गप्प आहे त्यांनी बेजाबाबदारपणाची उत्तर दिलेली आहेत. प्रशासनाने त्याच्यावर कारवाई केली पाहीजे तरच दुसरा प्रशासनाचा अधिकारी चांगल्या पध्दतीने काम करेल ना तर “येरे माझ्या मागल्या” अशीच गत होणार. यातून काहीतरी निष्पन्न झाल पाहीजे. संबंधित अधिका-यावरती कारवाई झाली पाहीजे. असे बेजबाबदारपणे उत्तर दिल्यानंतर त्यांना जर आपण पाठीशी घातलतर या सभागृहाला काही अर्थ राहणार नाही गेले पंधरा वीस वर्षे मी काम करतो अशा संदर्भात सभागृह फक्त बदनाम होत. सत्ताधारी पक्ष असताना देखील अधिका-याच्या बेजबाबदारीपणामुळे या पक्षाला बदनामी सहन करावी लागते. तेंव्हा आपल्याला विनंती आहे की संबंधितावर कारवाई करण्यात यावी. नसेलतर पाठीशी घाला आम्हांला रस्ता मोकळा दया.

**मा.महापौर -** आजच्या या अहवालावरुन कुलकर्णींनी काही बेजबाबदारपणाची उत्तर दिलेली आहेत. नगरसेवकांच्या प्रश्नाला उत्तर दिली नाही किंवा वेळोवेळी काही माहिती मागीतल्यानंतर सुध्दा व्यवस्थीत उत्तर दिलेली नाही, तेव्हा आज सभागृहाच्या वतीने मी याठिकाणी आयुक्तांना आदेश देते की कुलकर्णीवर कारवाई करण्यात यावी आणि महीन्याभरात तो अहवाल त्यांनी सादर करावा. पुढच्या जीबीला त्याच्यातून त्यांची सुटका होईल तोपर्यंत त्यांनी

दिल नाहीतर अजून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. आणि हा अहवाल याठिकाणी मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ७

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. आमुका/२/कावि/ ५८७/२०१६ दि. ६/०९/२०१६

देशातील सर्व शहरां मधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१५ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ व शासन निर्णय क्र.स्वमअ २०१६/प्र.क्र.१३/२०१६-१७ दि. १३/०६/२०१६ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्र शासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | १,२४,९६,०००/- | २,४९,९२,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ४६,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,६७,०३,०००/-** | **२,६३,९१,००० /-** |
| | | **केंद्र शासन व राज्य शासन एकूण अनुदान** | **४,३०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ८०००/- , राज्य शासनाचे र.रु. ४०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३१/०८/२०१६ अखेरसोबत सादर केलेले प्रपत्र "अ" प्रमाणे कामकाज झालेले आहे. शासन निर्णय क्र.स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९/११/२०१५अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा" असे कळविलेले आहे.तसेच स्वच्छ भारत अभियानासाठी मा. पंतप्रधान यांनी महाराष्ट्र राज्याकरिता नामनिर्देशित केलेल्या खेलरत्न व अर्जुन पुरस्कार विजेत्या नेमबाज अंजली भागवत यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी ब्रॅन्ड अम्बॅसिडर म्हणून नियुक्ती केलेली आहे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०८/२०१६अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | ५५३३ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संके | ५१६६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण संख्या | | | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ३९४५ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ३२१४ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | २४७० | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ३८१५ लाभार्थी | GOI+GOM=२२८.९लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ७६.३० लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३०५.२० लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १७७६ लाभार्थी | GOI+GOM= १०६.५६ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ३५.५२ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१४२.०८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत बालाजीनगर, लांडेवाडी, महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमध्ये ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. तरी सदर झोपडपट्टीमध्ये ड्रेनेज लाईनकरीता खोदलेल्या रस्त्याचे WBM, BBM कॉंक्रिटीकरण पेव्हिंग ब्लॉक बसविणे, गटाराची दुरुस्ती करणे या कामाकरीता कामे (Revise) करण्यात आली असुन सदर कामाच्या वाढीव खर्चास मा.स्थायी समितीने मान्यता दिली आहे तथापि सदर कामाची बिले अदा करणेकरीता अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ-घट करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | पानांक | अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | २०१६-१७ अंदाजपत्रकामध्ये केलेली तरतूद (लाखात) | (लाखात) वाढ | (लाखात) घट | २०१६-१७ साठी लागणारी तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५७६ | ११४ | इ.झो.सु. | लांडेवाडी झोपडपट्टीमधील अंतर्गत गल्ली बोळाचे काँक्रीटीकरण करणे/पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | ४३०००० | ३०००००० | ० | ३४३०००० |
| २ | ३१ | १० | | भुसंपादन निधी | १५६०५२००० | ० | ३०००००० | ० |
| | | | | | | ३०००००० | ३०००००० | |

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ९३० विषय क्रमांक- ७

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. आमुका/२/कावि/ ५८७/२०१६ दि. ६/०९/२०१६

देशातील सर्व शहरां मधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या

अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१५ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ व शासन निर्णय क्र.स्वमअ २०१६/प्र.क्र.१३/२०१६-१७ दि. १३/०६/२०१६ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्र शासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | १,२४,९६,०००/- | २,४९,९२,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ४६,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,६७,०३,०००/-** | **२,६३,९१,००० /-** |
| | | **केंद्र शासन व राज्य शासन एकूण अनुदान** | **४,३०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ८०००/- , राज्य शासनाचे र.रु. ४०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३१/०८/२०१६ अखेरसोबत सादर केलेले प्रपत्र "अ" प्रमाणे कामकाज झालेले आहे. शासन निर्णय क्र.स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९/११/२०१५अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा" असे कळविलेले आहे.तसेच स्वच्छ भारत अभियानासाठी मा. पंतप्रधान यांनी महाराष्ट्र राज्याकरिता

नामनिर्देशित केलेल्या खेलरत्न व अर्जुन पुरस्कार विजेत्या नेमबाज अंजली भागवत यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी ब्रॅन्ड अम्बॅसिडर म्हणून नियुक्ती केलेली आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०८/२०१६अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ५५३३ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संके स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण संख्या | | ५१६६ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ३९४५ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ३२१४ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | २४७० | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ३८१५ लाभार्थी | GOI+GOM=२२८.९लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ७६.३० लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३०५.२० लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १७७६ लाभार्थी | GOI+GOM= १०६.५६ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ३५.५२ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१४२.०८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे. तसेच स्वच्छ भारत

अभियानाअंतर्गत बालाजीनगर, लांडेवाडी, महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमध्ये ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. तरी सदर झोपडपट्टीमध्ये ड्रेनेज लाईनकरीता खोदलेल्या रस्त्याचे WBM, BBM काँक्रिटीकरण पेव्हिंग ब्लॉक बसविणे, गटाराची दुरुस्ती करणे या कामाकरीता कामे (Revise) करण्यात आली असुन सदर कामाच्या वाढीव खर्चास मा.स्थायी समितीने मान्यता दिली आहे तथापि सदर कामाची बिले अदा करणेकरीता अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ-घट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पानांक | अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | २०१६-१७ अंदाजपत्रकामध्ये केलेली तरतूद (लाखात) | (लाखात) वाढ | (लाखात) घट | २०१६-१७ साठी लागणारी तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५७६ | ११४ | इ.झो.सु. | लांडेवाडी झोपडपट्टीमधील अंतर्गत गल्ली बोळाचे काँक्रीटीकरण करणे/पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | ४३०००० | ३०००००० | ० | ३४३०००० |
| २ | ३१ | १० | | भुसंपादन निधी | १५६०५२००० | ० | ३०००००० | ० |
| | | | | | | ३०००००० | ३०००००० | |

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ८

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. आमुका/२/कावि/ ५८८/२०१६ दि. ६/०९/२०१६

पिंपरी चिंचवड शहरातील ज्या कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही अशा कुटुंबाना उघडयावर शौचास जावे लागते. केंद्र शासनाचे निर्देशानुसार अर्ज व कागदपत्रे सादर केल्यास वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देणेत येते. दिनांक २ ऑक्टोबर २०१७ पर्यंत शहर हांगणदारीमुक्त करणेचे उद्दिष्ठ ठरविणेत आले आहे. सद्यस्थितीत केंद्रशासन, राज्यशासन व महानगरपालिका मिळून एकत्रित रक्कम रु. १६०००/- पात्र लाभार्थ्यांना शौचालय बांधणेसाठी अर्थसहाय्य दिले जाते. परंतू लाभार्थ्यांना रक्कम अदा केल्यानंतर त्यांचेकडून मुदतीत शौचालयाचे बांधकाम पुर्ण करण्यात येत नाही असे निदर्शनास येत आहे. सदर योजनेची प्रभावीपणे व कालमर्यादेत अंमलबजावणी करणेसाठी लाभार्थ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/संस्था/एजन्सीकडून प्रथमत: शौचालयाचे संपुर्ण बांधकाम पुर्ण करणे, तदनंतर त्यांचे संमतीने अनुदानाची रक्कम अदा करणे तसेच लाभार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणे त्यांच्याकडून किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या संस्थेकडून योग्य पध्दतीने काम करून घेणे व कामाची गुणवत्ता तपासल्यानंतर मोबदला अदा करणे अशाप्रकारे पुणे महानगरपालिकेने महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट मधील ७२ ब नुसार योजना राबविली असुन सदरचे मॉडेल अन्य महानगरपालिकांनी राबविणेत यावे असे शासनाने सुचित केले आहे तसेच जे लाभार्थी वैयक्तिक घरगूती शौचालयाचे बांधकाम स्वत: करतील त्यांना पूर्वीचे धोरणानुसार ररु १६,०००/- अनुदान देय राहिल.

सबब, पुणे महानगरपालिकेचे धर्तीवर लाभार्थ्यांच्या संमतीने बांधकामाची देय रक्कम रुपये १६०००/- प्रति लाभार्थी व्यक्ती/संस्था/एजन्सी इ. काम पूर्ण झाल्यानंतर व त्रयस्थ संस्थेमार्फत गुणवत्ता तपासणी अंती अदा करणेची बाब अवलोकन करणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंदा आल्हाट-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ज्या कुटूंबाकडे स्वत:चे शौचालय नाही अशा ठिकाणी वैयक्तिक शौचालय बांधणेसाठी केंद्र शासन, राज्यशासन व मनपा मार्फत अनुदान देण्यात येत आहे. त्यास झोपडपट्टीतील ब-याच झोपडीधारकांचा प्रतिसाद मिळत आहे. तथापि, झोपडपटयामध्ये काही ठिकाणी मलनि:सारण नलिका नसल्याने झोपडीधारकांना मैलापाणी निचरा करता येत नाही. त्यामुळे

खालील नमुद केलेल्या ठिकाणी मलनि:सारण नलिका टाकणे शक्य नसल्याने त्या ठिकाणी Dewatt पध्दतीचे मैलाशुध्दीकरण केंद्र/सेप्टीक टँक बांधणेत यावे. सदर Dewatt पध्दतीचे मैलाशुध्दीकरण केंद्र / सेप्टीक टँक तातडीने बांधणे आवश्यक असल्याने त्या परिसरात चालू असलेल्या मलनि:सारण विषयक कामातून करुन घेणेत यावे त्यासाठी येणा-या वाढीव खर्चास सुधारित प्रशा. मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | प्रभागाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | अ प्रभाग | एम.बी.कॅम्प इंदिरानगर, रमाबाईनगर, विदयानगर, आण्णासाहेब मगर झोपडपट्टी |
| २ | ब प्रभाग | आंबेडकर नगर, बौध्दनगर, ताथवडे, चिंचवड गावठाण |
| ३ | क प्रभाग | बोपखेल |
| ४ | ड प्रभाग | संजयनगर, सुभाषनगर |
| ५ | इ प्रभाग | संजय गांधीनगर, इंदिरा आवास वसाहत, च-होली, दिघी, सदगुरुनगर, मोहननगर, मधुबन हौ.सोसा. चक्रपाणी वसाहत |
| ६ | फ प्रभाग | मोरे वस्ती, चव्हाण वस्ती, भाटे वस्ती, तळवडे गावठाण |

**मा.शमिम पठाण-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ९३१ विषय क्रमांक- ८

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. आमुका/२/कावि/ ५८८/२०१६ दि. ६/०९/२०१६

पिंपरी चिंचवड शहरातील ज्या कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही अशा कुटुंबाना उघडयावर शौचास जावे लागते. केंद्र शासनाचे निर्देशानुसार अर्ज व कागदपत्रे सादर केल्यास वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देणेत येते. दिनांक २ ऑक्टोबर २०१७ पर्यंत शहर हांगणदारीमुक्त करणेचे उद्दिष्ठ ठरविणेत आले आहे. सद्यस्थितीत केंद्रशासन, राज्यशासन व महानगरपालिका मिळून एकत्रित रक्कम रु. १६०००/- पात्र लाभार्थ्यांना शौचालय बांधणेसाठी अर्थसहाय्य दिले जाते. परंतू लाभार्थ्यांना रक्कम अदा

केल्यानंतर त्यांचेकडून मुदतीत शौचालयाचे बांधकाम पुर्ण करण्यात येत नाही असे निदर्शनास येत आहे. सदर योजनेची प्रभावीपणे व कालमर्यादेत अंमलबजावणी करणेसाठी लाभार्थ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/संस्था/एजन्सीकडून प्रथमत: शौचालयाचे संपुर्ण बांधकाम पुर्ण करणे, तदनंतर त्यांचे संमतीने अनुदानाची रक्कम अदा करणे तसेच लाभार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणे त्यांच्याकडून किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या संस्थेकडून योग्य पध्दतीने काम करुन घेणे व कामाची गुणवत्ता तपासल्यानंतर मोबदला अदा करणे अशाप्रकारे पुणे महानगरपालिकेने महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट मधील ७२ ब नुसार योजना राबविली असुन सदरचे मॉडेल अन्य महानगरपालिकांनी राबविणेत यावे असे शासनाने सुचित केले आहे तसेच जे लाभार्थी वैयक्तिक घरगूती शौचालयाचे बांधकाम स्वत: करतील त्यांना पूर्वीचे धोरणानुसार ररु १६,०००/- अनुदान देय राहिल.

सबब, पुणे महानगरपालिकेचे धर्तीवर लाभार्थ्यांच्या संमतीने बांधकामाची देय रक्कम रुपये १६०००/- प्रति लाभार्थी व्यक्ती/संस्था/एजन्सी इ. काम पूर्ण झाल्यानंतर व त्रयस्थ संस्थेमार्फत गुणवत्ता तपासणी अंती अदा करणेची बाब अवलोकन करणेत येत आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ज्या कुटूंबाकडे स्वत:चे शौचालय नाही अशा ठिकाणी वैयक्तिक शौचालय बांधणेसाठी केंद्र शासन, राज्यशासन व मनपा मार्फत अनुदान देण्यात येत आहे. त्यास झोपडपट्टीतील ब-याच झोपडीधारकांचा प्रतिसाद मिळत आहे. तथापि, झोपडपटयामध्ये काही ठिकाणी मलनि:सारण नलिका नसल्याने झोपडीधारकांना मैलापाणी निचरा करता येत नाही. त्यामुळे खालील नमुद केलेल्या ठिकाणी मलनि:सारण नलिका टाकणे शक्य नसल्याने त्या ठिकाणी Dewatt पध्दतीचे मैलाशुध्दीकरण केंद्र/सेप्टीक टँक बांधणेत यावे. सदर Dewatt पध्दतीचे मैलाशुध्दीकरण केंद्र / सेप्टीक टँक तातडीने बांधणे आवश्यक असल्याने त्या परिसरात चालू असलेल्या मलनि:सारण विषयक कामातून करुन घेणेत यावे त्यासाठी येणा-या वाढीव खर्चास सुधारित प्रशा. मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रभागाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | अ प्रभाग | एम.बी.कॅम्प इंदिरानगर, रमाबाईनगर, विदयानगर, आण्णासाहेब मगर झोपडपट्टी |
| २ | ब प्रभाग | आंबेडकर नगर, बौध्दनगर, ताथवडे, चिंचवड गावठाण |
| ३ | क प्रभाग | बोपखेल |
| ४ | ड प्रभाग | संजयनगर, सुभाषनगर |
| ५ | इ प्रभाग | संजय गांधीनगर, इंदिरा आवास वसाहत, च-होली, दिघी, सदगुरुनगर, मोहननगर, मधुबन हौ.सोसा. |

| | | |
|---|---|---|
| | | चक्रपाणी वसाहत |
| ६ | फ प्रभाग | मोरे वस्ती, चव्हाण वस्ती, भाटे वस्ती, तळवडे गावठाण |

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९३२ विषय क्रमांक- ९

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

दि.५/८/२०१६ व दि.८/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९३३ विषय क्रमांक- १०

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

दि.२७/७/२०१६ व १०/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९३४ विषय क्रमांक- ११

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

दि. ४/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९३५ विषय क्रमांक- १२

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

दि.३/८/२०१६ व दि.१८/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १३

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.सदगुरु कदम, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.
२) मा.क प्रभाग समिती सभा दि.३/८/२०१६ ठराव क्र.१८७
३) मा.क्षेत्रीय अधिकारी क प्रभाग यांचे कडील पत्र क्र.कक्षे/कावि/ ८८/२०१६ दि१/९/२०१६

हिंदुस्थान अँटिबायोटिक्स (एच.ए) कंपनीच्या मालकीची कामगारांसाठीची औदयोगिक वसाहत ही प्र.क्र. ४० खराळवाडी भागात समाविष्ठ आहे. सदर भागातील नागरिक हे प्र.क्र. ४० चे मतदार आहेत.एच.ए.कंपनीची आर्थिक स्थिती खराब असल्याने सदर कंपनीने

एच.ए.वसाहतीमध्ये मुलभूत सेवासुविधा पुरविण्याकरिता महापालिकेस विनंती केली आहे तरी या भागात महापालिकेतर्फे सेवासुविधा पुरविण्यात याव्यात तसेच सदर कामाकरिता २०१६-१७ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात लेखाशिर्ष निर्माण करुन त्यात ५०,००,०००/- तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सद्गूरु कदम -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- हिंदुस्थान अँटिबायोटिक्स (एच.ए) कॉलनी याठिकाणी असलेल्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये प्रतिवर्षी संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी विसाव्यासाठी थांबते. त्यानिमित्ताने अनेक वारक-यांच्या दिंडया एक दिवस अगोदर मुक्कामासाठी येत असतात. पावसाळयामध्ये वारक-यांची गैरसोय होत असते. येथील मंदिराला लागून असलेल्या मोकळया जागेमध्ये डबर, गार्बेज टाकून पेव्हींग ब्लॉक बसविण्यात यावेत त्यामुळे हजारो वारक-यांची सोय होणार आहे.

तसेच मुंबई-पुणे रस्त्यावर एच.कॉलनी ते एच.ए. कंपनी दरम्यान असणा-या भूयारी मार्गाला जोडणा-या पादचारी मार्गावरील पाय-यांचे नुतनीकरण करणे जरुरीचे आहे.

वरील दोन्ही कामासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात लेखाशीर्ष निर्माण करुन त्यासाठी र.रु. ५० लाख ची तरतूद वर्ग करण्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.तानाजी खाडे-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एच.ए.कंपनीचा विषय आहे आज त्या कंपनीची परिस्थिती फार अवघड आहे. या कंपनीच्या कामगारांना चौदा महीने झाले पगार सुध्दा नाहीत. जर आपल्याला करता आलतर अधिकारी निर्णय घेतील. सभागृहात हा विषय होईल अधिका-यांनी निर्णय घ्यावा. आम्ही मानवतेच्या दृष्टिकोनातून विषय मांडलेला आहे अधिका-यांनी योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- HDFC कॉलनी या ठिकाणी देखील कामगारांची औदयोगिक वसाहत असून ही कॉलनी जुनी असून कॉलनीतील रस्ते, विजपुरवठा इ. कामे सदर कॉलनीतील रहीवासी यांना आर्थिकदृष्टया परवडत नसल्याने करु शकत नाही. तरी या भागात महापालिकेतर्फे मुलभुत सेवा सुविधा पुरविण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.महापौर -** एच.ए.ची ही उपसूचना आहे, ठिक आहे मानवता म्हणलेतरी मी त्याला मान्यता दयायला तयार आहे. पण खरंच हे आपण करु शकतो का. उगचच इलेक्शन आल म्हणून आपण काहीतरी प्रश्न मांडतो याच्यावर थोडा विचार करावा. महापालिका हे करु शकते का. खरच महापालिका हे करुन देत असेलतर मला काहीच हरकत नाही. अधिका-यांनी याच उत्तर

दयाव की आपण हे करु शकतो का. आपल्यालाही माहिती एच.ए.च्या कामगाराची परिस्थिती काय आहे ते सगळ आपण अनुभवतो. पण हे होऊ शकत का हे सांगाव.

**मा.सद्गूरु कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याच्यामध्ये आपण धोरणात्मक निर्णय घेऊ शकतो. याच्या अगोदर पण आपण तसे निर्णय घेतलेले आहेत. ती सरकारी जागा आहे खाजगी जागा नाही. ही सुविधा आपण दरवर्षी करतो. त्यांनी रस्ते लिहून दिलेले आहेत. त्याच्यामध्ये आपण शिवाजी महाराजांच्या पुतळयाच, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच आणि विठ्ठल रुक्मिणी मंदीरातल सर्व आपण महापालिकेच्या वतीने करतो.

**मा.महापौर -** अधिका-यांनी या विषयी सांगाव.

**मा.चव्हाण (शहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खाजगी जागेत आपण कुठलही काम करत नाहीत. याबाबत मनपाच्या हद्दीबाहेर किंवा याच्या बद्दल लिगल विभागाकडून अभिप्राय घेवून शासनाचा त्याच्यावर निर्णय घेवून आपण काम करु शकतो.

**मा. कैलासभाऊ थोपटे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका परीसरात जागतिक बँक अर्थसहाय्याने बी.आर.टी.रस्त्याची कामे सुरु आहेत. सदर रस्त्याचे बाधीत मिळकतधारकांना जागेची नुकसान भरपाई देणेची कार्यवाही सुरु आहे तसेच इतर काही आरक्षणे व रस्ते इत्यादीसाठी नुकसान भरपाई अदा करणे आवश्यक आहे. तरी जागा मालक यांना खाजगी वाटाघाटीने मोबदला देणे आवश्यक आहे. तरी वरील नमुद कामाकरीता मा.आयुक्त सो.यांनी मा.स्थायी समितीकडे प्रस्तावित केल्यानुसार भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर ४०.२४ कोटी इतकी वाढीव तरतूद वर्ग करणे आवश्यक असल्याने सदर तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.निलेश पांढरकर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सदगुरु कदम यांनी सूचना मांडली आहे. धार्मीक स्थळ म्हणून पालखी दरवेळेस त्याठिकाणी मुक्कामाला थांबते देहू-आळंदीचा रस्ता असेल आपल्या हद्दी व्यतिरीक्त देहू गावात जाणारा रस्ता बीआरटीच्या पध्दतीने करतो. आपण ब-याचवेळा देहू संस्थानला तीन तीन लाख रुपये अनुदान दिलेल आहे लाईटचे पोल दिलेले आहेत. कारण अख्ख्या राज्यातून लोक आपल्या शहरामध्ये येतात आपण टॉयलेट वगैरे सुध्दा देत असतो. तस विठ्ठल रुक्मिणीच मंदीर आहे ते मंदीर केंद्र सरकारच्या जागेत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ९३६ विषय क्रमांक- १३

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.सदगुरु कदम, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.
२) मा.क प्रभाग समिती सभा दि.३/८/२०१६ ठराव क्र.१८७
३) मा.क्षेत्रीय अधिकारी क प्रभाग यांचे कडील पत्र क्र.कक्षे/कावि/ ८८/२०१६ दि१/९/२०१६

हिंदुस्थान अँटिबायोटिक्स (एच.ए) कंपनीच्या मालकीची कामगारांसाठीची औदयोगिक वसाहत ही प्र.क्र. ४० खराळवाडी भागात समाविष्ठ आहे. सदर भागातील नागरिक हे प्र.क्र. ४० चे मतदार आहेत.एच.ए.कंपनीची आर्थिक स्थिती खराब असल्याने सदर कंपनीने एच.ए.वसाहतीमध्ये मुलभूत सेवासुविधा पुरविण्याकरिता महापालिकेस विनंती केली आहे. तरी या भागात महापालिकेतर्फे सेवासुविधा पुरविण्यात याव्यात तसेच सदर कामाकरिता २०१६-१७ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात लेखाशिर्ष निर्माण करुन त्यात ५०,००,०००/- तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच हिंदुस्थान अँटिबायोटिक्स (एच.ए) कॉलनी याठिकाणी असलेल्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये प्रतिवर्षी संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी विसाव्यासाठी थांबते. त्यानिमित्ताने अनेक वारक-यांच्या दिंडया एक दिवस अगोदर मुक्कामासाठी येत असतात. पावसाळयामध्ये वारक-यांची गैरसोय होत असते. येथील मंदिराला लागून असलेल्या मोकळया जागेमध्ये डबर, गार्बेज टाकून पेव्हींग ब्लॉक बसविण्यात यावेत त्यामुळे हजारो वारक-यांची सोय होणार आहे.

तसेच मुंबई-पुणे रस्त्यावर एच.कॉलनी ते एच.ए. कंपनी दरम्यान असणा-या भूयारी मार्गाला जोडणा-या पादचारी मार्गावरील पाय-यांचे नुतनीकरण करणे जरुरीचे आहे.

वरील दोन्ही कामासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात लेखाशीर्ष निर्माण करुन त्यासाठी र.रु. ५० लाख ची तरतूद वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच HDFC कॉलनी या ठिकाणी देखील कामगारांची औदयोगिक वसाहत असून ही कॉलनी जुनी असून कॉलनीतील रस्ते, विजपुरवठा इ. कामे सदर कॉलनीतील रहीवासी यांना आर्थिकदृष्टया परवडत नसल्याने करु शकत नाही. तरी या भागात महापालिकेतर्फे मुलभुत सेवा सुविधा पुरविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका परीसरात जागतिक बँक अर्थसहाय्याने बी.आर.टी.रस्त्याची कामे सुरु आहेत. सदर रस्त्याचे बाधीत मिळकतधारकांना जागेची नुकसान भरपाई देणेची कार्यवाही सुरु आहे. तसेच इतर काही आरक्षणे व रस्ते इत्यादीसाठी नुकसान भरपाई अदा करणे आवश्यक आहे. तरी जागा मालक यांना खाजगी वाटाघाटीने मोबदला देणे आवश्यक आहे. तरी वरील नमुद कामाकरीता मा.आयुक्त सो.यांनी मा.स्थायी समितीकडे प्रस्तावित केल्यानुसार भूसंपादन निधी या

लेखाशिर्षावर ४०.२४ कोटी इतकी वाढीव तरतूद वर्ग करणे आवश्यक असल्याने सदर तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १४

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.संजय काटे, मा.चंद्रकांता सोनकांबळे,मा.गिता मंचरकर, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

२) मा.क प्रभाग समिती सभा दि.३/८/२०१६ ठराव क्र.१९४

३) मा.क्षेत्रीय अधिकारी क प्रभाग यांचे कडील पत्र क्र.कक्षे/कावि/८८/२०१६ दि१/९/२०१६

प्रभाग क्रमांक ६४ दापोडी-बोपखेल मधील सर्वे नं.२८५९ मध्ये रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ नुसार घोषीत करणे.

सदर प्रभाग पिं.चिं.म.न.पा.च्या कार्यक्षेत्रातील क क्षेत्रीय विभागाअंतर्गत येत आहे सर्वे नं. २८५९ मधुन नागरीकांच्या सोयीसाठी रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे.

सदर सर्वे नं.२८५९ जागेभोवतालचा परिसर आधुनिकरणाने व नागरीकरणाने विकसित झाला असून, नागरीकांच्या दळणवळणाच्या सोयीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ नुसार घोषीत करणेत येऊन तात्काळ रस्ता बनविणेत यावा यांस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते दाभाडेवस्ती नियोजीत पुलापर्यंतचा (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ३५/१-२०१३-१४) व सी.डी.वर्क बांधणे. (निविदा क्र.३२/२२-२०१३-१४) या कामातुन ताजणेमळा-काळजेवाडी रस्त्यास रिटेनिंग वॉल व सी.डी. वर्क बांधणे या दोन्ही कामाचे आदेश ठेकेदार यांना दि०८/०८/२०१४ रोजी देणेत अलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी काम चालू केले असता विकास आराखडयातील ३० मी० रुंदीचा रस्ता ४५ मी. रुंदीचा करुन आखणीत बदल केलेमुळे येथील स्थानिक शेतकरी श्री.रघुनाथ दाभाडे व इतर भुमीहीन होत असलेने विषयांकीत कामास विरोध केलेने कामाची साईट अदयापपर्यंत उपलब्ध झालेली

नाही. सदर कामास विरोध केल्यामुळे सदरचे आरक्षण रद्द करणेकरीता मनपा मार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे. तथापि सदरचे आरक्षण रद्द होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्याने विषयांकीत काम सदयस्थितीत होत नसल्याने सदर विषयांकीत कामाच्या ऐवजी काळजेवाडी-ताजणेमळा रस्त्यास रिटेनिंग वॉल बांधणे व नाल्यावर सी.डी.वर्क बांधणेची मागणी मा.नगरसदस्य श्री.नितिन काळजे यांनी केलेली आहे.

त्यामुळे सदर कामाऐवजी विषयांकित कामातुन ताजणेमळा-काळजेवाडी-च-होली रस्त्यास रिटेनिंग वॉल बांधणे व नाल्यावर सी.डी. वर्क बांधणेस मान्यता देणेत यावी. तसेच मनपाच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ५७ अ.क्र. १०९ वर 'दापोडी येथे मुंबई पुणे रस्त्यावर FOB (पादचारी पूल) बांधणे व स्थापत्यविषयक अनुषंगिक काम करणे' या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ८५० दि.२०/४/२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर कामातील FOB (पादचारी पूल) बांधणे ऐवजी सब-वे बांधणे असा बदल करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.निलेश बारणे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे थेरगाव हद्दीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट करण्यात आलेल्या स.नं. २५ व ३० मधुन जाणारा १२.० मी. रुंद रस्ता स.नं. २५ मध्ये सरळ करणे, स.नं.३३ ते ३६ पै. मधील २४.० मी. रुंद रस्त्यापासुन थेरगाव स्मशानभुमीपर्यंत १२.० मी. रुंद रस्ता नव्याने प्रस्तावित करणे व स्मशानभुमी पासुन थेरगाव गावठाण मधील २४.० मी. रुंद रस्त्यापर्यंत सध्या अस्तित्वातील रस्ता ९.० मी.रुंद करणेकामी कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबतच्या अनुषंगाने महापालिका सभा ठराव क्र. २९० दि.२०/०५/२०१३ च्या ठरावामध्ये पुढील मजकुराचा अंतर्भाव करण्यास मान्यता देणेत यावी. 'महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सुचना मागवुन अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाही करण्याकरिता व शासनास सदर प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ९३७ विषय क्रमांक- १४

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.संजय काटे, मा.चंद्रकांता सोनकांबळे,मा.गिता मंचरकर, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

२) मा.क प्रभाग समिती सभा दि.३/८/२०१६ ठराव क्र.१९४

३) मा.क्षेत्रीय अधिकारी क प्रभाग यांचे कडील पत्र क्र.कक्षे/कावि/ ८८/२०१६ दि१/९/२०१६

प्रभाग क्रमांक ६४ दापोडी-बोपखेल मधील सर्वे नं.२८५९ मध्ये रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ नुसार घोषीत करणे.

सदर प्रभाग पिं.चिं.म.न.पा.च्या कार्यक्षेत्रातील क क्षेत्रीय विभागाअंतर्गत येत आहे सर्वे नं. २८५९ मधुन नागरीकांच्या सोयीसाठी रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे.

सदर सर्वे नं.२८५९ जागेभोवतालचा परिसर आधुनिकरणाने व नागरीकरणाने विकसित झाला असून, नागरीकांच्या दळणवळणाच्या सोयीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ नुसार घोषीत करणेत येऊन तात्काळ रस्ता बनविणेत यावा यांस मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते दाभाडेवस्ती नियोजीत पुलापर्यंतचा (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ३५/१-२०१३-१४) व सी.डी.वर्क बांधणे. (निविदा क्र.३२/२२-२०१३-१४) या कामातुन ताजणेमळा-काळजेवाडी रस्त्यास रिटेनिंग वॉल व सी.डी. वर्क बांधणे या दोन्ही कामाचे आदेश ठेकेदार यांना दि०८/०८/२०१४ रोजी देणेत अलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी काम चालू केले असता विकास आराखडयातील ३० मी० रुंदीचा रस्ता ४५ मी. रुंदीचा करुन आखणीत बदल केलेमुळे येथील स्थानिक शेतकरी श्री.रघुनाथ दाभाडे व इतर भुमीहीन होत असलेने विषयांकीत कामास विरोध केलेने कामाची साईट अदयापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. सदर कामास विरोध केल्यामुळे सदरचे आरक्षण रद्द करणेकरीता मनपा मार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे. तथापि सदरचे आरक्षण रद्द होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्याने विषयांकीत काम सदयस्थितीत होत नसल्याने सदर विषयांकीत कामाच्या ऐवजी काळजेवाडी-ताजणेमळा रस्त्यास रिटेनिंग वॉल बांधणे व नाल्यावर सी.डी.वर्क बांधणेची मागणी मा.नगरसदस्य श्री.नितिन काळजे यांनी केलेली आहे.

त्यामुळे सदर कामाऐवजी विषयांकित कामातुन ताजणेमळा-काळजेवाडी-च-होली रस्त्यास रिटेनिंग वॉल बांधणे व नाल्यावर सी.डी. वर्क बांधणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पान क्र. ५७ अ.क्र. १०९ वर ‘दापोडी येथे मुंबई पुणे रस्त्यावर FOB (पादचारी पूल) बांधणे व स्थापत्यविषयक अनुषंगिक काम करणे’ या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ८५० दि.२०/४/२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर कामातील FOB (पादचारी पूल) बांधणे ऐवजी सब-वे बांधणे असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे थेरगाव हद्दीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट करण्यात आलेल्या स.नं. २५ व ३० मधुन जाणारा १२.० मी. रुंद रस्ता स.नं. २५ मध्ये सरळ करणे, स.नं.३३ ते ३६ पै. मधील २४.० मी. रुंद रस्त्यापासुन थेरगाव स्मशानभुमीपर्यंत १२.० मी. रुंद रस्ता नव्याने प्रस्तावित करणे व स्मशानभुमी पासुन थेरगाव गावठाण मधील २४.० मी. रुंद रस्त्यापर्यंत सध्या अस्तित्वातील रस्ता ९.० मी.रुंद करणेकामी कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबतच्या अनुषंगाने महापालिका सभा ठराव क्र. २९० दि.२०/०५/२०१३ च्या ठरावामध्ये पुढील मजकुराचा अंतर्भाव करण्यास मान्यता देणेत येत आहे. 'महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सुचना मागवुन अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाही करण्याकरिता व शासनास सदर प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमत मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९३८ विषय क्रमांक- १५

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आरोग्य/६/कावि/११५/२०१६ दि.२०/९/२०१६

२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आरोग्य/६/कावि/११६/२०१६ दि.२०/९/२०१६

श्री.शंकर हुसेन लोखंडे हे ड क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य विभागात दि.०४/०८/१९९८ पासून घंटागाडी ठेकेदार म्हणून कार्यरत होते. पिंपळे सौदागर येथे गणेश विसर्जनासाठी आरोग्य विभागामार्फत त्यांची नेमणूक होती. दि१५/०९/२०१६ रोजी गणपती विसर्जनाचे कामकाज करताना त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे त्यांना आर्थीक मदत मिळणेकामी घंटागाडी ठेकेदार श्री.लोखंडे यांचे कुंटूंबियांना सध्या मिळणाऱ्या मासिक वेतन व त्यांचा शील्लक सेवेचा विचार करुन भविष्यात मिळणा-या वेतनाइतकी रक्कम ठेकेदारांच्या कुंटूंबियास एकरक्कमी आर्थीक मदत देणे व त्यांचे कुटूंबातील व्यक्तीस उदर निर्वाहसाठी नोकरी देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९३९ विषय क्रमांक- १६

दिनांक- २८.११.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.निवडणूक/३/कावि/१०४/२०१६ दि. १४/९/२०१६

२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.निवडणूक/३/कावि/१०५/२०१६ दि. १४/९/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये होत आहे. सदर महानगरपालिकेच्या निवडणूकीकरीता मा.भारत निवडणूक आयोगाकडील विधानसभेच्या यादयां वरुन महापालिकेच्या मतदार यादया तयार करण्यात येत असतात. महानगरपालिका कार्यक्षेत्रात २०५- चिंचवड, २०६- पिंपरी, २०७-भोसरी तसेच २०३-भोर विधानसभा अंतर्गत ताथवडे गाव हे भाग समाविष्ट आहेत. याकामी दिनांक-१/१/२०१७ रोजी ज्या नागरिकांचे वय १८ वर्षे पुर्ण होत आहे अशा नागरिकांना आपले नाव मतदार यादीत मतदार म्हणून नोंदविता येणार आहे. तसेच कोणताही पात्र नागरिक अथवा पात्र मतदार मतदार यादीत नाव नाही म्हणून मतदानापासून वंचित राहणार नाही याकामी मा.भारत निवडणूक आयोगातर्फे मतदार नोंदणी अभियान कार्यक्रम दिनांक- १५ सप्टेंबर २०१६ ते दिनांक-१४ ऑक्टोबर २०१६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक-१८/९/२०१६ (रविवार) व दिनांक-९/१०/२०१६ (रविवार) या दोन्ही दिवशी विशेष मोहिमेचे आयोजन करणेत आलेले आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत पात्र नागरिकांना त्यांचे नाव मतदार यादीत नोंदविणे तसेच मतदार यादीतील नाव, वय, लिंग, इ.चुकांची दुरुस्ती करणे तसेच मयत, दुबार, स्थलांतरण इत्यादि नावे वगळणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याकामी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालये तसेच शहरातील १४ महाविदयालयांमध्ये १ ऑगस्ट २०१६ पासून मतदार सहायता केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. त्यांचेमार्फत फॉर्म नं. ६ नवीन नोंदणी, फॉर्म नं. ७ नाव वगळणी, फॉर्म नं. ८ नाव, पत्ता, तपशील दुरुस्ती, फॉर्म नं. ८ अ स्थलांतरण हे फॉर्मस्

वाटप व स्विकृती करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सदरच्या विषयाचे अवलोकन करणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/४९३/१६
दिनांक - २१/१२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.